UNIVERSITY OF TORONTO
3 1761 00121560 7

Digitized by the Internet Archive
in 2008 with funding from
Microsoft Corporation

http://www.archive.org/details/treatiesagreemen00vadguoft

*SELECTIONS FROM THE GOVERNMENT RECORDS IN THE ALIENATION OFFICE POONA.*

# TREATIES, AGREEMENTS AND SANADS.

SELECTED BY

The Late Rao Bahadur GANESH CHIMNAJI VAD, B. A.

Alienation Assistant to the Commissioner C. D., Poona.

EDITED BY

PURSHOTAM VISHRAM MAWJEE, J. P., M. R. A. S.

AND

Rao Bahadur D. B. PARASNIS, M. R. A. S.

PUBLISHED WITH THE PERMISSION OF THE GOVERNMENT OF BOMBAY

BY

PURSHOTAM VISHRAM MAWJEE, J. P., M. R. A. S. BOMBAY.

PRINTED BY R. Y. SHEDGE, AT THE "NIRNAYA-SAGAR" PRESS,
No. 23 KOLBHAT LANE, BOMBAY.

1914.

Supplied by
Poona Oriental Book House
Sadashiv,
POONA 2 (India)

DS
432
M2 V34

LIBRARY
DEC 7 1973
UNIVERSITY OF TORONTO

# INDEX.


1 Raja Shahu and the Emperor of Delhi ( 1 to 5 ) ... 1 to 9
2 Peshwa Bajirao 1 and Raja Hardesai Judev ( 1 ) ... 9- 10
3 Peshwa and Nizam ( 1 to 13 ) ... ... ... ... 10- 30
4 Peshwa and the Portuguese ( 1 to 5 ) ... ... ... 30- 43
5 Satara Raja and Kolhapur Raja ( 1 to 2 ) ... ... 43- 44
6 Peshwa and Kolhapur Raja ( 1 to 17 ) ... ... ... 45- 83
7 Peshwa and Haidar ( 1 to 2 ) ... ... ... ... 83- 86
8 Peshwa and Nawab of Sawnur ( 1 to 2 ) ... ... 86- 93
9 Peshwa and Nawab of Kadapa ( 1 to 3.. ) ... ... 94-107
10 Peshwa and Nawab of Janjira ( 1 to 6 ) ... ... 107-122
11 Peshwa and Rohillas ( 1 )... ... ... ... ... 122-124
12 Peshwa and Prithwi Sing of Jeypore ( 1 ) ... ... 124-126
13 Peshwa and Nawab of Karnool ( 1 ) ... ... ... 126-127
14 Peshwa and Raghoba Dada ( 1 to 4 ) ... ... ... 127-135
15 Peshwa and Bhonsles of Nagpur ( 1 to 7 ) ... ... 135-152
16 Peshwa and Scindia ( 1 to 7 ) ... ... ... ... 152-159
17 Peshwa and Holkar ( 1 to 3 ) ... ... ... ... 159-164
18 Peshwa and Gaikwad ( 1 to 11 ) ... ... ... ... 164-197
19 Peshwa and Angria ( 1 to 3 ) ... ... ... ... 197-205
20 Peshwa and Sardesai of Sawantwadi ( 1 to 3 )... ... 205-210
21 Peshwa and Nimbalkar ( 1 ) ... ... ... ... 210-213
22 Peshwa and Pratinidhi of Vishalgad ( 1 to 2 )... ... 213-217
23 French and English ( 1 ) ... ... ... ... ... 217-220
24 Peshwa and Sawai Santaji Bhonsle ( 1 ) ... ... 220-221
25 Raghoji Bhonsle and Murshud Kulikhan ( 1 to 2 ) ... 221-222
26 Bhonsles of Nagpur and Nizam ( 1 to 2 ) ... ... 222-225

# अनुक्रमणिका.


| | | पृष्ठें. |
|---|---|---|
| १ | दिल्लीचे बादशाहा व शाहू महाराज ( १ ते ५ ) .... | १ ते ९ |
| २ | राजा हिरदेसाई व बाजीराव बल्लाळ पेशवे ( १ ).... | ९– १० |
| ३ | पेशवे आणि निजाम ( १–१३ ) .... .... | १०– ३० |
| ४ | पेशवे आणि फिरंगी ( १–५ ) .... .... | ३०– ४३ |
| ५ | साताराचे राजे व कोल्हापुरचे राजे ( १–२ ) .... | ४३– ४४ |
| ६ | कोल्हापुरचे राजे व पेशवे ( १–१७ ).... .... | ४५– ८३ |
| ७ | पेशवे आणि हैदर ( १–२ ) .... .... | ८३– ८६ |
| ८ | पेशवे आणि सावनूरकर नवाब ( १–२ ) .... | ८६– ९३ |
| ९ | पेशवे आणि नवाब कडपेकर ( १–३ ).... .... | ९४–१०७ |
| १० | जंजिऱ्याचे खान आणि पेशवे ( १–६ ) .... | १०७–१२२ |
| ११ | रोहिले आणि पेशवे ( १ ).... .... .... | १२२–१२४ |
| १२ | राजा पृथ्वीसिंग आणि पेशवे ( १ ) .... .... | १२४–१२६ |
| १३ | कर्नूलकर आणि पेशवे ( १ ) .... .... | १२६–१२७ |
| १४ | राघोबादादा आणि पेशवे ( १–४ ) .... .... | १२७–१३५ |
| १५ | पंत प्रधान व जानोजी भोंसले वगैरे ( १–७ ) .... | १३५–१५२ |
| १६ | पेशवे व महादजी शिंदे वगैरे ( १–७ ) .... | १५२–१५९ |
| १७ | पेशवे व मल्हारराव होळकर वगैरे ( १–३ ) .... | १५९–१६४ |
| १८ | पेशवे व गाइकवाड ( १–११ ) .... .... | १६४–१९७ |
| १९ | सरखेल व छत्रपति शाहू महाराज वगैरे ( १–३ ).... | १९७–२०५ |
| २० | कुडाळकर सरदेसाई व पेशवे ( १–३ ) .... | २०५–२१० |
| २१ | मुधोजी नाईक निंबाळकर व पेशवे ( १ ) .... | २१०–२१३ |
| २२ | पेशवे सरकार व प्रतिनिधी विशाळगड ( १–२ ) .... | २१३–२१७ |
| २३ | फ्रेंच सरकार व इंग्रज सरकार ( १ ) .... .... | २१७–२२० |
| २४ | पेशवे सरकार व सवाई संताजी भोंसले ( १ ) .... | २२०–२२१ |
| २५ | रघोजी भोंसले व मुरशत कुलीखान ( १–२ ) .... | २२१–२२२ |
| २६ | भोंसले नागपूरकर व निजाम ( १–२ ) .... | २२२–२२५ |

# तह व करारमदार.

## दिल्लीचे बादशाहा व शाहू महाराज.

### सनद १.

अवरंगाबाद सुभ्याचे चवथाईची सनद. निजामनमुलुक सुभेदार व फिदवी खान दिवाण पातशाही याचे मोहेरेनसीं पारसी. त्याची नक्कल हिंदवी.

गुमास्ते जागीरदार व करोडे व जमीदार सुभे अवरंगाबाद यांस लिहिलें जातें कीं, सांप्रत सुभे मजकूर येथील चवथ शिवाय सायेर व सदपंज बल्दे व परगणांत हजरत रफी-उद्दरजात यांच्या फर्मानाप्रमाणें व निजामनमुलुक सुभेदार यांच्या तजविजेनें बसालत मर्तबत राजे शाहू यांजकडे करार जाली. त्याचा तपसील परवान्याचे पाठीवर लिहिला आहे. त्या बमोजीब चवथाईचा हिस्सा राजे मशारनिल्हे यांजकडील कमाविसदारांस पोहचावीत जाणें. छ २६ रबिलावल सन दोन जुलूस.

सा सुभे दक्षणची चवथाई निजामनमुलुक सुभेदार यांच्या तजविजीनें व हजरत रफी-उद्दरजात यांचे फर्मानाप्रमाणें शिवाय सायेर व सदपंज बल्दे व परगणांत बसालत मर्तबत राजे शाहू यांजकडे मुकरर जाली. सुभे साहांपैकीं पांचा सुभ्यांच्या सनदा अलाहिदा दिल्या आहेत. छ २५ रबिलावल सन दोन फई दसखत जाली त्याचा तपसीलः—

"वकील राजे शाहू अर्ज करितो कीं, सा सुभे दक्षणची चवथाई, पंधरा हजार फौज सुभ्यासमागमें चाकरीस ठेवावी लागते, त्याचे सरंजामास हजरत रफीउद्दरजात यांच्या कारकीर्दीच्या फर्मानाप्रमाणें आमच्या यजमानाकडे मुकरर आहे. त्यास हल्लीं सनद नवी इनायत करावी." दसखत जालें कीं सनद देणें.

कैफियतः—

"राजे शाहू यांच्या वकिलाजवळ हजरत रफीउद्दरजात यांचे कारकीर्दीचे फर्मानाची नक्कल आहे. त्यांत मजकूर कीं, पंधरा हजार फौज सुभेदारासांगातें चाकरीस ठेवावी. त्याचे सरंजामास सा सुभे दक्षणची चवथाई राजे शाहू यांस इनायत जाली. पेशर्जी हुसेनअलीखां यांच्या कारकीर्दींत चवथाईचे परवाने दक्षणच्या दिवाणीच्या दप्तरांतून घेतले नव्हते. परवाने कांहीं अवरंगाबाद सुभ्याचे महालचे सुभ्याच्या दिवाणी दप्तरांतून घेतले होते."

महिपत आनंदराव वकील राजे शाहू यांणीं ताहोद लिहून दिल्हा, त्याचा तपसीलः–

"सा सुभे दक्षणच्या सरदेशमुखीची खिदमत हजरत रफीउद्दरजात यांच्या कारकीर्दीच्या फर्मानाबमोजीब व दिवाणी दप्तरच्या सनदाप्रमाणें आमचे यजमानाकडे करार जाली. सबब ताहोद लिहून दिल्हा ऐसा कीं, यजमान खिदमतीच्या लाजिम्याविशीं कायावाचामनें सादर राहून, रयतीस आबादी विशेष होय व सरकारची दौलतख्वाई व मुफसदाचें पारपत्य घडे तें करितील; व पंधरा हजार फौज सुभेदाराच्या समागमें चाकरीस ठेऊन, रयतीस आपल्याकडोन राजी राखितील, व उजाड गांवाची लावणी तीन सालांत करोन ऐसा बंदोबस्त करितील, जे दुष्टाचा उपद्रव होणार नाहीं. कदाचित् कोणाचे घरीं चोरी जाली, किंवा कोणाचा माल चोरीस गेला, तरी चोरास शिक्षा व ज्याचा माल त्यास देतील. कदाचित् चोरास शिक्षा करोन चोरीचें ठिकाण न लागे, तरी चोरीचे मालाची निशा आपण करितील. शिवाय चवथ व सरदेशमुखी अधिक लोभ धरणार नाहींत, अगर जाहिर जाल्यास जे रुपये ज्यादा तलबी करोन घेतील, ते सरकार–आलींत दाखल करितील. हा ताहोद लिहिला असे. छ २४ रबिलावल सन दोन जलुसी."

सुभा एक सरकारा दहा १०.

| | |
|---|---|
| सरकार दौलताबाद १ | सरकार पैठण १ |
| सरकार अहमदनगर १ | सरकार बीड १ |
| सरकार धारूर १ | सरकार सोलापूर १ |
| सरकार परांडे १ | सरकार जुन्नर १ |
| सरकार संगमनेर १ | सरकार जालनापूर १. |

## सनद २.

सा सुभे दक्षणच्या सरदेशमुखीची सनद नबाब अमिरुलउमरा फेरोजंग बक्षी व दियानतखान दिवाण पातशाही यांचे मोहरेनसीं, त्याची हिंदवी नक्कल.

सांप्रत सा सुभे दक्षणच्या सरदेशमुखीची खिदमत बसालत मर्तबत शाहूराजे यांणीं सरकारची पेशकष एक करोड सतरा लक्ष एकुणीस हजार तीनशें नव्वद रुपये बारा आणे पैकीं खिलत जाली. यावर चवथाई नगद व तीन हिस्से किस्तबंदी ऐसी कबूल केली. सबब अमिरुलउमरा फेरोजंग बक्षी यांचे मोहरेनसीं शाहूराजे यांजकडे मुकरर जाली. त्यास राजे यांणीं खिदमतीच्या लाजिम्याविशीं सर्व काल सादर राहून, रयतेची आबादी ज्यादा होय व सरकारची दौलतख्वाई व मुफसदाचें पारपत्य घडे तें करावें. कदाचित् कोणाचे येथें चोरी जाली, तरी चोरास शिक्षा व ज्याचा माल त्यास द्यावा. अगर रुपये नगद द्यावे. व हमेश चांगल्या जमीयतीनसीं सरकारचाकरींत हजीर असावें. व पेशकषीचा ऐवज जाबत्याप्रमाणें किस्तबंदीनें खजान्यांत दाखल करीत जावा. दरशेंकडा दहा रुपये रुसूम

घेत जावा. याखेरीज अधिक लोभ करूं नये. देशमुख, देशपांडे व मोकदम व रयत व मुजारी सा सुभे दक्षण यांणीं रुजू राहून सरदेशमुखीचा रुसूम राजे यांजकडे देत जावा. छ १९ रबिलावल सन सात जलुसी.

## सनद ३.

सा सुभे दक्षणच्या सरदेशमुखीची खिदमत शाहूराजे यांणीं सरकारची पेशकष एक करोड सतरा लक्ष एकुणीस हजार तीनशें नव्वद रुपये बारा आणे, पैकीं खिलत व फर्मान इनायत जालीयावर नगद चवथाई व बाकी तीन हिस्से किस्तबंदीनें द्यावे, असी कबूल केली. सबब अमिरुलउमरा फेरोजंग बक्षी यांचे मोहरेनसी राजे याकडे मुकरर जाली.

छ १६ रबिलावल दफ्तरांत ताहोद जाला त्याचा तपसील:—

"शाहूराजे यांचा वकील विनंती करितो कीं, दक्षणचा मुलुक मुफसदाच्या उपद्रवाकरितां बहुत दिवसांपासून वैराण व खराब जाला, अगर सा सुभे दक्षणच्या सरदेशमुखीची खिदमत दरशेंकडा रुसूम दहा रुपये याप्रमाणें माझ्या यजमानाकडे मुकरर व्हावी. पातपाहाच्या प्रतापेंकरोन दुष्टाचें पारपत्य व मुलकाची आबादी अमलांत येईल, व मुफसद सरहद्दंत राहून रयतीस उपसर्ग देतात, त्यास काढोन देतील व ऐसा बंदोबस्त करितील कीं मुशाफर पांथस्थ सुखेंकरोन जात येत जातील. कोठें चोरी जाली तरी चोरास शिक्षा व ज्याचा माल त्यास पावता करितील; किंवा मालाचे रुपये नगद देतील. व सुभेदारासमागमें जमीयतसुद्धां राहून पातशाही सेवा एकनिष्ठपणें करीत जातील. त्यास मुलूक अतिशय वैराण व कमहासील; शंभरास एक वसूल नाहीं; सबब जावत्याप्रमाणें पेशकष कबूल नसे. एक करोड सतरा लक्ष एकोणीस हजार तीनशें नव्वद रुपये बारा आणे सरदेशमुखीची पेशकष कबूल आहे. पैकीं खिलत व फर्मान इनायत जालीयावर चवथाई नगद व तीन हिस्से किस्तबंदीनें खजान्यांत दाखल करीन. याप्रमाणें शाहूराजे यांचा वकील विनंती करितो व सनद द्यावी ह्मणोन उमेदवार आहे."

पेशकषीची फर्द मंजूर होऊन दसखत जालें कीं मुचलका घेऊन सनद द्यावी.

जावत्याप्रमाणें सरकारच्या पेशकषीचा आकार

दक्षण सुभे ६.

जमा १८०५१७२९४।~।।। रुपये

तपसील.

| | |
|---|---|
| १२३७६०४२।।=।।। | सुभे अवरंगाबाद. |
| ११५२३५०८।।।=।।। | सुभे वराड. |
| ७४९१८७९।।।·। | सुभे बिदर. |
| ७८५०८५६०।।।=। | सुभे बिजापूर. |

| | |
|---|---|
| ६४८६७४८३ | सुभे हैदराबाद. |
| ५७४९८१९८॥· | सुभे खानदेश. |
| १८०५१७२९४।~॥ | |

सरदेशमुखी दरशेंकडा रुपये १० एकूण १८०५१७३० रुपये.

पेशकष सरकार दर हजारी ६५१० एकूण ११७५१६७६२ रुपये.

पैकीं शाहूराजे यांचे वकिलानें कबूल केली ११७१९३९०॥ रुपये.

| | |
|---|---|
| खिलत सनद जालीयावर चवथाई | बाकी किस्तबंदीनें द्यावे. |
| नगद २९२९८४७॥≈ रुपये. | ८७८९५४३८~ रुपये. |

मुचलका छ १९ रविलावलीं दिल्हा, त्याचा तपसीलः—

वकील राजे शाहू याणें मुचलका लिहून दिधला ऐसा कीं, सा सुभे दक्षणचे सरदेशमुखींची खिदमत अमिरुलउमराव फेरोजंग बक्षी यांचे मोहरेनसीं आमच्या यजमानाकडे मुकरर जाली असे, सबब सरकारची पेशकष एक करोड सतरा लक्ष एकोणीस हजार तीनशें नव्वद रुपये बारा आणे कबूल केली, पैकीं खिलत व फर्मान इनायत जालीयावर चवथाई नगद व तीन हिस्से किस्तबंदीनें याप्रमाणें यजमानासही कबूल आहे. ११७१९३९०॥ रुपये.

खिलत व फर्मान इनायत जालीयावर चवथाई नगद. २९२९८४८ रुपये.

बाकी किस्तबंदीनें द्यावे. ८७८९५४२॥ रुपये.

मुचलका छ १९ रबिलावलीं दिल्हा त्याचा तपसील.

"यादोराव वकील राजे शाहू याणें मुचलका लिहून दिधला ऐसा कीं, सा सुभे दक्षणचे सरदेशमुखीची खिदमत अमिरुलउमराव फेरोजंग बक्षी यांचे मोहरेनसीं आमचे यजमानाकडे मुकरर जाली. त्यास यजमानानीं रास्ती व वाजवीच्या मार्गें खिदमतीस सादर राहून रयतीची आबादी व सरकारची दौलतरुवाही व मुफसदाचें पारपत्य करीत जावें. कदाचित् कोठें चोरी जाली तरी चोरास शिक्षा व ज्याचा माल त्यास किंवा मालाचे रुपये नगद देतील व चांगल्या जमीयतेनसीं सरकारचाकरींत हजीर राहतील व चाकरी करोन दाखवितील."

दक्षण सुभे ६.

| | |
|---|---|
| सुभे अवरंगाबाद दरोबस्त १ | सुभे वराड दरोबस्त १ |
| सुभे बिजापूर दरोबस्त १ | सुभे बिदर दरोबस्त १ |
| सुभे हैदराबाद दरोबस्त १ | सुभे खानदेश दरोबस्त १ |

## सनद ४.

कदीम राज्याचे महालाची सनद, अमिरुलउमराव फरोजंग बक्षी यांचे मोहरेनसीं. त्याची नक्कल हिंदवी.

"दरीविला राजे शाहू यांणीं सरकारची पेशकष रुपये दाहा लक्ष पैकीं खिलत व फर्मान

इनायत जालीयावर चवथाई नगद व तीन हिस्से किस्तबंदीनें द्यावे ऐशी कबूल केली. सबब कदीम राज्याचे महाल पेशजीप्रमाणें राजे याजकडे करार जाले. त्याचा तपसील परवान्याचे पाठीवर लिहिला असे. त्यास राजे यांणीं एकनिष्ठपणें सादर राहून रयतीची आबादी विशेष होय आणि सरकारची दौलतख्वाही व दुष्टाचें पारपत्य घडे तें करावें व पातशाही सेवकपणाचे धर्म कायावाचामनें करीत जावे. कोणेविशीं चुकूं नये. सरकारची पेशकष करारबमोजिब खजान्यांत दाखल करावी. देशमुख व देशपांडे व मुकदम व मुजारी व रयत यांणीं महाल मजकुराचें राज्य राजे याजकडे जाणावें व राजाचे आज्ञेखेरीज वर्तों नये. येविशीं ताकीद जाणून लिहिली. याप्रमाणें अमलांत आणावें. छ २१ जमादिलावल सन सात जलुसी."

राजे शाहू यांणीं सरकरची पेशकष रुपये दहा लक्ष पैकीं खिलत व फर्मान इनायत जालीयावर चवथाई नगद व तीन हिस्से किस्तबंदीनें द्यावे ऐसी कबूल केली, सबब कदीम राज्याचे महाल राजे याजकडे मुकरर केले असेतः—

महाल ३७ सुमारें.

तपसील.

| बाळाघाट महाल सुमार २४ | तळकोंकण महाल सुमार १३ |
|---|---|
| १ परगणे पुणें तर्फा ६ | १ परगणे रामनगर घनदेवी |
| १ परगणे बारामती तर्फा | १ परगणे जवार |
| १ परगणे इंदापूर | १ परगणे भिवंडी तर्फा १२ |
| १ परगणे मावळ तर्फा १३ | १ परगणे कल्याण तर्फा २० |
| १ परगणे वाई तर्फा ४ | १ परगणे चेऊल तर्फा ६ |
| १ परगणे सातारा तर्फा ६ | १ परगणे राजपुरी तर्फा १२ |
| १ परगणे कसराबाद तर्फा ९ | १ परगणे दाभोळ तर्फा ११ |
| १ परगणे खटाव तर्फा ११ | १ परगणे भिमगड तर्फा ५ |
| १ परगणे माण तर्फा ४ | १ परगणे जावली तर्फा १८ |
| १ परगणे फलटण | १ परगणे राजापूर तर्फा १८ |
| १ परगणे मलकापूर तर्फा ४ | १ परगणे फोंडा तर्फा ५ |
| १ परगणे पनाळा तर्फा १० | १ परगणे अंकोला तर्फा ५ |
| १ परगणे तारळा तर्फा ५ | १ परगणे कुडाळ तर्फा १५ |
| १ परगणे अदसर (आजेंरे?) तर्फा ११ | १३ |

१ परगणे जुन्नेर तर्फा १३

१ परगणे सोलापूर तर्फा ९

मलगाव वगैरे महिपालगड वगैरे साहा किल्याचे बेगमीस महाल. तपसील:—

८ परगणे मजकूर १
परगणे करक १
परगणे नवलगुंद १
परगणे मलेहाल १
परगणे संपगाव १
परगणे लक्ष्मेश्वर १
परगणे कोपाल १
परगणे १

२४

## सनद ५.

कदीम राज्यांतील महाल तपसीलवार दाहा लक्ष रुपये सरकार नजरेचे कबूल केले. त्यांतून फर्मान सादर होतांच चार हिस्से नगद व बाकी किस्तबंदीनें खजान्यांत साबिक दस्तुराप्रमाणें दाखल करणें, ह्मणोन राजे शाहू यांजवर कृपा जाहाली. महाल वितपसील:—

घाटावरील महाल.

६ परगणे पुणें महाल
१ तर्फ हवेली मजकूर
१ तर्फ निरथडी
१ तर्फ कडेपठार
१ तर्फ सांडस
१ तर्फ पाटस
१ तर्फ सासवड
६

५ परगणे तारळा महाल
१ तर्फ हवेली मजकूर
१ तर्फ असंदोली
१ तर्फ आरळें
१ तर्फ खानापूर
१ तर्फ घोल.
५

६ परगणे सुपे व बारामती.
१ परगणे इंदापूर.
१ तर्फ वाई.
१ तर्फ हवेली मजकूर.
१ तर्फ निंब.
१ तर्फ वाघोली.
१ तर्फ कोरेगांव.
६

९ परगणे पनाळा महाल.
१ तर्फ कलमसर.
१ तर्फ कोडोली.
१ तर्फ सातवे.
१ तर्फ ठाणें.
१ तर्फ बोरगांव.
१ तर्फ आष्टे.
१ तर्फ आगजे.
१ तर्फ रोकडी.
१ तर्फ वाळवें.
९

१२ परगणे मावळ महाल.
१ तर्फ कर्यात मावळ.
१ तर्फ कानदखोरें.

१ तर्फ गुंजनमावळ
१ तर्फ नाणेंमावळ
१ तर्फ पहूडखोरें
१ तर्फ पौनमावळ
१ तर्फ मुठें खोरें
१ तर्फ मोसें खोरें
१ तर्फ यलवंड खोरें
१ तर्फ हिरडोस मावळ
१ तर्फ रोहिडखोरें
१ तर्फ शिरवळ

१२

६ परगणे सातारा महाल.
१ तर्फ हवेली मजकूर
१ तर्फ परळी
१ तर्फ तारगांव
१ तर्फ उमरज
१ तर्फ कुडाळ
१ तर्फ वंदन

६

९ परगणे कसराबाद महाल.
१ तर्फ हवेली मजकूर
१ तर्फ मारूल
१ तर्फ तारसा
१ तर्फ तारळा
१ तर्फ कोळा
१ तर्फ मरळी
१ तर्फ कर्यात माल
१ तर्फ पाटण
१ तर्फ वनवाला

९

११ परगणे आजरें महाल.
१ तर्फ हवेली मजकूर
१ तर्फ आजरें
१ तर्फ गणेगांव
१ तर्फ करतोली
१ तर्फ आंतोली
१ तर्फ महागांव
१ तर्फ आनवर
१ तर्फ काशी
१ खानापूर
१ तर्फ केले
१ तर्फ सरी

११

१४ परगणे जुन्नर महाल.
१ तर्फ खेड
१ तर्फ नारायणगांव
१ तर्फ निघोज
१ तर्फ इंदर
१ तर्फ रायवाग
१ तर्फ वळेगांव
१ तर्फ मेढखोरें
१ तर्फ महाळुंगे
१ तर्फ आंगूर
१ तर्फ आवसरी
१ तर्फ घोडे
१ तर्फ वोर
१ तर्फ मनचर
१ तर्फ पावळ

१४

११ परगणे खटाव महाल.
१ तर्फ हवेली मजकूर
१ तर्फ कर्यात मलवडी
१ तर्फ वांगी
१ तर्फ कर्यात निमसोड
१ तर्फ कर्यात मायणी
१ तर्फ कर्यात अलकुंडे
१ तर्फ कर्यात रिंद
१ तर्फ कर्यात आबंद
१ तर्फ कर्यात भांबोली
१ तर्फ कर्यात खानापूर
१ तर्फ कसबे कलेढोण
११

४ परगणे माण महाल.
१ तर्फ कर्यात वहेगांव
१ तर्फ कर्यात अबलापूर
१ तर्फ कर्यात भसूर
१ तर्फ कर्यात असदभारी
४

१ परगणे फलटण.

४ परगणे मलकापूर महाल.
१ तर्फ हवेली मजकूर
१ तर्फ वारुण
१ तर्फ कासेगांव
१ तर्फ वराल
४

९ परगणे कोल्हापूर महाल.
१ तर्फ हवेली मजकूर
१ तर्फ कागल
१ तर्फ रायबाग
१ तर्फ एकशंबे
१ तर्फ सालुगांव
१ तर्फ शिवलिंगें
१ तर्फ कर्यात पंज ५
१ तर्फ कर्यात कल
१ तर्फ जोगी
९

४८

५९

मालेगांव वगैरे किल्ले पेश्व्यांतील महालांत पूर्वीपासून राजा शाहू यांजकडे आहेत व राजे मजकूर यांणीं सरकारचाकरी आख्तीयार केली, त्यास किल्ले मजकूरचे किल्लेदारास वेतन

वगैरे नेमणूक नाहीं. यास्तव रुपये ६०००० साठ हजार दरसाल, दर किल्यास रुपये बारा हजारप्रमाणें, फारसीमध्यें लिहिले आहेत, परंतु किल्ले साहा त्यापेक्षां दर किल्यास दाहा हजारप्रमाणें असावें. बारा हजार चुकून लिहिलें आहे. त्यास दाहा हजारप्रमाणें या परगण्यांतून मुकरर करणें. किल्ले बितपसील:—

| | |
|---|---|
| ३ किता | ३ किता |
| १ किल्ले महिमानगड | १ किल्ले सुवर्णदुर्ग |
| १ किल्ले महिमंतगड | १ किल्ले कोपळ |
| १ किल्ले भुजंगगड | १ किल्ले बहादूरबिंडा |
| ३ | ३ |

## २ राजा हिरदेसाई व बाजीराव बल्लाळ पेशवे.

### सनद १.

कौलनामा श्रीमहाराजाधि राजश्री महाराजा श्री राजा हिरदेसाई जुदेवं कुदं श्री राव बाजीराव मुख्य प्रधान यांणीं दिल्हा कौलनामा ऐसा जे:—तुमचा आमचा कौलकरार जाहला कीं, जे तुमचा वेव्हार, वडाई, मरातीब आहे, तो कधीं कम होणार नाहीं. दिवसें दिवस तुमचा आमचा वेव्हार मरातीब अधिक होईल. जे तुमचे बापाचे वेळची जागा अंमल आहे, त्यापैकीं कोणे गांवाविशीं आह्मी घेणार नाहीं. धामोणीचे किल्याची व जागेयाची आह्मी रजबदले करणार नाहीं. आणखी तुमचा भाई, भतीजा, कुंवर, ठाकूर, चाकर, गैरराज मिदार कोणीही तुह्मांपाशीं गैरराजी होऊन आह्मांपाशीं येईल, त्यास आह्मी ठेवणार नाहीं. त्याची समजाई करून तुमचे हवालीं करूं. आमची फौज तुमचे जागेयांत उपद्रव करणार नाहीं. कोणे समयीं आमची फौज तुमचे राज्यांत गेल्यास आपले पदरींचा रोजमरा खर्च करीत जातील. तुमचे मुलुकपैकीं घेणार नाहींत. दक्षणची फौज कोणाचीही तुमचे मुलकांत गेल्यास ताकीद करून मनाई करूं; व पातशाई फौज तुमचेवर चढाई करून आल्यास आह्मी तुमची मदत करून येऊं. ज्याप्रमाणें सातारा पुणा याचें रक्षण करितों, त्याप्रमाणें तुमचे राज्याचें संरक्षण करूं; आणि आह्मांवर मोंगलाची फौज आल्यास तुह्मीं आमची मदत करीत जावी. पातशाहीमध्यें राह आह्मी आपली करून घेऊं, ते समयीं तुमचाही बंदोबस्त करून घेऊं. एकानें सत्र एकानें मित्र, याप्रमाणें करार पिढी दर पिढी तुमचे आमचे चालत जातील. आणखी, चामील व जमुना पैलापार भदावरचें राज्य, शिवाय तुमची आमची फौज गेल्यास जो मुलुक रुपया कमाईमध्यें पैदा होईल तो, आपले फौजेप्रमाणें वांटून घेत जाऊं. तुमचे फौजेचे अन्वयें तुह्मीं घ्यावें. आमचे फौजेप्रमाणें आह्मांस द्यावें. तुह्मी

आह्मांस पेशजी सवा दोन लाखांची व हल्लीं पावणे तीन लाखांची जागीर एकूण पांच लाखांची दिल्ही, ती दोनी राजे मिळोन सवा एक हिसे बमोजिब आह्मांस देत जावी. याशिवाय रुपयाची व गांवाची कोणेक समयीं रजबदली करणार नाहीं. या कराराप्रमाणें हमेशा चालत जाईल. यासी सोगंध श्री रामचंद्रजी व श्री सदाशिवजी तुलसी बेलपत्राची आहे. या गोष्टीस दरम्यान श्री चिमाजी आपा व श्री नाना व पिलाजी जाधव व मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे व यशवंतराव पवार व जानोजी समशेर आहेत. यांत अंतर होणार नाहीं. आह्मांस हिंदुस्थानास काम पडल्यास तुह्मीं आह्मांस सामील व्हावें. आणखी आमचे इतलेशिवाय मोंगलाशीं सलूक करूं नये. कदाचित् मोंगलाची भारी फौज आल्यास दोन महिने लढाई करावी. दोन महिनेयांत आमची फौज तुमचे मदतीस न आली, तर मतलबी सल्ला करावा. त्यास आह्मी वाईट मानणार नाहीं. तुमची फौज येऊन पोचली, तर तुह्मीं आह्मीं एकविचारें सामील होऊन, उभयेतां मिळोन, मोंगलाची फौज हटवून देऊं. मिती आषाढ शुद्ध ७ संवत १७९५

---

## ३ पेशवे आणि निजाम.

### सनद १.

श्री.

याद़ी नवाब निजामअलीखान बहादर यांजकडील कलमांचे जाबसाल सरकारांतून सु ॥ तिसा सितैन मया व अलफ.

किले अणकाई व राजदेहर, तह खेरीज सरकारांत घेतले आहेत; ते द्यावे ह्मणोन रुकनुतदौला बहादर ह्मणतात. त्यास किले नळदुर्ग नवाबानीं तहामध्यें सरकारांत दिल्हा असतां फिरोन घेतला, सबब त्या ऐवजीं सदरहू दोन्ही किले सरकारांत ठेविले असत. येणेंप्रमाणें करार.

सदरहू प्रमाणें असल याद खास दस्तुरी कराराची शिक्क्यानसीं रुकनुतदौलेबहादर दिमत नवाब निजामअलीखान याजवळ दिल्ही असे. येणेंप्रमाणें करार.

परगणे बीड व परगणे पाथरी येथील जागिरीचा अंमल तुह्मीं आपले सरकारांत ठेवणार. त्यास, त्यास दोही महालांत खराज्याचा अंमल, मुकासा, बाबती, सरदेशमुखी, सवोत्रा, कचे आकारास वाजवी अंमल इकडील अंमलदार घेतील. जाजती सरकारांतून उपद्रव होणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

छ १ जमादिलाखर रुजू रजब सन तिसा सितैन पर्यंत किले व महाल मोंगलाईकडे चालतात ते चालतील, व सरकारांत चालतात ते सरकारांत चालतील. येणेंप्रमाणें सरकारचे तालुकदारांनीं मध्येंच राजकारण करून नवाबाकडील किल्ला व मुलुक घेतला तर माघारा नवाबाकडे द्यावा. बेदिकत द्यावा. येणेंप्रमाणें करार.

## सनद २.

श्री.

तहनामा श्रीमंत राजश्री रघुनाथ बाजीराव प्रधान यांचा व नवाब निजामुद्दौले बहादर असफजाहा यांचा जे तर्फेनची दोस्ती जफरुद्दौले बहादर यांचे मार्फतीनें ठरला. नवाब असफजाहानीं, हालीचा बखेडा सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन यांणीं मुलाचे नांवें-करून केला आहे. त्यांचा पक्ष सोडावा. जे सरकारचे दुष्मन लहान मोठे, ते नवाबांनीं आपले मोजून, त्यांचे पारपत्यास सर्व प्रकारें अनकूल असावें. मागील जाहाला प्रकार तें दोहोकडेही मनांत नसावें; आणि आतां हा तह दोस्तीचा ठरला, तो शेवटपर्यंत निभवावा. या कामां-संमधें नवाब असफजाहा यांस नफा येणेंप्रमाणें—

सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन यांणीं मुलांचे नांवेंकरून जो मुलूक व किल्ले दौलताबाद दिल्ही आहे, त्यांत जे नवाबाचे पदरीं पडोन अमल दाखल जाहला असेल त्याच्या सनदा सरकारांतून करून देऊं. सदरहू दोघांनीं मुलांचे नांवें बफद करून जें लेहून दिल्हें आहे तें सर्व रद्द असे. हालीं सरकारांतून करार लेहून दिल्हा आहे हा प्रमाण. याप्रमाणें अमलांत येईल. येणेंप्रमाणें प्रथम कलम १.

येणेप्रमाणें कलम करार

प्रथम कलम लिहिलें आहे त्याखेरीज आणीख द्यावयाचा करार येणेंप्रमाणें:—

१ पहिले जे फितुरी यांनीं सरकारचे परगणे दिल्हे आहेत, त्यांत अंमल दाखल नवाबाचा जाहला असेल. त्याखेरीज हालीं तीस लक्ष रुपयांचे किमतीचे द्यावे. त्यांतच शहर बराणपूर व बराणपूरचे लगत व शहर औरंगाबादचे लगते परगणे सरकार तालुके असतील ते लावून देऊं. येणेंप्रमाणें कलम

किल्ले हाय.

१ किल्ले असेरी

१ किल्ले सोलापूर

२

दोन किल्ले द्यावयाचा करार केला असे. हे दोनी किल्ले देऊं. कलम १

२ एकूण दोन कलमें करार.

एकूण तीन कलमें लिहिल्याप्रमाणें अमलांत सरकारांतून बजदफेत येतील. हालीं कोणे गोष्टीचा अंदेशा व खतरा चित्तांत न आणितां, सर्वप्रकारें फितुरीयांचे पारपत्यास नवाबांनीं हरवक्त अनकूल असावें. परस्परें दोस्ती होऊन सरकारमसलतीस नवाब अनकूल जाहाले; फितुरी याचा पक्ष बिलकूल सोडिला नाहीं; राजा होऊन फितुरी यासी बिघाड केला; हे

चाल आतांपासूनच धरावी. सरकारांतून सदरहु तीन कलमें लेहून दिल्हीं असेत. याप्रमाणें करार जाणिजे. छ. १५ रबिलावल सु॥ सीत सबैन मया व अलफ. मोर्तब.

छ ४ रबिलावल सन सीत सबैन वैशाखमास मुक्काम नजीक सुरत.

---

## सनद ३.

सरकार राजश्री रघुनाथ बाजीराव प्रधान यांचा व नवाब निजामुदौले बहादर असफजाहा यांचा सलुख जफरुदौले बहादर यांचे मार्फतीनें ठरला, त्यांची याद आलाहिदा जाहली असे. त्याप्रमाणें परस्परें अमलांत येईल व यावें. या कारभारसंमधीं सरकारांतून जफरुदौले बहादर यांस पांच लक्ष रुपये यांची जाहागीर रयात करावी, ऐसा करार करून लेहून दिल्हें आहे. त्यास जफरुदौले ह्मणतात कीं, हें काम करून दाखवूं. आपले दौलतीवर श्रीमंत बसतील, उपरांत जे कृपा करून देतील तें घेऊं. हे गोष्ट फार बरी असे. मनावर जें काम धरिलें आहे, खातरीनें शेवटास न्यालच. खातरजमा सरकारची असे. बंदफत्ते जफरुदौले बहादर यांस खुशी केलें जाईल. येणेंप्रमाणें करार.

छ १५ रबिलावल सु॥ सीत सबैन मया व अलफ. मोर्तब.

छ ४ रबिलावल वैशाखमास सन सीत सबैन मुक्काम सुरत.

---

## सनद ४.

यादी नवाब निजामअलीखां बहादूर व राव पंतप्रधान यांचा तहनामा फत्तेअलीखान यांचे मसलतसंमधें वगैरेचा यादगिरीचे मुकामीं जाला. अलीकडे तर्फेनचे सरदार व फौजा मसलतीवर कायम जाले. त्यास, प्रथम मोहीम कृष्णा व तुंगभद्रा या दुवाब्यांत ठरली. सबब तर्फेनचे विचारें व सलाहानें तहनाम्याअलीकडील ठरावाचीं कलमें बितपसील सन १२०० हिजरी, मुताबीक सन ११९६ फसली, सबा समानीन मया व अलफ.

कडपे तालुका सुटेल व मोहीम तमाम होय, तोंपर्यंत दुवाब्याचा मुल्क निमेनिम तक्सीम व्हावा. कलम १.

सांप्रत निमेनिम प्रमाणें वर्तावें. मोहीम तमाम जाल्यावर यादगिरीचे मुकामीं तहनामा जाहला आहे, त्याप्रमाणें सरकारचा तालुका सरकारांत राहील. कडपे तालुका तहनाम्याप्रमाणें नवाबाचे सरकारांत राहील.

सरकार तालुका व नवाबाचे सरकारचा कडपे वगैरे तालुका तहनाम्यांत दाखल आहे; त्यास दोन्ही तालुके सुटत तोंपावेतों फत्तेअलीखान यांसीं सलूक करूं नये. येणेंप्रमाणें करार करावें.

कडपे तालुका अजमासें दहा लक्ष रुपयांचा सुटला व किल्ल्यापैकीं एखादा किल्ला सुटल्यास जो किल्ला सुटेल त्याचे परगणे

असतील ते महाल दुवाब्याचे वांटणीपैकीं आह्मी आपले वांटणींत लावून घेऊं. वरकड तालुका कडप्यावद्दल निमे तुह्मांकडे निमे आमचे सरकारांत राहील. कलम १.

जो किल्ला सुटेल, त्या किल्ल्याचे सरकारचे महाल तहनाम्याप्रमाणें दुवाब्याचे वांटणीपैकीं नवाबांनीं मजुरा देऊन, तितका तालुका नवाबांनीं सरकारांत दुवाब्यापैकीं द्यावा. किल्ल्याखेरीज मुलूक सुटेल तो, जेथील तेथें, निमेनिम प्रमाणें, तर्फेनें घ्यावा. येणेंप्रमाणें करार करावें.

दुवाब्याचा मुलूक जसजसा सुटेल तसी तसी वांटणी लागलीच केल्यास, ज्याचे ते महाल मजकूर वगैरे, शिबंदी खर्च, सोईनें करतील; अगर करार ठरल्याप्रमाणें सरकारचा आमीन राहावा ऐसें असल्यास, महाल मजकूर वगैरे जरूरी खर्च सरकारचे आमीनाचे इतल्यानें करावा. महालाचे कच्चे आकारापैकीं महाल मजकूर वगैरे वजा होऊन, बाकीचा ऐवज निमेनिम तकसीम व्हावा. कलम १.

तालुका निमेनिम प्रमाणें वांटावा. सरकारचे निमेंत सरकारचे कमाविसदार राहतील; तेथें नवाबाकडील आमीन दाखल्यास असावा. व नवाबकडील निमे तालुक्यांत नवाबाकडील कमाविसदार राहातील; त्यांजवळ सरकारचे आमीन दाखल्यास असावे. तर्फेन आमीनाचे दाखल्यानें कमाविसदारांनीं वर्तणूक करावी. कच्चा आकार होईल त्यांत, दोहींकडील किल्ल्यांचा व महाल मजकूर खर्च समाईक वजा होऊन, बाकी ऐवज निमेनिम प्रमाणें वांटून घ्यावा. किल्ल्याचा खर्च तर्फेनचे विचारें ठरवावा. येणेंप्रमाणें करार करावें.

होळकर व गणेशपंत बेहेरे वगैरे यांजकडे सरकारचे कारकून इतल्यास जावे व आजपावेतों कमाविस लूट वगैरे जाली असेल त्याची इतला द्यावी. कलम १.

सरकारांत आलें असेल त्याची वांटणी निमेनिमप्रमाणें होईल. असदअलीखान वगैरे यांजकडील याद नवाबाचे सरकारची यावी. सरकारची द्यावी. येणेंप्रमाणें करार करावें.

संस्थानिकाचा ठराव होईल तो तर्फेनचे विचारें व सलाहानें व्हावा व पुढील वर्तणुकेचे मुचलके घ्यावे. कलम १.

सदरहूप्रमाणें करार करावें.

हरएक संस्थानिकाकडील जमीयेत नौकरीस येईल ते निमेनिम तर्फेनें असावी. कलम १.

निमेनिमप्रमाणें जमियेत दोहींकडे राहील. येणेंप्रमाणें करार करावें.

कडपे तालुका कांहीं सुटल्यास, सिधवट अगर गंजीकोटा किल्ले सुटल्याखेरीज तालुका सुटेल तो जमा धरून, दुवाब्याचे तालुकीयांत निमे वांटणीपैकीं मजुरा द्यावयाचा नाहीं. जेथील तेथें वांटणी होईल. कलम १.

किल्ल्याखेरीज तालुका सुटेल, तो त्याच तालुक्यांत तर्फेन वांटून, निमेनिम प्रमाणें घ्यावा. येणेंप्रमाणें करार करावें.

दुवाब्याचे किल्ल्याची वांटणी समान रीतीनें व्हावी. कलम १.

दुवाळ्याचे किल्ले सुटतील त्यांपैकीं तर्फेनें सलाहानें निमे सरकारांत राहतील, व निमे नवाबाचे सरकारांत कडपे तालुक्याचे किल्ले सुटत तोपर्यंत राहातील. कडपे तालुक्यांतील किल्ले सुटल्यावर दुवाळ्यांतील किल्ले नवाबांनीं सरकारांत द्यावे. येणेंप्रमाणें करार करावें.

आमीन सरकारचा राहील. त्यानें जमेची गोष्ट सांगितल्यास ऐकावी. इतल्याशिवाय करूं नये. कलम १.

वाजबी किफाइतीची गोष्ट सांगितल्यास परस्परें ऐकावी. येणेप्रमाणें करार करावें.

महालचे कागदपत्रावर आमीनाची निशाणी काय असावी ? कलम १

परस्परें आमीनानीं 'रुजू' असें निशाण करीत जावें. येणेंप्रमाणें करार करावें.

दुवाळ्यांत पंधरा लक्ष रुपयांचे पेशकशीबद्दल महाल असतील, त्याशिवाय महाल आहेत त्यांची वांटणी लागलीच व्हावी. कलम १.

सरकारचे महालांखेरीज महाल सुटतील त्यांची वांटणी निमेनिम प्रमाणें लागलीच केली जाईल. येणेंप्रमाणें करार करावें.

पंधरा लक्ष रुपयाचे पेशकशीचे महाल कोणते ? यादीलेहून द्यावी. कलम १.

नवाबाकडील कडपे तालुक्याची यादी सरकारांत द्यावी. सरकारचे महालची यादी नवाबचे सरकारांत यावी. येणेंप्रमाणें करार करावें.

दुवाळ्याचे महालची वांटणी लागलीच होईल; त्यास आमचे सोईचे महाल आह्मांस द्यावे, आपले सोईचे आपण घ्यावे. कलम १.

सरकारचे महालाखेरीज महाल सुटतील त्यांची वाटणी तर्फेनचे तजविजीनें व्हावी. येणेंप्रमाणें करार करावें.

बल्हारी तालुका कितेक कारणांमुळें जमीदाराकडे ठेवावयाचा नाहीं; यास्तव खालसा करावा. कलम १.

दोही सरकारचें काम चांगलें तसेंच होईल. येणेंप्रमाणें करार करावें.

संस्थानिकांकडील पैगाम आल्यानंतर तर्फेनचे विचारें कौल पत्र देणें जाल्यास दोन्ही सरकारचीं पत्रें व कौल देत जावे. कलम १.

कौल देणें ते दोन्ही सरकारचे द्यावे. येणेंप्रमाणें करार करावें.

येणेंप्रमाणें पंधरा कलमें करार केलीं असेत. सरकारचे सरंजामाबराबर नवाबाकडील सरकारचा सरंजाम, छावणी व पेस्तर लढाईस असावा. कोणे गोष्टीची दिक्कत नसावी. येणेंप्रमाणें करार करावें.

छ ४ सवाल सन सबा समानीन मया व अलफ श्रावणमास.

## सनद ११.

श्री.

यादी राव पंतप्रधान व नबाब निजाम अलीखान बहादूर यांचा तहनामा, फत्ते अलीखान यांचे मसलत संमधीं वगैरेचा, यादगिरीचे मुक्कामीं जाहला. अलीकडे तर्फेनचे सरदार व फौजा मसलहतीवर कायम जाले; त्यास प्रथम मोहीम कृष्णा व तुंगभद्रा या दुवाब्यांत ठरली. सबब तर्फेनचे विचारें व सलाहानें तहनाम्याअलीकडील कलमें बितपसील सन १२०० हिजरी मुताबिक सन ११९६ फसली. सबा समानीन मया व अलफ.

बिलफैल दुवाब्यापैकीं नवा तालुका सुटेल, त्यांत निमे, नबाबाकडे कडपे तालुका सुटे तों पावेतों द्यावा, ऐसें ठरलें. त्यास कडपे तालुका नबाबाकडील तहनाम्याप्रमाणें सुटल्यावर दुवाब्याचा तालुका सरकारांत सोडावा. कलम १.

कडपे तालुका जसजसा सुटेल त्या हिसेरसीदीनें दुवाब्याचा तालुका नबाबांनीं सोडीत जावा. कलम १.

दुवाब्यापैकीं किल्ले कडपे तालुक्याचे किल्ले सुटेत तों पावेतों, निमे नबाबाचे सरकारांत द्यावयाचा करार ठरला. त्यास कडपे तालुकीयाचे किल्ले सुटल्यावर सरकारचे किल्ले सरकारांत द्यावे. कलम १.

कडपे तालुकीयांतील किल्ले जसे जसे सुटतील, त्या हिसेरसीदीप्रमाणें दुआब्यांतील किल्ले नबाबांनीं सरकारांत सोडावे. कलम १.

कडपे तालुकीयाचा किल्ला न सुटतां मुलुख सुटेल तो, जेथील तेथें निमेनिम द्यावा. किल्ला सुटल्यावर त्या सरकारचे महाल नबाबांनीं घेऊन त्याचे हिसेरसीदीप्रमाणें नबाबांनीं दुवाब्यांतील महाल सोडावे. कलम १.

कडपे तालुका सुटे तों, पावेतों दुवाब्यांतील तालुका निमे नबाबाचे सरकारांत द्यावा ऐसें ठरलें; त्यास नबाबाचे निमेंत नबाबाकडील आमीन राहील. सरकारचे निमेंत सरकारचा आमीन राहील. नबाबाकडील आमीन राहील त्यास तर्फेन महालचा कसा आकार होईल, त्यास महाल मजकूर व तर्फेन किल्ल्याचा खर्च वजा जाऊन, बाकी निमे सरकारांत व निमे नबाबचे सरकारांत घ्यावा. किल्ल्याचा खर्च तर्फेनच्या विचारें नेमून द्यावा. कलम १.

भोंसल्याची फौज मसलहतीस सामील जाली आहे, त्या दिवसापासून दरमहा खर्चास द्यावा लागतो; तो करार बमोजिब तर्फेन निमेनिम द्यावा. कलम १.

सरकारचे महालांखेरीज महाल सुटतील त्यांची वांटणी लागलीच निमेनिम तर्फेनचे तजविजीनें व्हावी. कलम १.

मसलहतीस दोन्ही सरकारच्या फौजा बराबरीनें असाव्या. कळकळीनें कामें करावीं. क. १.

छावणीस हुमायुनजहा बहादूर व शमपुलमुलुक व मुपरुलमुलुक बहादूर यांनीं रहावें. कलम १.

असद अलीखान वगैरे कमाविसीची याद यावी. त्या यादीप्रमाणें निमे ऐवज सरकारांत द्यावा. कलम १.

कडपे तालुका तहनाम्यांत लिहिल्याप्रमाणें त्या महालची याद द्यावी. कलम १.

संस्थानिकांकडील जमीयत येईल ती दोन्ही सरकारांत निमेनिमप्रमाणें राहील. कलम १.

संस्थानिकांस कौलपत्र देणें तो तर्फेन सलाहानें द्यावा. कलम १.

तर्फेन तालुकीयांत आमीन राहातील त्यांनीं निशाण 'रुजू' असें करीत जावें. कलम १.

आमीनांनीं जमेची व आबादीची गोष्ट सांगितल्यास तर्फेन ऐकावी. कलम १.

छावणींत दुवाळ्यांत मुखालिफाची जमीयत जिकडे येईल व काम पडेल, तिकडे दिक्कत न करितां तर्फेनच्या विचारें मुखालिफाचे तंबीस जावें. कलम १.

आइप तर्फेनच्या तजविजीनें ज्या रुखें जाणें सलाह ठरेल त्या रुखें जावें. कलम १.

यादगिरीवर तहनामा जाला, त्या उपर दोन्ही सरकारचे महाल व किल्ले फत्तेअलीखानानें तसरुफ केले, ते सोडविल्याखेरीज सलुख करूं नये. महाल व किल्ले सुटल्यानंतर ज्या सरकारचे त्या सरकारांत राहातील. कलम १.

तुंगभद्रेचें पाणी उतरल्यानंतर तर्फेनच्या मसलहतीनें व विचारें, ज्या रुखें जावें ऐसें ठरेल, त्या रुखें जाऊन, मुलुख तखसीर करावा व मुखालिफाची तंबी करावी. जातीच्या गरजेकरितां फलाणी मसलहत नेक ह्मणून जीद करूं नये. नेक च करावें. कलम १.

---

## यादी १२.

श्री.

यादी दुवाळ्याचे यादीवर नवाबाची दसखत करून घेण्याचा ठराव.

तहनाम्याप्रमाणें कडपे वगैरे तालुका सुटल्यानंतर दुवाळ्याचा तालुका निमे वांटणीचा येईल तो सोडूं. कडपे वगैरे तालुका तहनाम्याप्रमाणें सरकारांत राहील. सरकारचा तालुका कडपे वगैरे व राव पंतप्रधान यांच्या सरकारचा तालुका तहनाम्यांत दाखल आहे; त्यास दोन्ही तालुके सुटत तोंपावेतों फत्तेअलीखान यांसीं सलुख करूं नये. १.

कडपे तालुकीयांतील जो किल्ला सुटेल त्या किल्ल्याचे सरकारचे महाल त्या हिसेरसिदीबमोजीब दुवाळ्याचे महाल निमे वांटणीपैकीं सोडूं. बरकड कडपे वगैरे तालुका किल्ल्याखेरीज सुटे तो, जेथील तेथें निमेनिमप्रमाणें तर्फेन राहील. १.

कडपे वगैरे तालुक्याचे किल्ले दरोबस्त सुटल्यानंतर दुवाळ्याचे निमे वांटणीचे किल्ले सोडूं. कडपे वगैरेचे किल्ले सरकारांत राहातील. १.

कडपे वगैरे तालुक्याचे किल्ले जसजसे सुटतील, त्या हिसेरसिदीप्रमाणें दुवाळ्याचे किल्ले सोडूं. १.

सदरहूप्रमाणें. १.

सदरहूप्रमाणें. १.

भोंसल्यांची फौज येईल, त्यास दरमहा खर्चास निमेनिमप्रमाणें द्यावा, असें पेशजी बोलण्यांत आलें आहे. त्यास गुदस्ता चाकरीस आल्यापासून दरमहा पावत आहे तो निमेनिम तर्फेनें द्यावा. १.

दोन्ही सरकारची जमियत व जंगी सरंजाम बराबरीनें असावा. व दिलापासोन तर्फेन कामें करावीं. १.

मुशुरुलमुलुक बहादूर व शमषीलमुलुक बहादूर हा सरंजाम बराबरीचा घेऊन रविलावल अखेर हरिपंतापाशीं पोंहचतील. आइंदे छावणीस राहावयाचें ठरल्यास उभयतां राहतील. १.

सरकारांत दाखल जालें असेल तें निमेनिमप्रमाणें दिल्हें जाईल. राव पंतप्रधान यांचे सरकारांत येईल, तें निमें द्यावें. १.

पंधरा लक्षांचे पेशकशीबद्दल त्रेपन लक्ष रुपयांचे मुलुकाची याद तहनाम्याबमोजीब राव पंतप्रधान यांजकडील द्यावी. कडपे वगैरे तालुक्याचे महालाची याद सरकारांतून देऊं. १.

निमेनिमप्रमाणें राहील. १.

मंजूर. १.

करार. १.

किफायतीची व आबादीची गोष्ट तर्फेनें ऐकावी. १.

तर्फेनच्या विचारें मुखालिफाची जमियत नमूद होईल, त्याची तंबी करावी. १.

येणेंप्रमाणें करार. १.

तर्फेनच्या तजविजीनें वांटणी लागलीच व्हावी. १.

---

## यादी ७.

यादी हजरत बंदगानअल्ली यांचे सरकारांतून श्रीमंत राव पंतप्रधान यांचे सरकारचे वगैरे जुनयातीचे फडशे होणें, सन ११९९ तिसैन मया व अल्लफ अखेर पावेतों.

१ चौथ सरदेशमुखीचा अमल या सालचा त्या सालावर जातो, कमाविसदाराचे बोभाट पडतात, सबब फसलीचे फसलीस हंगामी महाली ऐवज मिळावा. जागीरदार व जागिरीचे आमिनांनीं इनायत नाम्याचा उजूर करूं नये.——याचें उत्तर मध्यस्थानीं केलें कीं, दौलतींत असा नेम चालत नाहीं. तथापि हें साल तों अखेर होत आलें. सन १२०० इहिद्दे तिसेनापासोन सालाचे सालांत दसऱ्यापावेतों फैसला हस्त सालास करून द्यावा. हें करून देतों. जागीरदार व आमील इनायतनाम्याचा उजूर करणार नाहींत, असें एकदांच इनायतनामे करून देतों कीं, दरसाल दिकत न पडे.

१ चालत्या अमलाच्या बाक्या व कितेक ठिकाणीं सालमसालें राहिलीं, त्याचा फडशा आजपावेतों अमलांत यावा. ——इतके दिवस या सालचा अमल त्या सालावर असें उडतें चालतें.

व बाक्याही आहेत. ह्या एकदाच कशा मिळतील? यास्तव मेहेरबानगी करून, इस्तकबील सन ११९२ सल्लास तागाईत सन ११९७ समान पावेतों, बाक्या जुन्या व सन ११९८ समान तागाईत सन ११९९ तिसैन अखेर पावेतों, जो ऐवज ज्या महालीं निघेल तो, ती सालांत, ती किस्तीनें घ्यावा. कारण सन इहिदेपासोन सालाचें सालांत फडशा करावा लागतो, सबब बाकी मागील तीन सालांत घ्यावी. कलम.

१ कितेक महालीं कैलासवासी रावसाहेब यांचे अहदादीस आंख कमी देतात, त्याचा मागील फडशा व पुढील बंदोबस्त. रुजुवातीस कारकून देतों. चौकशी करावी. कमी जाजती असेल, त्याचा फडशा होईल. बहुतकरून कमी नाहीं. कलम.

१ सनवार बाक्यांचा ठराव होऊन ऐवज मिळावा.

दहा बारा वर्षांमागील बहुतकरून बाकीचे फडशे करून दिल्हे. पिंगळे यांचीही बाकीस करडखेड वगैरे ऐवज लाऊन दिल्हा. तथापि जुनबाकी असेल त्याची चौकशी जमेदाराचे रुजूची जाल्यावर हस्तेबंदी ऐवज पाहून होईल. चौकशीस कारकून घ्यावा. कलम.

१ पांच लाख तीस हजारांची फर्दन फरुदौला यांचे आमची राहिली, त्याचा फडशा—— याविसींचा एख्तियार हातूराजुन मदारुलमहाम यांजवर आहे. दोही सरकारचे दौलत खाते समजून अर्ज करतील त्याप्रमाणें अमलांत येईल, ऐसी दसखतच करून दिल्ही, त्याची जिकीर कां? मदारुलमहाम उचित समजोन लिहितील, त्याप्रमाणें होईल. कलम. १.

१ उमरखेडापासोन शाहा मिर्जानें ऐवज घेतला, तो कराप्रमाणें यावा. फार दिवस जाले. ——तहःसुकाप्रमाणें ऐवज लावून देतों. कलम.

१ जडसी वगैरे महाल सुपुर्द जफरुदौला यांचे होते. त्याचा फडशा——बहुतकरून फडशा जाला, ऐसें जमेदाराच्या इजहारावरून त्यास कारकून देतों, रुजुवातीनें ठरेल त्याचा फडशा कच्चे आकारानें या मामुलप्रमाणें करून देतों. याप्रमाणें दसखत पहिली जालीच आहे. रुजुवात करावी. कारकून देतों. कलम.

१ वराड बालाघाट येथील चौथ सरदेशमुखी मामुलाप्रमाणें यावी.——आंख मामुल रावसाहेबांचे कारकीर्दीचा समजावा; ह्मणजे कच्चे आकारानें महालचा तह करून देऊं; अगर मामुलास इस्तावा बांधून देऊं. बशर्ते हंगामा न व्हावा. स्वार न फिरावा. महाल लावणीस आपले सरकारांत दहा बारा लक्षांचे घ्यावे. आह्मी दहा बारा लक्षांचे घेऊं. आबादी होईल. दोही सरकारचा नफा, आंख मामुल समजल्यावर, आज करून देतों. कलम.

१ आदवानीचें स्वराज्याचा फडशा सोळा वर्षांचा राहिला तो व्हावा.——महाबतजंग यांजकडील कारभारी बोलाविला आहे. आलीयावर तोडजोड करून देऊं; अगर परभारें समजोन घ्या, ऐसें सांगूं. लेकीन बहुतकरून तोडजोड होईल. कलम.

१ निर्मळ वगैरे महालाची रावसाहेबांचे कारकीर्दीची रुजुवात——कारकून नेमून देतों.

रावसाहेबांची कारकीर्द लागलीच. असफजाहा यांचे कारकीर्दीची रुजुवात करवावी. एक कामांत दोन्ही कामें उगवावीं. कलम.

१ सन ११८५ सन सितांत जागिरीचे महाल दिल्हे, त्या सालचें स्वराज्य सदरहू महालचें आलें नाहीं. तें देवावें.

जागिरीचा वसूल पडला असेल, तो तुह्मीं द्यावा. स्वराज्य आह्मीं द्यावें. महाल मजकूर परस्परें मागूं नये. अगर परस्परें द्यावें घ्यावें हा तह. महाल गंगथडीचे आहेत. अजिमुद्दौलासच रुजुवात सांगतों. तुह्मीं आपला कारकून रुजुवातीस द्यावा.

१ तालुके हालगेर रुजुवात बाकी कारकीर्द जाधवराव.——रुजुवातीस कारकून देतों. आह्मांसही याची जरूर आणि आमचे. कलम.

१ बालाघाट रुजुवात बाकी कारकीर्द निंबाळकर.——रुजुवातीविशीं आमची अर्जू, आमचा पैका फिरतो, यास्तव रुजुवातीस कारकून देतों. तुह्मीं द्यावा. कलम.

१ शिराढोण वगैरे महाल वांटून देणें.

महालचे गांव वांटून दिल्ह्यावर जागिरीचे गांवास स्वराज्याचा उपसर्ग लागूं नये. लागल्यास मजुरा, ऐसा करार व्हावा. नाहींतरी गांव वांटून देऊन पुन्हां जागिरीचे गांवांत हंगामा जाधवराव यांस कन्नड, फुलबरी महाल वांटून दिल्हे असतां, हल्लीं वेहरे वगैरे सरकारचें गांवावर कहीला बंड करितात; आणि तोफखान्याचे बैल चराईस आले आहेत. गोया आमचा तालुका ह्मणजे कुरणसह जकीवांत आहे. यास्तव या उपरी गांव वांटणें माफकत नाहीं. पहिले वांटले तेही राहातील. सर्व एकीठाई जाल्यावर पायमल्ली व नुकसानी हिसेरसीद तऱ्ही पडेल; नाहींतरी याचा तह ठरावा. मग गांव वाटल्यास चिंता नाहीं. कलम.

१ जुनयातची याद.

फडशेच होतात मग याद कशास ? तथापि पाहिजे तरी घ्या. कलम.

१ सुतोंडाबद्दल महमद कबीरखान याची जागीर सरकारची यावी.

महमद कबीरखान या सरकारचे बक्षी; त्यास तिकडून जागीर बहाल जाली, ते सरकारांत बंदगानअलीनीं घेतली. याविशीं तुह्मीं बोलों नये. करारही असाच आहे कीं, परस्परें देत. घेऊं नये. ज्या सरकारचा मुत्सद्दी या सरदार, ते सरकार त्याविशीं मुखत्यार. कलम.

१ मदारुलमहाम यांचे ब्राह्मणांची जागीर दहा हजारांची.——ब्राह्मणांचीं नांवें व कोणे महालीं कोणाची सोय व कोणास गांव किती तनख्याचा हें लेहून पाठवावें. सनदा करून देऊं.

१ हरिपंताकडील ब्राह्मणांचे रोज——करार करून देऊं.

१ मुकुंद जोशी जमिनीची दुमोहरी.——आलबता.

१ फुलबरीस ब्राह्मणांस इनाम जमीन पांच चाहूर.

१——सर्व फडशे जाल्यावर सख्त रदबदलीनें हुजूर अर्ज करीन.

१ जाधवराव आटोळे बाबरे——द्यावयाचे नाहीं. फर्दावर करार जाला त्यापूर्वी जप्तींत आलें. करारांतही हेंच कीं, मागें जालें तें जालें, सबब बोलूं नये.

१ महाराव निंबाळकर यांस कराराप्रमाणें जागीर.

हें कलम फक्त तुमचे रदबदलीचें. त्यांतही त्यांचे चिरंजिवांनीं चाकरीस यावें हा करार. तेंही नाहीं. धनीपणा आणि चाकरपणा हे वाट खुंटली. बेअदबींत काय राहिलें ? तेव्हां हें बोलणें मुनासब नाहीं. जेऊर सरकारचें तुह्मांकडे अमानत. महारायांचें नांव इतःपर घेऊं नका. त्याजकडे सरकारचा ऐवज येणें त्याचें नांव तुमचेबद्दल खातर तूर्त घेत नाहीं.

१ कडेकर व कुंटे यांचे कर्जाचा फडशा कल्याणरायाकडील——हरएक माणूस पेचांत येत. त्याची रीत तोडजोडीची त्याही सरकारांत आहे. तिकडील सरदार कां देण्याचे पेचांत नसतील ? जागीर तुह्मांकडे अमानत आहेच. याची तोडजोड करणें मदारुलमहाम याजकडेच. ते करतील तें मान्य. तुह्मांसमागमें कल्याणराव यांचा कारभारी देतों. मदारुल सांगतील तेच तोड. दुसरे नाहीं. कलम.

१ माधवराव सदाशिव यांचा गांव सोडावा व पैका घेतला तो द्यावा.——देतों.

१ करडखेड हा कर्णे यांचा मुबदला महाल उमरखेडाजवळील शेवालें द्यावें.——पैक्याची निशा करून देतों. अगर महाल देईन.

१ रामचंद्र दीक्षित सातारकर यांचा बंदोबस्त——पाहिजे तसा.

---

## यादी ८.

श्री.

याद मतालब सरकार नबाब असफजा बहादूर यांचे राव पंतप्रधान यांचे सरकारांतून उगवावे. सुरुसन १२०२.

१ सुभे बेदरचे चौथ सरदेशमुखी अमलाची रकम मवाफीक अहद नबाब मगफिरत मजलत ठराव होऊन मुनकाह व्हावा व त्यापैकीं सरकारअलीची किफायत करणें मंजूर असेल तें करून, बाकी ऐवजास ऐवज मावीजा महालातीचा व्हावा. पुढें तेथील चौथ सरदेशमुखी हैदराबादप्रमाणें नेहमीं माफी श्रीमंतांकडून व्हावी.

१ मामलत चौथ व सरदेशमुखी वगैरे महालांत सुभे वराड बालाघाट नि॥ सरकार माहूर वगैरे श्रीमंताकडून एका शेखसाकडे करून ध्यावी. ते माधवरावसाहेबांचे कारकीर्दीप्रमाणें साता सालांचे इस्ताव्यानें मुकरर करावा. तालुके मजकुरीं नेमल्या गृहस्थाशिवाय दुसरा मामलेदार नसावा.

१ सुभे औरंगाबादेचा स्वराज्याचा बंदोबस्त मवाफीफ मामुल नवाब मगफरतमहा अम-

लांत यावा व ज्याद तलबी आटोळे व जाधवाची आहे, ते न व्हावी. अगाऊ त्यांनीं ज्याद तलबी केली आहे त्याचा ऐवज मुबदला अमलांत यावा.

१ मामलत चौथ सरदेशमुखी वगैरे प्रांत कलबुर्गे वगैरे महालांत कदीम सुभे विजापूर व तैसेंच प्रांत आंबे वगैरे महालांत सुभे औरंगाबाद येथील मामलत हरिपंततात्या अथवा अणीक कोणाचे नांवें व्हावी. त्याची घालमेल होऊं नये. ह्मणजे महाल आबाद राहातील.

१ हिस्सा निमे बाबत मुल्क बदामी बमोजिब तहनामा अजइस्तदा एक बाजा ऐवज द्यावा व पुढें हिशाप्रमाणें तालुका निमे सरकारांत गुजास्त करावा.

१ पेशजी मजकूर जाल्याप्रमाणें बादशाहींत जोंपरीयंत राव पंतप्रधानाचा कबजा आहे तैसा सरकारचाही दखल बादशाहींत असावा. सरकारचे दखलाची शकल करारांत यावी.

१ राव पंतप्रधानाकडून जो कोणी बादशाहींत दखल राखील, त्यानें व सरकारअलीचे लोकांनीं इतीफकानें बंदोबस्त राखावा. जो शेखस बादशाहींत राहील, त्याशीं दोस्तीचा सिलसिला सरकारचा चालेल. याचा संदेह नसावा.

१ मामलत चौथ वगैरे आबावाब राव पंतप्रधानाचा आष्टी वगैरे महालांत जागीर सैफुनमुल्क व गाजीयुलमुल्क बहादूर यांजकडे आहे. ते मामलत मुनका होऊन पुढें चौथ वगैरे त्या महालची श्रीमंताकडून एका शखसास व्हावी ह्मणजे आबादी राहील.

१ फैसला जुजीयात वगैरे दफे अलाहिदा बंदाप्रमाणें अमलांत यावें. कलम.

---

## करारनामा ९.

श्री.

करारनामा व—कसम इमान माधवराव नारायण पंतप्रधान व नवाब निजामअलीखां बहादूर उभयतां एकदिल व एक जहत होऊन, सन खमस तिसैन मया व अलफ मुताबीक सन १२०४ फसली मवाफीक सन १२०९ हिजरी ऐसा करार पावला कीं, पूर्वीं छ १ साबान सन ११९८ हिजरी खमस समानीन मया व अलफ मुताबीक सन ११९४ फसली दरजागा किल्ले यादगिरी येथें दिलापासोन एक होऊन, सरादफेचे कराराची यादी ठरली. त्यांत खलप दरमियान आला. यास्तव तर्फैनचे सलाहानें तो खलप दूर करून, हल्लीं परस्परें साफ दिलापासोन व एक जहतकडून मजबुतीचा करारनामा या प्रकारें ठरावांत आला. जेः—यादगिरीचे मुक्कामीं सत्रा कलमांचे कराराची याद सन ११९८ हिजरी ठरली, त्यापैकीं तिसरें कलम खारीज करून, बाकी सोळा दफा बहाल व बार करार असेत. तिसरी दफा खारीज केली. ती हुबहू ऐसी कीं, तर्फैन इत्यफाकानें करनाटकची मोहीम करार होईल; मुल्क व किल्ले व गढ्या व खंडण्या वगैरे मालमवेसी हातीं लागेल; त्यापैकीं त्र्येपन लक्ष त्र्यायशी हजार रुपयांची तनखा कैलासवासी माधवरावसाहेब यांचे वेळेस चालत होता,

त्याची पेषकश पंधरा लक्ष रुपये अलीकडे हैदरअल्लीखान याणीं कबूल केली होती. तो तालुका राव पंतप्रधान यांजकडे राहील. त्यांत हिस्सा नवाबाचा नाहीं. व कडपे तालुका बाबत आबदुल अलीमखान वगैरे त्याचे निसबतीचे लोक व तालुका करनूल वगैरे जागीर रणमस्तखान वगैरे त्याचे निसबतीचे लोक; व तालुके आदवानी वगैरे सन ११८२ सन सलास सबैनपासोन अलीकडे हैदरअल्लीखान यांणीं तसरुफ केला होता; तो हल्लीं फतेअल्लीखान यांचे तसरुफांत आहे; तो नवाबाचे सरकारांत राहील. त्यांत हिस्सा राव पंतप्रधान यांचा नाहीं. याशिवाय जें कांहीं हातास येईल तें निमेनिम करावें. एकानें हिस्सा मुलकाचा करून टाकावा; एकानें उचलावा. नवाबाकडे हिस्सा मुलकाचा येईल, त्यांत राव पंतप्रधान यांस चौथ वगैरे बाबतींत शराकत नाहीं; परंतु चौथचा मखता तालुके आदवानी व करनुलचा, राव पंतप्रधान यांचे सरकारांत पावत होता, त्याप्रमाणें राहील ह्मणजे चालेल; ऐसी तिसरी दफे आहे. हे तिसरी दफा दूर करायाचें कारण, सरकार राव पंतप्रधान व सरकार नवाब निजामअल्लीखां बहादूर व कुंपणी इंग्रजबहादूर तीन सरकारचा टिपुसुलतान बहादूर यांसीं तहनामा जाला; सबब तिसरी दफे खारीज केली. मगर चौथेचा मक्ता तालुके आदवानी व करनुलचा साल बसाल चालत आल्याबमोजीब, राव पंतप्रधान यांस पावावा. न पोंहचल्यास राव पंतप्रधान घेतील. याविषयीं नवाबांनीं वाईट मानूं नये. दोन्ही सरकारांत कुंपणी इंग्रजबहादूर व टिपुसुलतान बहादूर यांसीं तहनामे जाले, त्या बमोजीब टिपुसुलतान बहादूर यांचे मसलहत प्रकरणीं अमलांत यावें. यादगिरीवरील कराराचे याददास्तीपैकीं सोळा दफे बाकी राहिल्या, त्याबद्दल व बार करार व हल्लींचा हा करारनामा ठरावांत आला, याप्रमाणें अमलांत येईल. यांत तफावत होणार नाहीं. याजकरितां बेलभंडाराची शपथ असे. तारीख छ १ शवाल मुक्काम दरजागा मौजे पांडे परगणे कडेवलीत सीनागीर.

---

## सनद १०.

यादी करारनामा हजरत बंदगानअल्ली निजाम अल्लीखान बहादूर यांचे सरकारासीं आजमुलउमरा बहादूर यांचे विद्यमानें बाळाजी जनार्दन यांचा. सुरुसन सबा तिसैन मया व अलफ सन १२०६ फसली, मुताबीक सन १२११ हिजरी. श्रीमंत पंतप्रधान यांचे दौलतींत बखेडा मनस्वी जाला व आपण कोकणांत महाडास गेलों. पुढें दौलतीचा बचाव तें करावें ऐसें मनांत येऊन, आजमुलउमरा बहादुराचे विद्यमानें निश्चय जाला कीं, दौलतख्वाकडून समजोन गैरसमजानें कसूर जाला असेल, तो हजरतीचे मनांत नसावा. आजपर्यंत तरफेनें जालें तें जालें, पुढें हजरतीशीं स्वच्छ अंतःकरणेंकडून वर्तणूक करूं. आजमुलउमराबहादूर

हजरतीचे सरकारचे मदारुलमहाम व मी दौलतख्वा श्रीमंताचे सरकारचा कारपरदाज उभयतांनीं एक मसलतीनें व एक विचारें वर्तणूक करावी. दोनही दौलतीस रोजकस चांगलें तें उभयतांचे विचारें व मसलतीनें तर्फेनें अमलांत येईल. यांत तफावत हरगीज येऊं नये. श्रीमंताचे दौलतीचा बचाव व खैरख्वाचे हक्कांत बेहेतर तें हजरतीकडून व आजमुल उमराकडून अमलांत यावें. व हजरतीचे दौलतीस बेहेतर तें श्रीमंताकडून व खैरख्वाकडून अमलांत येईल. यांत तफावत करील त्यास त्याचे दिल इमानाची कसम व शपथ असे.

कलम १

सदरहूप्रमाणें तर्फेनें चालावें येणेंप्रमाणें.—

शिंदे श्रीमंताचे सरकारचे मातबर सरदार, त्यांचे कारभारी बाळाजी अनंत वगैरेनीं गैर रीत करून श्रीमंत राजश्री बाजीराव साहेबास, परशराम रामचंद्र यांस आपले संमतांत घेऊन, आपले अटकेंत ठेविलें आहे. त्यास हजरतीचे सरकारची फौज व बार वगैरे जंगी सरंजाम श्रीमंताचे सरकारची हुजरात वगैरे फौज व सेनासाहेबसुभा रघोजी भोंसले यांणीं एक होऊन बाजीराव साहेबास एक जागा करावें. येविषयीं मेहेनत व मषकत जी पडेल, ते हजरतीचे सरकारचे जमीयतीनें करावी. अजमुलउमरा बहादुरानीं जमीयत पंधरा हजार बार व तोफा वगैरे जंगी सरंजामानें खैरख्वाचे शरीक असावें. कंपनी इंग्रज बहादूर खैरख्वाचे मसलतीस शरीक होतील. शरीक न जाल्यास प्रतिकूलता त्याजकडून व्हावयाची नाहीं. याची मजबुती दोस्तदारानें केली असे. कलम १.

सदरहूप्रमाणें हजरत व अजमुलउमरा याजकडून अमलांत यावें येणेंप्रमाणें.—

हजरतीचे सरकारचा मुलूक वगैरे देखील दौलताबादचा किल्ला व नगदी ऐवज एकंदर देण्याचा करार खरड्याचे मुक्कामीं जाला, तो समग्र मुलूक व किल्ला व नगदी ऐवजाचे दस्तऐवज माघारे देऊं; व पेशजी यादगीरचे मुकामीं दोन्ही सरकारचा तहनामा जाला तो बहाल व बार करार असे. मुलूक सोडूं त्या महालाकडे बाकी आहे, त्याचा तगादा होणार नाहीं. आदवाणी व बीड वगैरे एकंदर स्वराज्याचा ऐवज खरड्याचे करारांत आला तो दस्तैवज माघारा द्यावयाचा करार जाला, त्याप्रमाणें देऊं. सन १२०४ पर्यंत आदवाणी वगैरे स्वराज्याचा तगादा राहिला नसे. सन १२०५ सालापासोन स्वराज्याचा ऐवज आदवाणी वगैरे सुद्धां मामूल प्रमाणें हजरतींनीं द्यावा. कलम १.

सदरहूप्रमाणें.—

रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांचे व हजरतीचे सरकारचे तहनामे आहेत, त्याप्रमाणें हजरतीचे आमचे विचारें श्रीमंताचे दौलतीचा बंदोबस्त जाल्यावर, बंदोबस्त व फैसला करवून देऊं. कलम १.

सरकारचा बंदोबस्त जाल्यावर आपले आमचे विचारें तो काढून फैसला करूं. येणेंप्रमाणें.

दिल्ली सढासणा वगैरे महाल प्राचीन नवाबाचे ते हल्लीं महादजी शिंद्याचे विद्यमानें सुटले व एक महाल पुढें सोडूं ऐसा करार होता. त्याप्रमाणें राव शिंदे यांस सांगून हजरतीचे हजरतीकडे चालवूं. कलम १.

सदरीं लिहिल्याप्रमाणें होईल. येणेंप्रमाणें.—

दोन्ही सरकारचे जुनयातीचे लढे आजपर्यंत जे असतील, त्यांजपासून दोनी सरकारांनीं हात उचलावा. पुढें स्वराज्याचा अमल सालाचें सालांत देत जावा. महाल मुलकी ठाणीं वगैरे मामूलप्रमाणें चालावीं. कलम १.

मागील चालत्या अमलाच्या बाक्या व मामूल ठाणीं द्यावीं. लढे परस्परें मागूं नयेत. पुढें सरळ तह प्रमाणें चालावें येणेंप्रमाणें.—

बेदर सुभ्याचें स्वराज्य सोडावें, अशी हजरतीची पहिलेपासून मर्जी. त्यास दोन्ही दौलतीवर हजरतीचा मसावीमद नजर. त्यास बाजीराव साहेब धनी आहेत. कसम पुरःसर खैरख्वा करार करितों कीं हें वतनी काम आहे. बाजीराव साहेबास हामवर करून सोडून देवील. कलम १.

सदरहू करार हजरतीचे जात मुबारकेसीच. येणेंप्रमाणें——भोंसल्यांनीं लौकर यावें व शरीक व्हावें. कलम १.

आपण व आह्मीं त्यास लिहून आणवावें येणेंप्रमाणें.—

खर्चास मुबदला वीस लक्ष रुपये द्यावे असें आपलें ह्मणणें. त्यास दहा लक्ष रुपये मुबदला देऊं. कलम १.

समयास येतील, न आल्यास वागवून घ्यावे ह्मणजे उसने दिल्हे जातील. येणेंप्रमाणें.—१

टिपूची फौज नमूद होऊं नये याचा बंदोबस्त इंग्रजाकडून व आपल्याकडून करावा. कलम १.

फौज नमूद होणार नाहीं. झाल्यास आपण, आह्मीं व कंपणी इंग्रज बहादूर यांणीं पटणच्या कराराप्रमाणें बंदोबस्त करावा. येणेंप्रमाणें.—

आपले सरकारचे फंदी फितुरी यांचा ऐवज श्रीमंताचे सरकारचे तालुकीयांत असल्यास आपण मुद्दा खचित लावून द्यावा. मुद्दा लागू जाल्यास आपले सरकारचे निसबती लोकांचा ऐवज देण्याविशीं ताकीद केली जाईल. कलम १.

यापुढें सदरहू प्रमाणें तर्फैनचा करार येणेंप्रमाणें.—

सदरहू कलमें लिहिलीं. याचे दसखत श्रीमंताचे हातचें करून देऊं. कलम १.

सदरहू येणेंप्रमाणें.—

नवाबाच्या व आपल्या दोनी दौलतीचा चेमुदा व मचोलखा तर्फैन कोणीं कितीही समजाविल्यास मनांत येऊं नये. आल्यास वरचेवर समजाऊन स्वच्छता करीत जावी व

हरएक मुखालिफ हरएक दौलतीवर उभा राहिला, तरी दोघांनीं एक होऊन मुखालिफाचें निवारण करावें. परस्परें आपली अडचण दाखवूं नये. कलम १.

सदरहू येणेंप्रमाणें कलमबंदी ठरल्याप्रमाणें अकृत्रिमपणें तर्फेन वर्तणूक व्हावी. आपलाले गरजेस दखल तर्फेन देऊं नये. कलम १.

सदरहू प्रमाणें तर्फेन चालावें. एकूण कलमें सुमार चवदा. येणेंप्रमाणें.

छ ५ माहे रविलाखर अश्विनमास सन सबा तिसैन.

---

## यादी १७.

श्री.

यादी सरकार राजश्री बाजीराव रघुनाथ पंतप्रधान व सरकार नबाब निजामअलीखान आसफजहाबहादूर यांसीं तर्फेनें करारार्ची कलमें सु॥ तिसा तिसैन मया व अलफ सन १२०८ फसली.

पहिले करार सन सबा तिसैन मया व अलफ सन १२०६ फसलीचे सालीं, मुषीरुलमुलक बहादूर जाते समयीं, राव पंत प्रधान यांचे खास दसकतीनें जाहाले, ते बहाल व बरकरार कलम १.

सदरहू प्रमाणें करार.

हल्लीं दौलतराव शिंदे अलिजाबहादूर व महादजी शिंदे मुतवफा यांचे कबिले लक्ष्मीबाई वगैरे बक्षी व सरदार यांसीं पेंच पडून आपसंबंधें बखेडा करून लढाई सुरू आहे. त्यास नबाबानीं हल्लीं हे मसलत तमाम होय तोंपावेतों, दहा हजार फौज व दहा हजार गाडद तोफांसुद्धां, जाहीर व बातन सबाह्यांतर सरकारलक्षानें चालून सरकारची कुमक करावी. राव शिंदे व बाळाजी जनार्दन फडणीस वगैरे मिळोन, अगर अलाहिदा कोणी, बाजीराव रघुनाथ पंतप्रधान यांसी व त्यांचे दौलतीविशीं वाकडें मनांत आणून व त्यांचे आज्ञेखेरीज चालेल, त्याचे पारिपत्याविशीं राव पंतप्रधान यांच्या इशाऱ्याबमोजीब नबाब असफजहाबहादूर यांणीं सबाह्यांतर अनकूल असावें. येविशीं सरकारांतून नबाबास आठ लक्ष रुपयांची जहागीर द्यावी. हल्लीं राव पंतप्रधान सांगतील तेथें फौज पंधरा रोजांनीं नबाबाकडून यावी. कलम १.

सदरहू प्रमाणें करार.

शिंदे अथवा हर कोणीं राव पंतप्रधान यांचे सरकारचे नबाबाशीं वाकडें करूं लागल्यास, राव पंतप्रधान यांणीं त्यास ताकीद करून निवारण करावें. जबरदस्त होऊन करूं लागल्यास, राव पंतप्रधान यांणीं नबाबास अनकूल होऊन त्यांचे तंबीस खिसारा न ह्मणतां शरीक असावें. कलम १.

सदरहू प्रमाणें करार.

बाळाजी जनार्दन फडणीस, पुढेंपाठीं

बाजीराव रघुनाथ पंतप्रधान यांचें वाकडें करूं लागल्यास, त्यांचे तंबीस नवाबानीं सबाह्यांतर अनकूल असावें; अगर बाळाजी जनार्दन, बाजीराव रघुनाथ पंतप्रधान यांसीं सबाह्यांतर एकनिष्ठतेचे चालीनें व एकसुईनें बोलूं लागल्यास, राव पंतप्रधान यांणीं त्यांजवर कृपा करून, त्यांस जातीची जहागीर व किल्ला देऊन स्थानसंधेस ठेवावें. त्यांस दुतर्फा खातरजमा नवाबानीं करावी. मेणवलीस बाळाजी जनार्दन यांणीं स्वस्थ बाजीराव रघुनाथ पंतप्रधान यांचें लक्ष राखून असावें. कलम १.

सदरहू प्रमाणें करार.

नवाबाचे सरकारचे सरदार व हर कोणीं राव पंतप्रधान यांसीं वाकडें करूं लागल्यास नवाबानीं त्यांस ताकीद करून निवारण करावें. जबरदस्त होऊन करूं लागल्यास नवाबानीं राव पंतप्रधान यांस अनकूल होऊन त्यांचे तंबीस खिसारा न ह्मणतां शरीक असावें. कलम. १.

सदरहू प्रमाणें करार.

एकूण कलमें सुमार पांच. सदरहू प्रमाणें परस्परें कोणीं कोणाचे फंदफिसाद न करितां सदरीं लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करावी. छ ११ माहे मोहरम येणेंप्रमाणें करार.

---

## यादी १८.

श्री.

यादी कलमें करारार्ची सरकार नवाब मीर निजामअलीखां बहादूर व सरकार राजश्री बाजीराव रघुनाथ पंतप्रधान या दोन्ही सरकारची बतफसील सन १२०८ फसली सु ॥ तिसा तिसैन मया व अलफ. सन १२१३ हिजरी.

१ पूर्वीं तहनामे व यादी जाल्या, त्या बहाल बकरार कलम सुवाद.

१ छ ११ मोहरमीं सालमजकुरीं तर्फेनचे करारांची पांच कलमांची याद जाली. त्यांत असे जे, राव पंतप्रधान यांचे सरकारांतून आठ लक्ष रुपयांची जहागीर सरकार अलींत घ्यावी. ते बेरीज ८०००००.

सदरहूचे कलमाचा ठराव हल्लीं येणेंप्रमाणें करार जाला.

३७५००० राव पंतप्रधान यांनीं सन १२१० फसलीचे अवल सालापासोन जहागीर सरकारांत द्यावी रुपये.

४२५००० बेदर सुभ्याचे स्वराज्यपैकीं राव पंतप्रधान यांनीं तीन हिस्से सन सबा तिसैन सन १२०६ फसलीपासोन आजमुलउमरा यांचे विद्यमानें सरकारांत दिल्हे. बाकी चौथा हिस्सा राव पंतप्रधान यांजकडे राहिला. त्यास आठ लक्षांची जहागीर सरकारांत द्यावयाचा करार. त्यापैकीं तीन लक्ष पंचाहत्तर हजार रुपयांची जहागीर सन १२१० फसलीचे सुरु सालापासून राव पंतप्रधान यांनीं द्यावी.

बाकी चार लक्ष पंचवीस हजारांची जहागीर राहिली, ते चौथे हिश्शांत मुबद-ल्यांत राव पंतप्रधान यांजकडे देऊन, स्वराज्याचा चौथा हिस्सा बेदरच्या सर-कारांत घ्यावयाचा करार जाला, त्याऐवजीं जहागीर राव पंत प्रधान यांजकडे

८००००० रुपये.

बेदर सुभ्याचे दरोबस्त स्वराज्य पूर्वीं तीन हिस्से व सन १२०९ फसलीचे सुरु साला-पासोन चौथा हिस्सा राव पंतप्रधान यांनीं सरकारांत दिल्हा. सदरहू कराराप्रमाणें आठ लक्षांचे जहागिरीचा व बेदर सुभ्याचे चौथीचा फैसला जाला. कलम १ सुवाद.

१ खर्डे याचे सालीं सरकारांतून राव पंतप्रधान यांजला नकदी ऐवज द्यावयाचा करार जाला होता. त्यापैकीं तीन हिस्से राव पंतप्रधान यांचे आजमुलउमरा यांचे विद्यमानें सरका-रांतून दिल्हे. बाकी एक हिस्सा ह्मणजे पन्नास लक्ष रुपये राव पंतप्रधान यांनीं दौलतराव बहादूर शिंदे यांस सरकारांतून देविले होते. त्यापैकीं पंधरा लक्ष रुपये सरकारांतून शिंदे बहादूर यांस पावते केले. बाकी पस्तीस लक्ष राहिले, ते राव पंतप्रधान यांनीं शिंदे बहादूर यांस प्रविष्ट केले. सबब शिंदे यांचे हवाल्याबाबद पस्तीस लक्ष रुपये कराराप्रमाणें राव पंत-प्रधान यांजला प्रविष्ट करावयाचे होते. परंतु त्या पस्तीसापैकीं दहा लक्ष रुपये राव पंतप्रधान यांनीं सूट दिली. बाकी पंचवीस लक्ष रुपये राहिले; ते राव पंतप्रधान यांजला प्रविष्ट करावे ऐसा करार जाला. परंतु शिंदे बहादूर यांजवळ दस्ताऐवज चिरंजीव मशारनिल्हे यांचा पन्नास लक्षांचा आहे, तो परतून द्यावयाचा असे. त्यास, राव शिंदे यांनीं कदाचित् दस्ताऐवज द्यावयाविषयीं अनमान केला व सरकारासीं पस्तीस लक्षांचा तगादा केला, तर राव पंतप्रधान यांनीं शिंदे बहादूर यांस ताकीद करावी. ताकीद न मानून जर हंगामा करतील, तर तर्फेन-कडून एक विचारें निराकरण व्हावें. कलम सुवाद.

१ सन खमस तिसैन सन १२०४ फसली खर्डे याचे सालीं, सरकारांतून राव पंतप्रधान यांजला ऐवज द्यावयाचा करार ठरला; त्यापैकीं आजमुलउमरा यांचे विद्यमानें निश्चय जाला कीं तीन हिस्से असफजाहा यांजला सूट देऊन, बाकी एक हिस्सा राव पंतप्रधान यांजला द्यावा. त्याऐवजीं पन्नास लक्ष राव पंतप्रधान यांनीं राव शिंदे यांस देविले होते. त्यापैकीं पंधरा लक्ष रुपये असफजाहा यांचे सरकारांतून शिंदे बहादूर यांजकडे वसूल पडले. बाकी पस्तीस लक्ष राहिले. त्यांतून दहा लक्ष रुपये राव पंतप्रधान यांनीं असफजाहा यांजला सूट दिल्हे. बाकी पंचवीस लक्ष रुपये राव पंत प्रधान यांजला द्यावयाचे, ते येणें मुदतीप्रमाणें द्यावयाचा करार—

[ येथें मुदती दिल्या नाहींत. ] × × × × ×

एकूण पंचवीस लक्ष रुपये सदरहू मुदतीप्रमाणें सरकारांतून राव पंतप्रधान यांचे सर-कारांत प्रविष्ट केले जातील. सुवाद.

१ सुभे बेदर येथील स्वराज्यापैकीं चौथा हिस्सा राव पंतप्रधान यांचे सरकारांत होता.

त्याऐवजीं इस्तकबील सन १२०६ फसली तागाईत सन १२०८ फसली तीन सालें सरकारांतून राव पंतप्रधान यांजला द्यावयाचीं व छ ११ मोहरमेस करार जाला कीं, आठ लक्ष रुपयांची जहागीर राव पंतप्रधान यांनीं सरकारांत द्यावी. त्याचा ठराव अलाहिदा कलमांत लिहिला असे. तो ऐवज सरकारांत राव पंतप्रधान यांजकडून घ्यावयाचा तपसील:—

८०००००० बाबत सन १२०८ फसली.

३७५००० बावत सन १२०९ फसली. ८०००००० पैकीं वजा बद्दलस्वराज्य सुभे बेदर राव पंतप्रधान याजला दिल्हे. ४२५००० बाकी

११७५०००

एकूण अकरा लक्ष पंचाहत्तर हजार रुपये जहागीरचे महालाचा ऐवज जो होईल तो सरकारांत घेणें व राव पंतप्रधान यांजला चौथाईचे ऐवजीं सदरीचे तपसिलाप्रमाणें ऐवज देणें. त्यास दोही रकमांचा फडशा दोन्हीकडून करावा. सुवाद.

१ सांप्रत राव पंतप्रधान यांचे सरकारांत खाजगी मझेला उपस्थित असे. त्यास कदाचित् तसाच समय प्राप्त जाला, तर सरकारांतून स्वार व बार व जिनसीची जमीयत ह्मणजे भारी जमीयत बाजीराव रघुनाथ पंतप्रधान यांसी घरचा मझेला दूर होय तोंपावेतों, जमीयतीनसीं सरकारअली अनकूल राहील. कलम सुवाद.

६

एकूण सहा कलमें याप्रमाणें तर्फैनकडून अमलांत यावीं. तहरीर छ २० जमादिलाखर सन १२१४ हिजरी.

---

## यादी १९.

श्री.

यादी यावरूतीं सरकार कुंपणी इंग्रेज बहादुरांच्या सरकारांत मुकरर जाहलें आहे कीं, बमुजेब तहनामे वसईच्या तेरावे कलमांत मरकूम केलें आहे कीं, सरकार श्रीमंत राव पंडत प्रधान बहादूर यांचे सरकारचे कितीक मुकदमे नवाब असफजाहाबहादूर यांचे सरकारांतून फैसले होणें आहेत. ते हल्लीं सरकार कुंपणी बहादूर यांचे विद्यमानें फैसले व्हावे. याजवर तमाम कैफियत दोन्ही सरकारचे तर्फैनची जाहीर व्हावी, सबब अवल श्रीमंत बहादूर यांचे सरकारचा वाजवी लवाजमा स्वराज्याचा नवाब असफजाहाबहादूर यांचे सरकारावर ज्यारी आहे व त्याजविशीं कांहीं कजिया व किसा नाहीं. त्याचा तपसील:—

४६६४२९७॥।≈॥ महालानिहाय व गांव श्रीमंतांचे स्वराज्याचा अंमल व जहागिरीचा अंमल नवाब मवसुफ यांचे सरकारांत वाजवु तलब त्याची बेरीज रुपये.

३६३८२३।.। सरकार माहूर पैकीं स्वराज्याचा अंमल त्याची बेरीज रुपये.

५०२८१२१≤≈।॥

या जमेखेरीज जे पाळेगार दोन्ही सरकारांत पेषकशी देत आहेत, ते सदरहू बेरजेंत दाखल नाहींत.

याजप्रमाणें स्वराज्याचा अंमल साल दरसाल जारी आहे, तो वसूल होत जावा. दोन्ही सरकारांमध्यें कितीक मुकदमे मुलतवी आहेत, त्यांचे फैसले सरकार कुंपणी बहादुराचे मार्फतीनें जाहले पाहिजे, तर या मुकदम्याचे बाबें सहा तहनामे मातबर तपसील माफक आहेत.

१ अवल तहनामा यादगिरीचा त्याची नकल हजर आहे.

१ दुसरा खर्ड्याचा तहनामा हजर नाहीं. लेकिन महाडाचे तहनाम्यावरून त्याचा मतलब साफ मालूम होतो.

१ तिसरा महाडाचा तहनामा बमुजेब नकल हजर असे.

१ चौथा सन १२०६ फसलीचा तहनामा हजर नाहीं. लेकिन त्याचा मतलब छ ११ जिल्हेज सन १२०८ फसलीचे तहनाम्यावरून मालूम होतो.

१ पांचवा तहनामा छ ११ मोहरम सन १२०८ फसलीचा हजर नाहीं. परंतु छ ११ जिल्हेज सन १२०८ फसलीचे तहनाम्यावरून मतलब मालूम होतो.

१ सहावा छ ११ जिल्हेज सन १२०८ फसलीचा तहनामा याची नकल हजर आहे.

६

यादगिरीचे तहनाम्याचे तिसरे व सहावे कलमावरून मालूम होतें कीं, अदोनी सुद्धां स्वराज्याचा अंमल ज्यारी राहील, व खर्ड्याचे तहनाम्याचा मजकूर कीं, बत्तीस लाख रुपयांचा मुलूख मै किल्ला दौलताबाद व दोन करोड रुपये नवाब मवसूफ यांणीं श्रीमंत साहेबांचे सरकारांत द्यावे. महाडाचे तहनाम्यावरून मालूम होतें कीं, बत्तीस लाखांचा मुलूख व दौलताबादेचा किल्ला व दोन करोड रुपये नवाब मोइन यांजला माफ केले. जोपावेतों नवाब निजामलीखान बहादूर हीन हयात आहेत, तोंपावेतों सुभे बेदर येथील चौथाईचा अंमल नवाबास माफ असे. छ ११ मोहरम सन १२०८ फसलीच्या तहनाम्यांतील मतलब ऐसा आहे कीं, दोन करोड रुपयांपैकीं चौथाई हिस्सा पन्नास लाख रुपये व सुभे बेदरचे चौथाईच्या अंमलापैकींचा हरुम हिसा नवाब निजामलीखान बहादूर यांजकडून श्रीमंत साहेबाचे सरकारांत यावा. पांचवा तहनाम्याचा मतलब ऐसा मालूम होतो कीं, श्रीमंत बहादूर यांचे सरकारांतून नवाब निजामलीखान बहादूर यांचे सरकारांत आठ लक्ष रुपयांची जहागीर द्यावी व काम पडल्यास नवाबाची फौज कुमकेस येत जावी. सहावा तहनामा छ ११ जिल्हेज सन १२०८ फसलीचे तहनाम्याचा जो मजकूर तो बहाल बर–करार असावा व सन १२०६ फसलीचे तहनाम्याचे माफक श्रीमंतांचे सरकारांत पन्नास लाख रुपये दोन करोड रुपयांचा चाहरुम हिस्सा व सुभे बेदर येथील चौथाईचा चाहरुम हिस्सा नवाब निजामलीखान बहादूर यांचे सरकारांतून श्रीमंत बहादूर यांचे सरकारांत द्यावा व श्रीमंतांचे सरकारांतून नवाबाचे सरकारांत आठ लक्ष रुपयांची जहागीर बमुजेब तपसील तहनाम्याचे

लिहिल्याप्रमाणें द्यावी. याजवर सरकार श्रीमंत बहादूर यांचा दाइया नवाब निजामलीखान बहादूर यांचे सरकारावर ऐसा आहे कीं, आजरोये तहनामा छ ११ जिल्हेज सन १२०८ फसलीचे तहनाम्यांतील शर्ता हलीचे शर्तेमध्यें कांहीं बराबर पडत नाहींत वा शर्ता लिहिल्या बमुजेब अंमलांतही आल्या नाहींत. जर अमलांत आणाव्या तर मुशकील आहे. याचा वास्ता कीं मुशीरुलमुल्ख मरहुम यांणीं शिंदे बहादूर यांजला पस्तीस लाख रुपयांची चिठी द्यावी असें लिहून दिल्हें आहे. त्यास तहनामे सन १२०८ फसलीचे रुइनें सदरहू चिठी श्रीमंत बहादूर यांणीं शिंदे बहादूर यांजपासून घेऊन, नवाब मवसूफ यांजला द्यावी लागती. तर प्रस्तुतकाळीं हे गोष्ट मुशकील आहे. अंमलांत येऊं शकत नाहीं. तर श्रीमंत बहादूर यांचे सरकारचा मतलब कीं, कितीक मुकदमे नवाबाचे सरकारांतून कुंपणी बहादूर यांचे सरकारचे मार्फतीनें फैसले व्हावे. याजकरितां महाडचा तहनामा मंजूर ठेवितात. त्यास महाडचे तहनाम्यावरून ऐसें आहे कीं, सुभे बेदर येथील चौथाईचा अंमल जों पावेतों नवाब निजामलीखान बहादूर हीन हयात होते, तों पावेतों नवाब मवसूफ यांजकडे होता. त्यास नवाब मवसूफ बहेस्तनसीन जाहले, त्या दिवसापासून जो वसूल चौथाई अंमलाचा घेतला असेल, तो आदा व्हावा व पुढें बेदरचे चौथाईचा अमल ज्यारी असावा. अदोनीचे मुलखाची चौथाईचा अंमल मुशीरुलमुल्क मरहूम यांचे खताची नक्कल हजर असे. त्याप्रमाणें अदोनीचे चौथाईचा ऐवज नवाबाचे खजान्यांतून आदा व्हावा. अदोनीची चौथाईची बाकी महाडचे तहनाम्यावरून सन १२०५ फसलीपासून दहा सालें बाकी राहिली, तीही आदा व्हावी.

## पेशवे व फिरंगी.

### तहनामा १.

तहनामा सरकार राजश्री बाळाजी पंडित प्रधान सु॥ इहिदे आर्बैन मया व अलफ. सरकारचा व फिरंगी याचा जंग दरपेश येऊन कजीया जाहला. त्यास गोव्याहून अजम पेद्र मस्करे जलालेद देसा व दोमीन विजुरे गोव्याचे तर्फेनें दो फरासीस्क बतेन गेले. फलेस व अजम इष्टफीनला जनराल बंदर मुंबई यांचे तर्फेनें कपितान इंचवर्ड येऊन तहनामा करार केला. बितपसील:—

साष्टी बारदेशांत इकडील अंमल आहे तो उठवावा. कुकुलीचा कोट आहे त्यास जुनी इमारत असेल ती कायम राखून, नवीन इमारत केली असेल ते पाडून टाकून कुकुलीस दारुगोळा तोफा व वस्तभाव गल्ला दाणा असेल तो नेऊं. त्यास फिरंगी यांणीं अटकाव न करावा. कलम १.

वसईप्रांत व साष्टी व दवणप्रांत व बेलापूर व उरण व रेवदंडा व कोरळ या प्रांतास फिरंगी यांणीं आजार न द्यावा. याच तऱ्हेनें साष्टी बारदेशांत व दवणेस परगणा देऊं, तेथील अमल सालाबादप्रमाणें

फिरंगी यांणीं करावा. त्यास सरकारतर्फेनें आजार अगर अटकाव होणार नाहीं.

कलम १.

फोंडेप्रांत व जावेली पंचमहाल व सोंधे व बिदनूर प्रांतें सरकारचा तालुका जाला आहे व पुढें होईल, त्यास फिरंगी यांचे तर्फेनें उपसर्ग न करावा. कलम १.

सरकारतर्फेचे तारुं, तरांडें दर्यांत आमदरफ्ती करील, व सरकारी व सावकारी तरांडीं मस्कत वगैरे बंदरीं जाऊन, खजूर व खारीक व घोडे वगैरे मस्कती जिन्नस आणतील; व मस्कताहून सावकारी तरांडीं एक दोन जोरी करून सदरहू जिन्नस व घोडे आणतील, त्यास फिरंगी यांचे तर्फेनें मुजाहीम होऊं नये. याचप्रमाणें फिरंगी यांचे तर्फेनें सरकारी व सावकारी तरांडीं दर्यांत आमदरफ्ती करतील, त्यास सरकारतर्फेचे अरमाराचा उपसर्ग लागणार नाहीं.

कलम १.

या तर्फेचीं बंदीवानें फिरंगी यांचे अटकेंत असतील व तिकडील इकडे असतील, तीं दुतर्फाकडून खलास करावें. बंदी गुलाम इकडील तिकडे व तिकडील इकडे पळोन येईल, त्यास दुतर्फाकडूनहीं हवाली करावा. कलम १.

वतनदार इकडील तिकडे व तिकडील इकडे यापूर्वी गेले आले असतील, ते आपले रजावंदीनें जातील, तर सुखरूप जाऊं द्यावे. याउपर कोणी इकडील तिकडे व तिकडील इकडे येतील जातील, त्यास दुतर्फाही आश्रा न द्यावा. यापूर्वी गेले आले आहेत वतनदार त्यांजकडून मुलखांत उपसर्ग केला, तर दुतर्फाकडूनही सज्या द्यावी.

कलम १.

कुकुलीचे कोठींतील सामान, तोफा, दारुगोळा वगैरे देखील गल्ला दाणा न्यावयासी बेगारी लागतील, ते कुकुलीचे कदीम पांच गांव आहेत तेथील बेगारी घेऊन सामान नेऊं. वरकड साष्टीचे गांवांस उपसर्ग होणार नाहीं. सदरहू वेठीयास सामान पोंहचलीयावर रजा देऊं. अटकाव होणार नाहीं.

कलम १.

रेवदंडीयाचे कोटांतील व कोरळच्या कोटांतील सावकार वगैरे लोक आपले संतोषें राहतील त्यांणीं राहावें. जे आपले स्वसंतोषें जातील, त्यांस वस्तभावसुद्धां जाऊं दिल्हे जातील. त्यांस उपसर्ग लागणार नाहीं. फिरंगी यांचा गल्ला वस्तभाव असेल ते त्यांणीं सुखरूप घेऊन जावी. कलम १.

दवणाचा कोट व साव जतने ऊर्फ लोढे दवणचा कोट असे दोनी कोट फिरंगी यांचे आहेत, त्याप्रमाणें फिरंगी याकडे राखावे. त्यास सरकारतर्फेनें उपसर्ग लागणार नाहीं. हरदू कोटाचे बेगमीस एक परगणा द्यावयाचा करार केला आहे; त्याप्रमाणें परगणे न्हेर प्रांत दवण देऊं. त्यास सदरहू परगणीयांत सरकारचे किले असतील त्याचे मुतसील गांव असतील ते किल्याकडे राखून, त्याचा मुबदला लोढे दवणेची जमीन व तिचे मुतसील गांव असतील ते नेमून देऊं. न्हेर परगण्याचे गांव सरकारच्या किल्याचे मुतसीलचे

ठेवून, त्याचे मुबदला गांव ऐवज माफीक नेमून द्यावयासी सरकारचा कारकून व फिरंगी यांचा कारकून जाऊन नेमून द्यावे.

कलम १.

आंग्रीयाशीं कजीया करूं, ते समयीं फिरंगी यांणीं कुमक करून अरमारानिशीं सर्व प्रकारें करावी. कलम १.

सरकारचीं तरांडीं असोलणीयाचे बंदरीं तयार आहेत, तयार होणें असेत व फोंडे याचे बंदरीं ग्याली व गलबतें आहेत, तीं अनुकूल पडेल तर इकडे आणूं; अगर सोंधें प्रांतीं जागा करून तेथें सत्वर नेऊं. तोंपर्यंत सदरहू तरांडीं यांचे रखवालीस शंभर माणूस राहील. त्याचे वाटेस फिरंगी यांणीं न जावें. तसेंच सरकारचे लोक तेथें राहतील त्यांणीं साष्टीबारदेशांत उपसर्ग न करावा. सरकारचीं गलबतें असोलणें व फोंडेच्या बंदरीं जोंपर्यंत असतील, तोंपर्यंत वाऱ्यावर जाऊन सावकारास छडाछड न करावी. तरांडीं नेऊं त्यास फिरंगी यांचे तर्फेनें मुजाहीम अगर अटकाव न करावा.

कलम १.

तिकडील पाटील रयत इकडे येईल अगर आली असेल, व इकडील पाटील रयत तिकडे जाईल अगर गेली असेल, त्यांस दुतर्फाकडूनही (जाऊं येऊं) द्यावें. त्याचे दुतर्फाकडून चालवावें. त्यास आजार देऊं नये. कलम १.

सदरहू पाटील रयत रजावंदीनें जातील त्यास दुतर्फाकडून जाऊं द्यावें. कलम १.

रेवदंडा याचा कोट व कोरळचा कोट देखील तोफा दारुगोळा हवाली करावयाचा करार आहे. त्याप्रमाणें दोनी दरवाजे कोटाचे इंग्रजांचे लोकांचे हवाली करावे. साष्टी बारदेशांतील ठाणीं उठोन गेलीयाचा कागद येई तों पर्यंत, सरकारचे लोकांस संजाबाच्या(?) देवळांत व गांवांत राहावयासी जागा द्यावी. साष्टी बारदेश निदुर्झा जालीयाचें पत्र येतांच, इंग्रजांनीं सरकारचे लोकांस दोन्ही कोटांत दाखल करून आपण निघोन जावें. तोफा दारुगोळीची मोजदाद करावयास अगोदर कारकून नेऊन मोजदाद करून ठेवावी. कलम १.

सांवताचा व तुमचा तह जाला आहे त्याप्रमाणें तुह्मीं उभयतांनीं चालावें. जर सांवताकडून तहास अंतर जालें, तर आह्मीं तुमची मदत करूं. अगर तुह्मांकडून सांवताचे तहामध्यें अंतर जालें, तर या तर्फेनें सांवताची मदत करावी.

कलम १.

येणेंप्रमाणें चवदा कलमें करार केलीं असेत. सदरहूप्रमाणें दुतर्फाकडूनही अमलांत आणावें. या तहनाम्यापूर्वीं दुतर्फाकडून तह जाले असतील ते रद्द असेत. सदरहू तहनाम्याप्रमाणें दुतर्फाकडूनही चालावें. जाणिजे छ २७ माहे जमादिलाखर.

## तहनामा २.

तहनामा सरकार राजश्री बाळाजी पंडित प्रधान सुरु सन इहिदे आर्बैन मया व अलफ. गोंव्याहून अजम पेद्र मस्केर नकोद देसा व दामील विजुरे याचे तर्फेनें दाफरुसिस्क बरोनगले फलस व अजम इष्टफिनक जनराल बंदर मुंबई याचे तर्फेनें कपितान इंचबर्डी पुणीयाचे मुक्कामीं येऊन तह केला. इंद्रगडचे मुतसील गांव सरकारांत घ्यावे; व दवणचे मुतसील गांव दवणेकडे द्यावेसा करार जाला. त्याची वाटणी इंद्रगडचे मुक्कामीं विद्यमान राजश्री शंकराजी केशव व फिलीप व वलबारसोतम थोर कपितान प्रासकोंट दवण याचे तर्फेनें फरसीस्क पाईदमाले कपितान मोरकाद दवण व शिवाजी रणसोड दिमत इंचबेर्ड करार येणेंप्रमाणें.

तालुका निसबत राजेश्री बाळाजी बाजीराव पंडित प्रधान देह मुतसीलप्रमाणें

नहेर पैकीं.

१ मौजे कलगांव.
१ मौजे फणसे देखील पाखाडी मरजगांव.
१ मौजे कोलई.
१ मौजे कगले देखील पाखाडी कशोल.
१ मौजे मोहन.
१ मौजे पाल.
१ मौजे जंबुरी.
१ मौजे पुनाट.
१ मौजे आणगांव.
१ मौजे येककेर.
१ मौजे जावली.
१ मौजे कराजले.
१ मौजे वेरकई.
१ मौजे वावडे.
१ मौजे आतसी.
१ मौजे वेरीगांव.
१ मौजे कचीगांव.

१७



एकूण देह सतरा सरकारांत मुतसील ठेऊन, याचे ऐवजीं मुबदला परगणे खकडे पवडीपैकीं तालुका दवण ऐवजे ऐवज पुरवून द्यावा. विघे एकूण उगवणी सुदामत शिरस्तेप्रमाणें गल्ला व नक्त बेरीज परस्परें दुतर्फा पुरवून द्यावी. त्याचे ऐवजीं तालुका फिरंगी देह मुतसील देह सुमार.

१ मौजे वरकुद.
१ मौजे खलीकची गांव.
१ मौजे रिंगीण वाडा.
१ मौजे मुदलये देखील भेसरोल पाखडी.
१ मौजे देवकू देखील पाखडी वाकड धामडे.
१ मौजे कथलीये.
१ मौजे कडीये.
१ मौजे दलवडे देखील पाखडी मरवडे.
१ मौजे भिमपुर.
१ मौजे दाभले.
१ मौजे खोरीवाडी.

११

एकूण देह अकरा तालुका दवणेकडे नेमणूक करून दिल्ही आहे. यासी ऐवजे ऐ-

ढवूं नये. दवणकरांनीं वसईस ल्याहावें. वसईकरांनीं दवणेस लिहून कजीया चुकवावा.
कलम १.

वरकुंदचे कावलीये सरकारांत चाकर आहेत. त्यास फिरंगी यांनीं रजावंद करून नेलीयास सरकारांत त्यास अटकाव होणार नाहीं. जोरावरीनें नेऊं देणार नाहीं.
कलम १.

येणेंप्रमाणें कलमें अठरा करार केलीं असेती. बमोजीब तहनामा पुणीयाचा गांवची वाटणी करून दिल्ही असे. सदरहूप्रमाणें दुतर्फा वर्तणूक करावी. जाणिजे. छ २२ माहे जिल्काद. वरलीयाचे गांवच्या शिंदी सुदामत पाल पडत होत्या त्याप्रमाणें द्याव्या. त्याचा आकार न करावा. छ मजकुरीं सदरहू कलमांपैकीं सावकारी जहाजाचें कलम व वडकोनचे काबले रजावंद करून नेयाचें कलम दूर करून, फिरंगी याजवळी तहनामा लिहून दिल्हा, त्यांत सत्रा कलमें लेहून दिल्हीं असेत. जाणिजे छ मजकूर.

---

## तहनामा ३.

श्री.

तहनामा सरकार राजश्री माधवराव पंडित प्रधान सुरुसन समान सबैन मया व अलफ. आजम दोजुजे पेद्र देकाम्र फिरंगी विजुरे गोवें यांजकडून राजश्री नारायण विठ्ठल धुमे हुजूर येऊन सलुखाचा मजकूर विदित करून, सरकारचा व फिरंगी गोवेंकर याचा तहाचा ठराव जाहला कलमें. बितपशील.

सरकारचे अरमारासी व फिरंगी याचे अरमारासीं अगर एकाही तरांड्यासीं अथवा एकही तर्फेचें एकच तरांडें व दुसरे तर्फेचे अरमारासीं गाठ पडली तरी सलुखानें वर्तावें.
कलम १.

सरकारच्या अरमारासीं व फिरंगी याचे अरमारासीं मार्गीं गांठ पडली, तरी एका तर्फेस पाणी व फाटी नसल्यास दुसरे तर्फेनें, पाणी फाटी अधिक शिलक असेल तरी द्यावे. व गल्ला एकाचे अरमारावर शिलक नसल्यास दुसरेयाचे अरमारावर अधिकोत्तर शिलक असली तरी नक्त रुपये घेऊन गल्ला द्यावा. येणेंप्रमाणें दुतर्फा चालावें. कलम २.

चीनच्या प्रांतांतील फिरंगी याचे बंदरचीं जहाजें माल भरून उदमास समुद्रांत फिरतात, त्यांस सरकारच्या तर्फेच्या अरमारानें मुजाहीम होऊं नये; व चीनच्या बंदरीं सरकारतर्फेचीं जहाजें उदमास जातील, त्यांस फिरंगी यांणीं मुजाहीम होऊं नये. कलम ३.

सरकारच्या राज्यांतील फिरंगी याचे मुलकांत बंदी व गुलाम पळोन जातील ती त्यांणीं हवालीं करावी. याप्रमाणें दुतर्फा चालावें. कलम ४.

या तहनाम्याचे अगोदर लढे असतील ते दुतर्फाही काढूं नयेत. कलम ५.

दुतर्फा तह हल्ली ठरला, त्यास दरम्यान हरएक किलाफ भासल्यास वकीलाचे मार्फतीनें बोलोन निखालस दुतर्फा चालावें. कलम ६.

सरकारच्या राज्यांत फिरंगी याच्या राज्यांतील सावकारी तरांडीं पडाव्या अगर बतेले माल घेऊन येतील; उदीम वेवसाव करणार. त्यांणीं सालाबादप्रमाणें जकात सरकारांत देऊन करावा. कोणापासून तोशीस होऊं नये. सावकार आपला जिन्नस विकून दाणादुणा वगैरे जिन्नस सुखरूप न्यावा. याचप्रमाणें सरकारचे राज्यांतील सावकारांनीं बतेले व पडाव्या फिरंगी याचे राज्यांत दाणादुणा वगैरे जिन्नस विकून तेथील जिन्नस मोबदला वगैरे घेणार, तो घेऊं द्यावा. सालाबादप्रमाणें जकात देतात ती घेऊन सुखरूप येऊं द्यावा. कोणापासून उपसर्ग लागों नये. दुतर्फा करार असे. कलम ७.

दुतर्फाचे राज्यांतील सावकारी तरांडीं हरकोणी राज्यांत जाऊन समुद्रांत फिरतात. तीं दुतर्फाच्या अरमारास अगर हरकोणी युद्धाच्या जहाजास किंवा शिबाडास सांपडलीं तरी कौल नाहीं ह्मणोन धरूं नये. सुखरूप जाऊं द्यावीं. दुतर्फा राज्यांतील सावकारी तरांडें समुद्रांत गनीम नेत असेल आणि दुतर्फामधील कोणाचेंही अरमार किंवा एकाही तरांड्यासीं गांठ पडली, तरी मदत करून जोर पोहचल्यास सोडवून, जवळ सारखाडी पावेतों पोहचवावें. याप्रमाणें जो सरदार करील त्याच्या खावंदानें बहुमान करावे. कलम ८.

सरकारचे अरमारास व गनीमाची गांठ पडोन युद्ध होत असतां त्या समयीं फिरंगी याचे अरमार व फरगत येऊन पावलें, तरी गनीम फिरंगी याचा स्नेही नसल्यास, होईल तें साहित्य व कुमक करावी. याचप्रमाणें दुतर्फा अरमारानें करावें. कलम ९.

सरकारचा व फिरंगी याचा तह जाहला या अन्वयें परस्परें सरदेच्या वगैरे अमलदारांस व अरमारास ताकीद व्हावी. कदाचित् मामलेदारापासून अंतर पडल्यास ज्याचे त्यांणीं ताकीद करून बंदोबस्त करावा. याप्रमाणें दुतर्फा ( करार ). कलम १०.

सरकारचे राज्यांतील फिरंगी याचे राज्यांत, खुन्या, मातबर व जमीदार वगैरे हरकोणी पळोन जाऊन सरकारचे प्रांतांत दांडगावे अगर फितूर करील, त्यास आश्रा देऊन दांडगावे व फितूर करूं देऊं नये. व परस्परें राज्यांतील सरदेस फितुरी यासी जागा राहावयासी देऊं नये. याप्रमाणें दुतर्फा ( करार ). कलम ११.

सरकारचे गनीमास फिरंगी यांणीं मदत करूं नये व साहित्य जिन्नस देऊं नये व फिरंगी याचे गनीमास सरकारांतून साहित्य व मदत व जिन्नस वगैरे देऊं नये. कलम १२.

दुतर्फांतून एकीकडे कमजोर पडल्यानें दुसऱ्यानें दिकत काढून कलह करूं नये. कराराप्रमाणें सलुखानें निखालस वर्तावें. कलम १३.

फिरंगी यांणीं आपले बंदरचे सावकाराखेरीज दुसरे बंदरचीं गलबतें आपले काफल्याबरोबर आणूं नयेत व आपलें निशाण देऊं नये. कलम १४.

सरकारचे शिपाई लोक फिरंगी याचे राज्यांत गेले तरी ठेवूं नये, व आश्रा देऊं नये, व माघारे हवाली करावे. याचप्रमाणें फिरंगी याचे राज्यांतील फिरंगी वगैरे लोक सरकारच्या राज्यांत आले तरी ठेवूं नये व आश्रा देऊं नये. माघारे द्यावे. कलम १५.

किबलगाह रघुनाथराव यासी फिरंगी यांणीं आपले राज्यांत येऊं देऊं नये व राहूं देऊं नये व साहित्य देऊं नये व मदत करूं नये. कलम १६.

एकूण सोळा कलमें फिरंगी गोवेंकर यांजकडील नारायण विठ्ठल धुमे हुजूर येऊन तह केला त्याचीं कलमें करार जालीं. त्याजप्रमाणें तहनामा करून द्यावा. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

छ १८ रमजान समान सबैन.

---

## तहनामा ४.

श्री.

करारनामा सरकार राजश्री माधवराव पंडित प्रधान सुरुसन समानीन मया व अलफ. अजम दोजुजे पेद्र देकाब्र फिरंगी विजुरे गोवें याजकडून राजश्री नारायण विठ्ठल धुमे हुजूर येऊन, सलुखाचा मजकूर विदित करून, सरकारचा व फिरंगी गोवेंकर याचा तहाचा ठराव जाहला. कलमें बितपसीलः—

सरकारचें अरमारासीं व फिरंगी याचे अरमारासीं अगर एकाही तरांडीयासी अथवा एकही तर्फेचे एकच तरांडें व दुसरे तर्फेचे अरमारासीं दर्यांत गांठ पडली तर सलुखानें वर्तावें. कलम १.

चीनच्या प्रांतांतील फिरंगी याचे बंदरचीं जहाजें माल भरून उदमास हरएकाचे बंदरीं खेरदी फ्रोख्तास समुद्रांत फिरतात, त्यास सरकारतर्फेच्या अरमारानें मुजाहीम होऊं नये; व चीनच्या बंदरीं सरकारतर्फेचे बंदरचीं जहाजें उदमास जाण्याकरितां समुद्रांत फिरतील, त्यांस फिरंगी यांणीं मुजाहीम होऊं नये. कलम १.

या तहनाम्याचे अगोदरचे लढे असतील ते दुतर्फाहीं काढूं नयेत. कलम १.

सरकारच्या राज्यांत फिरंगी याजकडील मुलकांतील सावकारी तरांडीं, पडाव्या अगर बतेले माल घेऊन येतील, उदीम व्यवसाय करणार. त्यांणीं सालाबादप्रमाणें जकात सरकारांत देऊन करावा व कोणापासून तोशीस होऊं नये. सावकार आपला जिन्नस विकून, दाणा वगैरे जिन्नस खेरदी करून सुखरूप न्यावा. याप्रमाणें सरकारचे राज्यांतील सावकारांनीं बतेले व पडाव्या फिरंगी याचे मुलकांत दाणा वगैरे जिन्नस विकून तेथील जिन्नस मुबदला वगैरे खेरदी करून घेणार तो घ्यावा. सालाबादप्रमाणें जकात देतात ती देऊन सुखरूप जावें. कोणापासून उपसर्ग होऊं नये. दुतर्फा करार असे. कलम १.

सरकारचे अरमारास व गनीमासीं गांठ पडोन युद्ध होत असतां, त्या समयीं फिरंगी याचें अरमार व फरगत येऊन पावलें, तर गनीम फिरंगी याचा स्नेही नसल्यास होईल तें साहित्य व कुमक करावी. याप्रमाणें दुतर्फाचे आरमारानें करावें. कलम १.

सरकारचे राज्यांतील फिरंगी याचे मुलखांत खुन्या, मातबर व घरचे वडील धाकटे व जमीदार वगैरे हरकोणी पळोन जाऊन सरकारचे प्रांतांत दांडगावे व फितूर करील, त्यांस आश्रा देऊं नये व फितूर करूं देऊं नये. व परस्परें राज्यांतील सरदेस फितुरी यास जागा राहण्यास देऊं नये. याप्रमाणें फिरंगी याचे मुलखांतील सरकारचे राज्यांत खुन्या मातबर जमीदार वगैरे हरकोणी पळोन येऊन फिरंगी याचे प्रांतांत दांडगावे व फितूर करील त्यास आश्रा देऊं नये व फितूर करूं देऊं नये. परस्परें राज्यांतील सरदेस फितुरी यास जागा राहण्यास देऊं नये. याप्रमाणें दुतर्फा चालावें. कलम १.

सरकारचे राज्यांत, गुजराथ सांवत व काठेवाड व सोरठ वगैरे सुद्धां हरएक जागा फिरंगी यांणीं पुढें ठाणें घालूं नये व पहिल्यापासून फिरंगी याकडे हल्लीं बंदरें आहेत तेथून आमदरफ्ती करावी. कलम १.

फिरंगी यांणीं सरकारांत स्नेह बहुत चालविला व पुढेंही विशेष स्नेह चालविणार येविशीं नारायण विठ्ठल धुमे यांणीं निशा केली. त्याजवरून दवणेस सालमजकुरापासून बारा हजार रुपयांचे गांव सरकार अमलास वगैरे पंच नाहीं असे नेमून द्यावे. त्यांत फिरंगी यांणीं इमारत करूं नये. याप्रमाणें करार केला असे. गांव नेमून दिल्हे जातील. कलम १.

सरकारच्या अरमारासीं व फिरंगी याचे अरमारासीं मार्गीं गांठ पडोन, एक तर्फेस पाणी व फाटी नसल्यास दुसरे तर्फेनें पाणी व फाटी अधिक शिल्लक असेल तर द्यावें, व गल्ला एकाच्या अरमारावर शिल्लक नसोन दुसरे अरमारावर अधिक शिल्लक असेल तर नख्त रुपये घेऊन गल्ला द्यावा. येणेंप्रमाणें दुतर्फा चालावें. कलम १.

सरकारचे राज्यांतील फिरंगी याचे मुलकांत बंदी व गुलाम पळोन जातील ती त्यांणीं हवालीं करावी. याप्रमाणें दुतर्फा चालावें. कलम १.

दुतर्फा तह हल्लीं ठरला त्यास दरम्यानें हरएक किलाफ भासल्यास वकिलाचे मार्फतीनें बोलून निखालस दुतर्फा चालावें.

कलम १.

सरकारचे राज्यांतील व फिरंगी याचे मुलकांतील सावकारी तरांडीं हरएक बंदरीं जावयाकरतां समुद्रांत फिरतात. तीं दुतर्फाचे अरमारास अगर हरकोणी युद्धाचे जहाजास किंवा शिबाडास सांपडलीं तर कौल नाहीं ह्मणोन धरूं नये. सुखरूप जाऊं द्यावीं. दुतर्फा राज्यांतील सावकारी तरांडें समुद्रांत गनीम नेत असेल आणि दुतर्फामधील कोणाचेंही अरमार किंवा एकाही तरांड्यासीं गांठ पडली तर मदत करून, जोर पोहोंचल्यास सोडून जवळ सारखांडी पावेतों पो-

होंचवावें. याप्रमाणें जो सरदार करील त्याचा खावंदानें बहुमान करावा. कलम १.

सरकारचा व फिरंगी यांचा तह जाहला या अन्वयें परस्परें सरदेच्या वगैरे अमलदारास व अरमारास ताकीद व्हावी. कदाचित् मामलेदारापासून व मराठे राज्यांतील (?) याजपासून अंतर पडों लागल्यास ज्याचे त्यांणीं ताकीद करून बंदोबस्त करावा. याप्रमाणें दुतर्फा. कलम १.

सरकारचे गनीमास फिरंगी यांणीं मदत करूं नये व साहित्य वगैरे जिन्नस देऊं नये. व फिरंगी याचे गनीमास सरकारांतून साहित्य व मदत व जिन्नस वगैरे देऊं नये. कलम १.

दुतर्फांतून एकीकडे कमजोर पडल्यानें दुसरे यानें दिकत काढून कलह करूं नये. कराराप्रमाणें सलुखानें वर्तावें. कलम १.

सरकारचे राज्यांतील शिपाई लोक वगैरे फिरंगी याचे मुलखांत पळोन गेले तर ठेवूं नये व आश्रा देऊं नये. माघारे द्यावे. याप्रमाणें फिरंगी याजकडील सरकारचे राज्यांत फिरंगी लोक वगैरे पळून आले तर ठेवूं नये व आश्रा देऊं नये. माघारे द्यावे. कलम १.

सरकारच्या राज्यांतील साहुकारी तरांडें शिकस्त व फुटोन फिरंगी याचे बंदरीं लागलें तर तरांडें मालसुद्धां माघारे द्यावें. अगर गनीमाच्या भयास्तव बंदरीं आलें तर त्यास मुजाहीम होऊं नये. याप्रमाणें दुतर्फा चालावें. कलम १.

पेशजी फिरंगी याची सरई सरकारांत विजयदुर्ग अरमारानें धरून आणिली, ती फिरंगी याचा स्नेह जाणोन माघारी दिल्ही. त्या मालाचा पैका द्यावयाचा करार रुपये.

६६४५४ नख्त एक साला.

३००० लांकडें सागवानी वसईहून दवणेस पोहोचवावीं एकसाला.

६९४५४

एकूण एकूणहात्तर हजार चारशें चोपन रुपये नेमून दिले जातील. कलम १.

एकूण अठरा कलमें करार केलीं असेत. सदर्हूप्रमाणें दुतर्फा चालावें. येणेंप्रमाणें करार करावे.

छ ६ जिल्हेज सुरुसन समानीन मार्गशीर्ष.

---

## तहनामा ५.

श्री.

यादी फिरंगी गोवेंकर याजकडील तहनामा जाला, त्यांत कलमें फिर्गाणी अक्षराचीं लिहिलीं आहेत. त्याचा हिंदवी मजकूर करून लिहिलीं आहेत. ते सुरुसन बितपशीलः—

तहनामा हजरत इस्ताद मार्फत एक बल व इजलाल पन्हा साहेब गोवर्नदोर व कपितान व जेनरोल गाइद्य दोजुजे पेद्र दा काम फैसल अमारतमा अली मर्तबत माधवराव

नारायण पंडित प्रधान यांसी नारायण विठ्ठल धुमा यास रवाना केला. तदोपर सलुखाचा मजकूर बोलून, हजरत इस्तादाचा व अजम पंडित प्रधान यांचा तह ठराव जाहला, वितपशील:—

कलमें.

इस्तादाच्या अरमारासीं व पंडत प्रधान यांच्या अरमारासीं अगर एकही तरांडें यासीं अथवा एक तरफचें एकच तरांडें व दुसरे तरफचे अरमारासीं दरीयांत गांठ पडली तरी सलुखानें वर्तावें. कलम १.

इस्तादाच्या अरमारासीं व पंडत प्रधान यांच्या अरमारासीं मार्गीं गांठ पडोन एक तरफेस पाणी व फाटी नसल्यास दुसरे तरफेनें पाणी व फाटी अधिक शिल्लक असेल तरी द्यावे, व गल्ला एकाच्या अरमारावर शिल्लक नसोन दुसरे अरमारावर अधिकोत्तर शिल्लक असेल तरी नख्त रुपये घेऊन गल्ला द्यावा. येणेंप्रमाणें दुतरफा चालावें. कलम २.

चीनच्या प्रांतांतील इस्ताद याचे बंदरचीं जहाजें माल भरून उदीमास हरएकाचे बंदरीं खरेदीफरोख्तास समुद्रांत फिरतात, त्यास पंडत प्रधान यांच्या अरमारानें मुजाहीम होऊं नये; व चीनचे बंदरीं पंडत प्रधान यांच्या बंदरचीं जहाजें उदीमास जातील; इस्ताद तरफ मुजाहीम होऊं नये. कलम ३.

इस्तादाच्या राज्यांतील पंडत प्रधान यांच्या मुलखांत बंदीं गुलामें पळोन जातील तीं त्याणीं हवालीं करावीं. याप्रमाणें दुतरफा चालावें. कलम ४.

या तहनामे अगोदरचे लढे असतील ते दुतर्फाही काढों नयेत. कलम ५.

दुतरफा तह हलीं ठरला, त्यास दरम्यानें हरएक किलाफ भासल्यास वकिलाचे मारफतीनें बोलून निखालस दुतरफा चालावें. कलम ६.

पंडित प्रधान यांच्या राज्यांत इस्ताद याच्या राज्यांतील साहुकारी तरांडीं पडांग्या अगर बतेले, माल घेऊन येतील; उदीम वेवसायी करणार; त्यांणीं सालाबादप्रमाणें जकायत देऊन करावा. कोणापासून तोशीस होऊं नये. साहुकारांनीं आपला जिन्नस विकोन, दाणा वगैरे जिन्नस खरेदी करून सुखरूप न्यावा. याजप्रमाणें पंडित प्रधान यांच्या राज्यांतील साहुकारांनीं बतेले, पडांग्या, इस्ताद याच्या राज्यांत येऊन दाणा वगैरे जिन्नस विकोन, तेथील जिन्नस मुबादल वगैरा खरेदी करून घेणार तो घ्यावा. सालाबादप्रमाणें जकायत देतात ती देऊन सुखरूप जावें. कोणापासून उपसर्ग होऊं नये. दुतरफा करार असे. कलम ७.

दुतर्फाचे राज्यांतील साहुकारी तरांडीं हरकोणही राज्यांत जाऊन समुद्रांत फिरतात, तीं दुतरफाचे अरमारास अगर हरकोणी युद्धाच्या जहाजास किंवा शिबाडास सांपडलीं, तरी कौल नाहीं ह्मणोन धरूं नयेत. सुखरूप जाऊं द्यावीं. दुतरफाच्या राज्यांतील साहुकारी तरांडीं समुद्रांत गनीम नेत

असेल, आणि दुतर्फांमधील कोणाचेंही अरमार किंवा एकाही तरांडेसीं गांठ पडली तरी मदत करून, जोर पोहचल्यास सोडवून, जवळ सार खाडी पावें तंव पोहचवावें. याजप्रमाणें जो सरदार करील त्याच्या खावंदानें बहुमान करावा. कलम ८.

पंडित प्रधान यांच्या अरमारास व गनीमासीं गांठ पडोन युद्ध होत असतां, त्यासमयीं इस्ताद याचें अरमार व फर्गातें येऊन पावलीं, तर गनीम इस्तादाचा स्नेही नसल्यास, साहित्य व कुमक होईल तें करावें. याजप्रमाणें पंडित प्रधान यांच्या अरमारानें करावें. दुतरफा करार असे. कलम ९.

इस्तादाचा व पंडित प्रधान यांचा तह जाहला या अन्वयें परस्परें सरहदच्या व अमलदार वगैरा यांस व अरमारास ताकीद होऊन बंदोबस्त होईल. याजप्रमाणें पंडित प्रधान यांजकडील अमलदार, अरमार व राज्यांतील मराठे यांस ताकीद व्हावी. कदाचित् मामलेदारापासून व सरंजामी सरदार मराठे राज्यांतील यांकडोन अंतर पडों लागल्यास, ताकीद करून त्यांणीं बंदोबस्त करावा. याप्रमाणें दुतर्फा कलम १०.

इस्तादाच्या राज्यांतील पंडित प्रधान यांच्या राज्यांत जुन्या मातबर जमेदार वगैरे हरकोणी पळोन जाऊन, इस्तादाच्या प्रांतांत दांडगावे व फितूर करील त्यास आश्रा देऊं नये, व फितूर करूं देऊं नये. व परस्परें राज्यांतील सरहदेस फितूरी यास जागा रहावयास देऊं नये. याजप्रमाणें पंडित प्रधान यांच्या राज्यांतील इस्ताद याच्या राज्यांत जुन्या मातबर घरचे वडील धाकटे जमेदार वगैरे हरकोणी पळोन जाऊन, पंडित प्रधान यांच्या प्रांतांत दांडगावे व फितूर करील, त्यास आश्रा देऊं नये, व फितूर करूं देऊं नये; व परस्परें राज्यांतील सरहदीस फितूरी यास जागा रहावयास देऊं नये. याप्रमाणें दुतरफा.

कलम ११.

इस्तादाच्या गनीमास पंडत प्रधान यांणीं मदत करूं नये. साहित्य जिन्नस वगैरे देऊं नये. व पंडित प्रधान यांच्या गनीमास इस्तादानें साहित्य मदत वगैरे देऊं नये.

कलम १२.

दुतरफांतून एकीकडे कमजोर पडल्यानें दुसरे याणें दिकत काढोन कलह करों नये. कराराप्रमाणें सलुखानें निखालस वर्तावें.

कलम १३.

इस्तादाकडील फिरंगी लोक वगैरे पंडित प्रधान यांच्या राज्यांत पळोन गेले, तर ठेवूं नये व आश्रा देऊं नये व माघारी हवाली करावे. याजप्रमाणें पंडित प्रधान यांच्या राज्यांतील शिपाई लोक इस्तादाच्या राज्यांत आले तर ठेऊं नये, आश्रा देऊं नये व माघारे द्यावे. कलम १४.

पंडित प्रधान यांच्या राज्यांत गुजराथ सांवत व काठेवाड व सोरट वगैरे सुद्धां हरएक जागां इस्ताद याणें पुढें ठाणें घालूं नये, व पहिल्यापासून इस्ताद याकडे हल्लीं बंदरें आहेत तेथून आमदरफ्ती करावी. कलम १५.

इस्ताद याच्या राज्यांतील साहुकारी तरांडीं शिकस्त व फुटोन पंडित प्रधान यांचे

बंदरीं लागेल तर तरांडें मालसुद्धां माघारें द्यावें. अगर गनीमाच्या भयास्तव बंदरीं आलें तर त्यास मुजाहीम होऊं नये. याप्रमाणें दुतर्फा चालावें. कलम १६.

हजरत इस्तादाकडोन पंडित प्रधान यांचा स्नेह बहुतच चालविला; वकिलामुखें निशा पडली; त्याजवरून जहागीर दवणेस सालमजकूरपासून बारा हजार रुपयांची पंडित प्रधान यांणीं दवण प्रांतांत द्यावयाचा करार केला असे. त्याप्रमाणें इस्तादास द्यावयाची गांवगन्ना सनद अलाहिदा करार करून द्यावी. कलम १७.

इस्तादाकडील सरई पेशजी माघारें दिली, त्याच्या सामानाबाबद मागां पंडित प्रधान यांणीं द्यावयाचा करार केलेप्रमाणें रुपये:—

६६४५४ नक्त रुपये एक साला.

३००० लांकडें सागवानी सरईच्या-किरकोळ सामानाबाबद वसई हून दवणीस पोहचवावीं रुपयाचीं एक साला.

६९४५४

येणेंप्रमाणें सदरहू करार केल्यामाफक पंडत प्रधान यांकडून इस्तादास द्यावें. निविस्तन गोवा व तारीख ४ माहे मायु सन १७७९

छ १६ रबिलाखर सुरुसन ११७९.

कलम १८.

दो जुजे पेद्रदाकाम्र

हा तहनामा इजानेबास मान्य होऊन करार देऊन रुजू असे. गोवा व तारीख ११ माहे जनेर सन १७८० छ ३ माहे मोहरम सुरुसन ११८०.

दोफे देरी लागी. ल्येर्म देसान.

## ५ सातारचे राजे व कोल्हापुरचे राजे.

### तहनामा १.

तहनामा चिरंजीव राजश्री संभाजी राजे यांसी प्रती राजश्री शाहूराज यांणीं लिहून दिल्हा. सुरुसन सीत अशरीन मया व अलफ छ ५ माहे रबिलाखर उर्फ पौष शु॥ सप्तमी गुरुवार विश्वावसूनाम संवत्सरें बितपसील:—

अहद श्री कृष्णा धुम महाबळेश्वर पासून दक्षणतीर तहद निवृत्तिसंगम परीयंत, कुल दुतर्फा मुलख दरोबस्त देखील ठाणीं व किले तुह्मांस दिल्हे असे.

कलम १.

श्री सावित्री नदी उगमापासून तहद समुद्रगामिनी परीयंत दक्षणतीर जंजिरे कोट किलेसुद्धां व ठाणीं दरोबस्त महाल आंकोलपर्यंत तुह्मांस दिल्हीं असे. कलम १.

मिरज प्रांत व विजापूर प्रांतीचीं ठाणीं देखील अथणी, तासगांव वगैरे तुह्मीं आमचे स्वाधीन करावीं. कलम १.

इकडील चाकर तुह्मीं ठेऊं नयेत. तुह्मांकडील चाकर आह्मीं ठेऊं नयेत. कलम १.

तुंगभद्रा दक्षण तीरापासून श्री कृष्णा समुद्रगामिनी व श्री रामेश्वर देखील संस्थान निमें आह्मांकडे व निमें तुह्मांकडे करार करून दिल्हें असे. कलम १.

मोगलाईतील वगैरे उत्तरेकडील मुलूख सुटले, त्यांतील निमें प्रांत तुह्मांस देऊं; व तुह्मांकडून सुटला असतां निमे प्रांत आह्मांस द्यावा. कलम १.

तुह्मांसीं जे वैर करितील, त्यांचें पारिपत्य आह्मीं करावें. आह्मांसीं जे वैर करितील त्यांचें पारिपत्य तुह्मीं करावें. तुह्मीं आह्मीं एकविचारें राज्याभिवृद्धी करावी. कलम १.

एकूण सात कलमें करार करून तहनामा लिहून दिल्हा असे. सदरहूप्रमाणें आह्मीं चालवूं. यासी अंतराय होणार नाहीं. मोर्तब असे.

---

## तहनामा २.

तहनामा चिरंजीव राजश्री संभाजी राजे यांसी प्रती राजश्री शाहूराजे यांणीं लिहून दिल्हे. सुरुसन इहिदे सलासेन मया व अलफ छ १६ सवाल विरोधीकृत संवत्सरे चैत्र वद्य द्वितीया बितपसीलः—

इस्तकबील वरुण महाल तहद संगम दक्षणतीर कुल दुतर्फा मुलूख दरोबस्त देखील ठाणीं व किल्ले तुह्मांस दिल्हे असेत. कलम १.

तुंगभद्रा पासून तहद रामेश्वर देखील संस्थानें निमें आह्मांकडे ठेऊन, निमें तुह्मांकडे करार करून दिल्हें असे. कलम १.

किल्ले कोपळ तुह्मांकडे दिल्हे त्याचे मोबदला तुह्मीं रत्नागिरी आह्मांकडे दिल्ही. कलम १.

वडगांवचें ठाणें पाडून टाकूं. कलम १.

तुह्मांशीं जे वैर करितील त्यांचीं पारिपत्यें आह्मीं करावीं. आह्मांशीं जे वैर करितील त्यांचीं पारिपत्यें तुह्मीं करावीं. तुह्मीं आह्मीं एका विचारें राज्याभिवृद्धी करावी. कलम १.

वारणेच्या व कृष्णेच्या संगमापासून दक्षणतीर तहद निवृत्तीसंगम तुंगभद्रा पावेतों, दरोबस्त देखील गड, ठाणीं तुह्मांकडे दिल्हीं असेत. कलम १.

कोंकण प्रांतीं साळसीपलीकडे तहद पंचमहाल काले पावेतों दरोबस्त तुह्मांकडे दिल्हे असे. कलम १.

इकडील चाकर तुह्मीं ठेऊं नये. तुह्मांकडील चाकर आह्मीं ठेऊं नये. कलम १.

मिरज प्रांत, विजापूर प्रांतीचीं ठाणीं देखील अथणी, तासगांव वगैरे तुह्मीं आमचे स्वाधीन करावीं. कलम १.

एकूण नऊ कलमें करार करून तहनामा लिहून दिल्हा असे. सदरहूप्रमाणें आह्मीं चालवूं. यासी अंतराय होणार नाहीं. मोर्तब असे.

## ६ कोल्हापुरचे राजे व पेशवे.

### यादी १.

यादी श्रीमंत महाराज राजश्री छत्रपती स्वामींकडून कलमें करार करून घ्यावीं. सुरुसन तिस्सा खमसैन मया व अलफ:—

हे राजे खोटे, सर्वांचे प्रत्ययास येईसें जालें. तरी यांस मारूं नये. फत्तेसिंग बावा अथवा येसाजी कुसाजीप्रमाणें ठेवावें. नीट न राहे, तर अटकेंत ठेवणें प्राप्त होईल, तेव्हां ठेवावें. परंतु जिवास नाश व अन्नवस्त्रास अंतर नसावें. कलम १.

"खोट्यास मारूं नये ह्मणोन आपण विनंती केली, त्यास अटकेंत ठेवावें. जिवास भय काय आहे?"

मसलतीमुळें वगैरे सेवकास कर्ज जहालें आहे तें वारेतों सेवकास पैका देणें. पूर्वीपासून पडतो तो न मागावा. कर्जाचें सर्व प्रकारें, सेवक विनंती करील, त्याप्रकारें साहित्य करावें. कलम १.

"तुमचें कर्ज वारेतों सरकारांत द्यावयाचा ऐवज तुह्मांस माफ केला असे. तुमचें कर्ज वारलें, आबादानी जाहलीया, स्वामीसंतोष आहे."

वाई देशीं, कराड देशीं, दाहा गांव मातबर, अर्ज करूं ते, इनाम नवे करून द्यावे. कलम १.

"तुह्मीं कोणते नांव सांगाल, ते इनाम दाहा गांव करून देऊं."

सेवक कार्यप्रसंगीं दूर गेला तरी तिळमात्र कृपेस अंतर नसावें. तिळमात्र विरुद्ध दृष्टी नसावी. १.

"तुह्मीं सन्निध असला अगर मसलतीस दूर गेला, तरी तुह्मांविशीं विरुद्ध काडीमात्र स्वामी मानणार नाहींत, व ऐकणार नाहींत, हें सत्य असे. सर्व प्रकारें स्वामी तुह्मांवरी कृपा करून चालवितील. तिळमात्र कृपेस अंतर होणार नाहीं."

स्थळाची सुभेदारी सर्व अखत्यार सेवकाकडे द्यावा.

१ सातारा.
१ चंदन.
१ वंदन.
१ रांगणा.
१ मालवण जंजीरा.
—
५

एकूण पांच स्थळांचा अधिकार सेवकाकडे द्यावा. कलम १.

"पैकीं तुह्मांसीं करार करून दिल्हे आहेत:— सातारा, चंदन, वंदन हे तिन्हीं स्थळें तुह्मांसी दिल्हीं आहेत. सुभेदारीची अखत्यारीच्या सनदा अलाहिदा सादर आहेत."

सेवकाकडील मातबर जो हुजूर राहील त्याजवर कृपा करून लहान मोठें काम त्याचे विचारें करावें. सर्व अखत्यार सेवकाकडे असावा. खास चौकीचा बंदोबस्त सेवकाकडे सांगावा. कलम १.

"तुमचे तर्फेनें जो हुजूर राहील, त्याचे हातून सर्व अखत्यार, लहान मोठें काम, जसें कराल तें, मान्य असे. खास पथकाच्या लोकांची सुभेदारी तुह्मांसी दिल्ही असे."

शाहू महाराजांचे वेळचें व आई साहे-

वाचें कर्ज वारावें. धर्म मोठा आहे व सेवकाचें वचन गुंतलें आहे. यास्तव कर्ज वारावें.

कलम १.

"कैलासवासी शाहू महाराज यांवरी कर्ज होतें. सकवारबाईनीं जाते समयीं तुह्मांजवळून कर्ज वारावें ह्मणोन वचनास गुंतविलें होतें. यास्तव सातारचे नख्त व जवाहीर व कापड तुमचे विचारें देऊन, कर्ज वारिलें जाईल."

आईसाहेब सर्व प्रकारें वडील आहेत. त्यांचे महत्त्वास अंतर न करावें. कलम १.

"आईसाहेब सर्व प्रकारें वडील आहेत. त्यांचा वडीलपणाच्या महत्त्वासी अंतर होणार नाहीं."

लहान मोठा सर्व अखतियार तुह्मांवरी दिल्हा असे. यांत अंतर करूं तरी स्वामीस कुलस्वामीचे शपथ असे.

---

## यादी २.

यादी येणेंप्रमाणें सरकार निसबतीचीं कलमें करारांत लिहून द्यावीं:—

वारणे अलीकडे राजमंडळचा तालुका जो आहे, तो साहेबाकडे निर्वेध असावा.

"सुदामत चालत आल्याप्रमाणें चालवूं."

हुकेरी प्रांत साहेबाकडे खासगीस दरोबस्त दिल्हा, त्याप्रमाणें निर्वेध साहेबाकडे चालवावा.

"हुकेरी प्रांत दरोबस्त निर्वेध साहेबाकडे चालवूं."

सातारचे राजधानीस खासगी खर्चास सरंजाम साहेबाकडे द्यावा.

"जरुराती खर्चाप्रमाणें कांहीं सरंजाम, कांहीं नख्ती नेमणूक करून देऊं."

धन्या सन्निध लहान मोठे सेवक सेवा करून होते, त्यास त्यांचे योग्यतेप्रमाणें चालवावें.

"योग्यतेनुरूप समजोन चालेसें करूं."

धन्याचे हुजुरातीस किल्ले आहेत. त्यांचा सरंजाम, पूर्वील नेमणुकेप्रमाणें किल्ल्याचे तनखे किल्लेकडे सुदामत चालवावे.

"भोगवट्याप्रमाणें निर्वेध चालवूं."

हुजूरचे सनदेनें लोकांस गांव इनाम दिल्हे. वतनें करार जहालीं असतील ते चालवावीं. अंतर करूं नये.

"भोगवटा मनास आणून चालवूं. भोगवटा नसला, सनद असली, तरी मनसुबीचे रीतीनें मनास आणून, योग्य असेल तें चालवूं."

सरदेश कुलकर्णाचे व इनाम गांव चालवावे.

"सुदामत प्रमाणें चालवूं."

संस्थानें बिदनूर व सोंधें व सावनूर येथील तोफेचा ऐवज, करार पेशजी जाहला आहे त्याप्रमाणें, साहेबाकडे निखालस पावावा.

"पावत आल्याप्रमाणें ऐवज पावता होईल."

साहेबांतुह्मांत किमपि पडदा नसावा. साहेबीं जें केलें, तें तुह्मीं परिणामास नेऊन, साहेबाचे लक्षानरूप प्रांजल साहेबांसीं असावें.

"साहेबीं लेकाप्रमाणें अखतियार दिला आहे. बरें वाईट करण्याचा अखतियार साहेबांनीं दिल्हा आहे. असें असतां, ज्यांत राज्याम स्वामीचें उत्तम तेंच सेवकापासून होईल. साहेबाचें उत्तम लक्ष असेल त्यास अंतर होणार नाहीं."

शिंदे, नरगुंदे व पतके हुजूर पागेचे सरदार सरंजामसुद्धां पूर्ववतप्रमाणें धन्याचे हुजरातीस त्यांणीं असावें, व त्यांचे सरंजामाचा व पागेचा फडशाह होणें तो हुजूर होत असावा.

"साहेबाचे मर्जीप्रमाणें हुजरातीस करार आहे तसें राखूं."

सेना खासखेल याचा सरंजाम नेमून दिल्हा आहे. कांहीं चालतो. कांहीं चालत नाहीं. अगत्यवादें त्याचा सरंजाम नेमून दिल्हेप्रमाणें चालवावा.

"भोगवट्याप्रमाणें चालवूं. जो चालत नसेल त्याची चौकशी मनास आणून चालवण्यायोग्य दिसेल तें चालवूं."

सरदेशमुखी व बाजे वतनें सरकारतालुकेस आहेत, तीं सरकारांत असावीं.

"जसं दहा वीस वर्षें सरकारांत असेल तसें चालेल."

आंगरेकडील पंचमहालाचा मक्ता करार केला, त्याप्रमाणें ऐवज साहेबाकडे द्यावे.

"चिरंजीव भाऊनीं ऐवज करार केला आहे, त्याप्रमाणें प्रविष्ट होईल."

सदरहूप्रमाणें चालवावयास शफत कुलस्वामीची अंतर करूं तर असे.

---

## यादी ३.

यादी मनोली तालुका, धन्याचे पागेचा सरंजाम, सदरहू तालुकेचीं ठाणीं श्रीमंत सौभाग्यवती बाईसाहेब यांकडे घेऊन द्यावीं. सरंजाम साहेबाचे खासगीस चालावा असा पेशजीचा करार आहे, त्याप्रमाणें ठाणीं बसवून द्यावीं. सरंजाम निर्वेध चालवावा. येविशींचा करार दाद. मार्फत शेषो नारायण. सुरुसन सीतैन मया व अलफ.

मनोली तालुकेचीं ठाणीं एकंदर बसवून द्यावीं. (पुढें फाटलें आहे.) खर्चास करार बेरीज रुपये ५५००० रुपये करार करावे. तूर्त द्यावे. करार पंचावन हजार

सुबराऊ शिंदे मृत्यु पावले; त्यांच्या बायका आनंदीबाई, कृष्णाबाई व पुत्र आहे. त्यांस धण्यासंनिध पाठवावें. पांच हजार रुपयेचे दोन गांव करार केलेप्रमाणें धणी चालवितील.

बायका धण्यासंनिध येतील दोघींस दहा हजाराचा सरंजाम चालवावा. येणेंप्रमाणें करार करावें. बायकांवर धण्याची विरुद्ध दृष्टी नसावी. त्यांचे अबरूप्रमाणें चालवावें. करार.

सुबराऊ शिंदे यांची खासगत घराऊ वस्तभाव, हंडे भांडे, त्याचा संसारीक जिन्नस असेल तो बायकांकडे द्यावे. येणेंप्रमाणें करार.

मनोलींतील पागा व पीलखाना व थटी

कोठी, जामदारखाना सर्व धण्याची खासगी हिशेबी शिल्लक निघेल, त्याप्रमाणें सर्व कारखाने साहेबाकडे भरोन द्यावे.

शिंदे यांणीं अखत्यारीचा धंदा बहुत दिवस केला. सांप्रत पागा व हत्ती वगैरे असेल त्याप्रमाणें घ्यावें. येणें प्रमाणें करार करावें. करार

पागेचा सरंजाम, बेळगांव, कितूर, धारवाड, बंकापूर, गदग वगैरे महालीं चवथाई व मुकासबाब पूर्वी धण्यानीं पागेकडे नेमणूक करून दिल्हीं आहेत. तदनरूप चालवावा.

दक्षणप्रांत सरकारांत अंमल जाहाल्यापासून सरंजाम चालत आलेप्रमाणें चालेल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

छ १५ माहे रमजान वैशाखमास.

मशारनिल्हेनें, ते सालचे करार यादीची नक्कल आपणाजवळ आहे ह्मणोन सरकारांत सांगितलें, ते यादीची ही नक्कल असे.

---

## यादी ४.

यादी निसबत श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब यांकडील कलमें करार करून द्यावीं. सुरुसन सलास सीतैन मया व अलफ.

गुदस्ताचे करार दहा पैकीं कलमें:—

हुकेरी रायबाग व कागल हा तालुका साहेबाकडील, याजपैकीं फूट मुकासे व देशक यांणीं मालुमाती सनदा घेऊन गांव बळावून अनुभवितात; त्याकडून गांव घेऊन सरकारांत साहेबाकडे द्यावे. एकंदर ठाणीं बसावीं हुजुरचीं येणेंप्रमाणें.

"सुदामत प्रमाणें चालेल येणेंप्रमाणें करार करावें. करार रुजू."

सेनाखासखेल राजश्री लक्ष्मणराव शिंदे यांचा सरंजाम तोरगलचा सरंजाम निखालस करून द्यावा.

"सुदामत असेल त्याप्रमाणें चालेल येणेंप्रमाणें करार करावें. करार रुजू."

सोंधे बिदनूर व सावनूर या तीन संस्थानचे ऐवजाचा पेशजी करार दाद होऊन संस्थानें बोली करून राजश्री नाना प्रधान यांकडे दिलीं आहेत. त्याप्रमाणें साल दरसाल एकलक्ष दहाहजार रुपये हुजूर पाठवावे.

"गुदस्ता जाबसाल झाला आहे त्याप्रमाणें करार करावें. करार रुजू."

सातार्‍यास खोटा प्रकार जाला, तो सर्वांच्या प्रत्ययास आला. याउपर त्याविशींचा साक्षेप न करितां, आपले विचारें बाईसाहेबीं पुत्र घेतला हाच प्रतिपाद्य करावा.

"पुढें सातार्‍याचा मजकूर यथास्थित घडोन आल्यास, राजश्री नाना प्रधान याणीं तेथील राज्याचे बंदोबस्ताचा करार दाद लिहून याद साहेबाकडे दिली आहे, त्याप्रमाणें चालावें."

"हा प्रकार तूर्त होणें तो जालाच आहे. येणेंप्रमाणें करार करावें. करार रुजू."

वावडेकरी, विशाळगडकरी व सेनापती वगैरे सरदार यांणीं धण्याकडील लक्ष धरून हुकुमांत वर्तावें. व पेशजीचा करार दाद आहे, त्यास ताकीद होऊन हुकुमांत वर्तावें. न वर्तत त्यांचें पारपत्य करून अमलांत आणून द्यावें.

"या सर्वांस येथून ताकिदी होतील. समजोन ताकीद होईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार रुजू."

मनोलीचें ठाणें सरंजामसुद्धां प्रांत निखालस करून द्यावा.

येणेंप्रमाणें करार करावे. करार रुजू.

नरगुंदे व पथके यांसी ताकीद होऊन धण्याचे आज्ञेप्रमाणें त्यांणीं वर्तणूक करावी. जमावसुद्धां धण्याजवळ सेवा करावी.

दुबार सबब०

जंजिरे विजयदुर्ग प्रांताच्या सनदा साहेबीं करून दिल्हा, याचा करार दाद पेशजी दिनकर महादेव यांचे नांवें झाला आहे. त्याप्रमाणें दरसाल रुपये १०००० दहा-हजार सरकारांत द्यावे. फड फर्मास चालावी.

सेवकाकडे अंमल आल्यावर चाललें असेल त्याप्रमाणें चालेल. येणेंप्रमाणें करार करावें. करार रुजू.

वारणें अलीकडील तालुका राजधानीचा श्रीमन्महाराज मातुश्री बाईसाहेबांकडे नानांनीं लिहून दिल्हा आहे. त्याप्रमाणें निर्वेध चालवावा.

"सुदामत चालल्याप्रमाणें चालेल. येणेंप्रमाणें करार करावे. करार रुजू."

## सालमजकूरीं कलमें.

किल्ले प्रसिद्धगड व मनोहरगड व भैरवगड व सामानगड व भुदरगड व जंजिरे सिंधुदुर्ग यांचा सरंजाम सांवत भुटमर्दानें खातो व ज्याज्याकडे वरघाटें व कोकणांत व राजश्री घोरपडे पेशजी चालत आल्यामध्यें गुंतला असेल तो निखालस करून द्यावा.

"सांवतास व नारायणरायांस ताकीद द्यावी. जे सुदामतप्रमाणें चालणें ह्मणून पत्रें देवावीं. द्यावीं. देणें रुजू."

जंजिरे सिंधुदुर्ग येथील तनखा आरमार निसबत कोंकण समुद्रांत उंदरप्रांतें उत्तरेस व दक्षणप्रांतें हेट पूर्वीपासून चालत आहे. अलीकडे उंदरकरी कौल घेत नाहींत, त्यास ताकीद होऊन कौल चालल्याप्रमाणें त्याणीं घ्यावा. येविशीं जंजिरे विजेदुर्गच्या मामलेदाराकडून व प्रधानपंताच्या तालुक्यांतून अडथळा होऊं नये.

"आंगऱ्याचे कारकार्दीअलीकडे चालत असल्यास चालवावें ह्मणून विजयदुर्गचे मामलेदारास पत्र सुदामतप्रमाणें गुदस्त तिगस्त चाललें असले तरी चालवावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार रुजू."

कोकणांत खारेपाटण, संवदल, राजापूर, मीठगवाणें, लांजे, राजापूर, सुभा संगमेश्वर महालीं व वरकड महालीं हुजूरच्या किल्ल्याचे तनखे व खासगीचे गांव हशमाचे गांव व सेवक लोकांचें इनामगांव व फुट-

मुकासे व गांवगंना इनामती मौजे आंबुली बुद्रुक तालुका संगमेश्वर दशरथ जोशी जोशीराव यास इनाम पूर्वी चालत होता, अलीकडे चालत नाहीं. त्याविशीं व अवघेविशीं तमाम मामलेदारांस ताकीद होऊन, पूर्वींप्रमाणें सारें सुरळीत चालवावें.

"तूर्त होत नाहीं."

साहेबाकडील तालुक्यांत पुढें पैसा न घ्यावा. उपद्रव काडीमात्र न लागावा. सर्वांविशीं मर्यादेनें साहेबासीं चालावें. निष्टेनें असावें.

"साहेबानीं सर्वप्रकारें ममता करावी. दरसाल कांहीं उपद्रव होणार नाहीं. येणेंप्रमाणें करार करावें. करार रुजू."

रायबाग व कागल व फुटखेडी व हुकेरी प्रांत दरोबस्त साहेबाकडे खासगीस करून दिल्हा आहे. तेथील अंमल निखालस करून द्यावा. चिकोडी व वरकड ठाणीं आहेत, तीं सरकारतर्फेस करून, अंमल सुदामत चालवावा. खेरीज इसाफतीचे गांव व इनामतीचे गांव राखून.

"येणेंप्रमाणें करार करावें. करार रुजू."

हुजूरचे दस्तक कोठीचे बैलास, प्रधान पंताच्या निसबतीचे मामलेदाराकडून जकातीचा व हरएकविशींचा उपद्रव लागों नये. सरसाल पावेतों सुखरूप आमदरफती चालों देणें ह्मणोन ताकिदी वरघाटें व तळघाटें कोकणांत द्याव्या.

"सालाबादप्रमाणें दस्तकें देवावीं. करार करावे. करार रुजू."

वाडीकर सांवत यांचे तालुक्यांत कोंकण प्रांत आहे, त्या प्रांतांत पुरातन किल्याची व जंजिरे सिंधुदुर्गेचा तनखा व खासगी गांव व हशमाचे गांव व फुटमुकासे इनामगांव व गांवगन्ना इनामती हुजूर निसबत पूर्वी चालत होतें त्याप्रमाणें चालावें. पूर्वी हुजूर दरसाल ऐवज रुपये १२००० बारा हजार येत होते त्याप्रमाणें द्यावे. हुकुमांत वर्तावें.

येविषयीं ताकीदपत्र द्यावें. देवावी द्यावी देणें रुजू.

सालसी महालीं कोकणांत हुजूर निसबत ऐवज चालत आहे व महालीं हुजूर खासगीचे गांव व जंजिरे सिंधुदुर्गेचा तनखा व रांगणा भैरवगडचे गांव व श्री केळगांव व हशमाचे गांव व फुटमुकासे इनामगांव व इनामती व वेतनांत जमिनी चालत आहेत व कोटमटीचे गांव व मटी पुरातन चालत आल्याप्रमाणें हुजूर निसबत चालावें.

"सेवकाकडे अंमल आल्यावर जें चाललें असेल, त्यांत हल्ली कमाविसदार खलेल करीत असले तरी त्यास ताकीद होईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार रुजू."

खानवटी गांव शहाजी भोंसले यांस इनाम करून देऊन चालावा.

राजश्री नारायणराव घोरपडे याणीं निष्ठेनें वर्तावें. वतनबाब त्याकडे असेल ते वाजवी घ्यावी. ज्याजती होऊं नये. मर्यादेनें वर्तावें.

"वाजवी वतनी बाब घ्यावी. ज्याजती उपद्रव करूं नये. मर्यादेनें वर्तावें ह्मणून मशारनिलेस पत्र देवावें. द्यावें. देणें. रुजू."

हिंमतबहादूर यांचा सरंजाम सुदामत प्रमाणें चालावा. येविशीं ताकीदी. सालाबादप्रमाणें गुदस्ता पावेतों चालत आल्याप्रमाणें चालवावें.

"येणेंप्रमाणें करार करावें. करार रुजू."

साहेबाकडील तालुक्यांत मवास वर्तेल त्याचें पारपत्य साहेब करतील. तो फिर्याद आला तरी त्याचे ऐकूं नये. साहेबाच्या लक्षाप्रमाणें असावें.

"सरकार अंमल सुदामत वाजबी असेल तो घेत जावा. वाजबी घ्यावें. ताकीद केली जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार रुजू."

छ १४ रजब सलास सीतैन.

## यादी ५.

यादी श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब याकडील कारभाराचा करार दाद. सुरुसन अर्बा सितैन मया व अलफ.

परगणे हुकेरी व कागल व रायबाग व मनोली व फुटगांव साहेबाचे खासगीचा तालुका. त्यास जमीदारांनीं व चाकरांनीं बळावून बदमामली करूं लागले; यास्तव धण्यानीं सेवकास आज्ञा केली कीं, सदरहू तालुकेंत सरकारचे खासगीचीं ठाणीं बसवून, तालुके निर्वेध साहेबाकडे करून द्यावे. ह्मणून आज्ञा केली. येविशीं फौजेच्या खर्चास शेपो नारायण यांचे विद्यमानें करार केला, तो सेवकानें मान्य केला असे. सदरहू ठाणीं बसवून देऊन कराराप्रमाणें सालमजकुरीं ऐवज घेऊं. पुढें सदरहू तालुकेस व साहेबांच्या प्रांतास सेवकाकडून काडीमात्र उपसर्ग लागणार नाहीं. सदरहू धण्याचे तालुकेस पैसेचा लोभ धरूं तरी शिवस्व आहे.

"सदरहूप्रमाणें करार असे. सर्व प्रकारें साहेबीं कृपा करून अनकूल असावें. सेवकापासून अंतर होणार नाहीं. शिवस्व आहे."

चिकोडीकरानीं हुकेरीप्रांतांत सालमजकुरीं वसूल घेतला असेल, तो रुजुवातीनें तफावत न करितां, साहेबाकडे तूर्त पावता करून द्यावा.

"सदर सालचा आकार होईल त्यापैकीं तिसरी तक्षीम चिकोडीकरास द्यावी. दोन हिस्से साहेबाकडे द्यावे. आज तागाईत साहेबाचीं ठाणीं बसत तोंपर्यंत शिबंदी चिकोडीकरास पडली असेल, ते त्याणीं तिसरे तक्षीमेंत घ्यावी. पुढें वाढेल ते आईसाहेबानीं आपले दोन तक्षीमेमध्यें घ्यावी. सालेसाल आकार चालत आला आहे, त्याप्रमाणें हल्लीं आकाराचा करार करावा."

यमाजी रुद्र याची घोडीं गुरें वस्तवानी दाणा कापड व जो जिन्नस असेल, तो यमाजी रुद्र याचे नातू यमाजी विरपाक्ष व पुतणे आपाजी शामजी याजकडे हिशेबाच्या यादी असतील त्याप्रमाणें आवाजी नागनाथ याणें पावते करून द्यावें.

"जें असेल तें द्यावें."

चारी तालुकेचे देसक अगर त्याचे

निसबतीचे कारकून, धण्यासीं गैर रुजू होऊन हर कोठें राहून लबाडी करितील, तरी त्याचें पारिपत्य करावें. कोणी आसरा देतील त्यास ताकीद करावी. धण्याचे हुकुमाप्रमाणें सर्वांनीं वर्तावें. येविशीं कोणाची रदबदल ऐकों नये.

"सेवक ऐकणार नाहीं. धण्याचें लक्ष तेंच सेवकास प्रमाण आहे. स्वसत्तेमध्यें असल्यास साहेबाचे मर्जीप्रमाणें पारपत्य होईल. साहेबाचे हुकुमांत वर्तविलें जातील."

सदरहू तालुके ठाणीं निर्बंध करून द्यावीं ह्मणून शेषो नारायण याचे मार्फतीनें सेवकाचे फौजेस कुमकी खर्च सन इसनेंत व सालमजकुरीं मशारनिल्हेनीं सावकाराकडून कर्ज घेऊन भरणा केला, त्यास एकंदर महाली खर्च व सावकारी व्याजसुद्धां परगणे मजकूरचे ऐवजीं वसूल होऊन सावकार फिटे तोंपर्यंत, जमीदार देसकास वगैरे वतनदारांस वतनबाब शिरस्तेप्रमाणें पावणार नाहीं. सावकाराचें कर्ज व साहेबाकडील खंडणीचा ऐवज पावलेवर सुदामत शिरस्तेप्रमाणें हक्क व इनाम देसकाकडे वगैरे वतनदाराकडे चालेल. तूर्त पोटास प्रांत मजकुरचे ऐवजीं वतनबाबेचे शिरस्ते यांस तिजाई चवथाई या अजमासें द्यावें.

उभयतां देशमुख नणदीकर व चिकोडीकर याजकडील कारकून बोलावून आणून पुरातन हक्क व इनामगांव चालत आले असतील त्याप्रमाणें चालवावें.

सदरहू तालुकेंत देशकांनीं व काटकांनीं व फुट मोकासीयानीं ठाणीं बळावून अमर्याद वर्तणूक करीत गेले. प्रसंगोपात मालुमाती सनदा इनामपत्रें सरकारचीं करून घेतलीं. योग्य मनुष्य साहेबासीं निष्ठेनें वर्तणूक करील, त्याचे साहेब चालवितील. अमर्यादेनें वर्तत आले त्याची रदबदल ऐकों नये ह्मणून सेवकास आज्ञा केली. ऐसीयास साहेबाच्या लक्षानरूप सेवक मान्य आहे.

मातबर अंतर असलीयास पारपत्य करावें.

---

## यादी ६.

यादी श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब याकडील कलमें करार. सुरुसन अर्बा सितैन मया व अलफ.

हुकेरी प्रांत हा महाल साहेबाचे खासगीचा, त्यास जमिदारांनीं चिकोडी व एकंदर परगणे मजकूरचा तालुका ठाणीं बळावून, आपले मतलबानें खंडणीचा मक्ता करून साहेबाकडे देत होते. त्यास दरोबस्त परगणे मजकूरचा अंमल साहेबाकडे निर्वेध करून द्यावा. येणेंप्रमाणें कैलासवासी पंतप्रधान यानीं करवीरचे मुकामीं तिसा खमसैनांत करार केला. त्याजउपरी सन इसने सितैनांत राजश्री रघुनाथ पंडित व

राजश्री राऊ प्रधान यांचें आगमन दक्षणप्रांतें जाहलें. ते समयीं चिकोडी व एकंदर परगणे मजकूरचीं ठाणीं वसवून द्यावीं हा करार मदार होऊन ठाणीं वसवून दिल्हीं. आबाजी नागनाथ याजकडे कमाविसीचे विचारें परगणे मजकूर स्वाधीन केला असतां, बेइमानी करून ठाणीं वळाविलीं. याजकरतां सालमजकुरीं त्याचें पारिपत्य करून ठाणीं साहेबाचीं एकंदर वसवून द्यावीं. येणेंप्रमाणें करार जाहला.

१ मुख्य ठाणीं.

१ कसबे हुकेरी.
१ चिकोडी.
१ वागेवाडी.
१ येमकन मोरडी.
१ वंटमरी.
१ संद्दर.

६

एकूण ठाणीं साहा वसवून द्यावीं. कलम १.

१. वरकड प्रांत मजकुरीं गांवगन्ना चिकोडीकरांनीं ठाणीं घातलीं आहेत तीं घेऊन साहेबाकडे द्यावीं. कलमें. येणेंप्रमाणें दरोबस्त ठाणीं घालून द्यावीं.

सदरहूप्रमाणें करार करून द्यावा.

मनोली तालुका एकंदर ठाणीं मनोलीसुद्धां घालून द्यावीं. व पेशजी प्रांत सरंजाम सुदामत नेमणूकेप्रमाणें चालवावा.

येणेंप्रमाणें करार करावें.

धण्याचे हुजुरातीस किल्ले आहेत त्याचा सरंजाम पूर्वील नेमणूकेप्रमाणें किल्लेचे तनखे किल्लेकडे सुदामत चालवावे.

ताकीदपत्रें देऊन चालवावें.

आंग्रेकडील पंचमहालचा मक्ता करार केला, त्याप्रमाणें ऐवज साहेबाकडे द्यावा.

प्रांत रायबाग व प्रांत कागल येथील ठाणीं वसवून द्यावीं.

सदरहू प्रमाणें करार करावें.

फुट मोकासीयांनीं ठाणीं बळाविलीं आहेत, तीं घेऊन द्यावीं.

१ मौजे इंगळी प्रांत पनाळा.
१ मौजे तलदगे प्रांत हुकेरी.
१ मौजे येलगुंड प्रांत रायबाग.
१ मौजे रांगोली प्रांत हुकेरी.
१ मौजे अबदुललाट प्रांत मिरज.
१ मौजे घोसरवाड व वाडी प्रांत रायबाग
१ मौजे पटवड प्रांत रायबाग.
१ मौजे दानवड प्रांत रायबाग.
१ मौजे नेसलापूर प्रांत रायबाग.
१ कसबे एकसंबे प्रांत रायबाग.
१ कसबे नेज प्रांत हुकेरी.
१ मौजे आंकली प्रांत रायबाग.
१ मौजे संबदती प्रांत रायबाग.
१ मौजे चिंचणी प्रांत रायबाग.
१ मौजे जलालपूर प्रांत रायबाग.
१ कसबे लाट प्रांत हुकेरी.
१ मौजे पटणकुंडी प्रांत हुकेरी.
१ मौजे कोगनोली प्रांत हुकेरी.

१८

मुबदला हजारो रुपयांचा द्यावा. पेशजीं करार आहे, शिवाजी थोरातार्शी. हा करार ठीक करावा.

सदरहू गांवपैकीं दोन गांव महादजी

शितोळे याजकडे चालवावे. व संवदती निमे गांव गोसाव्याकडे चालवावा. गोसावी याचे गांवांत ठाणें घालावें. वरकड गांवांत ठाणीं बसवून द्यावीं. येणेंप्रमाणें करार करावें.

नरगुंदे व पतके याणीं धन्याचे हुजुरातीस चाकरी करावी. त्याचा फडशा होणें तो हुजूर धन्यासंनिध व्हावा. येविशीं पेशजीचा करार आहे.

पेशजी करार करून दिल्हा आहे, त्याप्रमाणें पुढें चालेल.

संस्थानें बिदनूर व सोंधे व सावनूर येथील तोफांचा ऐवज, करार पेशजीं जाहला आहे त्याप्रमाणें, निखालस ऐवज साहेबाकडे पावावा.

कर्नाटक प्रांतीचा बंदोबस्त जालीयावर पेशजीप्रमाणें साहेबाचा ऐवज पावेल.

राजश्री लक्ष्मणराऊ शिंदे सेनाखासखेल यांचा सरंजाम नेमून दिल्हा आहे. कांहीं चालतो, कांहीं चालत नाहीं. अगत्यवादें त्यांचा सरंजाम नेमून दिल्हेप्रमाणें चालवावा.

सुदामत चालत आला असेल त्याप्रमाणें चालवावें.

---

## यादी ७.

यादी श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब यांजकडील कार्यभाग निखालस करून देणें, याचा करार शेषो नारायण याचे विद्यमानें ठराव होऊन, सर्व मतलबाची यादी अलाहिदा मखलासी श्रीमंतानीं करून दिल्ही आहे. हुकेरीप्रांत व रायबाग व कागल व मनोली देखील तालुका साहेबाचे खासगीचा, त्यास काटकांनीं व चाकरांनीं ठाणीं बळावून मवासगिरीनें गैरहुकमीं वर्तो लागले; याजकरितां चारी तालुकेयांचीं एकंदर ठाणीं बसवून द्यावीं. येविशीं मशारनिल्हेचे विद्यमानें फौजचे खर्चास ऐवज करार सुरुसन इसन्ने सितैन मया व अलफ. बेरीज ७००००१ रुपये. यासी तपशील:—

प्रांत हुकेरी येथील ठाणीं दरोबस्त घेऊन द्यावीं. बितपसील:—

१ मुख्य ठाणीं.

१ कसबे हुकेरी.

१ चिकोडी.

१ वंटमरी.

१ वागेवाडी.

१ येमकन मोरडी.

१ शेंडूर.

६ कलम.

१ सालमजकुरीं दर गांवास चिकोडीकरानीं ठाणीं घेतलीं आहेत. एकंदर सदरहू तालुक्याचीं ठाणीं बसवून द्यावीं. कलम १.

२

सदरहू कलमाची बेरीज करार

५००००० रुपये.

सदरहू तालुक्याचीं एकंदर ठाणीं बसवून यावीं. पांच लाख रुपये सरकारांत फौजेचे खर्चास घ्यावे. वतनदाराची वतनवाव हक्कदीम असेल ती चालवावी.

नणदीचे निंबाळकर मराठे चिकोडीकर लिंगायत दुतर्फा देशमुखी निमेनिम वाटणी बरोबर आहे. मवासगिरीनें ठाणीं बळावून उचल्या हातें दिवाणास देणें ते देत आले. सांप्रत खासा स्वारी होऊन, परगणे मजकुर हा तालुका दरोबस्त ठाणीं घेऊन श्रीमंत मातुश्री आईसाहेब यांचे खासगीस दिल्हा. देशमुखानीं जबरदस्तीमुळें वतनबाबेचा पाया अधिक आगळा घातला असेल त्यास उभयतां देशमुखास हुजूर आणून पुरातन वतनबाबेचा शोध मनास आणावा. इनाम व कायदे अधिक वाढविले असिले तर देशदंडकाप्रमाणें पाहोन कांहीं ठाण्यांत सुरवात करून चालवावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

कागल तालुका व कसबे रायबाग व फुट मोकासी यांकडील फुटगांव व निपाणी कराकडील एकंदर खेडीं नांवनिशीवार यादी अलाहिदा आहे. त्याप्रमाणें एकंदर ठाणीं दरोबस्त बसवून द्यावीं.याजबद्दल करार रुपये.

२५००० निपाणी निसबत नणदीकराकडे.

२५००० कसबे कागल खेडींसुद्धां.

५०००० कसबे रायबाग व फुटमोकासी याजकडील फुटगांव एकंदर ठाणीं बसवून द्यावीं.

१०००००

सदरहू ठाणीं बसवून देऊन लाख रुपये सरकारांत घ्यावे. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

मनोली तालुका धन्याचे पागेचा सरंजाम, त्यास पागेची सुभेदारी शिंद्याकडे हुजरून चालत आली. सुबराव शिंदे यांणीं बेकैदी वर्तणूक केली. मशारनिल्हे मृत्यु पावले. मनोली तालुका दरोबस्त ठाणीं घेऊन धन्याचे खासगीस द्यावीं. सरंजाम पागेचा यथास्थित चालवावा. येणेंप्रमाणें कैलासवासी प्रधानपंत यांणीं सन –सितैनांत करार करून फौजेचे खर्चास पंचावन हजार रुपये घेतले आणि एकंदर तालुक्याच्या सनदा करून दिल्ह्या. फौज जाऊन ठाणीं बसवून दिल्हीं नाहींत. पूर्वील निश्चयानरूप सरंजामाची वाटणी बसवून द्यावी. याचा बशर्त करार करून फौजेच्या खर्चाबद्दल करार बेरीज १००००१ रुपये. एकूण एक लाख एक रुपया करार केला. सदरहू तालुक्याचीं मनोलीसुद्धां ठाणीं घेऊन साहेबाचे खासगीस द्यावीं. आनंदीबाई व कृष्णाबाई यांचे खर्चास कैलासवासी तीर्थरूपानीं करार करून दाहा हजार रुपये सरंजामाची सनद दिल्ही आहे. त्याप्रमाणें उभयतां बायकांस धन्यानीं सरंजाम चालवावा. ठाणीं बळावून जुंझो (झुंजो) लागले तरी सरंजाम देणेंयाचें प्रयोजन नाहीं. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

७०००१ रुपये.

यासी हप्तेबंदी.

३५०००० माघमासीं.

२००००० फाल्गुनमासीं पौर्णिमे अलीकडे हुकेरी रुपये द्यावे.

१००००० पाछ्यापुरीं आणून द्यावे. तेथून स्वार पाठवून घेऊन जाऊं.

१००००० तोरगळीं द्यावें. अगर दुसरे जागा न्यावयाची सोय रुपये.

२०००००

५०००० चैत्र शुद्ध १५ हुकेरीं रुपये द्यावे.

१००००१ मनोलीप्रांतें एकंदर ठाणीं बसवून दिल्हावर तेक्षणीं बिन वाइदा रुपये द्यावे.

७००००१.

येणेंप्रमाणें करार करावें. करार छ ७ साबान फाल्गुनमास.

---

## यादी ८.

### श्री.

यादी श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब सुरुसन सलास सबैन मया व अलफ शके १६९४ नंदननाम संवत्सरे.

तालुके मनोली येथील सरकारचा अंमल मुकासबाब व कमेत गडपटी वगैरे अंमल तुह्मांकडील महालीं चालतो, त्याप्रमाणें निखालस सरकारांत यावे. व परगणे मुरगोड व परगणे सतगीर येथील जा(हा)गिरीच्या अमलाचा मक्ता, पेशर्जी शिंदे यांचे कारकीर्दीपासून तुह्मांकडे द्यावयाचा करार चालत आहे, त्याप्रमाणें सरकारांतून पावेल, येणेंप्रमाणें करार करून ऐवज देत घेत जावें. कलम १.

मनोली तालुकीयाकडील आह्मांकडे महाली मुकासबाब व कमेत शिंद्याचे कारकीर्दीपासून चालत आहेत, त्याप्रमाणें साहेबाकडे चालेल व परगणे मुरगोड व परगणे सतगीर येथील जा(हा)गिरीचा मक्ता शिंद्याचे कारकिर्दीपासून आह्मांकडे घ्यावयाचा चालत आला आहे, त्याप्रमाणें ऐवज साहेबीं आह्मांकडे द्यावा. येणेंप्रमाणें करार. कलम १.

भगवंत आपाजी व शेपो नारायण व शेपो त्रिमल साहेबांचे सेवक असतां, महाराज कैलासवासी जाहलीयानंतर साहेबाचे पायाशीं यथास्थित वर्तणूक न केली, याजकरितां मशारनिल्हेकडे गांव खेडीं बहुत आहेत त्यापैकीं साहेबीं संतोषें दिल्हीं असतील ते एकनिष्ठपणें सेवा केलीयास चालतील. बाकी गांव सरकारचे सरकारांत यावे. कलम १.

त्रिवर्गानीं साहेबांची सेवा बहुत दिवस केली आहे. पदरचे आहेत. याजकरितां साहेबीं कृपा करून अलाहिदा गांव चालवावयाचा करार केला आहे, त्याप्रमाणें चालवावें. येणेंप्रमाणें करार.

परगणे हुकेरी व तालुके मनोली व फुटगांव परगणे कागल व रायबाग पैकीं भगवंत आपाजी व शेषो नारायण याचे कारकीर्दींत चालल्याप्रमाणें कुल अमल साहेबाकडे चालावा. मध्यें सांगणाराच्या गोष्टीवरून विपर्यास घडले, पुढें होणार नाहीं. याप्रमाणें करार करून निशापूर्वक विनंतीपत्रें यावीं. कलम १.

पेशजी भगवंत आपाजी व शेषो नारायण यांचे कारकीर्दींत चाललें आहे त्याप्रमाणें सालमजकुरापासून साहेबाकडे चालेल. याउपर सांगणाराचे सांगितल्यावर अथवा कोणीविशीं दिकत पडून विपर्यास होणार नाहीं. येविशीं आईसाहेबाचे नांवें अलाहिदा पत्र रामचंद्र महादेव व बाळाजी केशव व गोपाळभट वगैरे यांणीं मध्यस्तींत गांव इनाम ह्मणून घेतले आहेत ते सरकारांत यावे. कलम १.

त्रिवर्गांनीं वगैरे यांणीं मध्यस्थीमध्यें गांव घेतले असतील ते साहेबाचे साहेबाकडे देविले आहेत. ते साहेबीं सरकारांत ध्यावे. येणेंप्रमाणें करार.

साहेबाचे पायाशीं कोणी अमर्यादा वर्तणूक केली तर साहेबाचे आज्ञेप्रमाणें तुह्मीं यासी शिक्षा करून साहेबाचे आज्ञेंत सुरळीत वर्तणूक करीतसें करावें. कलम १.

साहेबापाशीं कोणी गैर वर्तणूक करतील त्यास शिक्षा केली जाईल. येणेंप्रमाणें करार.

देशक व देशपांडे व पाटील कुलकर्णी वगैरे वतनदार व इनामदार व सरंजामी वगैरे साहेबाचे राज्यांतील तुह्मांकडे व तुह्मांकडील तालुकदाराकडे कोणी आलीयास इनसाफविशीं व हरएकविशीं पक्षपात न धरितां साहेबाचे सेवेसी पाठवून द्यावे. कलम १.

आह्मांकडील व आमचे तालुकदाराकडील कोणी साहेबाकडे गेलें तर आह्मांकडे पाठवून द्यावे. साहेबाकडील कोणी आह्मांकडे अगर आमचे तालुकदाराकडे आले तर ताकीद करून साहेबाचे साहेबाकडे पाठवून देऊं. साहेबाचे राज्यांत हरएक इनसाफ होतच आहे. येणेंप्रमाणें करार.

साहेबामध्यें व तुह्मांमध्यें हरकोणी विपर्यास वारंवार पाडतात. येविशीं शपतपूर्वक विपर्यास न येईसें करावें. करार.

साहेबाकडून याप्रमाणें न व्हावें व सेवकाकडूनही होणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

साहेबाकडील जंजिरे व जंजिऱ्याचे निसबतीचें आरमार व किल्ले यांस तुह्मांकडून व तुह्मांकडील तालुकदाराकडून काडीमात्र उपसर्ग होऊं नये. कलम १.

साहेबाकडून व साहेबाचे तालुकदाराकडून आह्मांकडील तालुक्यांत उपद्रव होऊं नये. तसेंच सेवकाकडून सेवकाचे तालुकदाराकडूनही साहेबाचे किल्याकोटास व आरमारास उपद्रव होणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

कराराप्रमाणें इमानपत्रें राजश्री प्रधानपंत यांचीं व सखाराम भगवंत यांचीं यावीं. कलम १.

सालमजकुरीं करार जाल्याप्रमाणें साहे-

बाकडून निभावणी व्हावी. त्याप्रमाणें सेवकाकडूनही होईल. अंतर होणार नाहीं. येविशीं आलाहिदा पत्रें देणें. देशमुख देशपांड्ये व इनामदार व सरंजामी लोकांकडून पैका भगवंत आपाजी व शेषो नारायण यांणीं सन इसने सितैनांत व अर्बासितैन सालीं नजर दाखल घेतला असेल, त्या वेळेस त्याचे निसबतीनें रयात जाली असेल. त्याजपासून त्या अन्वयें सालमजकुरींही पैका घेऊं. येविशीं तुह्मांकडील त्यास ताकीद असावी व कोणी तुह्मांकडे आलीयास दिकत पडों नये. येणेंप्रमाणें कलम १.

हल्ली गांव अलाहिदा करार करून दिल्हे आहेत. त्याशिवाय रजावंदीनें बोभाट येथें न येतां, ऐवज साधेल तो साधून घ्यावा. येणेंप्रमाणें करार सालसी महालाकडे सिंधुदुर्गाकडील ऐवज चालत आहे. त्यास कैलासवासी बाळाजी पंडित यांचे कारकीर्दींत चालत होते. अलीकडे कांहीं नवीन दिकत काहाडून सुदामत अमल देत नाहींत. तर पहिले चालीप्रमाणें अमल देत जाणें ह्मणून ताकीद करावी. कलम १.

आजपावेतों चाललें असेल त्याप्रमाणें चालेल. येणेंप्रमाणें करार.

सरकारचे सेवक असतां सरकारांत रुजू न राहणें. गैरवर्तणूक करितात. त्याचे बंदोबस्ताविशीं तुह्मांकडील कांहीं तोफा व गाडदी व फौज देऊन बंदोबस्त केला पाहिजे. कलम १.

दोन तोफा मध्यम प्रतीच्या व शंभर स्वार देऊन फक्त ठाणीं अलाहिदा यादीप्रमाणें बसवून द्यावीं. याशिवाय मुलूख ज्याजती सर्वात्मना कोणावरी करूं नये. येणेंप्रमाणें करार.

बारा पतकेदारांनीं सरकारांत चाकरी करावी. त्यांचें चालवणें आरातारा पाहून चालवूं. कलम १.

आजपावेतों चालत आलें असेल त्याप्रमाणें चालेल. येणेंप्रमाणें करार.

मनोली तालुक्यांतील देशक व देशपांडे यांजकडे सरकाराच्या सनदावितरिक्त जे गांव असतील ते सरकारांत यावे. कलम १.

साहेबांचीं पत्रें व पातशाही फर्मानें व भोगवटा असेल त्याप्रमाणें चालवावें. शिवाय असतील ते साहेबीं सरकारांत घ्यावे. येणेंप्रमाणें करार.

मनोळी तालुका व हुकेरी तालुक्यांतील वगैरे दारु (गोळी) व घोडीं व गुरें जे काय असतील ते सरकारांत द्यावीं. कलम १.

शेषो नारायण याचे निसबतीस जितीस साहेबाचीं पागेचीं घोडीं होतीं, तीं रामचंद्र महादेव याजकडे आणलीं आहेत. तीं त्याजकडून देविलीं आहेत. त्याप्रमाणें घ्यावीं. येणेंप्रमाणें करार. सरकारचे हुजरे राजपुरीस पत्रें हमेशा सलुखाचीं जातात त्याप्रमाणें घेऊन गेले होते. ते हुजरे तुह्मीं तळें घोसाळ्यास ठेविले आहेत. ते सरकारांत यावे. कलम १.

आमचे जेथें विरुद्ध असेल तेथें साहेबीं पत्रें पाठवूं नयेत. हल्लीं हुजरे धरून तळें घोसाळ्यांत ठेविले आहेत, ते सोडून देविले आहेत. येणेंप्रमाणें करार.

बाळाजी पंडित यांचे स्वदस्तुरची याद करवीरचे मुक्कामीं कैलासवासी स्वामीसंनिध लिहून दिल्ही आहे. त्यास अंतर करूं नये. कलम.

हल्लीं करार करून दिल्हा आहे त्याप्रमाणें चालेल. येणेंप्रमाणें करार.

तालुके मनोळी व चिकोडी व फुटगांव पैकीं चौसाला शिबंदी फिटोन जो ऐवज वसूल आला असेल, तो हल्लीं ऐवज करार ठरेल त्यांत वजा यावा. कलम १.

सन सलास सबैनांत वसूल सालमजकूरचा पडला असेल तो वेहडियाप्रमाणें शिबंदींत वजा करून, जाजती वसूल आला असेल तर ठराव ऐवजाचा होईल त्यांत मुजरा देऊं. शिबंदीचा ऐवज फार आणि वसूल थोडा जाला तर बाकीचा ऐवज साहेबीं आह्मांस द्यावा. येणेंप्रमाणें करार.

किरकोळी वतनदार साहेबांकडील तालुक्यांतील तुह्मांकडे जे असतील ते साहेबांकडे पाठवून द्यावे. कलम.

साहेबांचे तालुकीयांतील दादी, फिर्यादी आले असतील. शोध लागल्यास साहेबांचे साहेबांकडे पाठवून देऊं. येणेंप्रमाणें करार.

शेपो नारायण याचे कारकीर्दीप्रमाणें एक खेडें न राहतां दोन्ही तालुके व फुटगांव व जुनीं खेडीं साहेबांकडे यावीं. कलम १.

शेपो नारायण याचे कारकीर्दींत चालत असतील त्याप्रमाणें चालतील. येणेंप्रमाणें करार.

हुकेरी परगणीयाचे देशमुख वसप्रभु लिंगाईत व तमाजी रवळो निंबाळकर यांणीं काटकाईसमयीं मन माने तशीं इनामें, खेडीं करून घेतलीं होतीं. त्यास सन इसन्ने सितैनांत व अरबासितैनात हुकेरी मनोळी तालुका साहेबांकडे नजर केला, तेव्हां भोगवटीच्या चालीप्रमाणें गांव नेमून दिल्हे त्याप्रमाणें हल्लीं चालत आहेत. निंबाळकर देशमुख यांचा धाकटा घरभाऊ याणें काटकाई करून निपाणी वगैरे खेडीं बळकावून खात होता. कागदपत्राचीं साधनें काटकाईत करून घेतलीं. परंतु सन आर्बा सितैनांत भगवंत आपाजी व शेपो नारायण यांणीं निंबाळकर देसाई यांचे निसबतीचे कारभारी सबब देसाई निंबाळकर यांचींच ठाणीं असेल ह्मणोन बळकावून बसले. त्यांजवर सन सबैनांत सदरहू ठाणीं द्यावयाचा करार जाला होता. ते समयीं सदरहूची चौकशी नागमंगलचे मुक्कामीं भिवराव देशपांडे परगणे मजकूर याजकडील इदलशाई झाडें तुह्मीं पाहून खेडीं जप्त केलीं. त्याकडे सन इसन्ने सबैनांत तुह्मांपासून देसाई याचे नांवचे कागदपत्र दाखवून उभयतां देसाई यांची चाल मागील इदलशाईची न दाखवितां, खेडीं आपले निसबतीस करून घेतलीं, तीं हल्लीं साहेबाचे साहेबांकडे यावें. कलम.

सदरहू कलमाची चौकशी मनास आणितां, त्यांतील अर्थ उभयतां देशमुख व देशपांडे परगणे मजकूर यांचे उमळी गांवची चाल पुरातन इदलशाईचे वेळेस चालत आली. ते वेळचे कागदपत्र भिवराव

व्यंकटेश देशपांडे परगणे मजकूर यासी आणून पाहिलें. त्याची चाल कारकीर्द इदलशाई कमकसर वर्षे शंभर.

आलगौडा देसाई लिंगाईत देहे ७॥ तनखा रुपये ९९६८॥ देशपांडीये देहेचा तनखा रुपये १३०६७।

परवगौडा निंबाळकर देसाई देहे ३ एकूण तनखा रुपये ६३८६॥-

त्या अलीकडे कारकीर्द इदलशाईची आखेरीस व शिवशाई व आवरंगजेब पातशाहा कमकसर वर्षे पाऊणशें ऐशी तपशील.

बसवगौडा वलद अलगौडा देसाई देहे १४॥ एकूण तनखा रुपये १७८३६॥ देशपांडे देहे ६॥ तनखा रुपये ४८११

तमाजी बरगौडा निंबाळकर देसाई देहे ६ तनखा ११७३६॥ रुपये.

या अलीकडे कमकसर साठ पांसष्ठ वर्षे देसकांनीं मवासगिरी करून संस्थानिक ह्मणूं लागले. त्या वेळेस काटकाईत मन मानेतसीं साधनें करून गांव इनाम मेळविले, ते सन इसन्ने सितैन पावेतों चालिले.

बसवगौडा विन लखमगौडा लिंगाईत राजपत्री व फर्मानी देहे ६५ तनखा रु. ११९९८२॥ राजपत्री देहे ४१॥ त० १९५७६॥। रुपये फर्मानी देहे १३॥
१३९५५९।
५५

कित्ता देहे १०
६५ रुपये.
देशपांडीये यासी देशक बोलावून दरोबस्त मोडिले सबब गांव याजकडे चालत नाहींत कलम.

तमाजी रवळोजी निंबाळकर देसाई व सिधापा देसाई १२४३७ रुपये. तमाजी रवळोजी ३१३७.

निपाणी लिंगाईत देसाई याजला हुजरती मुबदला देऊन लिंगाईत देसाई याजपासून घेतली, आणि सिधापा धाकटा भाऊ याजला निपाणी दिल्ही. व ती कर्यातीचा हक्क व कौलात देऊन तेथें ठेविला होता.
१५५७४
१६९१६ सिधापा निंबाळकर यांणीं निपाणींत राहून काटकाई करून घेतली खेडीं ७
३२४९०

अलीकडे सन आर्बा तिसैनांत साहेबांकडील कुल ठाणीं बसलीं ते समयीं देशकाकडे गांव राहते केले बितपसीलः—

लिंगाईत निसबतीस खेडीं कांहीं इनामी कांहीं गैर इनामी मिळोन देहे ९. तनखा रुपये ७३१२
कर्यात मनोली ४६८७
कसबे मनोली २६२५
नेरली ७३१२
२
२६२५ आमजगी
कर्यात नज १
४०४९ कर्यात कबूर
२८१२

तमाजी रवळोजी निंबाळकर देशमुख देहे ६ एकूण तनखा १८७५ नदी उरली कसबे नुगल ४७४३॥। कर्यात कबूर १९३१। बलकुली २८१२॥ उबरणी ४७४३॥।
२
६८२१।
कर्यात संटलेंगं ३१०७॥। नणदी.

| | |
|---|---|
| नागर मनोली | २२११॥ नागराळें |
| ७५० अवरगोल. | १५०१॥।≈ |
| ४८७ वलगली | मलिकवड व- |
| ४०४९ | दल देशपांडे. |
| ३ | ६८२१। |
| २७५० मुबलकाकडे | ३ |
| १५०० बेमलवड | १३४४०। |
| कर्यातकवूर | ६ |
| १२५० आरल | तपशील |
| | ११९३८८≈ |
| उवाकयीत मूळ | ऐन देहे ५ |
| २७५० | १५०१॥।≈ |
| ५० | मळीकवड देशपांडे |
| ९३७॥ नाडगौंडा | याचे पंनास साठ |
| किकडे मुधे हल्ली | वर्षे जबरदस्तीनें |
| कर्यात कवूर | खातात. |
| १७६७३॥ | १३४४० |
| ९ | ६ |

तालुके निपाणीपैकीं खेडीं ८ धाकटे भावाकडे साठ पाऊणशें वर्षे चाललीं, ते शेषो नारायण यांणीं सन आर्बा सितैनचे सालीं घेऊन ठाणीं घातलीं देहे ८ एकूण तनखा २०२५३ रुपये.

याप्रमाणें चाललें. पूर्वीपासून चालत आले आहेत. तेव्हां शेषो नारायण निंबाळकर देसाई याचे कारभारी सबब सदरहू आठ गांव निपाणीचे निंबाळकर देसाई याचेच ह्मणतात. परंतु पुरातन उमलीची चाल पाहतां सदरहू आठ गांव शिवाय उभयतां देसाई यांची उमलीची चाल पुरते. येविशींची चौकशी सन सबैन सालीं कर्नाटकचे स्वारींत तुरेकिवरे याचे मुक्कामीं होऊन आठ गांव जप्त झाले. मध्यें शेषो नारायण यांणीं पुरातन उमलीची चाल न समजावितां देसाई याचे वतनी गांव देसाई याजकडे द्यावें ह्मणोन सांगून जप्ती मोकळी करून, निंबाळकर देसाई यांचे नांवें गांव सोडून घेतले. त्याजवर हल्लीं सालमजकुरीं साहेबांकडे तालुके द्यावयाचा ठराव झाला, ते समयीं सदरहू गांव सरकारांत यावे ह्मणोन साहेबांची आज्ञा आली. त्याजवरून मागती चौकशी करितां पुरातन उमलीची चाल उभयतां देसाई यांची पाहतां सदरहू आठ गांव निंबाळकर देसाई याजकडे जाजती आहेत; ते घेऊन साहेबांचे सरकारांत द्यावयाचा करार केला असे. त्याप्रमाणें साहेबीं घ्यावें. येणेंप्रमाणें करार.

लहानसहान अंतर कोणापासून पडल्यास साहेबीं मनांत आणूं नये. सेवकही मनांत आणणार नाहींत. परस्परें वरचेवर बोलून चालून नीट करावें. लहान गोष्टीमुळें थोरल्या करारास अंतर न व्हावें. येणेंप्रमाणें करार. १.

भगवंतराव आपाजी व शेषो नारायण हे आपलें कर्ज सरकारांत यावें ह्मणतात, त्यास सन इसन्ने सितैन सालीं सात लाख रुपयांचा भरणा करार केला. त्यापैकीं साहेबांनीं उभयतांस सावकाराकडून अडीच लाख

रुपये कर्जदाखल देविले व अडीच लाख चिक्कोडीकरापासून घेतले. शिवाय अजमासें सरंजामी वगैरे याजकडून तीन लाख रुपये घेतले. पुढें सन अर्बा सितैनांत पांच लाख रुपये व सन सबा सितैन सालीं रुपये एक लाख एकूण सहा लाख भरले. त्यापैकीं साहेबांनीं सावकाराकडून अर्बा सितैनांत सवा लाख कर्ज दाखल रुपये दिल्हे आहेत. बाकी पावणेपांच लाख रुपये मशारनिल्हेनीं भरले. त्यापैकीं इसन्ने सितैन व अर्बा सितैनांत ठाणीं सरकारचीं बसलीं तेव्हां मागती सरंजामी यां(ज)पासून व इनामदार व जमीदार यांजपासून ऐवज वसूल करून घेतला आहे. पांच वर्षें दरोबस्त हुकेरी मनोली तालुका व निपाणी निसबत खेडीं व फुटगांव वगैरे खेडीं याचा ऐवज वसूल घेतला असेल, तो साहेबाकडील सदरहू पावणेचार लाख रुपये कर्जाबद्दल येणें असतां त्यांतील पैसा वसूल दिल्हा नाहीं. असें असोन उफराटें कर्ज साहेबाकडे येणें ह्मणतात, तरी येविशींचा फडशा होणें साहेबासही जरूर आहे. तरी उभयतां मशारनिल्हे हुजूर पाठवून द्यावे. रुजवातीमुळें साहेबाचा पैका त्यांजकडे फिरल्यास त्यांणीं द्यावा. त्यांचा पैका सरकारांत फिरल्यास साहेब देवितील. यासी मुदत एक वर्षा अलीकडे उभयतांनीं येऊन रुजुवात होऊन फडशा व्हावा. न जालीयास साहेबाचा पैका कर्जाचा आहे तो मशारनिल्हेकडून घेतला जाईल. त्यांणीं आपलें कर्ज यावें ह्मटल्यास सरकारांतून देणार नाहींत. कलम १.

रुजुवातीस कारकून दोन दो महिन्यांअलीकडे पाठवून देऊं. व भगवंत आपाजी व शेषो नारायण यांजकडीलही येखत्यार कारकून दोन महिन्यांअलीकडे पाठवून देऊं. साहेबाकडील येखत्यारी कारकून येऊन जमीदाराचे विद्यमानें वाजवी रुजुवात व्हावी. रुजुवातीमुळें भगवंत आपाजी व शेषो नारायण यांचा पैका साहेबाकडे निघाल्यास साहेबीं द्यावा. साहेबाचा पैका उभयतांकडे फिरल्यास उभयतां साहेबास देतील. त्यास मुदत आह्मांकडील कारकून महाली पैवस्ता होतील त्यापासून बारा महिने रुजुवात होऊन फडशा व्हावा; व भगवंत आपाजी व शेषो नारायण यांजकडील कारकून जावयास दिवसगत लागली किंवा सुरळीत रुजुवात न करीत, असें जाहलीयास बारा महिन्यांनंतर रुजुवात करूं नये. व उभयतांनीं साहेबास पैका मागूं नये. साहेबाकडून रुजुवातीस दिकत पडली तर उभयतांचे हिशेब पाहून चौघांचे मध्यें वाजवी ऐवज द्यावयाचा ठरेल तो साहेबीं उभयतांस द्यावा. येणेंप्रमाणें करार १.

रामचंद्र महादेव व बाळाजी केशव यांणीं हुजूरचें आज्ञापत्र व सावकारी पत्रें मनोलीच्या सनदा व दरमीयानगरीच्या जे असतील ते सरकारांत याव्या. कलम १.

साहेबाकडील दस्ताऐवजी पत्रें असतील तीं शोध करून माघारीं द्यावीं. येणेंप्रमाणें करार १.

तालुके विजयदुर्गाकडील ऐवज बाळा-

जी पंडित यांणीं करार केला आहे. त्याप्रमाणें सरकारांत यावा. कलम १.

हल्लीं चालत असेल त्याप्रमाणें चालेल. येणेंप्रमाणें करार १.

कृष्णाबाई शिंदी तालुके मनोली यासीं व त्रिवर्ग शिलेदार यांजकडे गांव आहेत ते शेषो नारायण याचे अमलाप्रमाणें सरकारांत यावे. कलम १.

पेशजीप्रमाणें गांव कृष्णाबाईकडे व शिलेदाराकडे चालवावे. येणेंप्रमाणें करार १.

अवांतर लोकांकडील गांव व ठाणीं आहेत तीं अलाहिदा यादीवरहुकुम सरकारांत यावीं. कलम १.

अलाहिदा यादीवर फडशा करून दिल्हा आहे त्याप्रमाणें घ्यावे. येणेंप्रमाणें करार १.

ऐवजाचा करार ठरेल त्याप्रमाणें हसेबंदीचा करार करून हसेबंदीप्रमाणें तालुक्यांत जो शिक्का पडत असेल त्याप्रमाणें घ्यावा. येणेंप्रमाणें करार १.

ऐवजाची यादी अलाहिदा ठरविली आहे, त्याप्रमाणें क्षेपनिक्षेप निर्गमांत यावें. येणेंप्रमाणें करार १.

लासूणकर व बावदे परभु व मानाजी गुरव व शिवाजी भोसले सरकारांत चार असामी यावे. कलम १.

बावदे परभूचें पारपत्य केलेंच आहे. मानाजी गुरव साहेबास सांपडल्यास साहेबीं धरावा. आम्हांस सांपडल्यास धरून साहेबांकडे पाठवून देऊं. भोसले यांपासून अंतर पडेल तें पडेलच. याउपर अंतर पडल्यास साहेबाकडे पाठवून देऊं. येणेंप्रमाणें करार १.

सोंधे व बिदनूर वगैरे संस्थानें यांजकडील ऐवज पेशजीच्या कराराप्रमाणें सरकारांत यावा. कलम १.

आजपावेतों चाललें असेल त्याप्रमाणें चालेल. येणेंप्रमाणें करार १.

शेषो नारायण याजवळील सरकारचीं पत्रें व प्रधान पंताकडील करारमदाराच्या यादी वगैरे जे काय असतील तीं सरकारांत यावीं. कलम १.

साहेबाचे कारभारसंबंधाचीं पत्रें साहेबाकडील व आह्मांकडील शेषो नारायण याजपाशीं असतील तीं पाहून, जिवराव भोसले यांचे गुजारतीनें परत करावी येणेंप्रमाणें करार १.

पत्रें तुह्मांकडील लागतील तीं अलाहिदा यादीप्रमाणें द्यावीं. कलम १.

यादी पाहून अलाहिदा पत्रें देविले जातील येणेंप्रमाणें करार १.

हत्ती, वस्त्रें, जवाहीर सन अर्बासितैन सालीं राजश्री शेषो नारायण याचे गुजारतीनें तुह्मीं पाठविलें असतां सरकारांत आलें नाहीं. त्याची चौकशी करून फडशा करावा. कलम १.

हत्ती व वस्त्रें येथून शेषो नारायण या समागमें पाठविलींच नाहींत. सेवेसी विदित व्हावें. येणेंप्रमाणें करार १.

किल्ले मालवण जंजीरा सरजाकोट नजीक तोंडालीस विजयदुर्गकरी मेढा

घालतात. त्यास कैलासवासी शिवाजी महाराज यांचे कारकीर्दीपासून व आंग्रे यांचे वेळेस आजपर्यंत तेथें कोणीं मेढा घातला नाहीं. हल्लीं विजयदुर्गकर मेढा घालतात त्यास किल्ल्यानजीक घातल्यानें किल्ल्यास उपद्रव होतो. यास्तव मेढा घालावयाचें मना करावें. घातला असेल तो काढावा. कलम १.

सालमजकुरीं नवाच मेढा घालतात तो घालूं नये. सुदामत चालत आलें असेल त्याप्रमाणें चालल्याप्रमाणें आह्मीं तालुकदारास ताकीद करून नवीन होऊं देणार नाहीं. येणेंप्रमाणें करार १.

सावकारी तरांडीं दर्यांतून बाहेर व सावकारीस जात असतात. त्यांचा कौल मालवणकराकडून कैलासवासी शिवाजी महाराजांचे कारकीर्दीपासून घेऊन जात असतात. त्यास तुमचा अंमल जाल्यापासून अलीकडे तुह्मांकडील तालुकदार कौल मालवणचा न घेणें ह्मणोन सावकारास सांगतात. याप्रमाणें सावकार ऐकोन कौल न घेतां जात येत असतात. त्यांचा माल कौल घेतला नाहीं यास्तव लुटला जातो. येविशीं कौल घेण्यास दिकत तुह्मांकडून असों नये. पेशजी मालवणचा कौल घेऊन जात येत असावें. कौल न घेतां गेल्यास लुटले जातील. येविशीं तुह्मांकडील तालुकदारास ताकीद जाली पाहिजे. कलम १.

सालाबाद कौल घेत असे असतील त्याप्रमाणें द्यावा, नवीन कांहींच करूं नये. याप्रमाणें आह्मीं आपले तालुकदारास ताकीद करूं. येणेंप्रमाणें करार.

शंकराचार्य स्वामी यांचें पुरातन चालत आलें त्याप्रमाणें चालवावें. नवीत दिकत करून स्वामींची अमर्यादा न व्हावी. त्यांजकडील कारभारी अगर कारकून येऊन समजावितील तें ऐकूं नये. स्वामींच्या विचारास येईल ती गोष्ट करतील येविशीं आज्ञा असावी. येणेंप्रमाणें करार १.

अलीकडे जुनीं २२२११ खेडीं सरकारचीं घेतलीं आहेत. त्याचा वसूल ठाणें पडल्यापासून आज तागाईत आला असेल तो हल्ली ऐवजाचा करार जाला आहे त्यांत मजरा यावे. कलम १.

कारभार होऊन गेला तो गेलाच. पुन्हां या गोष्टीचें उद्घाटण न व्हावें. थोडाबहुत ऐवज घेतला असेल तो साहेबीं मागूं नये. येणेंप्रमाणें करार १.

राजश्री नारो बाबाजी कमाविसदार परगणे धारवाड याचे अमलांत नवीन मनोली तालुक्यापैकीं ऐवज तुह्मांकडे पेशजीपासून पावेतों त्याचा बट्टा ह्मणून ठरावून घेतात.

१७१२॥।~ जागीर बाबें बाबत बट्टा.
११३० निमे सरंजाम बाबें बट्टा.
२८४२॥।~

एकूण अठ्ठावीसशें पावणे त्रेताळीस रुपये दोन आणे घेतात. त्यास दोन तीन वर्षे नवीन चाल घातली आहे. मना करून पुरातनपासून तेथील चालीप्रमाणें ऐवज घेत जावा. अठ्ठावीसशें पावणे त्रेताळीस रुपये चवल बट्ट्याबद्दल घेऊन धारवाडचे वेहड्यांत जमा धरिला आहे तो न घेणें.

मजुरा पडेल ह्मणून व्यंकटराव नारायण याचे नांवें सनद यावी. कलम १.

वट्टा घ्यावयाची नवीन चाल अलीकडे घातली आहे. ती घालूं नये. सुदामतप्रमाणें तेथील चालीचा ऐवज घेत आला त्याप्रमाणें घ्यावा. येविशीं आह्मीं आपलेकडील तालुकदारास ताकीद करूं. येणेंप्रमाणें करार.

हल्लीं करार जाला आहे यामध्यें आह्मीं याउपर लोभ धरणार नाहीं.

साहेबीं आह्मां खेरीज इकडील अनुसंधान अथवा राजकारण सर्व मना करूं नये. येविशीं परस्परें बेलभंडार व्हावा. येणेंप्रमाणें करार.

साहेबांनीं हल्ली सेवकास खर्चाबद्दल ऐवज द्यावयाचा करार केला, तो ऐवज साहुकारापासून आपाजी शामराव याचे विद्यमानें चिकोडी, मनोळी दोन्ही तालुके ऐवजाबद्दल साहेबीं ठेवून, सावकारास ऐवज लाऊन दिल्हा आहे; त्याप्रमाणें व्याज मनोती परभारा खर्चसुद्धां ऐवज फिटे तोंपावेतों साहेबीं तालुक्याची घालमेल होऊं देऊं नये. येविशीं सेवकाचें वचन सावकारापाशीं गुंतलें. येणेंप्रमाणें करार.

साहेबांकडील साधारण पत्रें कोणास गेल्यास चिंता नाहीं. राजकारणीं पत्रें ज्यांत आह्मांस विरोध तीं कोणासही पाठऊं नये. येणेंप्रमाणें करार.

सदरहू लिहिल्याप्रमाणें एकेचाळीस कलमें करार.

छ २५ सवाल, पौष, सन सलास सबैन मया व आलफ, मुक्काम पुणें.

---

## यादी ९.

श्री.

यादी श्रीमंत महाराज राजश्री शिव छत्रपती स्वामी यांस, राजश्री रघुनाथराव पंडीत यांणीं करार करून द्यावें. सुरुसन अर्बा सबैन मया व अलफ.

साल गुदस्ता सन सलास सबैनांत कैलासवासी नारायणराव पंडित यांचे विद्यमानें तीर्थस्वरूप कैलासवासी महाराज मातोश्री आईसाहेब वर्तमान असतां, राजश्री शिवाजी भोंसले सरकारचे व महादेव शास्त्री व आपाजी शामराव व आकोजी नेवेरे यांचे विद्यमानें करारमदाराच्या यादी व कागदपत्र जाले आहेत त्याप्रमाणें हल्लीं करार करून कुल निभावणी करून द्यावी. कलम १.

साल गुदस्ता चिकोडी, मनोळी तालुका वगैरे फुट खेडीं महाराजांस नजर केलीं आहेत. त्यास उपरी तुह्मीं कोण्या अर्थे महाराजांचे राज्यांत व सदरहू तालुक्यांत कोणेविशींचा लोभ धरूं नये व किल्ले, कोटाचा व बिघाभर जमीन किंवा पैशाचा व हरएक विशींचा लोभ कदापि धरूं नये. कितेकांनीं कितेक अर्थ कोणेविशींची कल्पना समजाविली तरी चित्तांत न आणितां निष्ठापूर्वक सदरहूप्रमाणें चालावें. यांत अंतर नसावें. कलम १.

एकूण दोन कलमें करार करून कुळस्वामींची शपथ तुळशी देऊन करार लिहून द्यावा.

महाराजांनीं कृपा अकृत्रिम आह्मांवर करावी. आह्मीं त्यांचे तालुकीयास समजोन उपद्रव देणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

शपथ असे. कुळस्वामींची शपथपूर्वक लिहिलें असे. महाराजांनीं आह्मांस विरोध, ते करूं नये. येणेंप्रमाणें करार. स्वामींचे राज्याचा लोभ आह्मांस नाहीं करार.

सदरहू मखलासी रघुनाथराव पंडित यांचे स्वदस्तुरची असे.

पैवस्ती छ १४ रमजान, सन आर्बा सबैन मया व अलफ.

---

## यादी १०.

श्री

यादी निसबत करवीर श्रीमंत महाराज राजश्री छत्रपती स्वामी, विद्यमान आपाजी शामराव, सुरुसन सीत सबैन मया व अलफ कलमें बितपशीलः—

फौज दूर करून पूर्ववत्प्रमाणें असावें. सरकारचा करारमदार ठरला आहे त्यांत दिक्कत आली तरी येथें कारकून पाठवून बोलून चालून जाबसाल असेल तो करून घ्यावा व मातुश्री अनुबाई यांच्या तालुक्याच्या बंदोबस्ताविशीं सरकारचे फौजेस व बाईकडील फौजेस वगैरे खर्च लागला असेल तो द्यावा. कलम १.

फौज विसा रोजांत दूर करावी ह्मणोन आपाजी शामराव यांणीं करार केला आहे, त्यास आठा रोजांत निमेसिमे फौज दूर जाहली ह्मणजे कोनेरराव त्रिंबक यांणीं महाराजांच्या तालुकीयांतून कुच करून पुढें जावें. आठ रोज राहणें, ते महाराजांच्या तालुक्यांत उपसर्ग न देतां साहा कोसांच्या तफावतीनें माघारे याच तालुक्यांत मुक्काम असावा. फौजेचा पैका मागों नये. येणेंप्रमाणें करार करावें.

वेंकटराव नारायण घोरपडे यांजकडील:—

१ इनामगांव देखील लाट रांगोळी व देशमुखी व सरदेशमुखी वतन समंधें हक्क इनाम शेतें, कमते वगैरे पुरातन चालत आल्याप्रमाणें चालवावें. वतनसंमंधें वसूल घेतला असेल तो माघारा द्यावा.

१ उतूर वगैरे ठाणीं घेतलीं असतील तीं माघारीं द्यावीं व ठाणीं पडलीं असतील तीं बांधून द्यावीं.

१ सरकारांतून तह जाहला असतां कलह करून आजपर्यंत शिबंदीच्या पेंचांत आणिलें तो खर्च आजपर्यंत लागला असेल तो द्यावा व गांव, खेडीं लुटलीं आहेत त्याचा नागावा द्यावा.

सदरहू प्रमाणें फडशा करून द्यावा. पुढें निर्वेधपणें चालवावें. याप्रमाणें महाराजांनीं बेलभंडार द्यावा. इकडून त्यांच्या तालुक्यास उपद्रव लावूं नये. ह्मणोन बेलभंडार द्यावा. कलम १.

मातुश्री अनुबाईकडे लाट रांगोळी सुद्धा गांव इनाम व देशमुखी व सरदेशमुखी व वतनें वगैरे सुदामत सालाबाद चालत आल्याप्रमाणें चालवावें. लढा तिळमात्र करूं नये. वतन जप्त आहे. त्याची मोकळ चिट्ठी

द्यावी व वतनाचे जप्तीचा ऐवज वसूल घेतला असेल तो आपाजी शामराव यांणीं हुजूर जाऊन विनंती करून माघारे मातुश्री-कडे देवावा. येणेंप्रमाणें करार करावें.

कसबे सोलापूर, चांदगड व कित्तूर येथें घासदाण्याचे रोखे करून मसाले घेतले, त्यास सरकारनिसबत महाल असतां मसाला घेतला तो माघारा द्यावा व मसाला करावयाचें व घासदाण्याचे रोखे करावयाचें कारण काय? याचा जाबसाल करावा. कलम १.

कसबे सोलापूर व चांदगड व कित्तूर येथील मसाला व घासदाणा व खर्च घेतला असेल तो रुजवातीमुळें ठरेल तो माघारा द्यावा. येणेंप्रमाणें करार करावें.

आपाजी शिंदे देसाई परगणे रायबाग यांचा इनामगांव व मौजे घोसरवाड, परगणे मजकूर येथील दुसाला नजर करार करून द्यावी, ऐसा करार असतां गांवांत ठाणें गुदस्ता घालून दुसाला वसूल घेतला तो गांव त्यांचा त्यांजकडे कराराप्रमाणें सोडून द्यावा. कलम १.

पेशजीच्या कराराप्रमाणें गांव शिंदे देसाई यांचे हवालीं करावा. करार करावें.

शेषो नारायण व भगवंत आपाजी व शेषो त्रिमल यांजकडे सरकारांतून गांव तोडमोड होऊन करार करून दिल्हे त्या-पैकीं गांव जबरदस्तीनें घेतले ते माघारे द्यावे.

१ भगवंत आपाजी हेरले.

२ शेषो नारायण.

१ रुईचें ठाणेंविशीं जामीन घेतला व अडीच हजार रुपये घेतले ते माघारे द्यावे.

१ मौजे वलीगे.

१ मौजे मावकरो.

३

१ शेषो त्रिमल यांजकडील हंचीनाळ.

१ मौजे * * * * * * * *.

६

या त्रिवर्गांनीं येथें यावें ह्मणजे पेशजीच्या कराराप्रमाणें चालवावें. त्याकडे लढे असतील ते मनास आणून वाजवी ठरेल त्याप्रमाणें फडशा करून देवऊं येणेंप्रमाणें. करार करावें.

दानवाड, बावाजी सांवत याजकडे आहेत येथें चाकरी करितात त्याचा गांव त्याजकडे चालवावा. कलम १.

सदरहू गांव घेतला असिला तरी माघारे बावाजी सांवतास देऊन पेशजीच्या कराराप्रमाणें निर्वेध चालवावा. येणेंप्रमाणें करार करावें.

पेशजीचा करार आहे त्यांत लाट रांगोळी खेरीज करून वरकड कराराप्रमाणें करावें. कलम १.

येणेंप्रमाणें चालवावें. सेवकाकडूनही लाट रांगोळी खेरीजकरून पेशजीच्या करारांत अंतर होणार नाहीं. स्वामींनीं सदरहू करारांत अंतर करूं नये व सेवकाचें लक्ष सोडूं नये. येणेंप्रमाणें करार करावें.

राजमंडळकरी पतके याचे पुरातन चालत आल्याप्रमाणें चालवावें. ऐसा करार असतां त्याजवर घासदाण्याचे रोखे वगैरे उपद्रव करावयाचें कारण काय? याचा जाबसाल करावा. कलम १.

पेशजीच्या कराराप्रमाणें चाकरी सेवकाकडे करितात पुढें करितील, त्यांचे वाटेस जाऊं नये. त्यापासून कांहीं घेतलें असेल ते रुजवातीनें होईल त्याप्रमाणें ऐवज स्वामींनीं माघारा द्यावा. येणेंप्रमाणें करार करावें.

पंत अमात्य व प्रतिनिधी व सेनापती यांजकडील तालुका, कोट, किल्ले सुद्धां वतनदारी व अमल खेडीं वगैरे पुरातनपासून त्यांजकडे चालत आलीं असतील त्याप्रमाणें चालवावीं. महाराजांच्या सरकारांत गांव वगैरे घेतले असेल तें माघारें द्यावें. कलम १.

सदरहूप्रमाणें चालवावें व घेतलें असेल तें सोडून द्यावें. शेषो नारायण यांचे कारकीर्दीप्रमाणें नजरेचे ऐवजाचा फडशा पडे तंवर एक एक गांव मातबर आपाजी शामराव यांचे स्वाधीन असावा. नजरेचा फडशा जाहलीयावर तोही गांव सोडून द्यावा. अमात्यांच्या गांवाचा वसूल अलीकडे घेतला असेल तो गांवगन्ना रुजू होईल, त्यांत नजरेचा ऐवज वजा करून बाकी निघाली तरी माघारी देवावी. त्याचा गांव आपाजी शामराव यांजकडे ठेऊं नये. झाडून त्याच्या हवाले करावें. करार करावें.

महादजी शितोळे याजकडे कसबे मांजरी व कसबे नेज व मौजे आंकली हे गांव मजरेसुद्धां मशारनिल्हेकडे चालत आल्याप्रमाणें चालवावें. सालमजकुरीं ते सरकारांत चाकरी करीत असतां रुपये व गुरें वळून नेलीं असतील ती माघारी देवावीं. कलम १.

महादजी शितोळे याचे गांव याजकडे चालवावे. गुरें व मेंढरें नेलीं असतील तीं शितोळे यांणीं ठिकाणीं लाऊन सांगितलें ह्मणजे सोडावीं. शितोळे चाकरीवर इकडे आहेत ते आलीयावर त्याजकडे लढे काय व त्याचें गांवचा पैका महाराजांनीं किती घेतला तो अर्थ वाजवी समजोन विनंती लिहून पाठवूं. त्याप्रमाणें करावें. करार करावे.

श्री शंकराचार्य स्वामी यांजकडे इनाम गांवचे कुळास वगैरे उपद्रव करून कुळें धरून नेऊन रुपये घेतले आहेत. ते माघारे द्यावे व कुळें धरून नेलीं आहेत तीं सोडून द्यावीं.

१ कसोपूर येथील मकसुद्या सराफ याजपासून रुपये आठ हजार घेतले आहेत ते माघारे द्यावे.

१ हळदीच्या ठाण्यापासून रुपये घेतले आहेत ते माघारे द्यावे.

१ संकेश्वरचीं कुळें धरून नेलीं आहेत तीं सोडून द्यावीं.

महाराजांनीं वाजवी मनास आणून फडशा करावा. तेथें समज न पडे तरी येथें मनास आणून विनंती लिहूं. त्याप्रमाणें अमलांत आणावें. येणेंप्रमाणें करार करावें.

ममदापूर श्रीसत्यबोधस्वामींचा इनामगांव त्याचा घासदाणा दोनशें रुपये घेऊन आणि गांवांत ठाणें घातलें आहे ते रुपये माघारे देऊन गांव पूर्ववत् आदण्णाचार्य यांचे हवालीं करून द्यावा. कलम १.

सत्यबोधस्वामींचें पत्र गांवाविशीं येईल त्याप्रमाणें करावें. येणेंप्रमाणें करार करावें.

वामनराव गोविंद यांजकडील कलमें:—

१ घोडीं दोन वेळां मिळोन चार चो-

रून नेलीं, त्याचा माग त्याचे तालुक्यांत गेला आहे. त्याची वाट करून दिली नाहीं ती करून द्यावी.

१ तळी खेरे पाटील याच्या तालुक्यांत शिरोळास वगैरे आहेत ते द्यावे.

१ बैल कोठीचे नेले आहेत ते द्यावे.

१ रेणदलचा तसनस केला आहे तो भरून द्यावा.

१ शिरोळकर यांणीं घोडीं नेलीं आहेत तीं द्यावीं.

मिरजेकडील लढे करवीराकडे व करवीराकडील मिरजेकडे आहेत ते येथें मनास आणून वाजवी ठरेल त्याप्रमाणें विनंती लिहूं त्याअन्वयें विल्हेस लावावें. येणेंप्रमाणें करार करावें.

ब्राह्मण भगवंत गोविंद याचा भाऊ वगैरे बंदीखानीं घातले आहेत, ते येथें पाठवून द्यावे. त्याचा अन्वय पाहून कर्तव्य तें करावें. भगवंत गोविंद तों मेलेच आहेत. बाकी जे असतील ते हवालीं करावे. कलम १.

सदरहूचे गुणदोष न पाहतां ब्राह्मण अटकेंतून मोकळे करून येथें पाठवावे. येणेंप्रमाणें करार करावे.

येथून विनंतीपत्रें येतील तीं अलक्ष करूं नयेत. त्याप्रमाणें वर्तणुकेंत आणावें. कलम १.

येणेंप्रमाणें करार करावे.

मानाजी बागुल याणें गांव खाऊन चाकरी करावी ऐसें असतां त्याजवर निमित्य ठेऊन गांव घेतला आहे. तो कराराप्रमाणें एका खाशानें चाकरी महाराजांचे सेवेसी करून गांव पूर्ववत्प्रमाणें इनाम आहे तसा चालवावा. कलम १.

बागलाचा मजकूर सेवकांनीं बोलूं नये. येणेंप्रमाणें करार करावें.

कोन्हेरराव त्रिंबक यांणीं अलीकडे गांव, खेडीं घेतलीं असतील तीं महाराजांच्या तालुक्यातून कूच करून जातील तेव्हां सोडून द्यावीं. कलम १.

येणेंप्रमाणें करार करावें.

एकूण सतरा कलमांखाले मखलासी लिहिली आहे. त्यांत शेषो नारायण व शंकराचार्य स्वामी व मिरजेकडील लढे व अनुबाईकडील वतनाचे जप्तीचा ऐवज, इतकीं कलमें मखलासीप्रमाणें अमलांत तिकडून येतील, परंतु या कलमाकरतां कोन्हेरराव यांणीं तट धरूं नये. याखेरीज वरकड मजकुराचा फडशा मखलासीप्रमाणें त्यांणीं करून आठ दिवसांत दिल्हा म्हणजे त्याचे तालुकीयाहून कोन्हेरराव त्रिंबक यांणीं कूच करून पुढें जावें. येणेंप्रमाणें करवीरकरांकडील राजमंडळचे फौजेचा पैका हिकडून देऊं नये; व मातुश्री अनुबाईनींही देऊं नये. इकडील फौजेचा व अनुबाईच्या फौजेचा पैका करवीरकरांहीं देऊं नये. येणेंप्रमाणें करार करावें.

सदरहू कलमाची तोडमोड विद्यमान आपाजी शामराव निसबत श्रीमंत महाराज राजश्री छत्रपती स्वामी हस्ताक्षर खुद्द.

छ १४ रबिलाखर, ज्येष्ठ, सन सीत सबैन.

## यादी ११.

श्री.

यादी श्रीमंत महाराज राजश्री शिव छत्रपती स्वामींस शिबंदीचे खर्चाबद्दल व करार जाबता निभावणीविशीं माधवराव नारायण पंडित प्रधान विद्यमान महादजी शिंदे गुजारत बाळाराव गोविंद व राणेखान निसबत शिंदे, सुहूर सन समान सबैन मया व अलफ छ २४ रविलावल.

ऐन मामलत शिबंदीचे खर्चाबद्दल १५०००0१ रुपये.

तपशील रुपये

४०००0१ हल्लीं रोख द्यावे मग करवीरचे मोर्चे उठतील.

११०००00 चार महिन्यानंतर द्यावे.

१५०००0१.

एकूण पंधरा लक्ष रुपये द्यावयाचे करार केले, पैकीं चार लक्ष हल्लीं सावकारी निशा करून देऊं. अकरा लक्ष वाइद्याप्रमाणें द्यावे; येणेंप्रमाणें बितपशीलः—

४०००0१ रोख सावकारी निशा करून देऊं तेव्हां मोर्चे उठवावे.

११०००00 चार महिने उपरांत देऊं. यास निभावणीस सटवोजी भोंसले याचा लेख पत्र करून देऊं.

१५०००0१.

येणेंप्रमाणें करार.

पेशजी तीर्थरूप कैलासवासी नारायणराव यांचे वेळेस करार जाबता ठरला आहे. त्यापैकीं तालुके चिकोडी व मनोळी व मौजे लाट व रांगोळी यांच्या सनदा दरोबस्त अमलाच्या आह्मांस द्याव्या. बाकी कलमें करार जाबत्याप्रमाणें पेस्तर निभवावीं. राजवौलांतील आह्मांकडे लोक आले त्यांस आह्मीं वचनें दिल्हीं आहेत त्याप्रमाणें स्वामींनीं निभवावीं. कलम १.

नारायणराव पंडित कैलासवासी यांच्या कारकीर्दीचा पहिला करार राजश्री सखाराम भगवंत व आपाजी शामजी, जिवाजी भोंसले यांचे विद्यमानेचे करारापैकीं तुह्मांस लाट, रांगोळी व चिकोडी मनोळी यांच्या सनदा तुह्मांस दरोबस्त द्याव्या. बाकीबद्दल जाबते व अलाहिदा यादी त्याप्रमाणें तुह्मीं वर्तून सरकारांत जराबजरा ठाणीं व खेडीं द्यावीं. तुह्मीं कराराप्रमाणें वर्तावें, आम्हांकडूनही जाबतेप्रमाणें निभावणी केली जाईल. येणेंप्रमाणें करार.

राज्याची अभिष्टवृद्धी व आमचें कल्याण तेंच स्वामींनीं करावें. फैल फितूर करूं नये. तीर्थस्वरूप राजश्री दादा वगैरे राज्यांतील व परराज्यांतील हैदर नाईक वगैरे यांजकडे संधानें लावून राज्यांत बैदा करूं नये. राज्यांतील व परराज्यांतील फितुरी, लबाड स्वामींकडे येतील त्यास थांग देऊं नये. येणेंप्रमाणें निखालसता असावी. कलम १.

राज्याचें कल्याण व राज्याची अभिष्टवृद्धी होईल तेंच करूं. तुह्मीं कराराप्रमाणें निभावणी करावी ह्मणजे तुह्मांसी दुसरा

अर्थ घडणार नाहीं. तुमच्या लक्षाप्रमाणें राजश्री रघुनाथराव पंडित यांजकडे संधान करणार नाहीं. हैदर नाईक यांजकडेही सूत्र लावून फितूर होणार नाहीं. राज्यांतील व परराज्यांतील यांजकडे सूत्र लाऊन राज्याचें अकल्याण होणार नाहीं. राज्याची अभिष्टवृद्धी व तुमचें कल्याण तेंच घडेल. तुह्मांकडून हरएक विशीं फितूर होऊं नये. येणेंप्रमाणें करार.

राणोजी घोरपडे सेनापती हे आमचे आप्तविषयीं व स्वामींचे सेवक, यांसी आह्मीं वचन दिल्हें आहे. त्याप्रमाणें निभावणी करावी. त्यांचीं ठाणीं व गांव स्वामींनीं सरकारांत घेतले आहेत ते मशारनिल्हेस देवावें. पूर्ववत्प्रमाणें सेनापतीचें चालवावें. कलम १.

राणोजी घोरपडे सेनापती हे राजश्री महादजी शिंदे यांचे आप्त व सरकारचे सेवक. तुह्मांस अगत्य तेंच आह्मांस अगत्य पहिल्याप्रमाणें एकनिष्ठपणें सेवा करावी. रुजु होऊन पहिलेप्रमाणेंच चालविलें जाईल. त्यांचीं ठाणीं व गांव घेतलीं तीं देविलीं जातील. येणेंप्रमाणें करार.

राजमंडळचे लहानथोर सेवक व वतनदार वगैरे व फितुरी व हरएक लबाडी करून कोणी तुमच्या तालुक्यांत येतील त्यास जागा न देतां सरकारांत स्वाधीन करावें. ज्या जाग्यास जातील त्यास पत्र जाईल. त्यांणीं थांग दिल्हा तरी त्या तालुक्यास उपसर्ग होईल. येविशीं सरकारांतून अंतर पडेल ऐसें नसावें.

प्रतिनिधी व अमात्य व सेनापती घोरपडे यांचे पेशजीप्रमाणें चालवावें व ज्याचा त्याचे हातून कारभार घ्यावा. कलम १.

प्रतिनिधी व अमात्य व सेनापती यांचे पूर्ववत्प्रमाणें चालविलें जाईल. त्यांणीं सरकारांत रुजू असावें व त्यांणीं दुष्टबुद्धि धरून हरएकविशीं फितवा फायडा करूं नये व राजमंडळचें हरकोणी वतनदार वगैरे त्यास त्यांणीं आश्रय देऊं नये. सरकारांत रुजू असावें. येणेंप्रमाणें करार.

घाटगे, कागलकर, हे पुरातन सेवक राजमंडळचे, यांजकडे पहिल्यापासून कागल आहे. अलीकडे शेषो नारायण यांचे कारकीर्दीस महाराजांनीं सरकारांत घेतलें आहे. तें फिरोन आह्मीं घेऊन घाटगे यांजकडे दिल्हें आहे. त्याप्रमाणें चालवावें. येविशीची सनद द्यावी व घाटगे यांचीं वतनें आहेत त्याप्रमाणें चालवावीं. आह्मांकडे आले होते ह्मणोन आकस करूं नये. कलम १.

कागलकर पुरातन सरकारचे सेवक त्यांणीं सेवाचाकरी पूर्ववत्प्रमाणें करावी. चाकरी पूर्ववत्प्रमाणें केल्यास कैलासवासी आईसाहेब यांच्या वेळेस चालत आल्याप्रमाणें कागल वगैरे पूर्ववत्प्रमाणें चालविलें जाईल. येणेंप्रमाणें करार.

व्यंकटराव घोरपडे यांजकडे मौजे लाट व रांगोळी आहे. त्यास पूर्वींपासून घोरपडे यांजकडे इनाम आहे. त्याप्रमाणें हल्लीं करार करून सनद करून द्यावी. कलम १.

लाट व रांगोळी पूर्ववत्प्रमाणें तुह्मांकडे करार करून दिल्ही असे तरी सुखरूप

अमल करून राहणें ह्मणोन सनद देविली जाईल. येणेंप्रमाणें करार.

देवस्थानास व ब्राह्मणास वगैरे इनाम गांव करून राजमंडळ पैकी द्यावे.

३००० क्षेत्रकरवीर.

| | | |
|---|---|---|
| २००० | श्री महालक्ष्मीस | गांव १. |
| ५०० | समस्त ब्राह्मण क्षेत्रस्थास | गांव १. |
| ५०० | शंकराच्यार्य स्वामींस | गांव १. |
| ३००० | | ३ देहे. |

३५०० श्री जोतिर्लिंगास गांव १.

३५०० श्रीमनसूर साहेब यांस गांव १.

१००००

एकूण दाहा हजार रुपयांचे गांव स्वामींनीं कृपाळू होऊन दिल्हे पाहिजेत. येविशी विनंती मान्य केली पाहिजे. कलम १.

तुह्मीं गांव द्यावे ह्मणोन लिहिलें त्यास सरकारांतून पेशजी गांव त्यास दिल्हे आहेत ते सरकारांत घेऊन हल्लीं तुह्मीं लिहिल्याप्रमाणें देविले जातील. येणेंप्रमाणें करार.

शंकराजी घोरपडे आपले राजमंडळाकडे चाकरीस होते. त्यांची तलब न देतां त्यांची घोडी मुधोळाहून येत होती ती घेतलीत व चिजवस्त घेतली आहे ती द्यावी. कलम १.

शंकराजी घोरपडे यांणीं सरकारांतील जाजती ऐवज नेला आहे व फरास, सामान व उंट व कनाती वगैरे नेले आहे ते जराबजरा सरकारांत त्यांणीं दिल्यानंतर घोडी देविली जातील.

विरभद्र गोसावी मौजे सवाहाती यांजपासून खतपत्र घेतलें असेल तें माघारें द्यावें. कलम १.

महेशगीर गोसावी दरम्यान होता त्यास पत्र दिल्हें आहे.

पडल्या घोड्याबद्दल व जखमी वगैरेबद्दल रोख द्यावे ४००००१ रुपये.

एकूण चार लक्ष एक रुपया द्यावयाचा करार वितपशीलः—

२००००१ तूर्त सावकारी निशा दिल्हा नंतर मोर्चे उठवावे.

२००००० ठाणें वडगांव वगैरे ठाणीं खासगत वसूल, खासगत राजमंडळचे गांवांपैकीं घेतला असेल त्याजमुळें तुमचा आमचा लढा, त्यास सदरहू सावकारी निशा आह्मी देतों. त्यांत वसूल रुजवातीनें ठरेल तो राजमंडळचे गांवचा मजुरा देऊं. बाकी ऐवज सावकार यांजपासून ध्यावा.

४००००१

एकूण चार लक्ष एक रुपया करार.

दरबारखर्चाबद्दल रोख द्यावे रुपये.

५०००० निसबत पंतप्रधान.

५०००० निसबत शिंदे.

१०००००

एकूण एक लक्ष रुपये साहा महिन्यांचे वायद्यानें सावकारी निशा देऊं. येणेंप्रमाणें करार.

चौथे महिन्याचे वाइद्यानें द्यावें.

११००००० रुपये.

सदरहू अकरा लक्ष रुपये याचे उगवणीस मातबर कोणी दरम्यान द्यावा. दरम्यान मातबर द्यावा. त्याणें चौथे महिन्यास निशा चिट्ठी देऊन ऐवजाची निशा करावी. स्वामींनीं मातबराचे चिट्ठीप्रमाणें निभावणी करावी. कलम १.

चौथे महिन्याचे वाइद्यानें द्यावे रुपये अकरा लक्ष. त्याचे उगवणीस सटवाजी भोंसले दरम्यान देऊन मशारनिल्हेकडून कराराप्रमाणें चौथे महिन्याची निशा चिट्ठी लिहून देवऊं. ऐवजाची निभावणी करून देऊं. येणेंप्रमाणें करार.

जिवाजी गोपाळ व विरूपाक्ष शामजी व रामचंद्र गणेश व कोन्हेर त्रिंबक यांचे लढाईत वगैरे आह्मांकडील लहान मोठे धरून नेऊन बंदीं घातले आहेत, ते सोडून द्यावे. कलम १.

जिवाजी गोपाळ व विरुपाक्ष शामजी व रामचंद्र गणेश व कोन्हेर त्रिंबक यांचे लढाईत तुह्मांकडील सांपडले असतील ते त्यांचीं खतें पत्रेंसुद्धां तुमचा खिजमतगार ठेवणें. त्याचे देखत पन्हाळ्याहून विशाळगडास पाठवून देऊं. तेथून राजश्री प्रतिनिधिपंत तुह्मांकडे पोंचवितील ते तुह्मी कृष्णापार होतांच. येणेंप्रमाणें करार.

गोपाळजी आंग्रे व येसनाक वगैरे हे आमचे तालुक्यांत कोंकणपट्टी वगैरे प्रांतीं चोरी वगैरे उपद्रव करून ब्राह्मणांच्या बायका धरून नेऊन पैका घेतात. हे हरामखोर राज्यांतील त्यांजला थागा, देऊन पन्हाळ्यास ठेविले आहेत, ते आमचे स्वाधीन करावे व पुढें हरामखोरास थागा देऊं नये. कलम १.



तुमचे तालुक्यांतील कोंकणप्रांतीं वगैरे चोरी करून आह्मांकडे आले आहेत त्यांचें पारिपत्य आह्मी करूं. त्यांजला सोडणार नाहीं. पुढें तुमचे तालुक्यांतील वगैरे फितुरी, हरामखोर येतील, त्यांस थागा देणार नाहीं. राजमंडळाकडील हरकोणी वतनदार वगैरे फितुरी व हरामखोर तुमचे तालुक्यांत येतील, त्यांस तुह्मीं थागा न द्यावा. येणेंप्रमाणें करार.

आह्मांकडे राजमंडळपैकीं लोक आले आहेत. त्यांस आह्मीं वचनें दिल्हीं आहेत त्याप्रमाणें निभावणी करावी. त्यांचा आकस न धरितां पूर्ववतप्रमाणें चालवावें. कलम १.

तुह्मीं वचनें सरकारतर्फेच्या लोकांस दिल्हीं आहेत, त्यास कैलासवासी आईसाहेब यांचे वेळेस चालत आलें असेल त्याप्रमाणें चालविलें जाईल. त्यांणीं एकनिष्ठपणें सेवा करावी. फितवा, फादडा, हिल्ला, हरकत करूं नये. त्यांणीं पूर्ववतप्रमाणें सरकारांत रुजू असावें. येणेंप्रमाणें करार.

राजश्री रघुनाथराव मंत्री व मिरजकर व शिराळेकर भोंसले व महिपतराव घोरपडे व थोरात वाळवेकर व व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर वगैरे आमचे सेवक व राजमंडळचे सेवक साताऱ्याकडील त्यांचें आकस धरून उपद्रव करूं नये, व आपले राजमंडळपैकीं मशारनिल्हेकडे इनाम वगैरे गांव व वतनें असतील तीं पूर्ववतप्रमाणें चालवावीं. कलम १.

मिरजकर व राजश्री रघुनाथराव मंत्री व शिराळेकर भोंसले व महिपतराव घोर-

पडे व व्यंकटराव, थोरात वगैरे तुह्मांकडील व सातारीयाच्या मंडळाकडील यांजला उपद्रव होणार नाहीं. यांजकडे इनाम वगैरे पूर्ववतप्रमाणें राजमंडळपैकीं असेल तें चालवूं, व आकसही होणार नाहीं. राजमंडळास हरएकविशीं फितूर, फादडा करूं नये. इकडील कोणीं लहान थोर व वतनदार व रयता वगैरे गेल्यास त्यांणीं जागा देऊं नये व आपण जागा देऊन इकडे चोरी व हरएक उपसर्ग करवूं नये. केल्यास उपसर्ग होईल येविशीं आपला शब्द नसावा. येणेंप्रमाणें करार.

तालुके चिकोडी व मनोळी दोन तालुके राजमंडळपैकीं सावकारांस कर्जांत दिल्हे आहेत. त्यास सावकारांचें कर्ज फिटल्यावर सदरहू दोन्ही तालुके तुह्मांस दिल्हे आहेत. तुह्मीं अमल करणें अथवा सावकारांचें कर्ज देऊन हल्लींच अमल करणें ह्मणोन सनदा दोहो तालुक्यांच्या दरोबस्त अमलाच्या द्याव्या. कलम १.

मनोळी व चिकोडी दोन्ही तालुके तुह्मांस द्यावे. येविशीं राजश्री महादजी शिंदे यांणीं येऊन विनंती केली, त्याजवरून दरोबस्त तालुके तुह्मांस दिल्हे. याप्रमाणें सनद देविली जाईल. येणेंप्रमाणें करार.

सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन वगैरे यांस पेशजी गांव द्यावयाचा करार केला आहे त्याप्रमाणें द्यावे. कलम १.

राजश्री सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन वगैरे मुत्सद्दी यांस पेशजी याद करार करून दिल्ही आहे. त्याप्रमाणें गांव व इनामपत्रें करून द्यावीं. त्यास चिकोडी मनोळी तुह्मांकडे, तेव्हां पत्रीं द्यावीं ती काय?

राजमंडळचे गांवाबद्दल व सरंजामीयांजपासून हल्लीं ऐवज घेतला असेल तो मागों नये. मागितल्यास सटवाजी भोंसले यांणीं स्वाऱ्या करून मिरज प्रांतीं वगैरे ऐवज घेतला असेल तो जराबासरा द्यावा. आह्मींही घेतला असेल तो रुजुवातीनें ठरेल त्याप्रमाणें देऊं. कलम १.

राजमंडळाकडील गांवचा वसूल तुह्मीं घेतला आहे तो चार लक्ष रुपये यांत तुह्मीं मजुरा द्यावा. मिरजप्रांतीं वगैरे येथें राजश्री सटवाजी भोंसले यांणीं स्वारी शिकारी करून खंडणी घेतली असेल तो ऐवज, खर्चेंच भारी पडला याजमुळें द्यावयाचा नाहीं. येणेंप्रमाणें करार.

एकूण कलमें एकवीस रास मोर्तब.

---

## यादी १२.

श्री.

यादी गुजारत रामचंद्र महादेव व आबाजी नाईक व रामचंद्र नारायण व आपाजी शामराव, सुरुसन इहिद्दे समानीन मया व अलफ. तालुके हुकेरी व मनोळी दोनी तालुके राजमंडळ करवीरवासी यांणीं सरकारांत भरणा ऐवजाचा आह्मांकडून करविला व दरबार-

खर्चाचा वगैरे ऐवज देविला त्याऐवजीं, सरकारचे विद्यमानें व्याज व मनोतीसुद्धां ऐवज फिटे तों तालुके आह्मांकडे ठेविले. दरम्यान मनोळी तालुका करारांत अंतर करून राजमंडळकरांनीं घेतला. हुकेरी तालुका राहिला आहे. त्यास राजमंडळकरांनीं सन सीत सबैनापासून बिघाड करून मनस्वी उपसर्ग तालुक्यास दिल्हा. शिवंदिच्या पेचांत सावकार आले. त्यांचा तह हल्लीं राजश्री परशराम रामचंद्र यांचे विद्यमानें होत आहे. त्या तहाच्या बोलण्यांत सावकारांकडील हुकेरी तालुका सरकारचे तिराइताकडे ठेवून रुजुवात करावी ऐसा ठराव जाहला आहे. त्यासंमंधें करार करून द्यावयाचा वितपशील. कलमें:—

रुजुवातीस सरकारचे कारकून जाऊन चहू महिन्याअलीकडे रुजुवात व्हावी. राजमंडळकरांनीं दिरंगावर घातल्यास व सरकारांतून मुदत ठरेल त्या अलीकडे येसाजी शिंदे यांणीं तहामध्यें बिघाड केल्यास, आमचे तालुके पूर्ववतप्रमाणें आह्मांकडे देऊन सरकारांतून पुस्तपन्हा पहिल्या कराराप्रमाणें करावा. कलम १.

सहा महिन्यांत रुजुवात करवून ऐवज ठरेल त्याचा फडशा करवीरवासी यांजकडून करवावा. रुजुवातीस सरकारचे कारकून व करवीरवासी यांजकडील कारकून द्यावे. त्यांणीं चवकशीनें रुजुवात करून सरकारांत समजावीतील, त्याअन्वयें सावकाराचे ऐवजाचा ठराव होईल. त्याचा फडशा करवीरवासी यांजकडून करवावा. रुजुवातीस करवीरकरांकडून खलेल पडली तर टाणीं सावकारांस देविलीं जातील. येणेंप्रमाणें करार करावे.

इनामगांव पेशजी कैलासवासी श्रीमंत मातुश्री आईसाहेब यांणीं करार करून दिल्हे व इनामपत्रेंही करून दिल्हीं आहेत. त्यास सन सलास सबैनचे सालीं तह ठरला, त्यामध्यें पहिला करार राहून सावकारांनीं साडेबारा लक्ष व दरबारखर्चाचा वगैरे भरणा केला, ते समयीं पहिले गांव दिल्हे. त्यांपैकीं वगैरे पांच हजार रुपयांचे गांव सावकारांस करार करून दिल्हे व आपाजी शामराव यांस मध्यस्तीबद्दल मौजे बागेवाडी हा गांव करार करून, राजश्री जिवाजी भोंसले व महादेवशास्त्री यांणीं यादी करार करून घेतली. ते याद विरुपाक्ष शामजी व महादेवशास्त्री यांस दरम्यान नाईकजी थोरात देऊन भेटीस बोलवून धरून नेले. ते समयीं सदरहू याद रुमालामध्यें करवीरकरांकडे गेली आहे. त्या कराराप्रमाणें गांव चालवावे.

१ मौजे गलतगे रामचंद्र महादेव यांकडे.

१ मौजे करजगे आबाजी बाजी यांकडे.

२

१ मौजे बागेवाडी आपाजी शामराव यांकडे पूर्वींपासून इनाम चालत होती. अलीकडे शेषो नारायण यांणीं घालमेल केली होती. अलीकडे श्रीमंत मातुश्री आईसाहेब यांणीं करार करून दिल्हा, त्याप्रमाणें चालवावा.

३

१ मौजे वाळवें गंगाधर विश्वनाथ यां-
जकडे चालत आहे तो.

४

चार गांव पेशजी करवीरवासी यांणीं सावकारांस इनाम दिल्हे आहेत. त्याप्रमाणें करवीरवासी यांसी बोलून सावकारांकडे चालवावे. करार करावे.

रद्द कर्जास आदा काय जाहला त्याची रुजुवात करणेंबद्दल तालुका अमानत तिराइताकडे ठेवावयाविशीं सरकारची आज्ञा. त्यास तालुकीयाची रुजुवात करून कर्ज व शिबंदी वगैरे एकंदर बाकी ऐवज करवीरकरांकडे ठरेल त्याची निशा रोकड सावकारांची करून द्यावी किंवा सदरहू तालुका द्यावा. रुजुवात होईपावेतों मुदतीबरहुकूम असावा. रुजुवात जाहलीयावर तालुका तिराइताकडे असोन ऐवज तुह्मीं घेत जाणें असें ह्मणों नये. तालुकाच आमच्या हवालीं करावा. कलम १.

रुजुवात होऊन सावकाराचा ऐवज बाकी ठरेल त्याचा फडशा करवीरवासी यांजकडून करून देविला जाईल. ऐवजास करवीरवासी यांजकडून दिक्कत निशापातीविशीं जाल्यास सरकारांतून ठाणीं सावकारांकडे देविलीं जातील. येणेंप्रमाणें करार करावे.

तालुके हुकेरी येथील सावकारांचे ऐवजाची रुजुवात होय तोंपावेतों तालुके मजकूरचा ऐवज वसूल पडत जाईल. त्याप्रमाणें सावकारास हिसेरसीदीप्रमाणें पावता करीत जावा ह्मणून परशराम रामचंद्र यांस सनद देवावी.

सरकारांतून तिराइताकडे तालुके ठेवितील. त्याणें सरकारचे बेहेड्याप्रमाणें शिबंदी वगैरे खर्च करून, बाकीचा वसूल रुजुवात होईपावेतों वरचेवर आमचा आह्मांकडे देत जावा. कलम १.

बेहेड्याप्रमाणें शिबंदी मजुरा पडेल. बाकीचा ऐवज सावकारास द्यावा. कदाचित् करवीरवासी वगैरे यांचे दंग्यामुळें जाजती शिबंदी खर्च पडल्यास सरकारांतून सनद सावकारांचीं ठाणीं देण्याविशीं सादर होईल. त्याप्रमाणें ठाणीं सावकारांचे हवालीं करावीं. दरम्यान जाजती शिबंदीचा ऐवज होईल, तो वजा करून बाकी ऐवज सावकारांस द्यावा. दंगा न जाल्यास सुरळीत ऐवज सावकारांस पाववीत जावा. येणेंप्रमाणें करार करावे.

तालुका तिराइताकडे ठेवावा. त्यापैकीं आह्मांस राहावयास जागा चिकोडी व बागेवाडी व हुकेरी यापैकीं रामचंद्र महादेव व आपाजी शामराव या दोघांस दोन ठाणीं व गांवकारकून व घोडीं व माणसें राहवयाबद्दल ऐसी द्यावी. वरकड रुजुवात जाहल्यावर मग सदरहू दोन ठाण्याची व गांवची रुजुवात करावी. कलम १.

रामचंद्र महादेव व आपाजी शामजी व रामचंद्र नारायण याप्रमाणें त्रिवर्गांस घोडीं, माणसें ठेवावयास तीन गांव ठाण्याचे द्यावे, व त्यालगत फडफर्माविशीबद्दल वगैरे गांव लावून द्यावे. त्याचा अजमास ठाण्याचे गांवसुद्धां रुपये.

१०००० रामचंद्र महादेव यांजकडे ठाण्याचे गांव सुद्धां.
७००० आपाजी शामजी यांजकडे ठाण्याचे गांव सुद्धां.
३००० रामचंद्र नारायण.
२००००

वीस हजार रुपयांचे गांव ठाण्याचे गांवसुद्धां त्रिवर्गांचे निसबतीस देऊन ऐवज रद्दकर्जी धरावा. येणेंप्रमाणें करार करावें.

येसाजी शिंदे यांणीं बिघाड केल्यामुळें शिबंदी खर्च जाजती व मदत खर्च व घासदाणा सरकारांत घेतले आहेत ते व ठाण्यासंमंधें मरामतीबद्दल वगैरे खर्च जाहला असेल तो मजुरा द्यावा. कलम १.

रुजुवातमुळें तुमचा ऐवज ठरावांत येईल त्याप्रमाणें करवीरवासी यांजकडून देविला जाईल. येणेंप्रमाणें करार करावे.

सावकारीसंमंधें भरण्याचे ऐवजाची व दरबारखर्च व व्याजमनोती याची कराराची याद होती, ते महादेवशास्त्री यांजबराबर कतबा घ्यावयाबद्दल पाठविली होती. ते याद शास्त्री यांस कैद केले, ते समयीं रुमाल घेतले त्यांत गेली असे. कलम १.

करवीरवासी यांसी सांगून यादी व कागदपत्र त्यांणीं नेले असतील ते देविले जातील. येणेंप्रमाणें करार करावे.

तालुका राजश्री परशराम रामचंद्र यांचे निसबतीनें राहिल्यास ऐवज सावकाराचा सावकारास पावीत जावा. सरकारचे निसबतीचे खर्च व सरदारीसंमंधें वगैरे ऐवज मागणें आहे व पुढें मसलतमुळें होईल, त्या जाबसालांत सदरहू सावकाराचा ऐवज मोबदला करून, सरकारांत जाबसाल सांगोन सावकारास पावणार नाहीं असें होऊं नये. सावकाराचे तालुक्याचा ऐवज सावकारास पावता व्हावा. येविशींची खातरजमा व्हावी. कलम. १

सदरहूप्रमाणें कलमें करार करावीं. येणेंप्रमाणें करार करावे.

सदरहू यादी मखलासी बाळाजीपंत दिंमत राजश्री परशराम रामचंद्र यांस दाखवून करार केली असे.

छ २६ जमादिलाखर इसन्ने समानीन.

## यादी १३.

श्री.

यादी श्रीमंत महाराज राजश्री—छत्रपती स्वामींचे शेवेसी. राजश्री प्रधानपंत यांजकडून कलमें करार होऊन यादीं. सुरुसन इसन्ने समानीन मया व अलफ.

सरकारांतून विठ्ठल शेषाद्री व रामचंद्र नारायण यांस सावकारी कर्जाची हमी देण्याविशीं आज्ञा जाली आहे. त्यास तालुके चिकोडी व फुटगांव मशारनिल्हेचे स्वाधीन करावे. सरकारांतून कराराची याद पाठविली आहे, त्याप्रमाणें हमी देतील. हमीचा ऐवज

पोंहचल्यानंतर उभयतां मशारनिल्हे तालुका व फुटगांव राजधानीकडे देतील. कलम १.

सावकारांचे ऐवजाचे ठरावाची यादी अलाहिदा ठरली आहे, त्याअन्वयें सावकारांचा निशा ठरेल, त्याची निभावणी विठ्ठल शेषाद्री व रामचंद्र नारायण ( पुढें फाटलें आहे ) परशराम रामचंद्र यांणीं घेऊन तालुके चिकोडी व फुटगांव करार प्रमाणें उभयतां हमीदार यांचे हवालीं करावे. उभयतांचा पैका फिटल्यानंतर तालुका व गांव महाराजांचे स्वाधीन करावे. येणेंप्रमाणें करार करावे.

परशराम रामचंद्र यांचे विद्यमानें तह होऊन ऐवजाचा ठराव जाला. ऐवज पोंहचून बाकी देण्याच्या ऐवजांत शिरोळ व तालुके मनोळी वगैरे गहाणवट आहेत. ठाण्यांतील वसूल व सरकारांतून ऐवज पोंहचून बाकी देणें निघेल त्याची हमी घेऊन सरकारांत ठाणीं द्यावीं. कलम १.

परशराम रामचंद्र यांचे विद्यमानें ऐवज द्यावयाचा करार जाला आहे. त्यांपैकीं कांहीं वसूल जाला, बाकी ऐवज राहिला. याजकरितां शिरोळ व तालुका मनोळी वगैरे गहाणवट ठेविले आहे. त्याचा वसूल पडला असेल त्यांत शिबंदी वगैरे कराराप्रमाणें मजुरा देऊन, बाकी ऐवज राहील तो पहिला पावला तो एकंदर करून करारांत वजा देऊन, बाकी ऐवज राहील त्याची सावकारी निशा घेऊन, शिरोळ व तालुके मनोळी वगैरे कराराप्रमाणें स्वामींकडे देतील. येणेंप्रमाणें करार करावे.

खेम सांवत सरकारचा सेवक याणें धन्याच्या पायाशीं अमर्यादा केली, त्याचें पारपत्य सरकारांतून होईल. येविशीं सांवताचा पुस्तपना तुह्मांकडून होऊं नये. कलम १.

सांवतांनीं स्वामींची अमर्यादा केली आहे. त्यास सरदार पदरचे आहेत. सबब उत्तम रीतीनें ( पुढें फाटलें आहे. ) विवेक करून (पुढें फाटलें आहे.) येणेंप्रमाणें करार करावे.

सरकारतर्फेचे सरंजामी व जमीदार वगैरे यांपासून कर्जपट्टी व नजर तुह्मांकडील दाखल्याप्रमाणें घेऊं. कलम १.

सरंजामी व जमीदार यांजपासून पट्टी घ्यावयाची, त्यास खर्चवेच पडले आहेत, ते पाहून जिवनमाफक घेणें ते घ्यावे. येणेंप्रमाणें करार करावे.

तालुका चिकोडी व मनोळी व रायबाग व कागल वगैरे फुटगांव परशराम रामचंद्र यांचे विद्यमानें तह जाहला त्याअन्वयें जराबाजरा ठाणीं सरकारांत यावीं. इतःपर सरकार तालुक्यांत व किल्ले, कोट, जंजिरे येथें हरएकविशीं तुह्मांकडून बखेडा होऊं नये. हरकोणी अमर्याद वर्तणूक करतील त्याचें पारपत्य करावें. अलीकडे सरकार तालुक्यांतील गांवखेडीं व ज ( पुढें फाटलें आहे. ) किलेदार वगैरे सदी ( पुढें फाटलें आहे. ) राजधानी ( पुढें फाटलें आहे ) वीं. कलम १.

परशराम रामचंद्र यांणीं करार केला आहे त्याप्रमाणें निभावणींत येईल. किल्ले, कोटाविशीं कोणी अमर्यादा केलीयास ताकीद केली जाईल. येणेंप्रमाणें करार करावे.

वरकड कलमें परशराम रामचंद्र यांनीं करार केला आहे त्याअन्वयें मशारनिल्हेकडून निभावणी जालीयास उत्तम. न जाल्यास त्याप्रमाणें तुह्मीं निभाऊन द्यावी.

कलम १.

परशराम रामचंद्र यांणीं करार करून तहाच्या यादी ठराविल्या आहेत. त्याप्रमाणें निभावणींत येईल. येणेंप्रमाणें करार करावे.

भुदरगडास चिकोडकरांनीं फितूर केला आहे. लोक किल्ल्यावर घातले ते उतरल्यानंतर चिकोडीकरांनीं किल्लेकरी यांसी सिलसिला राखूं नये. व हरकोणी सिलसिला राखतील अथवा किल्लेकरी राजकारण करतील, त्यास व राजकारण करणारांचें निक्षून पारपत्य करावें. कमल १.

किल्ल्याविशीं चिकोडीकरांनीं याउपर सिलसिला राखूं नये. व आणखी कोणी राजकारण केल्यास त्यास न करण्याविशीं ताकीद केली जाईल. येणेंप्रमाणें करार करावे.

तहाच्या करारापैकीं गांवखेडीं ज्याकडे असतील, तीं सरकारांत देण्याविशीं ताकीदपत्रें सरकारांत लागतील तीं देत जावीं.

कलम १.

कराराप्रमाणें गांवखेडीं हवालीं करण्याविशीं ताकीदपत्रें लागतील तीं द्यावीं. येणेंप्रमाणें देवावी.

परशराम रामचंद्र यांणीं सांगितलें जे, तहाचें बोलणें लागलें असतां भुदरगडच्या घेऱ्यास चौक्या ठेवण्याचें कारण काय? रांगण्याकडे सांवताचा उपद्रव जाला आहे, त्यास भुदरगडच्या घेऱ्याचे लोक तिकडे पाठवून द्यावे. गडकरी यांकडून व अंताजी शामजी याजकडून उपद्रव होणार नाहीं. ह्मणोन सांगितल्यावरोन लोक उठवून रांगण्याकडे आणविले. असें असतां चिकोडीकरांनीं शेणगांव मारलें, तेथील पेठ मारली, लाख रुपयांची खराबी जाली, व गढी मातबर पाडून जमीनदोस्त केली. त्याचा दिनावा अंताजी शामजी यांणीं भरून द्यावा.

कलम १.

येविशींचें वर्तमान मनास आणून गैरवाजवी कोणाकडून न घडेल हें समजोन करणें तें केलें जाईल. येणेंप्रमाणें करार करावे.

हत्ती जरीपटके हुजूरचे नेले आहेत, ते हुजूर पाठवावे. कलम १.

लढाईंत गेले. त्यांचा ठिकाण नाहीं.

तालुक्यांतील जमीदार वगैरे तुह्मांकडे येऊन गैरवाका समजावितील. त्यांस आश्रय देऊं नये. कलम १.

स्वामींनीं कृपा करून यथापूर्व सर्वांचें चालवावें. गैरवाका कोणी येथें समजाविल्यास ऐकावयाचें नाहीं. येणेंप्रमाणें करार करावे.

छ ७ रबिलाखर, सन इसन्ने समानीन मया व अलफ, चैत्रमास.

---

# यादी १४.

श्री.

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपती स्वामी यांजकडील बंदोबस्ताचीं कलमें, राजश्री पंतप्रधान यांजकडून उलगडून घ्यावयाचीं. विद्यमान राजश्री दौलतराव शिंदे अलिजाबहादर सुरुसन इहिद्दे मयातैन व अलफ.

परगणे चिकोडी व मनोळी येथील व फुटगांव व इनामदार व सरंजामी सुद्धां रामचंद्र परशराम यांसी पत्र द्यावें. सदरहू अन्वयें महाल व फुटगांव दरोबस्त यांचे यांजकडे लाऊन द्यावे. कलम १.

चिकोडी व मनोळी व फुटगांव पूर्वी स्वामींकडे चालत होते. त्याप्रमाणें चालतील. येणेंप्रमाणें करार.

पेशजीपासून कागदोपत्रीं सिलसिला उभयपक्षीं चालत असावा. संस्थानचें कल्याण दिवसेंदिवस वृद्धी होत असावी. कलम १.

पूर्वींपासोन कागदोपत्रीं सिलसिला चालत आला आहे, त्याप्रमाणें चालेल. स्वामींचे राज्याचें कल्याण तें सेवकाकडून घडेल. येणेंप्रमाणें करार.

इंग्रजाचे रुपये मुद्दल वाजवी हिशेबी रुजुवाती मुंबईच्या रुजुवातीनें फडशा करून हस्तेबंदीप्रमाणें उलगडून देऊं. यास इंग्रजाचें बोलणें जरबेचें पडल्यास सदरहूप्रमाणें आपण तोड काढावी. कलम १.

इंग्रजाचा ऐवज स्वामींकडे येणें, त्याचा फडशाचा ठराव स्वामींकडून दोन महिनेंचे मुदतींत क्षेपनिक्षेप व्हावा. तोंपावेतों स्वामींकडील जाबसालास मातबर आले आहेत. त्यांणीं येथें असावें. इंग्रजाकडील जाबसालाच्या ठरावाविशीं सेवकाकडून अंतर होणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

परशरामपंत यांचा देण्याचा तंटा एकंदर न लागावा.

सदरहूप्रमाणें करार.

तिकडून वकीलीस येतील व पुण्यास राहतील त्यांची योग्यता पाहून खर्च चालवावा.

सुदामत पेशजी चालत आल्याप्रमाणें शिरस्ता पाहून चालविलें जाईल. येणेंप्रमाणें करार.

परभारें फिर्याद कोणी इकडे आल्यास जिकडील तिकडे पाठवून द्यावें. कलम १.

स्वामींकडील कोणी फिर्याद आल्यास स्वामींकडे पाठवूं. सेवकाकडील कोणी स्वामींकडे आल्यास सेवकाकडे पाठवावयाची आज्ञा असावी. येणेंप्रमाणें करार.

इकडील कामें पडल्यास तिकडून पुस्तपन्हा व्हावा. तिकडील कामें पडल्यास उभयतां परस्परें साहित्य व्हावें. कलम १.

सदरहूप्रमाणें करार.

छ १९ माहे सफर, आषाढ, इहिद्दे मयातैन.

## यादी १५.

श्री.

यादी श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामी यांजकडील राजफौजेचे खर्चामुळें आफतींत आले, सबब जाजती सरंजाम श्रीमंत पंतप्रधान यांजकडून लाऊन द्यावयाचा. सुरुसन इहिदे मयातैन व अलफ. सरंजाम वसुली राज्याचे लगत्यास.

२५०००० महाराजांस सरंजाम.
२५००० सौभाग्यवती बाईस सरंजाम.
२७५०००

स्वामींनीं जाजती खर्चाबाबद सरंजामास महाल लाऊन द्यावे ह्मणोन आज्ञा केली. त्यास, सेवकास अनेक प्रकारच्या दौलतीप्रकर्णीं मसलती पडतात, त्यास फौजेविशीं सेवक विनंतीपत्र लिहील; त्याप्रमाणें स्वामींकडून फौजेची रवानगी हरवख्त होत असावी. सदरहू पाऊणे तीन लक्ष रुपये कमाल बेरजेचे महाल नेमून देऊं. येणेंप्रमाणें करार.

१ राज्यांतील इनामदार व जहागिरदार व देशमुख, जमेदार व सरंजामी श्रीमंतांकडील सक्तीचा उपर दाखवून सदरहूप्रमाणें अनभवीत होते. ते हल्लीं एकंदर त्याची तगीरी बदली हुजुरून व्हावी. येविशीं तुह्मांकडे फिर्याद आल्यास मनास आणूं नये. कलम.

सदरहू प्रमाणें करावें.

छ १ माहे सफर, आषाढ, इहिदे मयातैन.

---

## यादी १६.

श्री.

यादी कोल्हापूर महाराज राजेसाहेब यांचे राजकारणाचा बंदोबस्त होणेंस्तव मंजूर केलीं तीं कलमें. महाराजांनीं मुलाहिजा फर्मावणेंचीः—

कंपनी सरकार व श्रीमंत पेशवेसाहेब बाजीराव रघुनाथ पंतप्रधान बहादर यांचे दरम्यानेंत एक तहनामा मुकरर होऊन, एक मिश्रित जाहल्यावरून, श्रीमंत पेशवेसाहेबांचे शत्रूस कुंपनी सरकारा ( नीं ) मारावे ( व ) कुंपनीचे शत्रूस श्रीमंत पेशवेसाहेब यांनीं मारावे ऐसें ठरलें आहे. आणि कोल्हापूरकर राजे महाराजांसीं श्रीमंत पेशवेसाहेबांवरी व त्यांचे सरदारांवरील हरतऱ्हेचे दायहो ( दावे ) आहेत; सर्वांसीं स्नेहभावेंकडून फैसला सल्ला करणेंचे जरूर आहे. यास्तव हा करारनामा जाहला आहे. तपशीलः—

१. अव्वल कलम तमाम कजीया बखेडा कोल्हापूर राजे महाराज व श्रीमंत पेशवेसाहेब व त्यांचे चाकर व रयतेची दरम्यानेंत पडले आहेत. सर्व फैसला होणेंस्तव हें काम

कुंपनी सरकारचा जिमा करावें आणि कुंपनीबहादर सरकार कोणतेप्रमाणें फैसला करतील त्याप्रमाणें महाराजांनीं कबूल करावें. कलम.

१. दुसरें कलम कुंपनीसरकार करार करीत आहेत जे. हे कजीयाचे मोकदमे महाराज कोल्हापूर राजेसाहेब व श्रीमंत पेशवेबहादर व त्यांचे चाकराचे दरम्यानेंत आहेत, दरोबस्तेस चांगलें पारिपत्य करून इनसाफी व हक्कचे रुईनें कुंपनी सरकार फैसला करितील. कलम.

१. तिसरें कलम सदरहू दोनीं कलमें जेव्हांपर्यंत अमलांत येतील तंवपावेतों एक करार होत आहे कीं, तमाम लढाई व हंगामा मौकूफ असावा. हरदो तर्फेनें श्रीमंत पेशवेसाहेबबहादर, त्यांचे सरदार व रयत एकीकडे, व महाराज राजे कोल्हापूरकर दुसरेकडे, ह्या उभयतांचे हातीं असणेंचा मुलक, ठाणें, जात वगैरे पार त्याकडेच कायम असावा कलम.

एकूण कलमें तीन मरकूम छ १० जुलई १८०४ इसवी, इसन्ने मुताबीक छ २ रबिलाखर.

---

## यादी १७.

श्री.

यादी करवीर महाराज राजे शिवछत्रपती यांसी जाहीर होणेची बंदराची मोकदमेंत कलमांत तपशील:—

१. अबल कलम महाराजांनीं आपणांकडून करार करावा कीं, हरकैसी तरी चोराचीं आरमारें, महाराजांचे मुलखांत जीं बंदरें आहेत तेथें तयार न होईल, व तेथून निघणारही नाहीं(त) व तेथें येणेंचीही नाहीं (त). ऐसी आरमारांसी महाराज आसरा देणार नाहींत ह्मणोन. कलम.

१. दुसरें कलम सावकार एक मुंबईंत असणार हो, या पुण्यांत असणार हो, त्यासी महाराजांनीं जामिनी द्यावा. त्या सावकार मजकुरांनीं कुंपनी सरकारांत ऐसे बोलावोन समुद्राचे किनाऱ्यांत बंदरासी फिरणेंचे आरमारासी व समुद्रांत फिरणेंचे आरमारासी कांहीं लूट वगैरे उपद्रव जाहल्यास व महाराजांचे मुलखांत आहेत (त्या) बंदरांतील चोरांचीं आरमारें बाहेर आल्यास व आंत गेल्यास, माघून जे काय माल चोरी गेले असत आहे कीं, त्या मालाची किंमत जे मोकरर होईल, त्या किमतीचा पैसा आह्मीं देऊं ह्मणून मुंबई सरकारांत पावता करावा. कलम.

१. तिसरें कलम हरएक आरमाराची किंमत मोकरर ऐसें ठरावणें होईल जे मुंबईंत इनसुरन्स कुंपनीचे सरदार आहेत, त्या सरदारांपैकीं दोनचार सरदारांची मुंबईचे सरकारचे तर्फेकडून मोकरर करितील त्यांनीं किंमत ठरावितील. कलम.

१ चौथें कलम हें कलम मोकरर जाहल्यानंतर आणि सदरहू दुसरें कलमांत लिहिलें तें सावकारांसी मुंबईचें सरकार जेव्हां कबूल करतील, ते समयीं महाराजांचें जें बंदर आहे तें बंदर तमाम खोलून आमदरफ्ती होईल. कलम.

४

एकूण कलमें चारी मरकूम छ १० माहे जूलई सन १८०४ इसवी. मुताबीक छ २ रबिलाखर.

---

## ७ पेशवे आणि हैदर.

### यादी १.

श्री.

तहनामा सरकारचा व नबाब हैदर अलीखान बहादर यांचा होऊन, मागील खंडणीचा फडशा तागाईत विकृति संवत्सरें पर्यंत राजश्री मुरारराव हिंदुराव घोरपडे सेनापति व राजश्री कृष्णराव बळवंत व राजश्री लक्ष्मणराव भिकाजी रास्ते यांच्या विद्यमानें राजश्री आपाजीराम व राजश्री शामराव गोपाळ यांणीं मौजे किंकेरी नजीक नारायणगड येथील मुक्कामीं ठराव रुपये ५०००००० पन्नास लक्षांवर केला. याचा वसूल द्यावयाचा करार ठरला. त्याप्रमाणें तूर्त व मुदतीनें नबाबमशारनिल्हेनीं लिहून दिल्हा. त्याप्रमाणें फडशा होऊन पुढें तहाप्रमाणें बहादरांनीं वर्तावें व सरकारतर्फेनें अमलांत यावें. सुरुसन सलास सब्बैन मया व अलफ. कलमें बितशीलः—

चित्रदुर्गकर संस्थानिक सरकार तर्फेचे, यांस बहादरांनीं बिदनूरचे मोहिमेस बरोबर नेले. त्यांणीं कामकाज केलें सबब संस्थान बिदनूर वगैरे दिल्हें आहे. त्याप्रमाणें पुढेंही बेदिक्कत चालवावें. सरकारांत सर्वप्रकारें रुजू राहोन हमेश सरकारचाकरी करीत आहेत, त्यांस कधींही हरएक विषयीं उपसर्ग होऊं नये. एखादे समयीं मोहिमेमुळें कुमकेचें काम पडल्यास सरकारांत लिहून आज्ञापत्र आणून बोलावावें. येतील. कलम १.

सावनूर सरकारतर्फेचें, त्यास कधींही कोणेविशीं उपसर्ग लागला नाहीं. अलीकडे बहादरांनीं पेशकशीचा तंटा उत्पन्न करून कतबा व बोल घेतली आहे. त्यास सावनूरकर सर्वप्रकारें सरकारांत सरळ वर्तणूक करितात. यांचें अगत्य सरकारांत. याजकरितां बोल सोडावी; कतबा फिरोन द्यावा. त्यांच्या तालुक्यास कधींही हरएकविशीं उपसर्ग देऊं नये. कलम १.

सरकारचे खंडणीचा ठराव विकृति संवत्सर पावेतों पन्नास लक्षांवर जाला. त्यापैकीं पंचवीस लक्ष रुपये नक्त व चार लक्षांचें जबाहीर व दोन लक्षांचे हत्ती एकूण एकतीस लक्ष तूर्त द्यावें. बाकी एकुणीस लक्ष राहिले, ते चौ महिन्यांचा एक हप्ता

याप्रमाणें तिन्ही हप्ते त्यांनीं एका वर्षांत झाडा करून द्यावा. निभावणीस सावकाराचे चार कतबे व चार गुमस्ते व बहादराचे निभावणीचें पत्र यावें. चारी सावकारांपैकीं दोन सावकारांचे गुमस्ते दोन व दोघांच्या नांवचें एकनिष्ठेचें पत्र आलें.

कलम १.

मनसुब्याचीं कामें हमेश पडतात. सरकारांत कोणी एक मनसबा करणें जरूर जाल्यास बहादरांनीं सर्वप्रकारें अनकूल असावें. पुस्तपन्हा करावा. कलम १.

हरपनहल्ली व रायदुर्ग वगैरे संस्थानिक पूर्वींपासोन सरकारांत रुजू राहोन पेशकसी देत आले. त्यांस मदगिरीचे सालीं तह होऊन जीं संस्थानें बहादरांकडे सरकारांतून नेमून दिल्हीं असतील, तीं बहादरांकडे रुजू राहतील. बाकी संस्थानें सरकारांत रुजू राहोन पेशकसी देत आले त्याप्रमाणें देतील. त्या संस्थानिकास बहादरांकडून काडीमात्र उपसर्ग होऊं नये. कोणाकडे कोणा वेळींची बाकी असली तरी त्याविषयींचा तगादा करूं नये. कलम १.

रजाअल्लीखान उदास होऊन सरकार आश्रयास आहे. त्यांजकडे नेलवंगल वगैरे बहादरांनीं पहिलेपासोन दरोबस्त चालविलें तसें तूर्त चालवावें. कांहीं दिवसीं त्याचे चित्तांतील वसवसा दूर करून, समजावून नेऊन बहादरांनीं पदरीं बाळगावें. प्रस्तुत सरकारांत आहेत ते आपले जवळ आहेत असें समजावें. कलम १.

तूर्तच्या भरण्याचा निरख जो बहादरांनीं करून ऐवज दिल्हा त्याप्रमाणें घेतला; परंतु पूर्वीं सरकारांत भरण जाला आहे, तो दप्तरीं रुजू पाहोन त्याप्रमाणें मजुरा द्यावा. बाकी निरखामुळें निघाली तरी बहादरांनीं द्यावी. याप्रमाणें करार जाला असे.

कलम १.

सरकारच्या तालुक्यास कोठें कधींही कोणेविशीं उपसर्ग लागूं नये. याविशीं लगते अंमलदार व किल्लेदार व ठाणेंदार यांस निक्षून ताकीद व्हावी. कलम १.

तुमचीं ठाणीं घेतलीं असतील तीं सोडावीं. बंदरें परस्परें सोडावीं. कलम १.

सरकारचा कर्जदार लहानमोठा असेल त्यास आश्रय देऊं नये व सरकारच्या विरोध्यांशीं स्नेह राखूं नये. सरकारचें काम तें बहादरांनीं आपलें समजोन करण्यांत आणावें. कलम १.

सदरहू दाहा कलमें येणेंप्रमाणें सरकारच्या शिक्कयानिशीं तहनामा करून घेतला. त्याप्रमाणें छ १९. रविलावल, जेष्ठमास नंदननाम संवत्सरें. हस्ताक्षर कृष्णाजी तिरमल शिरस्तेदार तालुकदार दिम्मत नबाब, हैदर अलीखान बहादर.

लिखीत आपाजीराम दिमत नबाब हैदर अल्लीखानबहादर. सदरहूप्रमाणें सरकारच्या शिक्कयानिशीं तहनामा करून आह्मांजवळ दिल्हा असे.

लिखीत शामराव गोपाळ दिमत नबाब हैदर अल्लीखान बहादर सदरहूप्रमाणें सरकारचा शिक्कयानिशीं तहनामा करून आह्मांजवळ दिल्हा असे.

## यादी २.

श्री.

करारनामा सरकार राजश्री माधवराव पंडित प्रधान यांजकडून नवाब हैदर अलीखान. बहादर यांसी सन ११९३ हिजरी, शके १७०१ विकारीनाम संवत्सरें सुरु सन समानीन मया व अलफ.

सरकारचा व इंग्रेजाचा बिघाड, याजकरितां तुह्मीं इंग्रेजाशीं बिघाड करून चेनापटण व आरकाट व त्रिचनापल्ली वगैरे इंग्रेजाचा तालुका मारून, इंग्रेजास जेर करावें. इंग्रेजाची मोहीम भारी आहे. दोन साल तीन साल लागले तरी इंग्रेजाचें पारपत्य शेवटास न्यावें. आणि इंग्रेजाचा व महंमद अल्लीखानाचा नवा मुलूख तुह्मी सोडवाल आणि इंग्रेज व महंमद अल्लीखानाचा सलुख होऊन त्या उभयतांकडून खंडणी घ्याल, त्यापैकीं निमे सरकारास, निमे तुह्मीं घ्यावी. कलम १.

समयानसार प्रसंग पडल्यास सरकारांतून लिहूं, ते समयीं तुह्मीं पांच हजार बार पाठवून द्यावे. त्यास शेर, जेवान अर्ध रुपये प्रमाणें खर्चास देत जाऊं. तुह्मी सरकारांत लिहिल्यास पांच हजार स्वार पाठवून देऊं. त्यास शेर, सवार दररोज एक रुपयाप्रमाणें खर्चास देत जावा. कलम १.

तुंगभद्रे पारचा मुलूख व कोट, किल्ले सरकारचे व पाळेगारचे तुह्मीं घेतले, ते दरोबस्त व तुंगभद्रेअलीकडील मुलूख व मकाणें व पाळेगार आजीपावेतों तुमचे तसरुफांत आहेत. ते तुह्मांकडे करार राहतील, याउपर सरकार तालुक्यास तुह्मीं उपसर्ग न द्यावा. सरकारांतून तुमचे तालुक्यास उपसर्ग होणार नाहीं. कलम १.

तीर्थस्वरूप रघुनाथराव दादा व दादा साहेबांचे संमंधी, बाजीराव बरवे, शिवाय आणीक संमंधी व स्वराज्यांतील लहान मोठे यांसीं तुह्मीं राजकारणें ठेऊं नये व सिलसिला राखों नये. पैका देऊं नये. राजकारण व सिलसिला असल्यास तोडावा. आसरा देऊं नये. कलम १.

सरकारचा पेशकसीचा ऐवज तुह्मांकडून येणें, त्याचा ठराव सन ११९४ हिजरी शके १७०२ शार्वरी संवत्सर अखेरपर्यंत पंधरा लक्ष रुपये करार केले असेत. सदरहू पंधरा लक्ष रुपये पुणीयांत नगद पावते करून पावल्याचा जाब घ्यावा. कलम १.

चंदावरचें संस्थान पुरातनपासोन भोंसले यांचें, तेथें इंग्रेजाचा उपद्रव जाहला आहे. तो परिहार करून भोंसलेचें राज्य निर्वेध करावें. याविशीं उभयपक्षीं अगत्यवाद असावा. कलम १.

इंग्रेजाकडील व महंमद अल्लीखानाकडील मुलूख तुह्मी सोडवाल, त्यांत सरकारच्या वांटणीचा निमे मुलूख आह्मांकडील मातबर आले आहेत, त्यांचे हवाले करावे. कलम १.

सरकारांतून सरदार व फौजा इंग्रेजावर सुरत प्रांतीं रवाना होतील. तुह्मीं चेनापट्टण वगैरेकडे इंग्रेजावर चालोन जावें. नवाब निजाम अल्लीखान बहादर शिकाकोल राजबंदराकडे जाऊन शह देतील. कलम १.

इंग्रेजाकडील सलुखाचा पैगाम इकडे आल्यास, तुमचे इतल्याशिवाय व मसलतीशिवाय सलूख करणार नाहीं. अगर प्रसंगानुसार सलूख करणें जाहल्यास सरकारचे व तुमचे मसलतीनें सलूख फलाणें तऱ्हेचा करावा ऐसें ठरावून त्याप्रमाणें केला जाईल. कलम १.

राव रास्ते यांकडून मातबर सरदार हजार स्वारानिशीं तुह्मांपाशीं राहतील. कलम १.

पेस्तर सन ११९५ हिजरी प्लवसंवत्सरापासोन दरसाल बारा लक्ष रुपये करार केले असेत. तर सदरहू बारा लक्ष रुपये तुह्मीं दरसाल सरकारांत देत जावे. याची सरकारी निशा नगद रुपयेची द्यावी आणि पुणीयांत भरणा करून पावलीयाचा जाब घेत जावा. कलम १.

एकूण अकरा कलमें करार केलीं असे. या जबाबासमवेत महादजीराव शिंदे व राव आनंदराव रास्ते यांसही दरम्यान दिल्हे आहे आणि सदरहू लिहिलेप्रमाणें करारास श्री कुलदेवता व महादेवाची शपथपूर्वक बेलभंडार दिल्हें आहे. यास हरगीज तफावत इकडून होणार नाहीं.

तहरीर तारीख.

---

## ८ पेशवे आणि जंजिरेकर.

### यादी १.

श्री.

तहनामा सरकार राजश्री पंडित प्रधान. सुरु सन सब्बा आर्बैन मया व अलफ. अमारत मर्तबत नबाब अबदुल मजीदखान यांचे तालुकीयाचीं कलमें करार केलीं बितपशीलः—

| सरकार बंकापूर महाल. | किता तालुके |
|---|---|
| १ परगणे कुंदगोल. | १ परगणे बागडकोट बिलगी. |
| १ परगणे कारडगी कमतरोण. | १ परगणे पातशहापूर. |
| १ परगणे मिश्रीकोट. | १ परगणे गोकाक. |
| १ संमत कलघटगी. | १ परगणे अजमनगर बोरगांव शहापूर. |
| १ संमत बर्मीगटी. | १ परगणे संपगाव कित्तूर. |
| १ संमत तडस. | १ तालुके बेटेगिरी. |
| १ संमत निडसिंगी. | १ कसबे तडकोड तेगूर. |
| १ संमत शिंगाव. | १ कसबे नेरंदर. |
| १ परगणे हानगल. | १ कसबे अमीनभावी. |

१ परगणे बंकापूर वगैरे.
१ परगणे तिनवल्ली.
१ परगणे अङ्कूर.
१ संमत करुरे बुद्रुक.
१ संमत करुरे खुर्द.
१ संमत तडकांडे.
१ संमत कोतीनेक.
१ परगणे राणेबेदनूर.
१ कुदूळकेर वगैरे.
१ संमत मासूर.
१ देव कसब हावेरी.
१ देव वावीस वावी.
१ देहांत किल्ले ऐरणी.
२२
एकूण बावीस महाल सरकार एक.

१ हिसार धारवाड.
१ हिसार बेलबल.
१ कसब एकुंडी.
१ परगणे लक्ष्मेश्वर.
१ परगणे नवलगुंद.
१ परगणे गदग.
१ परगणे जालेहाल बदामी.
१ परगणे गुंतल वगैरे.
१ परगणे रटहिळी.
१ परगणे मुळगुंद.
१ परगणे अनीगोंदी.
१ कसबे जाडे हेबळी.
१ परगणे रायेर हुबळी.
१ कित्ता दवेरे हुबळी कलमें.
१ मुगुंद.
१ हिसारा हरिहार.
१ सुळबेहरी.
१ परगणे केरूर सलाबत संमनी.
१ परगणे अनवल.
१ परगणे घनदुर्ग.
१ परगणे लोकापूर.
१ परगणे यादवड.
१ परगणे बनूर.
१ परगणे कडकोड.
१ परगणे मुरगोड.
१ परगणे संतीगर.
१ परगणे कानूर वगैरे.
३५
एकूण पस्तीस.

एकूण सरकार वंकापूर व तोरगल व अजमनगर तिन्ही सरकार अमारतपन्हाची तालुका असेल त्यास महाराजांकडील फौजाचे आजार लागणार नाहीं.

अमारत पन्हाचे तालुकीयावर कसाला पडोन मुलक पायमाल जाहले आहे, सबब अमारतपन्हाची एकलासावरमद नजर देऊन हरएक विषयीं साहिता केली जाईल. कमल १.

बाबुजी नाईक कर्नाटक प्रांतीं आले तर अमारतपन्हाची तालुकीयांतून यावे. मुलकास अजार न द्यावे. जरी मुलकास तसदी देतील तर यास नतीजा देऊन आपाजी नाईक मशारनिल्हे मुलकास आजार देतील. आणि इजानिबाचे फौज इकडे येऊन त्याचे बंदोबस्त होय तर तह सहज राहिला.

कलम १.

अमारतपन्हाचा दुस्मन तो इजानिबाचे दुसमन व अमारतपन्हाचा दोस्त तो इजानिबाचे दोस्त. याच वजेने इजानिबाची दोस्त व दुस्न असेल तो अमारतपन्हाचे दिलांत आणवून अमलांत आणावें. कलम १.

सालमजकुरापासून साल दरसालाचे पाऊण लाख रुपये अमारतपन्हानीं आपले तालुकीयाचे द्यावयाचे कुबूल केले, ते जाहीरींत आणूं नये व अमारतपन्हानीं जहागिरींत न आणावे, व सदरहू रुपये आह्मी संभाजी महाराज यांस देणार नाहीं. कदाचित अलम अफवा ऐकून संभाजी महाराज सातारीयास येऊन सदरहू रुपये आपलेकडे करून घेतील, तर तुमचा तहनामा तुह्मांस फिरून दिल्हा जाईल. व इजानिबाचा तहनामा अमारतपन्हानीं द्यावें. कलम १.

इजानिबांकडील फौज सोंदें व बिदनूर प्रांत तुंगभद्रा पैलीकडे जातां येतां अमारतपन्हाचे तालुकेयास उपद्रव देणार नाहीं. ताकिद करून मुलकाची बचाव करून जात येत तसें केलें जाईल. कलम १.

महाराजांकडील फौजा दक्षणेकडेस आल्यास अमारतपन्हाच्या तालुक्यास हरज देणार नाहीं. जर तसदी देऊन पायमाली केली तर तहत पायमाली वजा केली जाईल. तफावत होणार नाहीं. कलम १.

जाजुबैनची एकलास बुजुर्गांपासून चालत आहे तो दिन बदीन जादा होय तेंच केलें जाईल. कमल १.

संभाजी महाराज यांजकडील अमल करार बमोजीब पावल्यास त्यांजकडील अजार लागणार नाहीं. दिन बदीन एकलासाची तरकी होय तसें केलें जाईल. कलम १.

आपाजी नाईक वगैरेंचा पक्षपात इजानिब करणार नाहींत. कलम १.

एकूण कलमें नऊ करार केलीं असेत. तर्फेन लागून अमलांत आणावीं. तफावत न करावी. रवाना छ ७ रबिलाखर.

---

## यादी २.

तहनामा अबदुल हकीमखान सावनूरकर यांजपासून मुल्ख सरकारांत घेतला व त्याजकडे ठेविला. त्याचा दुतर्फा तह होऊन दारमदार जुकती कलमें.

सरकारतर्फेचीं कलमें बितपशीलः—

महाल व कसबे व गांव, ठाणीं सरकारांत दिल्हीं त्याचा तपशीलः—

| | होन नाणें | रुपये. |
|---|---|---|
| सरकार बंकापूर. | | |
| परगणे कुंदगोळ | २२००० | ७७००० |
| परगणे राय हुबळी | ६५०० | २२७५० |
| पेठ मजीदपूर | ११८३ | ४१४०॥ |
| परगणे मिश्रीकोट | १६००० | ५६००० |
| संमत तडस | ६००० | २१००० |
| आडवी सोमापूर | ३२० | ११२० |
| शेरवाड सरदेशगत, परगणे हुबळी | ९६१॥≈ | ३३६६ |
| कलघटगी | ६००० | २१००० |
| वेमीकटे देखील नेलेहरवी | १५०० | ५२५० |
| परगणे गदक | ० | ५२००० |
| सरदेशगत धारवाड | ३०० | १०५० |
| परगणे लखमेश्वर | ० | ७०००० |
| सरकार तोरगल. | | |
| परगणे मुळगुंद | ८८०० | ३४८०० |

| | होन. | एकूण रुपये. |
|---|---|---|
| कसबे शाहुणी | ० | ४००० |
| हेबसूर वगैरे | ६००० | २१००० |
| देहे येरेगोणे | २८०० | ९८०० |
| | ६८००० | ३४८०० |

| | | |
|---|---|---|
| कसबे वेहाटी | ८००० | २८००० |
| कसबे देवर हुबळी | ८०० | २८०० |
| परगणे बागलकोट देखील वहुगी | ० | १५४००० |
| उपन वेटगीर | ० | २२५०० |
| मतीकटे देखील कटकिरे, | ० | ९४०० |
| परगणे केरूर. | | |
| कसबे अमीनबावी | ० | १५००० |
| तलहावी वगैरे | ० | १०००० |

| | | |
|---|---|---|
| तडकोड तपे | ० | १५००० |
| तपे नरेंद्र | ० | ३००० |
| तपे शिराळें | ० | १२५० |
| परगणे नवलगुंद | ० | २५५५० |
| सतेगिरे व मुरगोड | ० | ४००० |
| कोणूर | ० | ३००० |
| असोडी देखील करीकटे | ० | ४००० |
| येकोडी | ० | ३००० |
| किलेहुली | ० | ३००० |
| तपे तेगूर | ० | १२०० |
| कोळवाड | २५०० | ८७५० |
| सरकार अजमनगर | | |
| परगणे अजमनगर | ० | ३३००० |
| परगणे पातशाहापूर | ० | २५००० |
| परगणे गोकाक | ० | ४०००० |
| परगणे संपगाव | ० | ४३००० |
| | ८०८६४॥= | ८२३९२६॥ |

किता कलमें सरकारचीं.

संस्थान मजकुराकडे सालमजकुरची खंडणी करार ११००००० रुपये.

पैकीं तूर्त वसूल रुपये.

१००००० हवाला मुरारजी घोरपडे
५०००० हवाला मुजफरखान मार्फत महादसेट
१००००० नक्त वसूल
४०००० जवाहीर बद्दल
१५००० हत्ती घेतले ३ एकूण
५००० कापड

३१००००

बाकी ७९०००० रुपये.

किले रायर हुबळी वगैरे सरकारांत घेतली बितपशील:—

२५००० राय हुबळी.
६२१२॥= किले केरूर देखील परगणा.
१४००० कसबे बेळगांव देखील किला.

४५२१२॥=

एकूण पंचेचाळीस हजार, दोनशें, साडेबारा चव्वल. किले तीन देखील तालुका सरकारांत घेतला. कलम १.

सात लक्ष, नवद हजार, रुपये येणें.

| यास तपसील रुपये. | |
|---|---|
| ४९०००० | कित्ता ऐवज पंधरा रोजांत द्यावा. त्यास वेळा घेतल्या त्याची याद अलाहिदा असे. |
| ३००००० | बंकापूर किल्ला राजश्री मल्हारजी होळकर यांचे मार्फतीनें सरकारांत घेतला. गहाण ठेविला असे. सदरहू ऐवज सरकारांत सहा महिन्यांत द्यावा आणि किल्ला सोडून घ्यावा. मुदतीस ऐवज न दिल्हा, तरी किल्ला सरकारांत घ्यावा. याप्रमाणें करार केला असे. |
| ७९०००० | |

येणेंप्रमाणें सात लक्ष, नवद हजार, रुपये सदरहूप्रमाणें निर्गम करून द्यावा.

कलम १.

सदरहूप्रमाणें कौल अलाहिदा दिल्हा असे.

तीन कलमें सरकारचीं.

अवदुल हकीमखान यांजकडे कलमें.

महाल वांटणी व कसबे, गांव वितपशील:—

| | होन नाणें | रुपये |
|---|---|---|
| सरकार बंकापूरपैकीं | | |
| परगणे कारटगी कमतराण | ७००९० | २४५००० |
| संमत निडसंगी, बाम्हणहळ्ळी | ४५०० | १५७५० |

| | | |
|---|---|---|
| परगणे हणगल | १७००० | ५९५०० |
| बिसार मासूर | ६००० | २१००० |
| संमत केरूर खुर्द | ४५०० | १५७५० |
| केरूर बुद्रुक | ४००० | १४००० |
| संमत तिळवल्ली | ६००० | २१००० |
| राणीबेन्नूर | १६००० | ५६००० |
| कागनली | १८००० | ६३००० |
| नेरगल व ठाणें आड्ड | १७९५५॥ | ६२८४४। |
| परगणे गुतल | १२२५८॥ | ४२९०४॥। |
| परगणे शिगाव | ६००० | २१००० |
| पेठ हावेरी | ६००० | २१००० |
| कसबे बंकापूर | ३४०० | ११९०० |
| देहात कुपेनूर, परगणे रटेहळ्ळी | ३५०० | १२२५० |
| कोड | ६००० | २१००० |
| हवस बावी | ९७१ | ३३९८॥ |
| ऐरणी | ३२०० | ११२०० |
| हलगिरे | २२१६॥= | ७७५८ |
| मौजे नसीहट्टी, परगणे रटेहळ्ळी | ४०३ | १४१०॥ |
| मौजे गंगाळूर | ३८२ | १३३७ |
| गुड्डुर बुद्रुक, संमत निरसिगी | १२६८॥= | ४४४० |
| गोदनकोप परगणे रायरहुबळी | २५० | ८७५ |
| सरकार तोरगल. | | |
| पगरणे आणिगीरे | ० | ४५००० |
| किल्ले परसगड देखील गांव | ० | ६५०० |
| परगणे मोरमपैकीं गांव | १९०० | ६६५० |

| | होनना. | ए. रु. |
|---|---|---|
| शिरकोळ | ७०० | २४५० |
| सूल | १२०० | ४२०० |
| | १९०० | ६६५० |

| | | |
|---|---|---|
| कसबे इंगळहाळ्ळी | २००० | ७००० |
| मौजे हाचनहाळ | १५०० | ५२५० |
| कल्लर बेरीज होन २५० एकूण ८७५ पैकीं | ० | २७५ |

| | | |
|---|---|---|
| नागनूर | २५० | ८७५ |
| दोडवाड, परगणे संपगांव सरकार अजमनगर | ० | १२०० |
| सोंधें | ० | २३००० |
| | २१५४५५॥ | ८३००६८ |

येणेंप्रमाणें महाल व ठाणीं व गांव व कसबे यांची बेरीज आठ लक्ष, तीस हजार, अड्डसष्ट रुपये कलम.

कित्ता कलमें निसबत अबदुल हकीमखान.

नवाब सलाबतजंग यांजकडील उपसर्ग तुह्मांस एकंदर लागों देणार नाहीं. तुह्मीं पूर्ववतप्रमाणें चालवावें. जाजती उपसर्ग करणार नाहींत. कलम १.

तुह्मांकडे वांटणीस मुलूख गेला आहे त्यास सरकारतर्फेनें उपसर्ग लागणार नाहीं व दरसाल खंडणीचा तगादा लागणार नाहीं सदरहू. कलम १.

कित्ता कलमें.

१९००० परगणे रटेहळ्ळी जागीरदाराकडे बेरीज तनखा रुपये.

११००० जागीर किल्ले वंकापूर पातशाही किल्ला याजकडे जहागीर तनखा रुपये.

३००००

दोन कलमें तीस हजार रुपायांचीं करार आहेत. कलम २.

जागीरदार कदीम आहेत त्यांजकडे चालवावें. त्याचा ऐवज— रुपये.

२०८०० अजीजमियां.

५००० अहंमदखान वल्लद अल्ली मिया.

२५८००

पंचवीस हजार आठशें. यास गांव वितपशील:—

१४००० मौजे मोरब.

३५०० शिरूर.

३५०० कोउलवाड.

४२०० गुमगोल.

६०० कळूर होन २५० रुपये ८७५ पैकीं बेरीज रुपये.

२५८००

सदरहू ऐवजाचे गांव जहागीरदाराकडे चालवावे. कलम १.

सहा कलमें अबदुल हकीमखान यांजकडे— कलमें.

येणेंप्रमाणें कलमें नऊ. पैकीं सरकारचीं कलमें तीन व अबदुल हकीमखान यांजकडील कलमें सहा. ऐसीं नव कलमें तहाचीं ठरलीं आहेत. याप्रमाणें चालेल. येणेंप्रमाणें तहनामा लिहून दिल्हा असे. छ ६ साबान सुरुसन सीत खमसैन मया व अलफ.

सदरहूप्रमाणें दप्तरीं बार असे.

## ९ पेशवे आणि नबाब कडपेकर.

### यादी १.

तहनामा सरकार राजश्री–पंतप्रधान सुरुसन सब्बा खमसैन मया व अलफ. सुभा कडपे बालाघाट व पायनघाट येथील तह विद्यमान त्रिमलराव व सिलीमखान दिंमत नवाब अबदुल नबीखान कराराचीं कलमें वितपशील रुपये.

तपशील वांटणी.

सरकारची बेरीज ११२४६४४॥ निमे पैकी वजा नवाब मशारनिल्हे यास सरकारचे वाटणीपैकीं द्यावे. १५०००० रुपये.

बाकी ९७४६४४॥रुपये

राजश्री बळवंतराव गणपत १५००० यासी नबाबानीं द्यावयाचा करार केला ती बेरीज. ९८९६४४॥

नबाब अबदुल नबीखान बेरीज ११२४६४४॥ निमे

जाजती सरकारचे १५००००
वाटणीपैकीं रुपये १२७४६४४॥

पैकीं वजा बळवंतराव गणपत यांसी द्यावयाचे ऐवजी बेरीज १५००० बाकी १२५९६४४॥

यासी वांटण्या महालवार.

सरकार राजश्री–पंतप्रधान बेरीज

२८६१०० सरकार गुरुमकोंडा

२०००० परगणे मदनपल्ली.
२४००० परगणे हवेली.
२०००० परगणे कोटाल पडेपल्ली
२०००० कंदकूर व तिपा समुद्र व रंगा समुद्र
६०००० परगणे राचोटी
६००० कोडकमर्के वगैरे
२६००० परगणे पिलेर वगैरे
३२००० पुंगनूर
३३००० गुमनापाले.
२२००० घटम
५००० पपेपालम वगैरे
६००० चितपर्ती
६५०० नड विचर्के वगैरे
१००० शिवापूर वगैरे

| | | |
|---|---|---|
| | ४००० | मुदीवीड वगैरे |
| | ६०० | बराकपूर |
| | २८६१०० | |
| ३३९००० | | सरकार गुंती. |
| | ४०००० | सिगन मला |
| | ६०००० | ताडपत्री |
| | २०००० | होनूर |
| | १५००० | इडपनकल |
| | ८०००० | याडकी |
| | २०००० | अनंतपूर |
| | १०००० | पायापली वगैरे |
| | १०००० | करुर |
| | ४८००० | पामुपेनवाडी |
| | १०००० | येरतीम राजचरू |
| | ८००० | अदम पालतूर |
| | ६००० | पेरुली वगैरे |
| | ६००० | उदरीप कोडा |
| | ६००० | नडमीन दोडी |
| | ३३९००० | |
| ३३९९८९ | | सरकार गंजीकोटा |
| | ४८००० | पुलविदल |
| | ३०००० | पारणपली |
| | ४०००० | कुमार कालवा वगैरे |
| | ३६००० | नंदीमंडळ वगैरे |
| | ८००० | कोकटीपाले. |
| | ८०००० | एकनूर |
| | ३५४८९ | तुव्रल |
| | २५०० | सोमपल्ली |
| | ६०००० | ताडकरी |
| | ३३९९८९ | |

१५००० बळवंतराव यांसी कबुलाती जहागीर रुपये

| | |
|---|---|
| १२००० | तवकूरवालकोटे |
| २००० | बुरकायलकोटे |
| १००० | बुदीविड |
| १५००० | |

९८००८९

अबदुल नबीखान वांटणी बेरीज

६६९००० सरकार सिधवट

| | |
|---|---|
| १००००० | हवेली |
| १७५००० | दुदूर वगैरे |
| ५३००० | कमलापूर |
| ३८००० | पेडकालवा वगैरे |
| १५०००० | चेन्नूर वगैरे |
| ५५००० | बदवल वगैरे |
| ४८००० | पोरमामला वगैरे |
| १०००० | नरसापूर वगैरे |
| ४०००० | मटलेवर |
| ६६९००० | |

३४२२०० सरकार गंजीकोटा

| | |
|---|---|
| १२०००० | जलाल कडु दरोबस्त |
| ७४००० | हवेली दुडीयक पाटथर वगैरे. |
| १८००० | कुवाकूल |
| १२००० | चितकुवा वगैरे |
| १२००० | मल्याल वगैरे |
| ४४००० | मेसूम वगैरे |
| २०००० | आमुक वगैरे |
| ८००० | उज्यालवाडा |
| ८००० | संगापट्टण |
| १२००० | राचेक कारपाड वगैरे |
| १२०० | उदल बेडनूर |
| १३००० | अनिल गुंडाल |
| ३४२२०० | |

२००००० सर कारखाना दरोबस्त
४८००० हसनापूर व दिनेपाड सरकार गुरुमकोंडा
१०००० तिमानायनपट सरकार गुंती.

१२६९२००

तपशील:—

१२५९६४४॥ ऐन बद्दल वांटणी
९५५५॥ श्रीमंतांच्या वांटणीचा ऐवज आला तो दुसरे जागा ऐवज द्यावयाचा करार.

१२६९२००

याखेरीज परस्परें सुरळीत वर्तावयाचीं कलमें:—

आमचा तुमचा सलुख जाल्याउपरांतिक मुलखाची तफरीक करून याद ठराविली, त्या यादींत परतून कांहीं जाबसाल न आणावा. कलम १.

तुमचा आमचा तालुका वाटों लागला, त्यांत गांवगन्ना यांत जमीन व तलाव व नाला व कुव्याचा कजीया असतो. तो सुदामत मामूल बाब असल्यासच खेडेवाल्यानें मिळोन जे तहकिक होईल त्याबमोजिब तर्फेनें अमलांत आणावे. कलम १.

तुमचे तालुक्याचे जमीदार याजवर सरकारचा वाजवी पैका आहे तो वसूल करूं. ताकीद करून देवणें. कलम १.

रहदारीचें लोकांस मुजाहीम होऊं नये. कलम १.

हमेशा कडप्यास येणारास व जारी देव पाऱ्यास मुजाहीम न व्हावें. कलम १.

सरकारतर्फेच्या जमीदारास वगैरे हरकोणास आह्मांकडील कोणे बाबें तगादा लावावयासी दरकार नाहीं. कलम १.

तुह्मांकडील रयत व कर्णम व वाणी. वकाल व अंमलदार व सेकदार व जमीदार येऊन तुह्मांकडील आश्रा करतील तर त्यांस तुह्मांनजीक बिला उजुर धरून दिल्हे जातील. कलम १.

तुह्मांकडील जमीदार वगैरे यांस तुह्मीं मनास मानेल तसें सजा पोहचवणें, यांत गैर रदबदली करणें आह्मांस संमंध नाहीं. आमचे तालुक्याचे पाळेगारास आह्मीं खातरखां करूं. येविशीं तुह्मांस दरकार नाहीं. कलम १.

परस्परें मुलखांत फिसाद होऊं देऊं नये. कलम १.

पुढें कोणी सरकारचा नवा सरदार इकडे मुकरार होईल. त्याणीं आह्मांस सर्व वतन सामील होऊन इतफाके राहणें ह्मणोन. तरी जो सरकारचा सरदार राहील त्याणीं तुह्मीं इतफाके करून रहावें. कलम १.

सदरहू दाहा कलमें करार केलीं असेत. परस्परें चालावें. सदरहू तहांत उभयतांनीं असावें. जाणिजे. छ ३ माहे जमादिलाखर.

---

## यादी २.

यादी तहनामा नवाब अबदुल नबीखान पठाण कडपेकर याचा मुलूख महालानिहाय प्रांत कडपें याचा तह होऊन वांटणी जाहली. सुरुसन समान खमसैन मया व अलफ छ १ जमादिलाखर.

वांटणी सरकार राजश्री पंतप्रधान यांची बेरीज — रुपये.

| | |
|---|---|
| ९७४६४४॥ | निमेची बेरीज ११२४६४४॥ पैकीं वजा नवाब अबदुल मोचे मिया यासी जहागीर १५०००० बाकी सरकारची बेरीज. |
| १५००० | राजश्री बळवंतराव गणपत यांसी जहागीर दीड लाख पैकीं दिल्हे ते. |
| ९८९६४४॥ | |

यासी तपशील महालानिहाय

सरकार गुरुमकोंडा

| | कामील रुपये | पैकीं हलीं वसूल |
|---|---|---|
| पुंगनूर | ९७५०० | ३२००० |
| गुमनाडपालें | ९७५०० | ३३००० |
| घटकोतपालें | ५८५०० | २२००० |
| पेदपालें | ३२५०० | ५००० |
| बतलापूर | १९५० | ६०० |
| कुगपाल पेडपली | ३३४७५ | २०००० |
| हवेली गुरुमकोंडा वगैरे | १३५९०४।≡ | ५६५०० |

हाल वसूलाचा तपशील:—

| | |
|---|---|
| २४००० | हवेली |
| ४००० | मुदवीड |
| ६००० | चितपरती |
| ६५०० | नडीमचर्क |

१००० शिवपूर
१२००० तटेकूर वुलकोटा
२००० बुरकायल कोटा
१००० बुडदविड.
५६५००

तीपसमुद्र व रंगसमुद्र

| | | |
|---|---|---|
| कपतूर वगैरे | २८९२५ | २०००० |
| परगणे गुंडलूर राचोटी | १२०३२७।= | ६०००० |
| परगणे मदनहल्ली देखील | | |
| कोंडामरी हाल वसुलाचा तपशील | ३९००० | २६००० |

२०००० मदनहल्ली
६००० कोंडामरी
२६०००

| | | |
|---|---|---|
| परगणे पिलेर गोटकल | २७०४२॥।= | २६००० |
| | ६७२६२४॥≡ | ३०११०० |

सरकार गुंती

| | कामील रुपये | हाल वसूल |
|---|---|---|
| ताडमरीचीयेड सिंगनमला वगैरे | १३८७६१।= | १०६००० |

४०००० सिंगनमला
६०००० ताडमरी
६००० तिडीमदोडी
१०६०००

| | | |
|---|---|---|
| उरवकोंडा वगैरे | १२८८२६।- | ४३००० |

८००० अमदाल पालतूर
२०००० होतूर
१५००० इडपनकळ
४३०००

| | | |
|---|---|---|
| हवेली गुंती परगणे पेरवली | २४८१५ | ६००० |
| पपापली | २६००० | १०००० |
| याडकी | ११९२४४८= | ८०००० |
| अनंतपूर | ८७२६२॥ | २०००० |
| करूनकोनकोडला | २४४१५ | १०००० |
| पामडी व पेनमहडी वगैरे | ६'५८१४।।।≡ | ४८००० |
| येरतीम रायचरु | ३३७५५।।।≡ | १०००० |
| उदरपकोंडा | २६४८७॥ | ६००० |
| | ६७'५३८२॥= | ३३९००० |

सरकार गंडीकोटापैकीं

| | कामील रुपये | हल्लीं वसूल |
|---|---|---|
| ताडपत्री | ८८२१३।।। | ६०००० |
| वेलनूर | ७७००५।।।= | ८०००० |
| पारणपल्ली | ३७७१६।।।= | ३०००० |
| तालुके डिबल दरोबस्त हाल वसूल वगैरे | १५३४७० | ३५४८९ |

| | |
|---|---|
| १२००० | कोडकमरला जागीर गालीपखान तसरफ गुमनाड |
| १००० | नलमडा जहागीर मोहतरमखान |
| १९००० | पामतुरती वगैरे जहागीर कदरीवाले तसरफ ताडमरीकर |
| ३४८९ | फौजदारी तुबल |
| ३५४८९ | |

कोकटपाले व सोमपली

दाखल कामील हवेली मजकूर पैकीं

| | | |
|---|---|---|
| हाल हासील | ४८००० | १०५०० |

| | |
|---|---|
| ८००० | कोकटपाले |
| २५०० | सोमपल्ली |
| १०५०० | |

| | | |
|---|---|---|
| परगणे कुमार कालवा | ४७६७१॥\- | ४०००० |
| परगणे नदीमंगल व वेमदली | ६५९३७॥= | ३६००० |
| पालगिरी व मेळ देखील | | |
| परगणे पुलवेदला | ५२५८० | ४८००० |
| | ५७०५९५॥≡ | ३३९९८९ |

तेरीज सरकार हिसा वेरीज

| | कामील रुपये | यासी हाल वसूल |
|---|---|---|
| सरकार गुरुमकोंडा | ६७२६२४॥≡ | ३०११०० |
| सरकार गुंती | ६७५३८२॥= | ३३९००० |
| सरकार गडीकोटापैकीं | ५७०५९५॥≡ | ३३९९८९ |
| | १९१८६०३। | ९८००८९ |

वांटणी नवाब अवदल नबीखान यांसी निमे वगैरे रुपये

११२४६४४॥ निमे हाल वसूलपैकीं

१३५००० जहागीर जाजती दिल्ही ते रुपये १५००००
वजा जहागीर राजश्री बळवंतराव यांसी रुपये
बाकी १५०००

१२५९६४४॥

यासी तपशील महालानिहाय

सरकार सिधवट

| | कामील रुपये | हाल वसूल |
|---|---|---|
| हवेली सिधवट | १५७१६२ | १००००० |
| परगणे धत्तूर | २२५१९६ | १७५००० |
| परगणे कमलापूर वगैरे | १६४६०४ | ९१००० |
| ५३००० कमलापूर | | |
| ३८००० पेडकालवा | | |
| ९१००० | | |
| परगणे चेंन्नूर | १३६००९ | १५०००० |
| परगणे बादवेल | ६७०४७॥। | ५५००० |
| परगणे फेरमामीला | ६८३५३ | ५८००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४८००० | फेरमामीला | | |
| १०००० | कळसपाड नरसापूर | | |
| ५८००० | | | |

| | | |
|---|---|---|
| तालुके मटलेवार पोतमनाड पुलगनाड वगैरे दोन परगणे घेऊन सरकारास पेशकसी देतात | १५५८८४॥। | ४०००० |
| | ९७४२५६॥ | ६६९००० |

सरकार गडीकोटा

| | कामील रुपये | हल्लीं वसूल |
|---|---|---|
| हवेली व जमलमडगू मुडी एक पाळूर वगैरे कामील हल्ली वसूल— रुपये | २९३३९७ | २०६००० |

| | |
|---|---|
| १२०००० | जमालमंडगू |
| ७४००० | हवेली देखील मुडी एक पाळूर |
| १२००० | चिंतकुंठा |
| २०६००० | |

| | | |
|---|---|---|
| परगणे कुंटाकूळ | ६५१६५॥। | १८००० |
| परगणे मल्याळ | ३२४३६।= | १२००० |
| अडक | ३३३४०॥≡ | २०००० |
| नोसूम पाळेगार | १५०९१३॥। | ४४००० |
| पाळेगार चीलर | ३३३६४॥ | ४२२०० |

| | |
|---|---|
| १२००० | राचाककोरपाड |
| ८००० | उयालवाड |
| ८००० | संगापट्टण |
| १२०० | उपलूर |
| १३००० | अनमलगुंटा |
| ४२२०० | |

| | | |
|---|---|---|
| | ६०८६१८८- | ३४९२०० |

तिमानायेनपेट कामील दाखला अडक यासी हाल वसूल १०००० रुपये.

गुरुमकोंडा सरकारपैकीं हसमपूर दिनपाड यासी.

कामील ६६२१८।।। रुपये. हाल वसूल ४८००० रुपये.

सरकार खमद देखील जहागीरदार व पाळेगार दरोबस्त

कामील बेरीज १०५७५८८ रुपये हाल वसूल २००००० रुपये.

तेरीज नवाबाची वाटणी बेरीज

| | कामील रुपये | हाल वसूल |
|---|---|---|
| सरकार सिधवट | ९७४२५६।। | ६६९००० |
| सरकार गंडीकोटा | ६०८६१८८‍‍॑ | ३४२२०० |
| तिमा नायेडपेट | ० | १०००० |
| गुरुमकोंडा | ६६२१८।।। | ४८००० |
| सरकार खमद | १०५७५८८ | २००००० |
| | २७०६६८१।॑ | १२६९२०० |

सदरहू वांटणीखेरीज प्रांत मजकूर पैकीं राजश्री मुरारराव घोरपडे यांणीं सरकार गुंतीपैकीं पेशजी घेतला मुलूख एकूण कामील रुपये.

१२००१६।॑ हवेली १५४८३१।॑ पैकीं वजा पेरवली २४८१५ बाकी

३६९६७।। चेनमपली

५७४६३।॑ तमनायेनचरू

२२४४४७८=

सदरहू मुलूख वांटणीशिवाय घोरपडे यांजकडे आहे.

याजखेरीज सरकार जगदेवगड शिवाय मुलूख निमेनिमे वांटणी होणें असे. हलीं वसूल अजमास २००००० रुपये

सदरहूची वांटणी चवकशीनें होणें असे.

सदरहूप्रमाणें याद लिहून हरि बल्लाळ यांजकडे पाठविली. श्रावण शुद्ध १४, सब्बा समानीन.

---

श्री

## मिरअली रजाखानाचे सरंजामाची यादी.

### यादी.

यादी प्रांत कडपें पैकीं महाल सरंजाम मीरअली रजाखानबहादर यांजकडे सुरुसन सबा सीतैन मया व अलफ रुपये.

१८१५०० स्वार रास ५५४० साडे पांचशें.

५०० स्वार रास.

५० दुवस्पा स्वार दरसदे १० प्रमाणें.

५५०

यांसी दर स्वारीं दरमहा रुपये ३० तीस प्रमाणें आकार माही बेरीज.

३३०००० गारदी असामी दोन हजार २००० दरमाहे दर असामीस रुपये १५ प्रमाणें दरमाहे रुपये ३०००० तीस हजार प्रमाणें आकार माही.

५०००० खासा व भाई बीरादर सालीना.

३८००० खासा मशारनिल्हे.

१२०० भाई बीरादर.

५००००

५००० नगारखाना बारमाही.

२००००० शिबंदी अंमली महालची.

५०००० किल्ला गुरुमकोंडा.

१५०००० अंमली महाल बितपशील.

२८००० गुडलुर व राचोटी.

९२५० पीलेर गोट गोल.

७६०० मदनहल्ली व कोंडामरी.

१३५०० पारणहल्ली.

१४००० पुलवींदन.

१३५०० कुजकर कालम

१५००० दिनपाड हनापुर.

१३००० तीपा समुद्र व रंगासमुद्र व कंपकुर.

१९६५० कुटाकुल व कोडकमरक जागीर गालीदखान.

१३००० कोडकमरक.

६६५० कुटाकुल.

१९६५०

१४००० नदीमंगल.

२५०० काट्याल पेडपली

१५००००

२०००००

७६६५००

यासी ऐवज सरंजाम महाल रुपये.

७८३५०० प्रांत कडपें महाल.

५१०००० अमली महाल.

१०५००० हवेली गुरूमकोंडा.

८०००० गुडलूर व राचोटी.

१७५०० दिलेर व गोटगल.

२५५०० परगणा मदनहल्ली.

१२००० परगणा काट्यालपेडपली.

३०००० परगणा पारणपली.

४५००० परगणा पुलविंदन.

३५००० परगणा कुंभार कालवा व घालवडे वगैरे.

५०००० परगणा हसनापूर दिनेपाड.

३०००० तिपासमुद्र व रंगासमुद्र कंपदुर देहे तीन ३.

४०००० कुटाकुल व कोंड कमरक जागीर गालीफखान.

४०००० परगणा नदीमंगल.

५१००००

२७३५०० पाळेगार पैकीं महाल रुपये.

१२८५०० ठाणीं सरकारचीं वसलीं रुपये.

५०००० परगणे गुमनाड पाले रुपये १४६०००

वजा शिबंदी ९६०००

बाकी बेरीज

६०००० परगणा कद्रिवतलपूर रुपये ७००००

वजा शिबंदी १०००० बाकी

बेरीज रुपये.

१५००० परगणे सोमपल्ली बतलापूर २५०००
वजा सिबंदी १०००० बाकी बेरीज रुपये.
३५०० पदेपाले व बेतूर कालकोटा ७०००
वजा शिबंदी ३५०० बाकी बेरीज.

१२८५००

१४५००० पेशकसीचे महाल खेरीज शिबंदी.

| | |
|---|---|
| १२५०० | परगणा घंटक. |
| ५००० | परगणा तुंबल. |
| २०००० | परगणा बडे अनंतपूर. |
| ६०००० | परगणा ताडमरी. |
| ८००० | परगणा कोकटीपाले. |
| १००० | परगणा नलमडा. |
| ६५०० | नडमंतुडी. |
| ३२००० | परगणा पुंगनूर. |
| १४५००० | |

२७३५००

७८३५००

१५००० पाळेगार सिरें प्रांतींचे आकदे रुपये.
१०००० दादनाईक पालें १८००० रुपये
वजा शिबंदी ८००० बाकी रुपये.
५००० चिनकर नेरपाले १०००० वजा
शिबंदी रुपये ५००० बाकी रुपये.

७९८५०० १५०००

तपशील.

७६६५०० सरंजामाची बेरीज बरहुकूम सदर.
३२००० जाजती बेरीज सरकारची हा ऐवज सरकारांत घ्यावा.

७९८५००

येणेंप्रमाणें सात लक्ष अठ्याण्णव हजार पांचशें पैकीं सरंजामाची बेरीज सात लक्ष सासष्ट हजार पांचशें व सरकार बेरीज बत्तीस हजार हा ऐवज सरकारांत घ्यावा याप्रमाणें बोलून चालून करार केला असे. सदरहूप्रमाणें वर्तावें येणेंप्रमाणें करार.

सदरहू महालच्या बेरजा व सिबंदीच्या बेरजा मीर रजा यांणीं सांगितल्याप्रमाणें लिहिल्या आहेत. त्यास चौकशीमुळें जाजती ऐवज जाहला तर सरकारांत घ्यावा व मीर रजांनीं इमानें इतबारें वर्तोन कुलकचें पडलें पान हिशेब समजवावा, येणेंप्रमाणें करार.

सदरहू सरंजामाशिवाय कडपें तालुक्यापैकीं परगणे पामतुरती हा परगणा राहिला आहे. तेथील अंमल मीरांनीं वसूव एवज आकारून जो ऐवज होईल तो सरकारांत अविच्छिन्न पावता करावा. अंतर करूं नये. येणेंप्रमाणें करार.

चाकरी एकनिष्ठपणें उमेदीनें करावी. महालचे कारभारांत तफावत न करितां इतबार वाढवावा. खावंदाची मर्जी दिवसेंदिवस पसंद करीत जावी असें, वर्तल्यास उत्तम आहे. वर्तणुकेनरूप धणीही कृपा करितील. येणेंप्रमाणें करार.

पेस्तर साल सन समान तीसा सीतैन दुसाला सरंजामाचा हिशेब मीररजा मागूं नये. सरकारांत येऊन पदरीं पडलें व लुटलें, नागविलें सबब. दोसालाची कसर होईल ते मीरावर नजर देऊन माफ केली असे. दोन सालांपुढें कच्चा हिशेब समजवावा. पाहून बंदोबस्त करून दिल्हा जाईल. सरंजामाशिवाय बावती हजार रुपये व पामतुर्तीचा ऐवज पेस्तरसालापासून क्षेप सरकारांत निक्षेप द्यावा. येणेंप्रमाणें करार.

कराराप्रमाणें राहून गाडदी चांगले बाळगून सरकारशिरस्तेप्रमाणें हजिरी, गणती देत जावी. राऊतांत व गाड्यांत नोकर होईल तो कबजांत बजा पडेल. जिकडे चाकरीस पाठवावें तिकडे बेउजूर जाऊन, मन घालून चाकरी करावी. येणेंप्रमाणें करार.

तुर्त बाजीमाजीमुळें व गडबडीमुळें मीराचे इतबारावर बेरजा लिहिल्या आहेत. त्यास पुढें साल दरसाल लावणी करून जाजती बेरीज आकारावी. त्यापैकीं सरंजामाचा ऐवज कराराप्रमाणें जाऊन बाकी ऐवज राहील तो क्षेपनिक्षेप सरकारांत देत जावा. येणेंप्रमाणें करार.

पुढें तनखे झाडा तपशिलवार आणून समजवावा. येणेंप्रमाणें करार.

महालचे जमीदारास व पाळेगारास सनदा वगैरे साहित्यपत्रें लागतील तीं द्यावीं. देणें.

सनदा लिहिणें छ १७ जिल्काद.

छ १५ जिल्काद, चैत्रमास, सन सबा सीतैन.

---

## जंजिऱ्याचे खान आणि पेशवे.

### यादी १.

तहनामा अजरखतखानें कोट जंजिरे दंडा राजपुरी सुरसन सबा सलासीन मया व अलफ. महालानिहायची रयत फीतर, तिचे गर्गशामुळें तजावजा होऊन, दिवसेंदिवस

खराब होत गेली याबद्दल महालानिहायचे जमीदार व रयत येऊन सरकारतर्फेनें व पंडित अजम बाजीराव पंडित प्रधान यांजकडून दुतर्फा तह होऊन कौल करार रयतीस देऊन, लावणी संचणी केली याखेरीज वसाहत होऊन, कीर्द मामुरी होत नाहीं ह्मणोन, जाहीर केले. त्यावरून मामुरीवर नजर देऊन, साल मजकुरापासून महालानिहायचा तह दुतर्फा करार केला असे. बितपशीलः—

महालानिहाय बितपशीलः—

| | |
|---|---|
| १ मामले तळें खेरीज कसबे तळें. | १ परगणे घोसाळें खेरीज कसबे घोसाळें. |
| १ तर्फ निजामपूर खेरीज कसबे निजामपूर. | १ परगणे बिरवाडी खेरीज कसबे बिरवाडी. |
| १ तर्फ गोरेगांव खेरीज मौजे तुपेगांव. | १ तर्फ गोंवलें. |
| | १ तर्फ मांडलें. |
| १ प्रांत नांदगांवमरूड. | १ प्रांत श्रीवर्धन. |
| १ प्रांत दिवें. | १ प्रांत ह्मसळें. |
| ५ | ६ |

एकूण अकरा महालचा तह बितपशील.

सदरहू अकरा महाली जमाबंदी दुतर्फा अमलदाराचे रुजवातीनें आकारून जिराईत व बागाईत व मोहतर्फा बाब व जरीबे गौली व कौली वगैरे याचा वसूल निमेनिमप्रमाणें माहालोमाहालीं दुतर्फा अंमलदार बैसोन मुतसील महालाचे वांटणीप्रमाणें घ्यावा. पेस्तर जिराईत व बागाईताचे मक्ते करून देणें तर द्यावे. अगर जेथें पहाणी करणें होईल तेथें दुतर्फा पहाणीदार जाऊन पहाणी करून, निमेनिमप्रमाणें दुतर्फा वसुलाची उगवणी करून घ्यावी. तिकडील मुतसील महाल आहेत. त्याचा वसूल जेहद फर्मास व वेट वेगार वांटणीप्रमाणें तिकडे घ्यावी. व इकडे मुतसील महाल आहेत, त्यांचा वसूल जेहद फर्मासव वेट वेगार इकडे घ्यावी. इकडील तिकडील महाली निमेचा ऐवज वजा वाटाव करून कमी जास्ती ऐवज होईल तो दुतर्फा पुरवून घ्यावा. इकडील मुलखांत तिकडील शिपाई याणें फिरणें तेव्हां त्याणें राजपुरीस येऊन सोबत शिपाई घेऊन मुलखांत कामकाजास फिरावें. अगर तिकडील मुलखांत, इकडील शिपाई याणें कामकाजास फिरणें, तेव्हां तळयास जाऊन तेथून शिपाई सोबत घेऊन मुलखांत फिरावें— कलम १.

जकातीचे अमलास व बंदरचे अमलास दुतर्फा अंमलदार जागाचे जागा बैसोन निमे निमे प्रमाणें हांशील घ्यावा यापैकीं वजा दुतर्फा दरोबस्त बितपसीलः—

ईजानेबाकडे बंदर राजापुरी १. पंडित अजमाकडे बंदर रोहें १.

येकूण बंदरें दोन खेरीजकरून बाकी बंदर व जकातीचा हांसील निमेनिमप्रमाणें दुतर्फा घ्यावा. कलम १.

कमावीस खंड गुन्हेगारी मुलखांत होईल ते रयत निसबतीची दुतर्फा निमेनिमप्रमाणें घ्यावी व चाकरमाने याकडील होईल ते तिकडील तिकडे व इकडील इकडे घ्यावी. कलम १.

राजपुरीचे बंदरचे मुबदलीयांस आअमारतपन्हाकडे दरोबस्त देहे ५ पांच व बंदर १ बितपशील:—

देहाय देखील जिराईत व नक्ती बाब व कुलकानू जात देहे.

१ कसबे तळें.
१ कसबे घोसाळें.
१ कसबे बिरवाडी.
१ कसबे निजामपूर.
१ मौजे तुपेगांव, तर्फ गोरेगांव.

५

मौजे रोहें, परगणे घोसाळें येथील जिराईत व बागाईत व नक्ती बाब गौली वगैरे महालचे जमाबंदी मोजीब दुतर्फा पाहाणीदार फिरोन पहाणी होऊन जमाबंदी होईल ते करार मोजीब निमेनिम दुतर्फा ऐवज पोहोंचेल त्याखेरीज बंदर जकात रोहें दरोबस्त बंदर. कलम १.

सदरहू देहे ५ पाच व बंदर मजकूरचे जकातीचा हांसील दरोबस्त आअमारतपन्हाकडे वसूल होईल ईजानेबाचे तर्फेनें सदरहू जागा मुजाहीम होणार नाहीं. कलम १.

मुलकाचे दस्तावरी सदरहू अकरा महाली गाईची बाबत पेशजीपासून होती ती दुतर्फा माफ करून दूर केली असे. कलम १.

सदरहू अकरा महाली पेशजीची बाकी साकी व खंड गुन्हेगारी हलाली हरामी रयत व जमीदार यांजकडे असेल ते दुतर्फाही माफ करून माफी कौल सालगुदस्ता सादर झाले आहेत. रयत व जमीदार लोकीं आपले जागाचे जागा येऊन, वसाहत करून कीर्द मामुरी आबादी करून दुतर्फा रुजूवातीनें खुशाल असावें. येबाबे हलीं पुरेही कौल दुतर्फा खाली झालें असे. कलम १.

राजपुरीची तर हरवितास जाते व मरूडची तर या हरदू तरीचे माणसांचा उतार खेरीज करून बाकी जकातीचा अंमल निमेनिमप्रमाणें दुतर्फा, वरकड तरीचा उतार व हांसील निमेनिमेप्रमाणें दुतर्फा घ्यावा. हरवीतचे व मरूडचे तरीवरील अदमी याचे उताराबाबें पंडित अजमाकडून मुजाहिम न व्हावें. कलम १.

तालुके नागोठणें, तर्फ अष्टमी व सीमा वनपाली येथील निमेप्रमाणें ऐवज मराठे यांकडे चालतच आहे. सरकारतर्फेकडील निमेचा ऐवज आहे. सानतपन्हाकडे वसूल होत आहे त्याप्रमाणें वसूल दरोबस्त होईल. ईजानेबाचे तर्फेनें सदरहू महाली मुजाहीम होणार नाहीं. कलम १.

मुतसील महाल दुतर्फा वसुलास व जथेबाद फर्मासीस व वेट बेगारीस महाल बितपशीलः—

सरकारतर्फेस ईजानेबाकडे महाल ५॥. पंडित अजमाकडे महाल ५॥.

तपशील.

सरकारी ईजानेबाकडे महाल.

१ परगणे नांदगांव मरूड.

१ परगणे श्रीवर्धन.

१ परगणे दिवें.

१ परगणे ह्मसाळें.

१ तालुके मांडलें.

·॥· तालुके गोवलें अजदेहे ५० पैकीं वजा इनाम देशमुख मौजे वडवली देहे १ बाकी ४९ पैकीः—

१ मौजे आटरें.

१ मौजे मुरूड.

१ मौजे टांकें.

१ मौजे लिपणी.

१ मौजे कोळें.

१ मौजे कणघर.

१ मौजे खांबगांव.

१ मौजे लख.

१ मौजे सागवड.

१ मौजे पुरार.

१ मौजे वडघर.

१ मौजे मुदरें.

१ मौजे मांजरवणें.
१ मौजे कुरतुडी.
१ मौजे सिलींब.
१ मौजे पाणदरें.
१ मौजे मादाटणें.
१ मौजे हरवतें.
१ मौजे वरणाटणें.
१ मौजे वाईगणी.
१ मौजे पाचती.
१ मौजे सोनघर.
१ मौजे वाघांव.
१ मौजे ताम्हणें.
॰॥॰ मौजे कोल मांडले देहे १ पैकीं निमे.

२४॥

५॥

निमे.

पंडित अजमाकडेस महाल.

१ तर्फ तळें.
१ प्रांत घोसाळें.
१ तर्फ निजामपूर.
१ तर्फ गोरेगांव.
१ प्रांत बिरवाडी.
॰॥॰ तर्फ गोवलें अजदेहे ५० पैकीं वजा इनामती देशमुख देहे मौजे वडवली
१ बाकी गांव ४९ पैकीं.
१ मौजे दाभोळ.
१ मौजे टालबुद्रुक.
१ मौजे भांडिवली.
१ मौजे सणदिरी.
१ मौजे सापें.
१ मौजे टालखुर्द.

१ मौजे कोंकरें.
१ मौजे नांदवी.
१ कसबे गोवलें.
१ मौजे दहिवली.
१ मौजे चांडोरें.
१ मौजे शीरवली.
१ मौजे तारणें.
१ मौजे वांकी.
१ मौजे कांसलें.
१ मौजे मढेगांव.
१ मौजे हुरडी.
१ मौजे कुसिवडें.
१ मौजे कुभसतें.
१ मौजे जवसी.
१ मौजे फलाणी.
१ मौजे हरकूल.
१ मौजे अलसंदे.
१ मौजे फसलप.
॥· मौजे कोलमांडले देहे १ पैकी निमे.

२४॥

५॥ निमे महाल.

एकूण अकरा महालची वांटणी सदरहू मोजीब मुकरार केली असे. कलम १.

याकुतनगर खोकरी येथें घाटचे व कोकणचे वगैरे बाज्ये जिन्नस घेऊन येतील व येथून जिन्नस घेऊन जातील त्याची जकात मौजे मेंढें अगर जेथें मवाफक पडेल तेथें दुतर्फा अंमलदार बैसोन निमेनिमप्रमाणें हांसील घ्यावा. कलम १.

बंदर राजपुरीचे मुबदले यांस बंदर रोहें व पांच देहे व खोकरी याकूतनगर येथें घांटचे बाज्ये जिन्नस आणितील व येथून नेतील त्याचा हांसील दुतर्फा मेंढें यांस अगर जेथें मवाफिक पडेल तेथें दुतर्फा अंमलदार बसोन निमेनिमप्रमाणें घ्यावयास करार दाद झाला असे. आअमरतपन्हाकडून शाहरपन्हाचे अमलास खेरीज नमकगर मुजाहीम न व्हावे. कलम १.

इकडील सरकारचें खासा तारूं, तरांडें त्यातर्फेचें बंदरीं जाईल, त्याचा हांसील न घ्यावा; व इकडील बंदरचीं तरांडीं दरयेक बंदरीं व्यापारास जाऊन येतील, त्यास मुजाहीम न व्हावें. ते तर्फेचें बंदरीं बंदर करूं द्यावें. याचे रवेसीनें तिकडील तरांडें यास मुजाहीम होणार नाहीं. आपले तर्फेचे बंदरीं बंदर करूं देऊन व खासा तिकडील सरकारचें तरांडें यांस हांसील घेणार नाहीं. कलम १.

दुतर्फा चाकरमाने यांचे कबिले व चाकरलोक अटकेंत असतील, ते दुतर्फाकडूनही खलास करावे. कलम १.

एकूण तेरा कलमें सदरहूमोजीब करार करून तहनामा दुतर्फा मुकरार केला आहे. याप्रमाणें करारमोजीब तर्फेनकडून सुरळीत चालावें. परवानगी हुजूर रसानगी दिलावर जवानी रघुजी नाईक बोरकर अफराद. रवाना छ २ माहे साबान सन १९ जुलूस महंमदशाही. मोर्तबसुद.

---

## यादी २.

तहनामा प्रांत राजपुरी विद्यमान राजश्री शंकराजी केशव व राजश्री रामाजी महादेव व राजश्री विसाजी केशव मारुफात राजश्री गंगाधर विश्वनाथ, मुक्काम कसबें पेण, सुरुसन खमस सितैन मया व अलफ. कलम बंदी बितपशील:—

सन इसन्ने व सन सलास दुसाला पैकीं बाकी राहिली आहे.

नक्त रुपये. ३१२।≈ गल्ला भात केली खंडी.

५८८ साष्टीपैकीं.

१४४५।।।१ तळ्यापैकीं.

२०३३।।।१

पैकीं वजा ऐन जिन्नस मौजे मालाट्याचें दास्तानीं द्यावें. भात केली खंडी १०३३।।।१ बाकी भात खंडी १००० एकूण तसर दरखंडीस रुपये १५ प्रमाणें बेरीज —— रुपये.

१५००० भात हजार खंडी पैकीं.

३१२।≈ नक्त.

१५३१२।≈

पैकीं वजा कोष्टी नांदेडकर यांचें कापड मौजे बोडसेत तर्पे निजामपूर येथून लुटून नेलें. त्याची किंमत जवानी कोष्टी रुपये ३७५ पावणे चारशें बाकी रुपये १४९३७।≈ सदरहू ऐवज दोहो महिन्यांचे मुदतीनें देऊं. कलम १.

मावळे दिमत सचीव येथील खंडणी गंगाधरपंत यांणीं करार केली आहे. त्यास किल्ले

कुई हा सरकारांत आलीयावरी आजलग मावळचा ऐवज जंजिरा पोहोंचला नाहीं, परंतु मोहिबाची खातरदास्त जाणोन रुपये १५०० पंधराशें दरसाल पावत जातील. कलम १.

तपे माडलें येथील अमल तळा सुभाकडे सुदामत प्रमाणें करार केला असे. तिकडून पेशजीचे अंमलदार होते ते करार केले आहेत. सुरळीत चालेल. कसूर होणार नाहीं. कलम. १.

जंजिऱ्यांतून शिपाई मावळांत गेले होते, ते सरकारांत दस्त जाहले. ते सोडावे म्हणून कलमबंदीचे यादींत लेहून आलें. त्यास सोडावे तरी यांणीं मुलखांतील रुपये ११००० अकरा हजार नेले आहेत. त्याची तहकिकात येथें जाहली आहे. शंकराजीपंत यांणीं गुदस्ता तह केला असोन सदरहू रुपये नेले, ते मोहिबाकडे जमा झालेच असतील. साडे अकरा महालची रुजवात ठरलीयावरी सरकारचे मुलखांतील ऐवज नेला, तो हिशेबी मजुरा आला पाहिजे. चौकशी करून जमा करावा. दुतर्फा हिशेबी जमा धरावे. शिपाई सोडून रवाना केले असेत. कलम १.

दुतर्फा अमलामुळें अकरा महालचा जाबसाल किरकोळ होणें, तो तळा सुभाकडे करावा म्हणोन करार केलें असे. मातबर जाबसाल व जमाबंदीचा ठराव होणें तो हुजुरून होईल. कलम १.

दुतर्फा येखलासी जाली, यांत कसूर दुतर्फा नसावा. हरदु तर्फेनें सुरळीत चालोन रयत आबाद होये तें दुतर्फा करीत जावें. कलम १.

सालमजकुरीं दुतर्फा अकरा महालची पहाणी करून जमाबंदी ठरवावी. खराब व मामूर जमीन मोजून जो आकार होईल, त्याप्रमाणें इस्तावे लाऊन, जमाबंदी होईल त्या मोजीब कमजास्ती ऐवज होईल तो जिकडील तिकडे पुरवावा. कलम १.

मागील रुजवातीची गोष्ट तरी मेजवानी दाखल अजम शंकराजीपंत सरसुभेदार यांणीं सालगुदस्ता तळ्याचे मुक्कामीं करार केलें, त्याप्रमाणें अजम गंगाधर विश्वनाथ यांचे मार्फतीनें करार जाहले रुपये २५००० पंचवीस हजार भरून दिल्हावरी मागील रुजवातीची गोष्ट बोलूं नये. खालीं देशमुखीच्या चिठ्ठ्या दिल्या आहेत त्याचा अंमल सुरळीत चालवावा, व साडेच्यार महालच्या गांवकुळकर्णाच्या चिठ्ठ्या दिल्ह्या नाहीं त्या खालीं देऊन कारभार चालवावा. तिसाला बाकी सन इसन्ने व सन सलास व आर्बा बाकी राहिली आहे, ती रयतीस ताकीद करून देवावी. कलम १.

सालगुदस्त सन आर्बाचें देणें, सन इसन्ने व सन सलास दुसाला हिशेब इसन्ने प्रमाणें चालला आहे, त्याप्रमाणें सन मजकूरचें देणें देऊं. नक्त रुपये श्रावणमासीं व गल्ला फसल हंगामी याप्रमाणें देऊं. कलम १.

खार, हसवीरा मोहिबाचे येखलासावरी नजर देऊन खार दिल्ही असे. लावणी संचणी करावयास एक शिपाई ठेऊन पीकदाव भात जमा होईल तें उंदेरीस घेऊन मुच-दला रोह्याचें बंदरीं देत जाऊं. बंदर मजकुरीं सावकारीं गलबत पाठवून भात न्यावें.

कलम १.

बंदर रोहें येथील जकातीचा मजकूर तरी शंकराजीपंत यांणीं तळ्याचे मुक्कामीं करार केलें आहे त्याप्रमाणें हल्लीं करार केलें आहे. प्रांत घोंसाळें येथील कलमें वितपशील:—

१ सिंगोटी प्रांत मजकूर.

१ अष्टमी कडील ऊभा मार्गाची व कडा प्रांत मजकूरची सुदामत शिरस्ते प्रमाणें.

१ मुलकी थलभरीत शिवाये बंदर रोहें मौजे मजकूर व यात्रा मौजे तळाघर प्रांत मजकूर.

३

येणेंप्रमाणें तीन कलमें जकाती पैकीं दुतर्फाकडे सालमजकुरापासून दिल्हीं असेत म्हणोन सनदा अमलदारांस येणेंप्रमाणें:—

१ गोविंदराव माणकर यांस.

१ लक्ष्मण गणेश जकातदार यांस.

२

येकूण दोन सनदा दिल्ह्या असेत. कलम १.

वेसवीखाडीपासून प्रांत दाभोळ व राजापूर सुभा येथील तुळाजी आंगरे दौलत करीत होते तें समयीं रुपये ३१२५ सव्वा एकतीसशें देत आले, त्यास गुदस्ता शंकराजीपंत तळ्याचे मुक्कामीं गेले होते तें समयीं करार केले रुपये:—

३१२५ कारकीर्द तुळाजी आंगरे.

१००० जाजस्ती रामाजीपंत सुभेदार यांनीं देऊं केले.

४१२५

एकूण सव्वाएकेचाळीसशें रुपये द्यावयाचा करार केला. त्याप्रमाणें पावत जातील. सदरहू शिवाय जाजती द्यावयास मवाफिक येत नाहीं. कलम १.

अष्टमीसी महाल, नागोठणें, पाली या महालीं पेशजी चौथाई चालत होती ह्मणून गंगाधरपंतास जंजीरकरांनीं जंजिरा समजावून चार हजार रुपये करार करविले. त्यास मागें कैलासवासी—रावसाहेब यांचे वर्त्तीं सन सबा सलासीनामध्यें तह झाला. तें समयीं सदरहू महालीं जंजिराकडून मुजाहिम होणार नाहीं ऐसें तहनाम्यांत करार असतां, नवीन

कानू सदरहू महालीं करावी हें येखलासाचे जागा वाजीब नसे. पेशजीचा तहनामा काढून पहावा, ह्मणजे निशा होऊन येईल. गुदस्ता शंकराजीपंतीं करारांत आणिले नाहीं व पेशजीच्या तहनाम्यांतही नाहीं. कलम १.

पेशजीच्या रुजवातीचा मजकूर तरी, कैलासवासी नानासाहेब वर्तमान असतां दौलत करीत होते आणि ते समयीं त्यांनीं कोणत्या मतलबावरी रुजवात न दिल्ही. व मोहि-बांचे तर्फेनें मागावयाची कोसीस काय ह्मणून झाली, हें न कळे. त्याप्रमाणें मागील भोगवटा पाहून हल्लींही रुजुवात द्यावी, परंतु सरकारतर्फेनें जंजिरे यास महसरा बसोन नुकसान जाहलें. आपला वतनी जागा, सबब मदत असावी हें जाणोन, राजश्री शंकराजीपंतास सांगून सन इसन्नेपासून रुजवात देविली. हल्लीं देशमुखीचें वतन चालतें व्हावें व कित्येक कामाचे लढे होते याजकरितां राजश्री गंगाधर विश्वनाथ यांस जंजिऱ्यास पाठविलें. अंदेशा करून वतन चालतें केलें व कित्येक कामकाजाचे लढे होते ते दूर होऊन सुरळीत तह झाला. मोहिबांचे बोलण्यामध्यें आलें कीं, पेशजीचे रुजवातीपैकीं ऐवज मागावा. त्यास हे बात दोस्तीचे जागा दूर असावी. हल्लीं कोणे वजेचा जमाना हेही मोहीब जाणतच आहेत. तर्फेनें दौलतीमध्यें मुजाईम आहे असे समजत नसो. दिल दिलजानेबची दोस्ती व येखलासी ज्यादा व्हावी हेच दिलजानेनसीं च्याहत असो. कलम १.

एकूण चौदा कलमें, जंजिऱ्याचीं कलमबंदीची यादी लिहून आली होती त्या अन्वयें, सदरहू चौदा कलमें इकडून करार करून पाठविलीं असेत.

---

## यादी ३.

यादी दास्त पेशजी तीर्थरूप कैलासवासी रावसाहेब यांचे अमलांत जंजिरा तर्फेचा तहनामा जाहला होता, त्यापैकीं कलमाचा कमपेश जाहला वगैरे याचा फैसल. सुरसन सीत सितैन मया व अलफ.

अंजणवेल, गोवळकोट व बाणकोट शाहामतपन्हा तुळाजी आंगरे यांणीं घेतलें. मतगडही घेणार. तेव्हां खाडी उतरून आंगरे अलीकडे येतात. अजिनेहत तें खानदान हें खानदान जुदें नाहीं. तें समजून आअमारतपन्हाचे बुनरुगांनीं किल्ला मतगड सरकारांत अमानत दिल्हा. व किल्ल्याचे सरंजामास परगणे दिवें निमें व परगणे श्रीवर्धन निमें दिल्हें होतें. हल्लीं किल्ले मजकूर अमानत आमचा आह्मांकडे द्यावा ह्मणून यादनामी-यांत कलमीं केलें व वकिलांनीं रदवदल केली. त्याजवरून किल्ले मजकूर व परगणे दिवें व परगणे श्रीवर्धन निमेंनिमें देखील आअमारतपन्हाकडे देविला असे. घेऊन दोन महि-नीया बाआदन किल्ला पाडून टाकावा. जरी आशौकतपन्हांनीं किल्ला इजानेबांकडे ठेविला

आणि हरदु महाल निमेनिमेचे घतले, तरी किल्ला सरकारांतून पाडिला जाईल. त्यास आअमारतपन्हा तर्फेनें मुजाहिम न व्हावे. आइदे दुतर्फाही किल्ला वसवूं नये. महाल सुदामतप्रमाणें अमारतपन्हाचे मुतसिलाकडे जातील. दुतर्फा रुजवातीस येतील. कलम. १.

सन इसन्ने रुजवात होऊन दुसाला इसन्ने व सलास हिशेब होऊन फडशा जाहला, त्यापैकीं बाकी राहिली तो ऐवज, व पुढें सन आर्बा व खमस जमाबंदीप्रमाणें दुतर्फा रुजवात होऊन ऐवज जिकडील तिकडे पुरवावा. आइदे सन सीत साल मजकुरीं दुतर्फा पहाणी करून, खराब महामुरा लावून, इस्तावे बांधून, पंचसाला ऐवज जिकडील तिकडे पावत जाईल. दिवें व श्रीवर्धन येथील ऐवज रुजवातींत इसन्नेपासून वजा पडणें आहे, तो साल मजकुरीं एकंदर हिशेब होईल तेव्हां ऐवज वजा पडून, साल मजकुरापासून दुतर्फा सुदामत तहनामीयाप्रमाणें निमेनिम चालेल. कलम १.

तालुके सुवर्णदुर्ग वगैरे निसबत आंगरे यांचे कारकीर्दीचे अमलांत रुपये ३१२५ सवा एकतीसशेंची सनद सुभा नेली, ते व जाजती रुपये १००० एक हजार एकूण सवा एकेचाळीसशें रुपये पावत आहेत. त्याप्रमाणें दरसाल पावतील. कलम १.

इसन्नेमागील रुजवात मागील तहनाम्याप्रमाणें राहिली आहे. तो ऐवज हिशोब करून आअमारतपन्हाचा द्यावा. त्यास मागील रुजवातीच्या बाता कशा गुजरल्या, त्याची बात आशौकतपन्हांनीं दिलांत आणावी, वाजीब नसे. ये बाबे अलाहिदा कलमीं केलें असें. कलम १.

तहचा मुनफा होऊन करार मदारांत आले त्याबमोजीब अमलांत येईलच. याऊपरी जंजिरातर्फेनें सरकार तालकीयास वगैरे येथें आअमारतपन्हा तर्फेनें तसदी एक जरा न लागावी. कलम १.

बंदर रोहें येथील जकात दरोबस्त सरकारतर्फेस चालतच असतां उभे मार्गाचे जकातीस आअमारतपन्हा तर्फेनें मुजाहीम होतात. त्यास सुदामत तह जाहल्यापासून रोह्याचे उभे मार्गाचा अमल आ शाहमतपन्हा तर्फेस चालला नाहीं ऐसें असतां उभा मार्गास मुजाहीम व्हावे, मुनासीब नसे. सुदामत सरकारतर्फेस अंमल चालल्याप्रमाणें चालेल. नवीन होणार नाहीं. आअमारतपन्हातर्फेनें मुजाहीम नव्हते. कलम १.

तळें, घोसाळें येथील गल्ला थोर, याचा जंजिरातर्फेचे खाडींतून विजेदुर्गास अगर रेवदंड्यास सावकारीं गलबतें भरून गल्ला जाईल. त्या लगत्यास आहशमतपन्हातर्फेनें हशिलाबाबे व कोण्हेविशीं मुजाहीम न व्हावें. कलम १.

सरकार मुतसील महालचे वतनदारीचा वगैरे इनसाफ इकडे होतील, त्या बमोजीब आअमारतपन्हाकडून सनदा पत्रा द्याव्या, याच वजा जंजिऱ्याचे मुतसील महालचे जमी-

दारी वगैरे इनसाफ आअमारतपन्हाकडे होतील. त्यावमोजीब सनदापत्रें सरकारतर्फेनें दिल्ह्या जातील. कलम १.

दास्तान माडलें सरकारतर्फेनें इंग्रेजास दिलें आहे. त्यास आअमारतपन्हांकडील निमेचा ऐवज मौजे मजकूरचा होईल तो रुजवातीचे हिशेबांत सरकारतर्फेनें सरसाल मुजरा दिल्हा जाईल. कलम १.

बंदी गुलाम, चाकरमान्या, शिपाई व घरचा चाकर वगैरे इकडील तिकडे तिकडील इकडे येऊं नये, व गेले असतील ते दुतर्फा जिकडील तिकडे द्यावे. कलम १.

पेशजीचा तहनामा दुतर्फा जाला, त्यांत वहिमाची जकात दुतर्फा घ्यावी ऐसें होतें, परंतु साष्टीचे मुक्कामीं कैलासवासी तीर्थरूप आप्पासाहेब यांणीं मक्ता बांधून दिल्हा ते समयीं रयतीनें अर्ज करून वहिमाची जकात सरकार मुतसीलातील माफ करून घेतली. आणि तिकडील मुतसीलांत न घ्यावी ऐसें पत्र नेलें. त्याप्रमाणें सरकार मुतसीलांत वहिमाची जकात घ्यावयाची चाल नाहीं. तैशीच तिकडील मुतसिली वहिमाची जकात घेऊं नये. कलम १.

महसरीयाचे अलीकडे दुतर्फा कसुरामुळें सरकारतर्फेचे मामलेदारांकडून पेशजीच्या तहनामीयाशिवाय कलमबंदीच्या यादी वगैरे साधकबाधकामुळें जंजिरा गेल्या आहेत. त्यास हल्लीं पेशजीचे करार प्रमाणें तह दुतर्फा जाला तेव्हां ते कागद रद्द असेत. कलम १.

सरकारतर्फेचा व जंजिरातर्फेचा दुतर्फा खलासा जाहला तेव्हां जंजिऱ्यातर्फेच्या मुतसीलांत दरगांवीं विसा खंडीचे दस्तास एक गाई रमजानीं घेतां, तें न घ्यावी. कलम १.

दुतर्फा तह जाला याजउपरीं कित्येक रयत लोक वगैरे फरारी जाले असतील, त्यास दुतर्फानीं खास कौल देऊन ठिकाणचे ठिकाणीं आणावे. कर्जदार, दिवाळखोर यांस दुतर्फा पुस्तपन्हा करूं नये. कर्ज वाजवी असेल तें देववावें. कलम १.

एकूण चौदा कलमें करार केलीं असेत. जाणिजे छ २९ जमादिलाखर आज्ञाप्रमाण.

---

## यादी ४.

यादी दास्त जंजिरेतर्फेकडून कलमें करार करून द्यावीं म्हणून अमारत मर्तबत पंडित प्रधान यांकडोन याददास्त लिहून आली, त्यावरून कलमें करार केलीं असेत. सुरुसन इसन्ने सबैन मया व अलफ.

खानजादे यांजकडे शिपाई व कारकून वगैरे सामील जाहले आहेत. त्यास खानजादे वरघाटें येतील. शिपाई वगैरे जेथें पुरवले तेथें मुलांमाणसांसुद्धां कोंकणप्रांतें राहातील.

त्यास जंजिरेतर्फेनें शिपाईयांस वगैरेचे मुलांमाणसांस तसदी एकंदर नसावी म्हणून लिहिलें, तर खुब असे. कलम १.

मुलखांत चोऱ्या होतात, त्यांचा बंदोबस्त दुतर्फाकडून जाला पाहिजे. त्यास सरकारतर्फेनें बंदोबस्त करविला असे. जंजिरा तर्फेनें बेमुरवतपणें ताकीद होऊन चोऱ्या न होत तें करावें, असें असून चोरी जाहली तरी जिकडे मुद्दा लागेल त्यांनीं चोरीचा जाब करावा म्हणून लिहिलें. तरी सरकारतर्फेकडूनही बंदोबस्त केला असे. कलम १.

खानजादे सन इहिद्देंत खालीं गेलीयावर, कृष्णाजी भास्कर वगैरे सरकारतालुक्यांतील धरून नेऊन पैका व कतबे घेतले आहेत, त्याचा रुजवातमुळें ठरेल तो ऐवज माघारा द्यावा ह्मणून लिहिलें, तरी सोळा हजार रुपये व कतबे घेतले असतील ते देऊं. कलम १.

सदरहूप्रमाणें कलमें तीन करार केलीं आहेत. रसानगी छ २१ माहे जिल्काद.

---

## यादी ५.

करारदाद अजरस्तखाने कोट जंजिरे, दंडा राजपुरी सुरसन इसन्ने सबैन मया व अलफ. आंके खानजादे यांची शरारत पैदा होऊन मुलखांत दंगा होऊन येत असे. त्याचे बंदोबस्ताकरितां पंडित अजम प्रधान पंडित यांचे अडमुदे यांजबद्दल सरकारतर्फेनें करार केले असे.

साहा सालें रुजवातीचा ऐवज द्यावयाचा करार केला असे. जंजिरेतर्फेनें रुजवातीहिशेबी साहा सालें इस्तकबिल सन आर्बापासून तिसा लग. एकूण साहा सालें एक साल. कलम १.

खानजादे यासी दरसाल खर्चास रुपये १५००० पंधरा हजार जंजिरेतर्फेनें रुजवाती ऐवजांत द्यावयाचा करार केला असे. दरसाल रुजवात ऐवज पैकीं देत जावा. रुजवात ऐवजांत वजा पडत जाईल. कलम १.

एकूण साहा साला रुजवात व खानजादे यांसी दरसाल खर्चास रुपये पंधरा हजार एकूण कलमें दोन करार केलीं आहेत. खानजादे यांसी वरघाटें नेऊन आपणांजवळ ठेवावें, मशारनिल्हेचा उपद्रव जंजिरेतर्फेच्या मुलखास न लागे तें करावें. परवानगी हुजूर रसानगी अबदुल गफूर जबानी खुद. रवाना छ १२ माहे जमादिलाखर. मोर्तबसुद्द.

---

## यादी ६.

यादी अजम पंडित प्रधान यांजकडून कलमें करार व्हावीं. विद्यमान सिद्दी जमरूद सुरुसन सीत समानीन मया व अलफ.

सिद्दी अबदुल रहिमखान साहेब मरहूम याचा प्याला होते वख्तीं धाकटा बेटा तक्तीं बसवावा. याप्रमाणें त्याचा हुकूम त्या मोजीब थोरले बेटे यांस अमारतपन्हा पंडित प्रधान यांनीं पत्र धाकटे बेटे यांस जंजिरे यांत पाठवावयास लिहावें. धाकटा मूल जंजिरेयांत गेलीयावर थोरले लेकांनीं राजपुरीस रहावें, अथवा पुणीयास रहावें. त्याचे संसाराचे बेगमीस गांव व नक्त मिळून पांच हजार रुपये जंजिरातर्फेनें देत जाऊं. त्यांनीं इमानें असावें. फितूर एकंदर न व्हावा. कलम १.

खानजादे याचा वाका झाला, ते समयीं धाकटे लेकास जंजिरेयांत पाठवावे, थोरले लेक बाळू मिया यांनीं राजपुरीस रहावें, त्याचें चालवावें. याप्रमाणें करार झाला आहे; त्याप्रमाणें सरकारांतून बाळू मिया यांस पत्र लिहिलें जाईल. त्यांनीं कराराप्रमाणें राजपुरीस राहिल्यास उत्तम. न राहिले, हुजूर आले, तर यांचे खर्चाचा बंदोबस्त सरकारचे व तुमचे विचारें त्यांचे स्वरूपानरूप करार होईल, याप्रमाणें बेदिक्कत चालवावें. अंतर करूं नये. येणें प्रमाणें करार करावे.

पुढें रुजवातीपैकीं ऐवज दरसाल यावा, त्यास दिक्कत होऊं नये, बिनदिक्कत ऐवज पावावा. कलम १.

सालमजकुरापासून रुजवातीचा ऐवज वाजवीचे रुईनें ठरेल तो देविला जाईल. येणें प्रमाणें करार करावे.

सरकारतर्फेचीं बांदें राहिलीं आहेत तीं व चिमाजीपंत यांचा कबिला वगैरे जीं बांदें असतील तीं सोडावीं. कलम १.

बांदें परस्परें सोडावीं. येणें प्रमाणें करार करावे.

दास्तान माडलें परगणे श्रीवर्धन हा गांव सरकारतर्फेचा इंग्रेजास अमारतपन्हांकडून दिल्हा असे. त्याचा मुबादला गांव ऐवज मवाफिक देवावा. मागील ऐवज गांवचा येणें राहिला आहे तो द्यावा. कलम १.

मागील ऐवज मागूं नये. फडशा झाला. सालमजकुरापासून ऐवज रुजवातीचे ऐवजाबरोबर देवविला जाईल. येणें प्रमाणें करार करावें.

किल्ले मतगड येथें तळसुभापैकीं लोक कुमक आहेत. व सरसुभापैकीं सुबराव बुरूणकर लोकसुद्धां जंजिरेतर्फेचे महालीं आहेत, ते उठवावे, त्यांचीं ताकीदपत्रें द्यावीं. कलम १.

कलमबंदीचे करार जाहले आहेत त्याप्रमाणें अमलांत आल्यावर सरकारचे लोक हुजूर आणविले जातील. येणें प्रमाणें करार करावें.

सालमजकुरापासून रुजवातीचा ऐवज जंजिरातर्फेस येणें. त्यांपैकीं तूर्त जंजिरा न्याव-यास देवावे रुपये २५००० पंचवीस हजार. कलम १.

पैकीं वीस हजार रुपये कराराप्रमाणें बंदोबस्त झाल्यावर तूर्त देविले जातील. येणें प्रमाणें करार करावे.

बंदर राजपुरी व नांदगांव व बरेली वगैरे बंदरें सरकार येथील सावकारी गलबतें व सरकारचा बतेला व कोळी महागिरीया रेवदंडेयास व विजयदुर्गास व वसईस वगैरे ठिकाणीं दस्त करून नेलीं आहेत, तीं सोडावीं. मामलेदारांस ताकीदपत्रें देवावीं.

तहाचें बोलणें लागल्यापासून गलबतें व बतेले व महागिऱ्या वगैरे धरून नेलीं असतील तीं परस्परें सोडावीं. येणेंप्रमाणें करार करावें.

सुवर्णदुर्ग तालुके याजकडून दरसाल ऐवज ४१२५ रुपये सव्वा एकेचाळीसशें पावतात. तो ऐवज मागील चारपांच वर्षें पावत नाहीं. तरी सुदामतप्रमाणें ऐवज मागील देवावा. पुढें सुरळीत चालावें. कलम १.

मागील ऐवज सन खमस अखेरपर्यंत राहिला असेल तो हिशेब पाहून देविला जाईल, पुढें साल मजकुरापासून सुदामतप्रमाणें पावत जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. देशमुखीचा हक्क मागील इस्तकबील तागाईत खमसपावेतों रयत फौती, फरारी जाहली असे. अजि सबब मागूं नये फैसल करावा. सालमजकुरापासून सुरळीत चालेल. कलम १.

देशमुखीचा हक्कदक्क, मानपान, इनाम व ईसाफत, वाड्या, गांव वगैरे सुदामत चालत आलें आहे, त्याप्रमाणें निर्वेध सालमजकुरापासून चालवावें. मागील देशमुखीचा ऐवज सन आर्बा समानीनपर्यंत सरकारचा येणें तो माफ केला असे. सन खमसचा देशमुखीचा ऐवज सरकारांत द्यावा. येणेंप्रमाणें करार करावे.

किल्ले मतगडास, तळ सुभापैकीं कुमक माणूस आहे. त्यास पावती सिद्दी जमरूद यांजकडून जाहली असेल. सुरवराव बुरुणकर सरसुभापैकीं लष्कर यास पावती, नख्त वगैरे जाहली आहे व पंडित प्रधान यांजकडून सिद्दी जमरूद यांस मतगडावरून उतरल्यापासून जाहली आहे. ते आजतागाईत ऐवज दुतर्फा परस्परें मागूं नये. कलम १.

किल्ले मतगडास तळ्यापैकीं लोक आहेत, त्यास व सुरवराव बुरुणकर यास जंजिरा तर्फेकडून पावती झाली असेल ती, व सिद्दी जमरूद हुजूर आले त्यांस पावती झाली आहे. त्यास परस्परें मागूं नये. येणेंप्रमाणें करार करावें.

सिद्दी अबदुल करीम बाळुमिया यांचा पुस्तपन्हा अमारतपन्हाकडून व्हावा. कलम १.

वाजबीचे रीतीनें सांगितलें असतां न ऐकिल्यास पुस्तपन्हा होणार नाहीं. येणें-प्रमाणें करार करावें.

छ २२ जिल्हेज, सन सीत समानीन, अश्विनमास.

---

## रोहिले आणि पेशवे.

### यादी १.

तहनामा राजश्री पंतप्रधान यांनीं खान वालापान फैजमहंमदखान यांस लिहून दिल्हा. मारफती राजश्री पिलाजी जाधवराव व जानोजी ढमढेरे. सुरुसन खमस आर्बैन मया व अलफ तारीख छ ९ सफर ऐसाजेः–तुम्हांकडे मुलूख व गड, किल्ले व ठाणीं होतीं, त्यास मुलूख कुलबाब परगणे व गांव पैकीं निमेनिम सरकारांत घेऊन निमे तुम्हांस दिल्हा. महाल बितपशीलः—

सरकारांत.

१ सरकार भेलशें वजा तर्फा.
 १ महलपूर.
 १ सेवस.
 १ उटखेडा.
 ३
 तीन तर्फा खेरीज करून
 बाकी प्रांत मजकूर.
१ परगणे खोमखेडा.
१ परगणे बोरसें.
१ परगणे दुराहा.
१ परगणे ईछावर.
१ परगणे अष्टें.
१ परगणे सुजालपूर.
१ परगणे उदपूर. वजा
 जागीर सुलतान
 महंमदखान वगैरे.
१ परगणे ताल.

तुम्हांकडे.

१ संस्थान गणोर.
१ परगणे वाडी चेनशाची.
१ परगणे शिलवणी भिलवणी.
१ परगणे शानव.
१ परगणे रायसेन.
१ परगणे गुलगांव.
१ परगणे दिलोद.
१ परगणे हुसंगाबाद.
१ परगणे भोवरी.
१ परगणे भेलशेंपैकीं तर्फा.
 १ महलपूर
 १ सेवस.
 १ उटखेडा.
 ३
॥ परगणे सेवणी निमे.
१२॥

१ परगणे नेमावर पंचमहाल.
१ परगणे सिहोर.
·।।· परगणे सेवणी निमे.
११।।

एकूण साडेबारा परगणे रोहिल्याकडे करार केले असेत.

साडे अकरा परगणे सरकारांत.

येणेंप्रमाणें प्रांत निमेनिम. सदरहूमध्यें गड, किल्ले व ठाणीं याची वांटणी बितपशील.:—

सरकारांत ठाणीं.

१ भेलशें.
१ पटाडी.
१ समसाबाद.
१ अष्टे.
४

८ गढी.

१ सुजालपूर.
१ देवीपुरा.
१ तिसावर.
१ मगरदा.
१ गंज.
१ बनारसी.
१ बोरसें.
१ सिहोर.
८

१२

बारा ठाणीं सरकारांत घेतलीं असे.

तुम्हांकडे.

४ किल्ले.

१ रायसन.
१ गणोर.
१ इसलामगंजर.
१ चोकीगड.
४

१ भूपाळ.
१ महलपूर.
१ सेवस.
१ वतू.
१ हुसंगाबाद.
९

एकूण नऊ ठाणीं रोहिल्याकडे करार केलीं असेत.

येणेंप्रमाणें किल्ले व कोट व गढ्या ठाणीं आहेत. करारप्रमाणें सरकारचीं सरकारचे हवाला करून, बाकी गड, कोट, मुलख तुम्हांस दिल्हा आहे, त्याऐवजीं तुम्हीं चाकरी पडेल तेव्हां फौजसुद्धां करावी. फौज चाकरीस येऊन चाकरी करील, तीस रोजमुरा पोटास शिरस्ते सरकारी बमोजीब घ्यावा. कलम.

याशिवाय किता कलमें बितपशीलः—

सरकारच्या फौजा तुमच्या मुलखांतून येतां जातां पायमल्ली न करावी. ताकीद करावी. कलम १.

रयत तुमच्या परगण्यांतील सरकारच्या मुलखांत आली तर न ठेवावी. तुमची तुम्हांस द्यावी. आमची तुम्हांकडे आल्यावर तुह्मीं न ठेवावी. रयत रजाबंदीनें ज्यांची त्यांनीं घेऊन जावी. कलम १.

सरकारच्या वांट्यांत मुलख आला, त्याजवर तुमची बाकी व कर्ज व तगाई वगैरे कांहीं कज्या असेल, त्याऐवजीं खरीपाचा वसूल साल मजकुरीं छ ९ माहे सफरपर्यंत तुम्हीं घेतला असेल, तो तुम्हांस माफ केला असे. याउपर रयतेसी तुम्हांसी कांहीं संबंध राहिला नाहीं. कलम १.

आवजी कवडे यांच्या वडिलांच्या मुलुखाची सरहद्द लागली. त्यास मशारनिल्हेकडील कोण्हाविषयीं उपसर्ग लागणार नाहीं. येविषयीं मशारनिल्हेस ताकीद केली जाईल. कलम १.

सरकारांत मुलख घेतला त्याचा वसूल छ ९ सफरपावेतों तुम्हांकडे जाहला असेल, तो तुम्हांस माफ असे. अलीकडे येईल तो सरकारचा फिरोन द्यावा. सदरहूच्या वांटणीच्या परगण्याचा आम्हांकडे वसूल छ ९ सफरांत अलीकडे येईल तो तुम्हांस मजुरा सरकारतर्फेनें देऊं. कलम १.

सुलतान महंमदखान यांच्या वडिलांचा तह जाहला असेल त्याप्रमाणें चालवणें. त्यांस तुम्हीं कज्जा न करणें. ते तुम्हांसी कज्जा करितील, तर त्यांस ताकीद केली जाईल. कलम १.

महालची वांटणी निमेनिम जाहली त्यांस हिशेबामुळें का(त)फावत दिसून आली यास्तव तुम्हांस वीस हजार रुपयांचे गांव दिल्हे आहेत. याऊपरी कमज्यादा द्यावयाची रदबदल कांहीं राहिली नाहीं. कलम १.

सात कलमें करार केलीं असेत.

सदरहू प्रमाणें तहनामा करून दिल्हा असे. यांत अंतर परस्परें न व्हावें. खंडणीचा वगैरे उपसर्ग तुम्हांस होणार नाहीं. जाहला करार सदैव चालेल. यांत संदेह नाहीं. जाणिजे छ १ रबिलोवल. आज्ञा प्रमाण.

---

## राजा पृथ्वीसिंग आणि पेशवे.

### यादी १.

यादी राजे पृथ्वीसिंग, जैयपूर संस्थान यांचे मतलब. सुरुसन सबैन मया व अलफ. छ २१ रबिलावल.

परगणे रामपुरा आम्हांस द्यावा. राजश्री तुकोजी होळकर यांचे रजावंदीनें मशारनिल्हेची व श्रीमंतांची भेट जाहली यावर अथवा हर कोणी मातबर पाठवून लिहून रजावंदी करावी. आम्हीं स्नेहाचा अनुभव दाखविल्यानंतर परगणे मजकूर द्यावा. त्यास आम्हीं रामपुरा दिल्ह्यावर दहा हजार फौजेनशीं विनखर्चा चाकरी करावी; अथवा रामपुरीयाचे तनख्याप्रमाणें वसूला बमोजिब आणिक परगणा मोबादला देऊं. दुसरा परगणा मोबादला दिल्हीयावर दहा हजार फौज चाकरीस येणार नाहीं. आम्हीं आपणांसीं स्नेहवृद्धि दिवसेंदिवस अधिक करावी. आमची फौज तुमचे फौजेस सामील व्हावी. जो मित्र आमचा तो मित्र तुमचा; जो आमचा शत्रू तो तुमचा. हिंदुस्थानप्रांतीं मनसवा पडेल तो एके विचारें करावा. आमची फौज जितकी येईल त्याचे हजिरीप्रमाणें आम्हांस वांटा द्यावा. परमुलखाचा तह, जाट सुद्धां वगैरे येणेंप्रमाणें आम्हीं वर्तावें. अनुभव आपणांस आलीयावर परगणे रामपुरा आम्हांस द्यावा. कलम १.

सरदार हुजूर होते ते समयीं, तुम्हांकडील मातबर कोणी येऊन हा प्रकार बोलण्यांत आलाच नाहीं. असो. प्रस्तुत तुम्हांकडील भले माणूस त्रिवर्ग हुजूर येऊन तुम्हांकडील कित्येक मजकूर विदित केला, व रामपुऱ्याविषयींही अर्ज केला. त्यास रामपुरा सरदारांकडे सरंजाम आहे. यास्तव सरदार हुजूर आलीयावर, त्यांस पुसून त्यांची रजावंदी झालीया रामपुऱ्याच्या मोबादला तनखा वसूल बमोजीब तुम्हांपासून सरकार उपयोगी महाल घेऊन रामपुरा द्यावा. अथवा रामपुरा तुम्हांस देऊन त्याचे ऐवजीं दहा हजार फौजेनशीं तुमचे फौजेनें सरकारचे सरंजामाप्रमाणें चाकरी करावी. येणेंप्रमाणें करार.

तुम्हांकडील मातवर फौज पंचवीस तीस हजार हिंदुस्थानचे सरदारांस सामील होऊन त्या फौजेचे स्वरूपानुरूप सरकारचें काम झाल्यास जाटांकडील वगैरे मुलख सुटेल. त्यापैकीं पातशाही मुलख व पेशजी सरकारचा मुलख वजा देऊं. फक्त नवा मुलख जो मिळेल त्यापैकीं तुमचे फौजेचे चाकरीवमोजीब तुम्हांस हिस्सा दिला जाईल. येणेंप्रमाणें करार.

आम्हांकडे आपली बाकी पेशजीबाबद मारफत होळकर व शिंदे आहे, त्यापैकीं आम्हांस सोड द्यावी रुपये ८,००,००० आठ लक्ष. बाकी हिशेबी राहील तो ऐवज चार सालांमध्यें इस्तकबील सन सबैन तागाईत सन सलास. चहूं सालांत ऐवज वारून देऊं. मुदतीस चार सहा महिने अधिक लागले तर व्याज देऊं. ज्याकडे आपण ऐवज देवितील त्याकडे पावता करूं. कलम १.

सरकार व होळकर व शिंदे यांचे हिशेबाचे रूईनें तुम्हांकडे बाकी निघेल त्यापैकीं आठ लाख रुपये तुम्हांस सूट दिल्ही असे. बाकी ऐवज राहील तो इस्तकबील सन सबैन तागाईत सन सलास सबैन चार वर्षांत क्षेपनिक्षेप सालाचा सालांत देत जावा. येणेंप्रमाणें करार.

शहर उज्जनी येथें जैसिंगपुरा आमचा आहे. त्यास ज्या शहरीं आमचे पुरे आहेत तेथें अंमल आमचा चालतो. या पुरीयाचा अंमल शिंदे आह्मांकडे चालवीत नाहीं. त्यास आमचा पुरा आह्मांकडे द्यावा. कलम १.

उज्जनीचा पुरा तुह्मांकडे दिल्हा असे. येणेंप्रमाणें करार.

---

## कर्नूलकर आणि पेशवे.

### यादी १.

यादी नबाब रणमस्तखां बाहादूर कर्णूलकर, श्रीमंत, हैदरखानाचें पारिपत्य करीत आहेत त्यापक्षीं आह्मीं श्रीमंताचे रफिक होतों, फौज घेऊन येतों. त्यासंबंधीं येणेंप्रमाणें कलमें आहेत, तीं कृपा करून मान्य करावीं. सुरुसन सबैन मया व अलफ.

आपण मुखालीपाचे पारिपत्य करीतच आहेत. त्यास पुर्तें पारिपत्य झाल्यास गुंताच वारला. जर सलूख होऊन मुखालीपावर कृपा केलीच तर आमचा बचाव केला पाहिजे. १.

हैदरखानाचें फार करून पारिपत्यच होईल; कदाचित् ईश्वरइच्छेनें सलूखच झाला तर तुमचा बचाव केला जाईल. तालुक्यास तसदी लागणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

स्वदेशीं जाफराबाद परगणा आमची जहागीर आहे. त्यास स्वराज्याकडील अमील उपसर्ग मनस्वी देतो, परगणे मजकूर लावणी होऊं देत नाहींत. तरी स्वराज्याचा अंमल वाजवी घेत जावा. जाजती उपसर्ग जहागिरीस न व्हावा. याप्रमाणें ताकीद निक्षून झाली पाहिजे. १.

त्या प्रांतीचे महाल जालनापूर वगैरे आहेत. त्याचा तह नवाबाचा व सरकारचा असेल त्याप्रमाणें यांही महालाचा चालविला जाईल. येणेंप्रमाणें.

पुण्यास गेल्यावर कसर समजाविल्यानंतर समजोन केलें जाईल. १.

आह्मीं स्वामींकडे येऊन रुसकत होऊन जाऊं. तों आमचे जाबसालांत एक दोघे मातबर मध्यस्थ असावे. १.

कृष्णराव बल्लाळ यांसी बोलणें तें बोलावें. ते विनंति करितील व मध्यस्थीही करितील. येणेंप्रमाणें करार.

आह्मीं आपलें गृहकृत्यामुळें कर्जदार झालों. त्यास आह्मीं आपणांकडे येऊन आह्मांकडील कर्जदार व सिबंदीवाले वगैरे स्वामींकडे फिर्याद होतील. तर त्याची फिर्याद आइकिली न पाहिजे. १.

कोणाचीही फिर्याद मागील ऐकणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

आह्मांवर दरसाल साठ हजार रुपये आहेत. त्यास गृहकृत्यामुळें व गुदस्ता हैदरखानानें मुलुख खराब करून तसदी फार केली, सबब सालाबाद खंडणी आह्मांस माफ केली पाहिजे. खासा स्वारी कर्नाटक प्रांतें झाल्यास आह्मीं आपले फौजेनिशीं रिफाकत करूं.

१.

हैदरखानाचें पारिपत्य होय तोंपावेतों दोन सालें दीड हजार फौजेनिशीं रिफीक असावें. चित्त घालून व डाईजांत मुखालीपाचे पारिपत्य होय तों तहात करीत जावी. हैदरनाईक राजकारणी आहे. कदाचित् तुह्मांकडे गुप्तरूपें राजकारणें अगर तुह्मांकडील कोणी मातबर लोक असतील त्यांजकडे राजकारणें केलीं, तर वरचेवर सरकारांत कळवीत जावीं; आणि राजकारणें करूं नये. आणि तुमचे प्रांतांतील कोणी स्वार व प्यादे ताकीद करून चाकरीस मुखालीपांकडे जाऊं देऊं नयेत, याविषयीं ताकीद करावी. यास्तव तुह्मांवर सरकारांतून रयात इहिदे सबैन व इसन्ने सबैन दुसाला खंडणी माफ व साल-मजकूरचे खंडणीपैकीं वीसा हजारांचा गल्ला हरजिन्नस राजश्री त्र्यंबकराव विश्वनाथ व गोपाळराव गोविंद छावणीस बनाय फौज रहात आहेत. त्यांस पावतां संस्थान रायदुर्ग व शिरें येथें पावतां करावा. बाकी माफ केली असे. चाकरीस दसरा होतांच निघून यावें.

सरकारची फौज छावणीस आहे, तेथें येऊन पोहोंचावें. येणेंप्रमाणें करार.

एकूण पांच कलमें करार केलीं असेत. सदरहूप्रमाणें करारनामा करून देणें.

छ १५ मोहरम, सन सबैन, वैशाख मास, नजिक शिरें.

---

## राघोबादादा आणि पेशवे.

### यादी १.

यादी राजश्री दादासाहेबांकडील करारमदार सुरुसन इसन्ने सबैन मया व अलफ.

कागदपत्र कोणास लिहूं नये. कोणीकडून आल्यास जाब लिहिणें तो तुह्मांकडील कारभारी यांस कळवून लिहूं, व आह्मांस कागद लिहिणें तर कारभारी यांस इतला देऊन लिहूं. येणेंप्रमाणें करार.

वर्षांत अजमासें सहा महिने, बाहेर कृष्णातीर व गंगातीरीं जाऊन राहूं. सहा महिने पुण्यांत राहूं. तुह्मांस ज्या दिवसांत आह्मीं बाहेर गेलों असतां पंच व मनसुब्यास विरुद्ध त्या दिवसांत जाणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

जुने कारभारी यांकडील लेकरी ठेऊं नये. ऐसीयास तुह्मीं याद लिहून द्याल ते ठेवणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

तुमचा कारभारी राहील त्यानें मर्यादेनें असावें. आह्मीं कारभाराचे जातीनें प्रतरणा करणार नाहीं. कच्चें पक्कें सांगणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

लष्करांत येणें तर येऊं, न आल्यास तुह्मीं आग्रह करूं नये. वाईट मानूं नये. येणें-प्रमाणें करार.

आह्मांकडील डौलाचें लिहिणें फडणीस लिहितील. येणेंप्रमाणें करार.

आह्मांकडील जुने भट व कारकून वगैरे यांपैकीं तुह्मीं याद लिहून द्याल. न ठेवावयाचे त्यास न ठेऊं. येणेंप्रमाणें करार.

तुमचे चित्तास आलें तर राऊत माणसें तुमचे सोईस पडतील तितकीं ठेवावीं. मर्यादेनें असावें. आमचे हुकमांत वर्तावें. तीनशाखालीं न ठेवावें. तीन पथकें ठेवावीं. अधिक असल्यास चिंता नाहीं. येणेंप्रमाणें करार.

गडबड झाली तर सर्व माणसें घेऊन किल्ल्यास जाऊं. अथवा तुह्मीं असाल तेथें राहूं. येणेंप्रमाणें करार.

कुरणें बेगमीपुर्तीं सोईचीं द्यावीं. येणेंप्रमाणें करार.

जवाहीर आह्मांकडे आहे तें आह्मांपाशीं राहील. पहिलें आमचें व अलीकडे आह्मांकडे आहे तें राहील. येणेंप्रमाणें करार.

तीनशें माणूस चौकीचे मराठे ठेऊं. जाजती ठेवणार नाहीं. मुसलमान, गारदी वगैरे ठेवणार नाहीं. पुण्यांत राहूं तेव्हां निमे ठेऊं; बाहेर जाऊं तेव्हां तीनशें ठेऊं. अजमासें उणी असल्यास चिंता नाहीं. जाजती न ठेऊं. येणेंप्रमाणें करार.

शागिर्द तीसपर्यंत ठेऊं. जास्ती ठेवणार नाहीं. याशिवाय आचारी, ब्राह्मण, पाणके कामापुरते ठेऊं. जाजती न ठेऊं. येणेंप्रमाणें करार.

मौजे वडगांव येथील बाग व घर व बेलाचीं झाडें आहेत त्यासुद्धां आह्मांकडे द्यावें. येणेंप्रमाणें करार.

पागेवर कारकून आह्मीं आपला ठेऊं. येणेंप्रमाणें करार.

मुलाचे लग्नास रुपये १०,००० दहा हजार द्यावे. येणेंप्रमाणें करार.

मंडळेश्वरास व्यंकटशास्त्री यांस ठेऊं. अनुष्ठान करणार नाहीं. ब्राह्मणभोजन मात्र करावें. करार.

आमचे जुने कारभारी सखारामपंत आदिकरून यांसी आह्मीं कांहीं संबंध ठेवणार नाहीं. चिंतो विठ्ठल व चिंतो अनंत व आबाजी महादेव यांसी कांहीं बोलूं नये. येणेंप्रमाणें करार.

जुन्या शागिर्दांपैकीं कोणी ठेऊं नये. त्यास पांच शागिर्द गरीब, लबाड नव्हत असे तुह्मीं सांगाल ते जुन्यांपैकीं ठेऊं. येणेंप्रमाणें करार.

जुन्या खिजमतगारापैकीं गरीब, लबाड नव्हत अशा दहा असामीस आपलें आमचें मतें ठेवणें होतील ते ठेऊं, बाकी न ठेऊं. येणेंप्रमाणें करार.

लेकाचें लग्न आनंदवल्लीस करूं. तुह्मीं पुण्यांत असतां, आह्मीं त्यांस पुण्यास आणणार नाहीं. नसाल तेव्हां आणूं. येणेंप्रमाणें करार.

राजकारण कोठें करणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

झाल्या कारभाराविषयीं कांहीं बोलणें तर आपल्यांशीं बोलूं. चित्तास येईल तसें करावें. न केल्यास विषाद मानणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

आह्मांकडे कोणी राजकारण केलें व चिठ्ठी, पत्र, निरोप पाठविला, तर आह्मीं तुह्मांस सांगणार नाहीं. तुम्हांस बातमी राखणें तर आह्मांस न कळतां बाहेर राखावी. येणें-प्रमाणें करार.

आह्मी माणसें ठेऊं. त्यांत एखाद्यानें लबाडी केली तरी तुह्मीं आमचे प्रत्ययास आ-णून द्यावी. मग आह्मी त्यास ठेवणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

किल्ल्यावर कोठें जाणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

घोडीं, उंटें वगैरे ठेवण्यास दहा पंधरा हजारांचे गांव सोईचे आमचे मर्जीचे मागित-ल्यास द्यावे. येणेंप्रमाणें करार.

हत्यारें वगैरे जिन्नस आमचे मर्जीचा आह्मांस द्यावा. येणेंप्रमाणें करार.

शागिर्दपेशाचें अजमासाचें कलम—

६० खिजमतगार.
१० चोपदार.
२० ढालाईत.
३० खासबारदार.
३० खास जिलीब.

१५०

सदरहू दीडशें माणूस सदरहू इसमांत ठेवावे. याखेरीज दिवटे, आफतागिरे व हुजूर पागेकडील व पिलखाना व उष्टरखाना वगैरे कारखान्याचे लवाजिम्याप्रमाणें माणूस ठेऊं, जाजती ठेवणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

मौजे पाषण येथील बाग सखारामपंत यांजकडे आहे. त्यांस याचे मोबदला त्यास देऊन तो बाग आह्मांस द्यावा. येणेंप्रमाणें करार.

सालिना खर्चास अजमासें रुपये ५,००,००० पांच लक्ष दरसाल तुह्मीं देत जावे. यांत सर्व खर्च आम्हीं आपला करूं. येणेंप्रमाणें करार.

छ १४ जिल्हेज, सन इसन्ने, फाल्गुन मास."

---

## यादी २.

श्री सांबः सपुत्रो विजयते.

"यादी करारजाबता राजश्री दादासाहेब यांचा, राजश्री माधवराव नारायण पंतप्रधान यांसी. विद्यमान राजश्री तुकोजी होळकर व महादजी शिंदे. सुरुसन तिसा सबैन मया व अलफ.

खर्चाचे बेगमीस जागा बारा लक्षांची द्यावयाचें ठरलें. त्याचा तपशील झांशी वगैरे आलाहिदा आहे. त्याप्रमाणें घेऊन झांशीस स्नानसंध्या करून राहूं.

"किल्ल्याचा खर्च व महाल मजकूर शिबंदी खर्च खेरीजकरून निके (नक्की) बारा लक्ष वसूल होत, ऐसे प्रांत व गांव सरकारपैकीं घेऊन राहूं. येणेंप्रमाणें करार."

कागदपत्र कोणास लिहून सिलसिला राखणार नाहीं. हर कोणाचा कागदपत्र आल्यास उभयतां सरदारांकडील कारकून राहातील त्यांचे हवालां करूं.

"प्रयोजन नाहीं. दुसरे कलमांत ऊगवले असे."

लहान व मोठे आह्मांजवळ आहेत, त्यांजपैकीं ज्यांचे संशय पडावयाचे असतील ते आह्मी आपल्या जवळ ठेवणार नाहीं.

"येथेंच फडशा होईल. त्यापैकीं फिरून आम्हांजवळ आल्यास सरदारांचे इतल्याशिवाय ठेवणार नाहीं. येणेंप्रमाणें करार."

झांशीहून तीर्थास व देवांस जाणें, तरी उभयतां सरदार हिंदुस्थानांत आल्यावर त्यांचे विचारें जाणें ऐसें ठरलें तर जाऊं. मध्यें जाणार नाहीं.

"सरदाराचे संमतीशिवाय करणार नाहीं. करार."

आम्ही आपल्याजवळ स्वार इतलाखी ठेवणार नाहीं. उभयतां सरदारांकडील पांच-सहाशे स्वार राहतील त्यांजलाच कामकाज सांगणें तें सांगून त्यांचेच हातें चाकरी घेत जाऊं, व आह्मी आपले खास पागेचीं घोडीं शंभरपावेतों ठेऊं. जाजती ठेवणार नाहीं.

"दोनशें स्वार इतलाखी ठेऊं. पागेची घोडीं खाशी व शागीर्दपेशा व तट्टे एसी जे लागतील तीं ठेविलीं जातील. जाजतीचें प्रयोजन नाहीं. करार."

झांशीस राहाणें त्यास, गडबड होऊन परचक्राचा उपद्रव प्राप्त जाहल्यास उभयतां सरदार हिंदुस्थानांत जेथें असतील तेथें येऊं. अथवा सांगून पाठवितील त्या स्थळीं राहूं.

"उभयतां सरदारांचे संमतें ठरेल तसें केलें जाईल. करार."

लहान मोठा कारभार आपले डौलाचा जो करणें तो उभयतां सरदारांकडील कारभारी रहातील त्यांचे इतल्यानें करीत जाऊं. कच्चा पक्का जाबसाल त्यांचे दाखल्याखेरीज करणार नाहीं.

"बाहेरील कारभार सांगूं. महालची जमा येईल ते सांगितली जाईल. घरचे खर्चाचा जाबसाल सांगणार नाहीं. करार."

"महालची जमा तीन वर्षेंपावेतों दाखवूं पुढें तोटा व नफा आमचा. येणेंप्रमाणें करार."

बारा लक्षांपैकीं तूर्त झांशी तालुक्यांतून साडेनव लक्षांची झांशी वगैरे जागा लाऊन दिल्ही. बाकी अडीच लक्षांची जागा लाऊन देणें राहिली. त्याजपैकीं किरकोळी गांव कांहीं नर्मदातीरचे वगैरे घाल, त्याची जमा सदरहू अडीच लक्षांत वजा होऊन, बाकी अडीच लक्षांपैकीं राहील ते, उभयतां सरदार हिंदुस्थानांत आल्यावर अंतरवेद वगैरे मुलूख सुटेल, त्याजपैकीं तीर्थासन्निध जागा लाऊन देतील तें घेऊन स्वस्थ राहूं."

"साडेनव लक्षाचे प्रांत यांत सरदारांचे विद्यमानें तोटा येईल तो उभयतांचे मार्फतीनें महाल लाऊन घेऊं व तोटा नक्त घेऊं. तीन वर्षांमध्यें महाल साडेनवचे भरतींत न येत, तरी महाल लाऊन घेऊं. तोंपर्यंत नक्त घेऊं. तोटा येईल तो घेऊं. करार."

देशीहून व हर कोणीकडून कोणाचें राजकारण व निरोप व कागदपत्र आला तरी माणसांसुद्धां उभयतां सरदारांकडील कारकुनाचे हवाला करूं.

"दौलतेस विरुद्ध असें राजकारण आल्यास सरदारांकडील कारकुनास इतल्ला देऊं व करणारही नाहीं. येणेंप्रमाणें करार."

आम्हीं आपल्याबरोबर शागिर्दपेशा, आचारी, पाणके व ब्राह्मण व शागिर्द आदिकरून आगत्य आगत्य नेणें, ते उभयतां सरदारांस इतबार पडे ऐसें नेऊं. गैरइतबारी नेणार नाहीं.

"या कलमाचें प्रयोजन नाहीं."

आम्हांपाशीं शागिर्दपेशा वगैरे ब्राह्मण मंडळींसमेत जे रहातील, त्यांतून हरकोणापासून अंतर उभयतां सरदारांकडील कारकुनाचे विचारें पडलें, ऐसें जाहल्यास त्याजला जवळ ठेवणार नाहीं.

"वाजवी अन्यायी असे ठहरेल त्यास हजुरांत ठेवणार नाहीं. करार."

आम्हांकडून ब्राह्मण वगैरे देशीं रहातील त्यांतून जो कोणी आम्हांजवळ फिरून येईल, त्यास ठेवणार नाहीं. व तुम्हांकडील राजमंडळसुद्धां कोणी फितुरी व तुमचे इतराजीमुळें हरकोणी येईल व परराज्यांतील कोणी येईल त्यास आश्रा देऊन ठेवणार नाहीं.

तुह्मांकडून इतराजी होऊन येईल त्यास ठेवावयाचें नाहीं. परराज्यांतील फौज घेऊन येईल त्यास ठेवणार नाहीं. करार."

एकूण कलमें बारा त्याची निभावणी मखलाशीप्रमाणें केली जाईल. छ १५ मोहरम सुरसन तिसा सबैन मया व अलफ. मुक्काम इंदुरी नजिक तळेगांव."

---

## यादी ३.

"यादी राजश्री दादासाहेब यांजकडील कलमबंदीची, राजश्री माधवराव नारायण पंतप्रधान यांजकडून करार करून घ्यावयाची. विद्यमान राजश्री तुकोजी होळकर व महादजी शिंदे. सुरुसन तिसा सबैन मया व अलफ.

बारा लक्षांचा मुलूख घेऊन स्नानसंध्या करून झांशीस रहावें, असें उभयतां सरदारांचे विद्यमानें ठरलें. त्याप्रमाणें मान्य केलें. त्यास बारा लक्षांचा मुलूख महाल मजकूर व झांशीचे किल्याचा खर्च खेरीजकरून निमे बारा लक्षांची जागा झांशी वगैरे परगणे व गांव लावून द्यावे. रुपये १२,००,००१ यासी सदरहू बारा लक्षांस मुलूख परगणे व गांव लावून दिल्याचा बितपशीलः—

९५३६७६॥≈ तालुके झांशी पैकीं झांशी वगैरे महाल संस्थान वोडसे बाबत आकार कुल जमा. ११३८९७०॥≈ पैकीं वजा महाल मजकूर वगैरे देखील किल्याचा खर्च सुद्धां रुपये १८५२९४ तपशीलः—

१७५२९४ महालमजकूर व किल्याचा खर्च.
१०००० निसबत शिंदे कसबे बारवासागर सरसाल नेमणूक देत जावी.
१८५२९४

बाकी रुपये

२३०३२४।≈ प्रांत अंतरवेद वगैरे सरकार तालुक्यापैकीं मुलूख सुटेल त्यापैकीं तीर्थासन्निध जागा लाऊन परगणे व गांव द्यावयाचा करार. त्याजमध्यें नर्मदातीरीं गांव देणें. त्यासुद्धां आकारांत महाल मजकूर वजा होऊन बाकी सदरहू रुपयांची जागा उभयतां सरदार लाऊन देतील.

१६००० कसबे खेड तालुके मजकूर व मौजे मरकल व मौजे आपटी प्रांत जुन्नर, देहे तीन एकूण अजमासें लिहिलें आहे. जास्ती जमा निघाल्यास अंतरवेद येथील परगणे व गांव लाऊन द्यावे त्यांत वजा होईल.

१२०००० १

बारा लक्ष एक रुपयांची जागा झांशी वगैरे लाऊन दिल्ही. ही घेऊन स्वस्थ स्नान-

संध्या करून आह्मांसी करारप्रमाणें अकृत्रिम चालल्यास इकडूनही करारप्रमाणें निभावणी होईल. येणेंप्रमाणें.

तालुके झांशी पैकीं झांशी वगैरे महाल व गांव संस्थान बोंडसे बाबत बारा लक्षांमध्यें नऊ लक्ष, त्रेपन्न हजार, सहाशें साडेशाहात्तर रुपये, दोन आणे बेरीज लाऊन दिल्ही, त्यांत तोटा येईल तो तीन वर्षें नख्त द्यावें. तीन वर्षें तोटा ठरेल त्याचा मुलूख चौथें वर्षीं लाऊन द्यावा.

सदरहू बारा लक्षांपैकीं नऊ लक्ष, त्रेपन्न हजार, सहाशें साडेशाहात्तर रुपये, दोन आणे याची जागा लाऊन दिल्ही आहे. त्याची वहिवाट जमेची व खर्चाची सरदारांकडील कारकून राहतील त्यांचे मार्फतीनें हस्तबुद अमलाची लावणी होऊन, ऐन जमेपैकीं तोटा बाजवी येईल त्याचा निर्गम सरदारांहातीं सरकारऐवजीं तीन वर्षेंपर्यंत करविला जाईल. चौथे सालीं मुलखाची लावणी हस्तबुद अमलाची होऊन ऐन जमेंत कमी पडेल, त्याची जागा उभयतां सरदारांचे मार्फतीनें हिंदुस्थान प्रांतीं लाऊन दिल्ही जाईल. येणेंप्रमाणें.

मंडळेश्वर व कसरावद इनामी पेशजीपासून आहेत. तीं बारा लक्षांखेरीज देऊन चालवावें. तीर्थरूप कैलासवासी नानासाहेब यांनीं इनाम करून देऊन चालविलें असेल, त्याप्रमाणें बारा लक्षांशिवाय चालेल. येणेंप्रमाणें.

आह्मीं लोकांचें देणें मुंबईहून निघाल्यावर महालचे रसदेचा ऐवज कल्याण वगैरे येथील घेतला आहे. तो व उचापतबाबत व पेशजी खेरदी उंट वगैरे जिन्नस घेतला आहे. त्यासुद्धां अडीच पावणेतीन लक्ष रुपयेपर्यंत अजमासें देणें आहे. त्याचा फडशा करून द्यावा.

हिशेबाचे चौकशीमुळें बाजवी ऐवज ठरेल तो ऐवज, हिंदुस्थानचे स्वारीस सरदार गेल्यावर हिंदुस्थानांत सरकार हिश्शाचा ऐवज उभयतां सरदारांचे विद्यमानें ठरेल त्याऐ-वजीं, अगोदर दोन लक्ष निदान अडीच लक्षपर्यंत उभयतांचे हातें निकाल करून देविला जाईल. येणेंप्रमाणें.

आमचे निसबतीचे कैदेंत असतील ते सोडून द्यावे.

मोरो बाबुराव व महिपतराव त्रिंबक पुरंदरे व रघुपतराव नारायण व बाबुराव हरी व सखाराम हरी खेरीजकरून इतर अटकेंत असतील, त्यांजपासून सरकारांत पक्की खातरजमा करून घेऊन सोडून दिल्हे जातील. येणेंप्रमाणें.

आह्मांजवळ लोक चाकरीस आहेत. त्यांच्या मुलांमाणसांस व घरादारास व वतनास, इनाम, शेतें, जमिनी वगैरे यांस उपद्रव होऊं नये. आह्मां जवळून कोणी देशीं येतील व देशींहून आह्मांकडे येतील, त्यांस उपद्रव मार्गीं होऊं नये. व कोणी कबिले घेऊन आह्मांकडे येतील, कोणी आपले कबिले देशांत पाठवितील, त्यांस अटकाव होऊं नये. ज्याचा संशय

ते खेरीजकरून बाकी चाकरीचे लोक समागमें राहतील त्यांच्या घरादारांस व मुलांमाणसांस व शेतास व वतनास वगैरे अडथळा न होतां कबिलेसुद्धां आपलेकडे जातील येतील व देशीं राहातील, त्यास अटकाव होणार नाहीं. येणेंप्रमाणें.

एकूण सहा कलमें करार केलीं असेत. याप्रमाणें निभावणी होईल. आपण उभयतां सरदारांचे मार्फतीनें दौलतीचा वारसा न करितां स्वस्थ स्नानसंध्या करून राहूं, असा क्रिया-पुरस्सर करारजाबिता करून दिल्हा आहे. त्याप्रमाणें अकृत्रिमपणें कोठें दरज न राखितां, राज्यलोभ न धरितां वर्तावें. यांत अंतर आपणांकडून न पडल्यास इकडूनही यादी-प्रमाणें निभावेल. येविषयीं श्रीआराध्यांची व श्रीगंगाभागीरथीची शपथ असे. येणेंप्रमाणें.

छ १५ मोहरम, सन तिसा सबैन मया व अलफ. माघ मास, मुक्काम नजिक इंदुरी तळेगांव."

---

## झांशी सरंजामाबद्दल.

### यादी ४.

"यादी झांशी सरंजाम नेमल्या पक्षीं.

१ झांशींत पूर्वील सरंजामी आहे ते वजा जाऊन, बाकी सरंजाम द्यावा. तेथील ऐवज महालमजकूर शिबंदीखर्च जाऊन येईल तो पूर्वील यादींत लिहिल्याप्रमाणें सरकारचे कारकुनांचे मार्फतीनें खर्च व्हावा.

१ बुंदेलखंड वगैरे हिंदुस्थानांत श्रीमंत दादासाहेबीं उपद्रव कांहीं न करणें.

१ झांशीस कारकून सरकारचा असावा. श्रीमंत दादासाहेबांकडीलही असलीया चिंता नाहीं.

१ झांशीस स्वार लागतील तर सरदार नेमून देऊं. त्यांनीं झांशीस जाऊन बंदोबस्त करावा.

१ आह्मांस न पुसतां कोण्या सरदारांस, देशांतील व हिंदुस्थानांतील स्वराज्य परराज्यांतील यांस पत्र न पाठवावें. माणूस अथवा कारकून त्यांजकडे न जावा, अथवा त्यांचा न यावा. झांशीसंबंधीं कागदपत्र झांशीस जावे यावे.

१ मध्यस्थ इंग्रज देत नाहीं. होळकर व शिंदे देऊं. किरकोळ सरदारांचे प्रयोजन नाहीं. क्रियाप्रमाण परस्परें व्हावें, व मध्यस्थांनींही चालवावें.

१ हे गोष्ट ठरलिया माधवराव सदाशिव दोघा सरदारांचे मातबर घेऊन येतील.

१ सदरहूप्रमाणें चित्तास न आलीया पूर्वील यादी साता लक्षांची जागीर कमाल

लिहिली आहे, त्याप्रमाणें देऊं. सदरहू झांशीच चित्तास आलीया हीं पूर्वील यादीचीं कलमें आह्मीं लिहिलीं याप्रमाणें करारांत असावीं.

१ उत्तम पक्ष गंगातीरीं कोपरगांवीं राहावें. नाहींतर मंडळेश्वरीं नर्मदातीरीं राहावें. सदरहू कलमें नऊ."

---

## पंतप्रधान व जानोजी भोंसले.

### १ यादी जाबसाल.

"यादी राजश्री पंतप्रधान यांजपासून जाबसाल व्हावयाचे. राजश्री जानोजी भोंसले, सेनासाहेब सुभा यांजकडील. सुरुसन तिसा सितैन मया व अलफ. मुक्काम मौजे कनकापूर सन्निध श्रीब्रह्मेश्वर गंगाउत्तरतीर. छ १४ जिलकाद, फाल्गुन मास.

कडपाचें वतन व निंबगांवचें ठाणें आमचें. त्यास ठाणें वारंवार पाडलें जातें, तें न पाडावें. वतन पूर्ववत्प्रमाणें चालवावें. कलम १.

तीर्थरूप कैलासवासी यांचे वेळेपासून ठाणें निंबगांव व वतन चालतें, त्याप्रमाणें चालवावें व मनसुफीचा ठराव तीर्थरूपांचे वेळेस जाला आहे. त्याप्रमाणें करावे. येणेंप्रमाणें करार.

हिंदुस्थानांत फौजा जातात ते महालांत उपद्रव करितात, यास्तव पहिल्यापासून हिंदुस्थानांत जातात त्या वाटेनें सरकारचे फौजांनीं जावें. कलम १.

पहिल्यापासून ज्या वाटेनें फौजा जातात त्या वाटेनें जातील. उपद्रव लागणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

भाऊबंदांचीं राजकारणें सरकारांत आलीं तर परिछिन्न ऐकूं नयेत. आमचे आह्मांकडे लावून द्यावे. आपण आश्रय देऊं नये. कलम १.

तुह्मीं त्यांचें चालवावें. येथून कोणास आसरा देणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

इंग्रजांचा कज्या कटक प्रांतीं आहे, त्याचा फडशा होत नाहीं. त्यास फौज पाठविली पाहिजे अथवा खाशांनीं गेलें पाहिजे. येविषयीं आज्ञा असावी. कलम १.

सरकारांत मसलत नाहीं व तुमची फौज न आल्यास पेंच नाहीं असें असल्यास, फौज पाठविण्याची आज्ञा केली जाईल; अथवा तुह्मांसच निरोप दिल्हा जाईल. येणेंप्रमाणें करार.

आमचे कर्जदार आहेत ते दरवर्षास सरकारांत येऊन बोभाट सांगून आह्मांस त्वष्ट लावितील. त्यास प्रस्तुत दौलतेंत पैका नाहीं. यास्तव कोणाचा अर्ज ऐकून तूर्त आह्मांस तगादा न व्हावा. पुढें दौलतेंत पैक्याची आमदानी जाल्यास वाजवी कर्ज असेल तें आज्ञेप्रमाणें वारूं. कलम १.

येणेंप्रमाणें तूर्त तगादा तुह्मांस लागणार नाहीं. पुढें सोईनें वारीत वारीत वारावें. येणेंप्रमाणें करार.

प्रस्तुत आमची खराबी झाली. सबब हलके जाणून कोणी उपद्रव करील, तर ममतापूर्वक साहित्य करावें. कलम १.

साहित्य केलें जाईल. येणेंप्रमाणें करार.

दर्यापूरकर खान मशारनिल्हे दरसाल आह्मांकडील बोभाट सांगतात. त्यांस नेमणूकप्रमाणें घासदाणा आह्मी घेत जाऊं. जास्ती उपद्रव लाविणार नाहीं. येविषयीं त्यांस ताकीदपत्र. कलम १.

तुह्मीं वाजवी घासदाणा मात्र सुदामतप्रमाणें घ्यावा. जास्ती उपद्रव लाऊं नये. येणेंप्रमाणें करार.

आमच्या घरचे लहानमोठे चाकर तुफानें सांगून सरकारचा क्षोभ करवितात. त्यास येविषयीं पुर्ता शोध करून आह्मांकडे दोष असल्यास मनास आणून, आज्ञा करणें ती करावी. कलम १.

पुर्ता शोध करूनच केलें जाईल. उगाच आरोप ठेऊन निमित्त ठेवावें, असें घडणार नाहीं. तुह्मीं सरळपणें वर्तावें. येणेंप्रमाणें करार.

नबाब निजामअल्लीखान यांचा व आमचा वऱ्हाडचा तह चालतो. त्यास आह्मांस कमजोर पाहून तह मोडून बिघाड केला, तर सरकारांतून आमची कुमक व्हावी. आमचा सलख व बिघाड सरकारचे सलख बिघाडांत. येणेंप्रमाणें. कलम १.

येणेंप्रमाणें करार.

वासीम, दारवें वगैरे माहालीं सरदेशमुखीचे अमलामुळें गोपाळ केशव उपद्रव करितात. त्यास वाजवी सरदेशमुखीचा अमल करावा. जास्ती उपसर्ग करूं नये. येविषयीं त्यांस पत्र. कलम १.

वाजवी अमल करणें, जास्ती उपद्रव न करणें, म्हणून पत्र देणें.

वऱ्हाडची सरदेशमुखी पेशजी तुम्हांकडे दिल्ही आहे. त्याप्रमाणें करार असे. येणेंप्रमाणें करार.

लहानसाहान निमित्य ठेऊन, लटका आरोप मात्र ठेवावा, असें न व्हावें. आम्हांकडील कागदपत्र अथवा दाखला मुकाबला असल्यास आम्हांस सांगोन आमचे अंगीं वाजवीचे रीतीनें लाऊन मग आज्ञा करणें ती करावी. कलम १.

तुम्हींही कोठें राजकारण राखूं नये. बदमामली करूं नये. तेथूनही ममतापूर्वक निखालसपणें कृपा केली जाईल. येणेंप्रमाणें करार.

आमचे नांवें सनद कीं, पटणें, मकसुदाबाद, कटक, वऱ्हाड, चांदें, गोंडवण, वरघाट घासदाणा गंगथडी व सरकारचे महाल करारप्रमाणें वजा होऊन, बाकी घासदाणा व मंड-ळ्याचे परगणे व भूगाळचे परगणे चालतात ते, व दाबिले आहेत ते छत्तीसगड व चुटीया-नागपूर व वस्तर वगैरे कदीम मुलूख, कैलासवासी महाराजांपासून वगैरे व नवे चालते आजपर्यंत ते अनुभवून करारप्रमाणें वर्तणूक करूं. सरकारांतून कोणेंविषयीं पेंच न करितां कृपा करावी. कलम १.

सदरहू प्रमाणें सनद. येणेंप्रमाणें करार.

सरकारांत कोठें पेंच न पडे आणि मामलत संमंधें जाबसाल असतील तेथें कार्याकारण कागदपत्र लिहावयाविषयीं आज्ञा असावी. कलम १.

मामलतसंमंधें जाबसाल लिहिणें तो लिहावा. राजकारण राखूं नये. येणेंप्रमाणें करार.

कैलासवासी नानासाहेबांनीं पुत्राप्रमाणें लोभ केला. त्याप्रमाणें आपणही अकृत्रिमपणें ममता करून चालवावें. यांत अंतर करूं नये.

तुम्हीं एकनिष्ठेनें वर्तावें. या दौलतीचें कल्याण तेच वर्तणूक करावी. तुम्हांवरही अकृत्रिमपणें, ममतापूर्वक, कुटुंबांतील असें जाणूनच कृपा केली जाईल. यांत गुंता नाहीं. येणेंप्रमाणें करार.

जामनेरचा किल्ला सरकारांत घेतला आहे तो माघारा द्यावा. कलम १.

किल्ला जकिरासुद्धां सेनासाहेब सुभा यांचे स्वाधीन करणें म्हणोन राघो बावाजी यांस सनद देणें.

पहिल्यापासून नबाब निजामअलीखान यांजकडे व इंग्रजांकडे कटकचे जाबसालास वकील राहातात. त्याप्रमाणें राहातील. सरकारचे वकिलांचे इतल्यानें राहातील. ते मामलतीशिवाय जाबसाल करणार नाहींत. कलम १.

येणेंप्रमाणें करार.

घासदाण्यासाठीं फौज फिरते. यामुळें कोठें लहानसाहान उपद्रव लागतो. त्याविषयीं रोष न ठेवावा. आम्हांस सांगून माघारे देवावे. देऊं. कलम १.

येणें प्रमाणें करार.

घासदाणा वसूल करावयास आमची फौज येतं. त्याजवर उभयतां निंबाळकर दंगा करितात. येविषयीं त्यांस ताकीद व्हावी व पत्रेंही द्यावीं. कदाचित् न ऐकिल्यास सरकारांतून त्यांस शिक्षा व्हावी. कलम १.

येणेंप्रमाणें पत्रें द्यावीं व ताकीदही केली जाईल. येणें प्रमाणें करार.

मंडलेवाल्यांस व भूपाळवाले यांस पत्रें कीं, पेशजीपासून सेनासाहेब सुभा यांजकडे मुलूख चालतो. त्यास ऊपद्रव न देणें. व यांचे महाल दाबिले असतील ते सोडून देणें. येविषयीं पत्रें द्यावीं. कलम १.

सरदरहू प्रमाणें पत्रें देणें.

---

## यादी २.

यादी राजश्री जानोजी भोंसले, सेनासाहेब सुभा, यांजकडील करार मदाराची याद. मुक्काम मौजे कनकापूर संनिध श्रीबम्हेश्वर गंगाउत्तर तीर. सुरुसन तिसा सितैन मया व अलफ. विद्यमान राजश्री दिवाकर पुरुषोत्तम. छ १४ जिल्काद.

सरकारांत जाहागीर द्यावी.

१ जुनी जाहागीर सरकारांतून महाल दिल्हे आहेत, ते माघारे द्यावे.

१ रेवा मुकूंदपूर.
१ च्यार ठाणें.
१ जिंतूर.
१ साकरखेड.
१ मेहेकर.
५
१ मोहोबा.
६

१ फत्तेसिंग भोंसले यांचा हिस्सा वऱ्हाड प्रांतें आहे. तो घ्यावा. अगर परगणा जामोद व परगणा अकोट व परगणा आडगांव हे तिन्ही महाल यांत सरकारचे मर्जीस येईल ते घ्यावे.

येणें प्रमाणें करार जालीयावर मोबदला बाळापूर मागितलें तर करार केला असे. पुढें घालमेल करूं नये. जालीयास घडणार नाहीं.

किता कलमें:—

१ हिंदुस्थानांत पातशाहा इंग्रज व नजीबखान, सुज्यातदौला वगैरे हिंदुस्थानचे सरदार यांजकडे खतपत्र पाठवूं नये व राजकारण राखूं नये.

१ मशारनिल्हेनीं सरकारांत अकृत्रिमपणें चालावें. कोणासीं राजकारण राखूं नये. फितवा फांदडा करूं नये. निष्ठेनें सेवा करावी. ज्या गोष्टी सरकारांत विरूद्ध ते गोष्ट

करूं नये. चाकरीस बोलावूं तेव्हां आपण यावें, अगर भावास पाठवावें. अगर दिवाकर पुरुषोत्तम यांणीं यावें.

१ कटकाविषयीं जावसालास इंग्रजांकडे वकील असावा. त्यानें मामलतसंबंधीं मात्र जाबसाल करावा. व कागदपत्र जाणें तोही मामलत संमधें जावा. दुसरे प्रकारें कांहीं नसावें.

१ नवाब निजामअल्लीखान यांजकडे पूर्ववत् प्रमाणें वकील असावा. त्यांनीं वऱ्हाडचे मामलत संमधें व घासदाणा संबंधें जाबसाल करावा. व तुह्मीं लिहिणें तें याच जाबसालाचें लिहावें. वरकड कोणेंही विषयीं सिलसिला राखूं नये. वकील, सरकारचे वकिलांचे इतल्यानें असावा.

१ नवाबाचे महालांत घासदाणा घेतला, त्याचा मुकरार करून ऐवज नवाब देतील. न दिल्यास घासदाणा मात्र घ्यावा. वरकड कोणेविषयी त्यांचे महालास तसदी देऊं नये.

येणें प्रमाणें पांच कलमें करार.

सरकारचे महालांत घासदाणा घेऊं नये व उपद्रव लावूं नये.

१ परगणा जालनापूर.
१ पैठण.
१ आंबड.
१ गांडापूर.
१ वैजापूर.
१ वलोज.
१ आंबडापूर.
१ राजणी.
१ रोशनगांव.
१ आंवढें.
१ आंबें जोगाईचें.
———
११

अकरा महाल लिहिले आहेत. याशिवाय पेशजीं करारांत घासदाणा घेऊं नये असा महाल असेल, तेथील घेऊं नये. वरकड सरकारचे महालीं सालाबादी घासदाणा घ्यावयाचा असेल, त्याप्रमाणें करार करून, ऐवज सरकारांतून देवविला जाईल. महालास उपद्रव काडीभर लागूं नये. येणें प्रमाणें करार.

सरकारांत नजर रुपये ५,००,००१ पांच लक्ष, एक रुपया द्यावयासी खिस्तबंदीः सालमजकूर सन तिसापासून दरसाल एक लक्ष देत जावे. सालमजकूरचा ऐवज अखेर सालीं द्यावा. पेस्तर दरसाल दसऱ्यास देत जावा. येणें प्रमाणें करार.

कोणी शिलेदार अथवा जो कोणी सरकारांत रुजूं नसेल, त्यास तुह्मी ठेऊं नये. आसरा देऊं नये. येणें प्रमाणें करार.

वासीमचे कापड दोन हजारांचे व बाळापूरचे तीन हजारांचे या प्रमाणें दरसाल चांगलें फर्मासी पाठवीत जावें. येणें प्रमाणें करार.

फौज तुह्मीं ठेवणें ते, आपले ऐवजापुर्ती ठेवावी. अधीक ठेऊं नये. येणेंप्रमाणें करार.

फत्तेसिंग भोंसले यांचा वऱ्हाड प्रांती हिस्सा आहे तो घ्यावा. अगर आंकोट, आडगांव, जामोद हे तिन्ही महाल सरकारांत घ्यावे. असें वरते कलम लिहिलें आहे. त्यास हल्लीं दोही मजकुराचे ऐवजीं बाळापूर परगण्यांत तुमचा अमल सरदेशमुखीसुद्धां दरोबस्त असेल, तो सरकारांत घ्यावा व सनदा द्याव्या. येणें प्रमाणें वरचे प्रमाणें रद्द असेत. बाळापूर करार असे.

---

## साबाजी भोंसले यांनीं वर्तावयाचीं कलमें.

यादी ब्रह्मेश्वरचे मुक्कामीं कराराची याद जाली आहे, त्याप्रमाणें हल्लीं राजश्रीं साबाजी भोंसले सेनासाहेब सुभा यांनीं वर्तावे. त्याशिवाय कलमें सुरुसन सलास सबैन मया व अलफ. छ ६ जमादिलावल, मुक्काम पुणें.

सरकारचे महाल आहेत तेथें घासदाणा वगैरे ऊपद्रव देऊं नये. पेस्तर महाल सरकारांत जे येतील, तेथें घासदाणा वगैरे याचा उपसर्ग लागूं नये.

परगणे पाथरी येथील मामूलचा घासदाणा आहे. त्याप्रमाणें व्यंकाजी गणेश सरकारचे कमाविसदार यांचे विद्यामानें घ्यावा. मुलखांत उपद्रव करूं नये. बिडास घासदाण्याचा उपद्रव एकंदर करूं नये. घासदाणा सुदामत नाहीं सबब.

सरकारांतून तुह्मांस फौजसुद्धां बोलाऊं पाठऊं. ते समयीं दिगर न लागतां तुह्मींच यावें. विलंब एकंदर करूं नये.

पेशजीचे तहनामीयावर करजदाराचें कलम लिहिलें आहे. त्यास सावकारांस ऐवज देणें तो तुह्मी द्यालच. परंतु सरकारची उगवणी ज्या खतावर आहे, ते खताचे उगवणीचे रुपये तुह्मीं अगत्यवाद धरून अगोदर वारावे. आणि खतें काढून आणून द्यावीं. दिसगतीवर घालूं नये.

---

## यादी पंतप्रधान व सेनाधुरंधर यांजमधील करारमदार.

यादी राजश्री पंतप्रधान यांसी व राजश्री सेनाधुरंधर यांसी करार मदार, राजश्री सेनासाहेब सुभा यांजकडील ठरण्यांत आलेत. छ १ माहे जिल्काद सुरुसन सीत समानीन मया व अलफ. सन ११९५. मुक्काम पुणें.

पूर्वी चिरंजीव राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा पुरंदरास आपले भेटीस आले. त्या प्रसंगीं कित्येक प्रकार स्नेहाचे व ऐक्यतेचे परस्परें दृढत्तर होऊन, त्यांचें येणें पुन्हां नागपुरास घडलें. त्यानंतर दिवाकर पुरुषोत्तम यांचें येणें पुण्यास झालें. त्या प्रसंगीं इंग्रज आदिकरून जे संशय निर्माण झाले होते, ते निर्षण होऊन करारामदाराचे प्रकार परस्परें ठरण्यांत आले. सांप्रत आमचें येणें आपले भेटीकरितां झालें. तेव्हां या प्रसंगीं परस्परें सर्वोत्कर्षे निश्चयात्मक बोलणीं करारमदार ऐसा ठरावा कीं, याची बुनयाद बहुत दिवस कायम राहे, व कोणेही प्रसंगीं परस्परें दुसरा प्रकार नमूदीस न ये, व वंशपरंपरा उपयोगास येई, ऐसें झालें पाहिजे. कलम. १

पूर्वी राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा व दिवाकर पुरुषोत्तम भेटीस आले, ते समयीं बोलणीं झालीं. प्रस्तुत तुमचें येणें झालें. स्वच्छतेचीं बोलणीं जाहलीं. संशय राहिला नाहीं. तुह्मांकडून लिहिल्याप्रमाणें वर्तणूक घडावी. इकडूनही दुसरा प्रकार होणार नाहीं. खातरजमा असावी. येणें प्रमाणें करार करावें.

चिरंजीव सेनासाहेब सुभा यांचे नांवें सनदा ऐशा कीं, मकसुदाबाद व सुभे पटणें व कटक प्रांत वौडासा बमय संभलपूर व प्रांत छत्तीसगड व चुटिया नागपूर व प्रांत बस्तर वगैरे व प्रांत वऱ्हाड व संस्थान देवगड व संस्थान चंद्रपूर बमय उटनूरसुद्धां व प्रांत वरघाट मूळ तापी वगैरे व बासदाणा प्रांत गंगथडी व प्रांत गढेमंडळ येथील रेवा दक्षणतीर दरोबस्त तालुका हे कैलासवासी महाराजांपासून चालत आहे. त्याप्रमाणें हलीं दरोबस्त सनदा झाल्या पाहिजेत. कलम १.

पेशजीपासून आहे त्याप्रमाणें करार करून सदरहू प्रमाणें सनदा. येणें प्रमाणें करार करावें.

चिरंजीव खंडोजी भोंसले सेनाबहाद्दर यांस सरंजाम प्रांत गढेमंडळ, रेवा उत्तरतीरचा दरोबस्त प्रांत, व ठाणें जात व गड जात सुद्धां, देणीयांचा करार पेशजी कैलासवासी दिवाकर पुरुषोत्तम यांचे विद्यमानें ठरला आहे. त्याप्रमाणें चिरंजिवांकडे संस्थान बहाल करोन सनदा देविल्या पाहिजेत. कलम १.

येविषयींचें बोलणें होऊन अलाहिदा यादी ठरली आहे. त्याप्रमाणें सनदा देविल्या जातील. येणें प्रमाणें करार करावें.

जागीरदारांचे हर्षामर्षामुळें वऱ्हाडांत व गंगथडींत कमती झाली. दिवसोनदिवस जागीरदार भारी होत चाललेत. नवाबांचा आपला स्नेह व इकडीलही स्नेह. अळजपूरचे तहाप्रमाणें जागीरदारांनीं वर्तणूक करावी, ऐसी नवाबांकडून निक्षून ताकीद असतां, ते मानीत नाहींत. जमाव ठेऊन हिश्शाचें कामांत खलेल करितात. येणेंकडोन लाखोच रुपयांची नुकसानी दिवसोनदिवस होत चालली. कथं चित् जागीरदारांसीं एखादा हर्षामर्ष जाला, तेव्हां नवाबांचे मर्जींत अंतर पडेल. जागीरदार तो आपले कडोन उपाधीस चुकत नाहींत. इकडून मात्र बरदास्त करण्यांत येती. याची सलाह कैसी करावी ही सांगितली पाहिजे. कलम १.

अळजपूरचे मुक्कामीं नवाबांचा व तुमचा तह झाला आहे. त्याप्रमाणें परस्पर वर्तणूक असावी. कांहीं नवाबांकडून व त्यांजकडील जागीरदारांकडून जाजती झाली असल्यास त्यांसीं बोलोन बंदोबस्त करून देविला जाईल. येणेंप्रमाणें करार करावें.

प्रांत कडेवलीत येथील वतन देशमुखी आमचें पूर्वींपासून आहे. तें आपण चालवीतच आहेत. परंतु कसबे मजकूरचें ठाण्यामुळें व सरकारांत चार गृहस्थ मुत्सद्दी आहेत यांजमुळें, कडेकराची हिमायेत होऊन ठाणें आमचें स्वाधीन होत नाहीं. त्यास ज्यापक्षीं आमचे तर्फेची आपणांस खातरजमा आहे त्यापक्षीं, ठाण्याचा रखना दरमियान नसावा. ठाणें देवावें. वतन संबंधीं जावसाल किरकोळी आहेत ते उरकून द्यावे. व नगर हवेली येथील अठरा गांवचा वसूल हुंडा देतात. त्यास ताकीद होऊन, शेंकडा दोनरुपये प्रमाणें रुसूम परगणीयाचे वहिवाटीप्रमाणें मिळे येविषयीं ताकीद झाली पाहिजे. कलम १.

सुदामत चालत आलें आहे त्याप्रमाणें चालेल. त्यांत दिक्कत पडलीयास ताकीद करून चालविलें जाईल. येणेंप्रमाणें करार करावें.

मौजे दहीगांव व मौजे पळशी संमत वाघोली, प्रांत वांई हे गांव दरोबस्त पूर्वींपासून आह्मांकडे चालत आहेत. त्यास जिल्हे बाब प्रतिनिधींकडील व मोकासबाब पैकीं व कसर पंचोत्रा आदिकरून उपद्रव आहे. तो कुलबाब, कुलकानू दरोबस्त इनामपत्रें करून देऊन निर्वेध झालें पाहिजे. कलम १.

दोही गावांकडे सरकारचा व प्रतिनिधींकडील अंमल आहे त्याचा मक्ता ठराऊन द्यावा. त्याप्रमाणें दरसाल ऐवज घेत जावा. जास्ती फड फर्मायेश वगैरे कोणेविषयीं उपद्रव न लावणें. रोखापत्र गांवांवर न करणें. ह्मणून सरकारचे मामलेदार व प्रतिनिधी यांस सनदा. येविषयींच्या मखलासीच्या यादी आलाहिदा झाल्या आहेत. त्याप्रमाणें सनदा दिल्या जातील. येणेंप्रमाणें करार करावें.

मौजे पळशी, संमत वाघोली, प्रांत वांई येथील शिवेवर डोंगर आहे. तो निमे किले नांदगिरीकडील हद्देचा तिकडेस चालत होता. व मौजे मजकूरचे तर्फेचा मौजे मजकुराकडे चालत होता. अलिकडे किलेवाले जबरदस्ती करोन दरोबस्त राखितात. त्यास किलेवाली-यांस निक्षून ताकीद होऊन, पूर्ववत् प्रमाणें गांवचा डोंगर गांवांकडे चालविला पाहिजे. कलम १.

मौजे मजकूरचे हद्देचा डोंगर मौजे मजकुरांकडे चालत होता. हल्लीं तुह्मी चालूं देत नाहीं. साराच किल्याकडे राखतां. त्यास सालमजकुरापासून पूर्ववत् प्रमाणें गांवच्या हद्देचा गांवांकडे करार करून दिला असे. चालविणें ह्मणून मामलेदारांस सनद देवावी.

त्र्यंबकेश्वरचे सालीं कैलासवासी तीर्थस्वरूप जानोजीबावा यांचा व आपला तह झाला, तेव्हां पांच लाख रुपये द्यावे ऐसा करार झाला होता. त्यापैकीं पेशजी वसूल जाऊन, बाकी राहिली असेल ती माफ करावी. कलम १.

दोन लक्ष सत्तर हजार रुपये नजरेपैकीं बाकी येणें. ते माफ केले असेत. येणेंप्रमाणें करार करावें.

मौजे विरल परगणा नळदुर्ग येथें तीर्थस्वरूप कैलासवासी जानोजीबावा यांचा काळ झाला. तेथें देऊळ बांधून अन्नछत्र घालावयाचें आहे. लांकूडफाटा वगैरे तेथील साहित्यास मौजे मजकूर स्वराज्याचा अंमल सरदेशमुखी व बाबती व चौथाई वगैरेसुद्धां दरोबस्त इनाम करून देविलें पाहिजे. कलम १.

अलाहिदा यादीवर मखलाशी झाली आहे. त्याप्रमाणें चालेल. येणेंप्रमाणें करार करावें.

वरकड कलमें कैलासवासी दिवाकर पुरुषोत्तम यांचे वेळेस ठरलीं आहेत. त्याप्रमाणें वर्तणुकींत असावें. कलम १.

येणेंप्रमाणें करार करावें.

मातबर मसलत उपस्थित झाल्यास आह्मांस बोलवावें आणि आह्मीं होऊन यावें. याची सूचना आगाऊ दोन महिने व्हावी. सामान्य कामें असल्यास होऊं नये. कलम १.

येणेंप्रमाणें करार करावें.

पूर्वील करार व तह ऐसा आहे कीं, प्रांत बौडासा व कटक दरोबस्त इकडे जें चालत आहे तें चालून, त्याशिवाय सुभे मकसुदाबाद व पटणें, बारा लक्ष रुपये ऐन, शिवाय कारकुनी दोन लक्ष रुपये, एकूण चवदा लक्ष रुपये प्रतिवर्षीं देत जावे. हा ऐवज तहाप्रमाणें पूर्वीं पोहोंचतही गेला. सांप्रत इंग्रजांकडे या हिशेबाची करोडों रुपये बाकी निघती. त्यास इंग्रजांकडील जाबसाल सलुकाचा अपणांकडील ठरला. आमचा तैसाच राहिला आहे.

त्यास आपले सलुकांत सर्वत्रांचा सलूक. याकरितां इंग्रजांकडील आमचा तहाचा ऐवज त्यांजला ताकीद होऊन त्याचा मार्ग घडावा. त्यांनीं मार्ग न केल्यास आह्मांकडील फौज जाऊन ज्याप्रमाणें ऐवज मिळेल त्याप्रमाणें ऐवज घेण्यांत येईल. त्या प्रांताचा व त्या सुभ्याचा जिमा पूर्वींपासून आमचा आहे. याविषयीं जें साहास व जो प्रकार घडला आहे तो विदितच आहे. तेव्हां दुसऱ्यांनीं उद्योग करावा ऐसें तों नाहींच. याजकरितां येथून पुर्ता निश्चय याविषयीं करारांत यावा. कलम १.

प्रांत वौडासा व कटक दरोबस्त तुह्मांकडे चालत आहे. सुभे मकसुदाबाद व पटणें येथील करार, ऐवजाचा तुमचा आहे. त्यास येविषयीं इंग्रजांसीं बोलोन स्नेहाचे वाटेनें जसें होईल तसें केलें जाईल. करार करावें.

प्रांत गढेमंडळ येथील नर्मदा दक्षणतीरचा दरोबस्त तालुका बमय चवरागड हा पूर्वीं कैलासवासी नानासाहेब यांनीं तीर्थरूप कैलासवासी बाबासाहेब यांसीं दिला होता. त्याप्रमाणें तिगस्ता राजश्री बळवंतराव विष्णु यांचे विद्यमानें, दरोबस्त तालुके याच्या सनदा करून दिल्या. त्याप्रमाणें हल्लीं सनदा चिरंजीव सेनासाहेब सुभा यांचे नांवें करून द्याव्यात. कलम १.

पेशजी करार झाला आहे त्याप्रमाणें सनदा देविल्या जातील. येणेंप्रमाणें करार करावें.

परगणा शिवणी, हुसंगाबाद बमय किल्ला व गुणोर व चाळीसा व बाडी वगैरे हे महाल कदीमपासून संस्थान देवगडचे तालुक्यांतील. तेथील अंमल भूपाळकरांनीं दाबिला आहे. करार वाकही मिळत नाहीं. याविषयीं ताकीदपत्रें संस्थानिकांस देऊन व सनदा पूर्ववत् प्रमाणें चिरंजीव सेनासाहेब सुभा यांचे नांवें करून देववाव्या, ह्मणजे तेथील बंदोबस्त करण्यांत येईल. कलम १.

पूर्वींपासून चालत आलें आहे त्याप्रमाणें चालवावें, व महाल दाबिले असतील ते सोडून द्यावे. येविषयीं भूपाळकरांस पत्र देवावें.

जेथें दौलत तेथें दायादसंबंधीं द्वेष व संच्यार नानाप्रकारचे त्यांनीं करावे व कोणेही प्रकारें स्थिरचित्तें राहूंच नये ऐसी त्याजकडील चाल. संधी पाहून फंद करावे, काबू वेळ प्रसंग त्यांनीं पहात असावा. त्यास कोणेही द्वेषबुद्धीनें अथवा वैरसंबंधीं या दौलतीचे अपायाविषयीं चालना करील व अनुसंधान लावील, तें लागूं देऊं नये. व येविषयीं त्यांस निषेध व शिक्षा आपणांकडून पुर्ती असावी. आणि इकडील खातरजमा पुर्ती करावी. व मातबर सरदार इकडील आपल्यांकडे आला, तरी त्यास आमचे इतल्याशिवाय व मर्जीशिवाय आपणांपाशीं ठेऊं नये. कथंचित् त्यांजकडोन अनुसंधान आलें, तरी त्याचा

इतला आह्मांस करावा. दायाद अथवा सरदार यांस जागा मिळो नये. आमचे स्वाधीन करोन द्यावे. त्यांचे येथून चालविण्यांत येईल. कलम १.

तुह्मीं स्वरूपाप्रमाणें चालवावें. असें करितां कोणी सरकारांत आला, तरी त्यांस आश्रा देणार नाहीं. व सरकाराचे सरदार वगैरे तुह्मांकडे कोणी गेले, तरी तुह्मीं ठेऊं नये. आश्रा देऊं नये. येणेंप्रमाणें करार करावें.

मौजे देऊर, संमत वाघोली, प्रांत वाई हा गांव दरोबस्त इनाम राजपत्रीं आह्मांकडे आहे. तेथील सरदेशमुखी व कसर पंचोत्रा एकूण रुपये तीनशें सरकारांत घेतात. त्यांस मौजे मजकूर येथील सरदेशमुखी व कसर पंचोत्रासुद्धां अंमल कुलबाब, कुलकानू दरोबस्त इनामपत्र करून देऊन, निर्वेध झालें पाहिजे. कलम १.

याची मखलासी अलाहिदा झाली आहे, त्याप्रमाणें चालेल. येणेंप्रमाणें करार करावें.

मातबर मसलतीस इकडून सामील व्हावें व तिकडोन बोलावणें हेच सलाह. यांतील तीन प्रकारः—प्रथमतः स्वतः जातीनें मातबर फौजसुद्धां यावें; अथवा चिरंजीवास बिदा करावें; अगर कोणी मातबराबरोबर फौज देऊन बिदा करावें. या तीहीं प्रकारांतून भलता एक प्रकार, यथाशक्ती जैसा प्रसंग पडल्याप्रमाणें घडेल. परंतु फत्तेअलीखान अथवा दुसरी मोहीम येऊन नमूद झाली, त्या प्रसंगास आपले स्वरूपानुरूप यावें व घडावें ऐसीं पत्रें जर आलीं, तेव्हां त्या प्रसंगास येऊन घडविलें पाहिजे. याचें घडणें व आम्हांकडून घडविणें हें सर्वस्व आपणांकडे आहे. श्रीमंत महाराज कैलासवासीचे वेळेस तीर्थरूप बाबासाहेब यांचें जाणें कर्नाटकास झालें होतें. ते वेळेस वांटणी नेमून दिल्ही होती, हें आपलें ध्यानांतच आहे. कर्नाटकचा नागपुरीहून पल्ला लांब व त्या मुलखांत वरकडांसारखी सोई इकडील नाहीं. याकरितां सूचनार्थ लिहिलें असे. त्यास फौजेचे पोटाचा बंदोबस्त व्हावा. गळाठा झाला न पाहिजे. कलम १.

खर्चास द्यावयाचा अलाहिदा यादीवर करार झाला आहे त्याप्रमाणें पावेल. येणें-प्रमाणें करार करावें.

मौजे आसनगांव, प्रांत वाई येथील कुरण, भिकाडोंगरचें व चंदनवंदनचें पहिलें पासून आम्हांकडे देऊरीं असतां चालत होतें. अलिकडे किले चंदनवालीयांनीं दाबिलें आहे. तें हल्लीं पूर्ववत्प्रमाणें आमचें आम्हांकडेस बहाल करून देऊन, येविषयीं ताकीद चंदनवालीयांस झाली पाहिजे. कलम १.

आसनगांवचें भिकाडोंगरचें कुरण व चंदनवदन येथील कुरण पूर्वीं चालत होतें. अलिकडे चालत नाहीं. तें पूर्ववत्प्रमाणें करार करून दिल्हें असे. यांजकडे चालवणें म्हणोन मामलेदारास सनद देवावी.

त० क० १९

दरसाल पांच हजार रुपयांचें कापड बाळापूरचें व वासीमचें घ्यावें. हे ब्रह्मेश्वराचे तहांत आहे. तें माफ करावयाचा करार झाला आहे. त्याप्रमाणें माफ करावें. कलम १.

या गोष्टीची रदबदल करूं नये. करारप्रमाणें पांच हजार रुपयांचें कापड सरकारांत देत जावें. मागील कापड सरकारांत आलें नाहीं. तें सन खमस समानीनपर्यंत माफ केलें असे. पुढें दरसाल देत जावें. येणेंप्रमाणें करार करावें.

मौजे शिरापूर, तर्फ पाटस, परगणा पुणें, हा गांव वतनी पाटिलकीचा. त्यास मौजे मजकुरीं इनाम एक चाहूर घुमट पख्या दोन आहेत. तो भाऊपणाचे वादामुळें पडला. तो गांवांत रयत वाहातात. त्याचा आकार सरकारजमेंत धरला आहे. त्याजविषयीं ताकीदपत्र देवावें. आणि इनामाची सनद दरोबस्तीची करून भोगवटीयास द्यावी. कलम १.

एक चाहूर जमिनीचा भोगवटा नाहीं, परंतु पाटिलकीचें वतन. यांजकरितां, मौजे मजकुरपैकीं एक चाहूर जमीन साल मजकुरापासून, नूतन इनाम करार करून दिल्ही असे. यापैकीं निमे पाटिलकी श्रीमंत महाराज छत्रपति स्वामी यांची आहे. त्यांजकडे निम चाहूर चालेल. व निमे तुमची पाटिलकी आहे. तुम्हांकडे निमे चाहूर चालेल. येणेंप्रमाणें करार करून निमे चाहूराचीं इनामपत्रें दरोबस्त अमलाचीं शिरस्तेप्रमाणें करून देवावीं.

एकूण कलमें वीस. यांची अस्सल याद राजश्री मुधोजी भोंसले सेनाधुरंधर यांजवळ असे. छ ७ जिल्काद.

छ ३० सवाल, सन सीत समानीन मया व अलफ. भाद्रपद. मुक्काम पुणें.

---

## यादी रघोजी भोंसले यांनीं वर्तावयाचीं कलमें.

यादी राजश्री रघोजी भोंसले, सेनासाहेब सुभा यांजकडील करार मदाराचीं कलमें. पेशजी कैलासवासी मुधोजी भोंसले सेनाधुरंधर पुण्यास आले, ते समयीं करार झाला त्याप्रमाणें वगैरे. सुरुसन तिसा समानीन मया व अलफ.

घरचा अगर बाहेरील कसाही प्रसंग पडला. तर सरकारचे लक्षाशिवाय दुसरें लक्ष धरणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

इंग्रजांचा बिघाड झाला. तरी शरीक सरकारचे. येणेंप्रमाणें करार.

त्रिवर्ग बंधू सरकारचे लक्षांत राहून दुसरें लक्ष धरणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

पांच हजार रुपयाचें कापड बाळापूर, वासीमचे पेशजी करारप्रमाणें दरसाल सन सीत समानीनपासून सरकारांत देत जाणें, असा करार आहे. त्यास कराराप्रमाणें मागील कापड देऊन, पुढें दरसाल देत जाऊं. येणेंप्रमाणें करार.

संस्थान गढेमंडळ रेवा उत्तरतीर, निसवत राजश्री खंडोजी भोंसले, सेना बहादर यांस फौजेचे सरंजामास सरकारांतून करार करून दिल्हें. त्याचें कलमबंदीची याद सन सीत समानीनांत जाहली आहे. त्याप्रमाणें सरकारांतून चालवावें. आम्ही करार-प्रमाणें निभावणी करूं. येणेंप्रमाणें करार.

प्रांत गंगथडी येथील महाल सरकारांत आले आहेत. तेथील घासदाणा तुमचा. तो तुम्हीं घेऊं नये. याचे ऐवजीं प्रांत वऱ्हाड येथील सरदेशमुखी व बाबतीचा ऐवज सव्वा दोन लक्ष रुपये तुम्हांकडे दरसालचें येणें, तें तुम्हांस माफ केलें. याप्रमाणें करार सन इसन्ने सितैनांत झाला आहे. व अलिकडे सन तिसा सितैनांत ब्रह्मेश्वरचें सालीं अकरा महालचा घासदाणा घेऊं नये असा करार आहे. त्याचा फडशा पेस्तर सालीं करावा, असा करार कैलासवासी सेना धुरंधर यांनीं सन सीत समानीनांत केला आहे. त्यास तूर्त नागपुरास जलदीनें जाणें. याजकरितां फडशा महकुफ करावा. पेस्तर सन तिसैनांत याचा फडशा क्षेपनिक्षेप करून देऊं. येणेंप्रमाणें करार.

ब्रह्मेश्वरचे मुक्कामीं, कैलासवासी जानोजी भोंसले, सेनासाहेबसुभा, यांसी करार झाले आहेत. त्याप्रमाणें वर्तणूक करूं. येणेंप्रमाणें करार.

छ ७ साबान, सन तिसा समानीन. वैशाखमास. मुक्काम पुणें.

---

## यादी २.

यादी राजश्री रघोजी भोंसले, सेना साहेब सुभा यांजकडील मतलब सुरुसन सबा तिसैन मया व अलफ. राजश्री बाजीरावजी यांचें बरें होण्याचे मसलतसंबंधीं, राजश्री बाळाजीपंत नाना यांनीं महाडास करार करून दिल्हा तीं कलमें. त्यास हल्लीं ठरावाचीं कलमें.

मंडळें दरोबस्त होऊन सनदा आमचे नांवें द्याव्या. कलम १.

मंडळें रघोजी भोंसले, सेनासाहेबसुभा यांचें नांवें करार करून द्यावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

चौरागड वमय त्याजखालीं सरंजाम आहे त्यासुद्धां द्यावा. कलम १.

चवऱ्यागड, पन्नास हजार रुपयांचा सरंजाम खालीं आहे त्यासुद्धां द्यावा. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

फौज तीन हजार यांनीं चाकरी करावी. या पूर्वींचा तह आहे तो करार सेना बहादर यांचा होता. आतां आम्हांस कृपा करून मंडळें देण्यांत येत आहे, तेव्हां फौजेची चाकरी माफ करावी. कलम १.

तीन हजार फौज सरकारांत मसलत असतां चाकरीस यावी, मसलत नसतां माफ केली जाईल. मातबर मसलतीस सेनासाहेबसुभा यांनीं खाशांनीं यावें. हा करार पेशजीचा आहे. तो आहेच. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

संस्थानिक व विसाजी बल्लाळ, नवस आदिकरून आठ्ठे चाळीस हजार रुपये ठरावून, मन माने तैसें, याचे परगणें अमके द्यावे, असा करार करून घेतले आहेत; त्यास येथें वाकिफकारी नव्हती. त्यास दहा बारा हजार रुपये नेमणूक ठरवून, आम्हांस सांगावें. म्हणजे एका परगणीयांत नेमणूक करून देण्यांत येईल. कलम १.

संस्थानिक व विसाजी बल्लाळ व नवस आदिकरून आठ्ठेचाळीस हजार तीनशें रुपये पेशजीचे करारांत आहेत. त्याप्रमाणें सरकारांत महाल मंडळेंपैकीं लावून द्यावा. येणें-प्रमाणें करार करावे. करार.

गंगथडीबद्दल दस्ताऐवज कैलासवासी आपासाहेबांचे व आमचे सरकारांत आहेत. ते न मागतां द्यावे. कलम १.

दस्तऐवज माघारे द्यावे. सरकार महालीं घासदाणा घेऊं नये. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

मंडळेंबद्दल चोवीस लक्ष रुपये व तळ्याबद्दल दोन लक्ष रुपये द्यावे. ऐसा करार आहे. तेव्हां सवीस लक्ष रुपये, लोभ करून माफ करावे. कलम १.

पेशजी मंडळ्याबद्दल ऐवज ध्यावयाचा करार जाहला आहे. ती बेरीजः— रुपये.

२५००००० ऐन नजर.

२००००० तळ्याबद्दल.

२७०००००

वाकी वजा. रुपये.

३००००० बुंदेल्यास पेशजी शिबंदी बाबद देविले आहेत ते रुपये.

११००००० हल्लीं मसलतीबद्दल सरकारांतून द्यावयाचा करार रुपये.

१५०००००

पैकीं महालपासून घेतले ४००००० रुपये. बाकी रुपये.

१४०००००

बाकी रुपये.

१३०००००

ऐकूण तेरा लक्ष रुपये, सरकारांत सेना साहेब सुभा यांनीं द्यावे. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

तीन वर्षे फौजेचा खिसारा अतिशय जाहला, हें वारंवार बोलण्यांत येत होतें. त्यास सांप्रत कांहीं देण्याचा मुद्दा घालावा ऐसा नाहीं. लाच्यारी आहे. दहा लक्ष रुपये देण्यांत येतील, ऐसें बोलण्यांत आहे. त्यांच्यानीं बेहबुदी होत नाहीं. सबब पोख्त सरंजाम पाहिजे. याजकरितां खर्चापुरती बेगमी जाहली पाहिजे. कलम १.

मसलतसंमंधें खर्चाबद्दल येताना महालीं आठ लक्ष रुपये घ्यावे व भेट जाहलीयावर सात लक्ष. एकूण पंधरा लक्षांचा करार. त्यापैकीं महालीं येतानां च्यार लक्ष रुपये तुम्ही घेतले. बाकी अकरा लक्ष रुपये घ्यावयाचे. हा ऐवज मंडळ्याचे नजरेचा ऐवज तुम्हांकडे येणें, त्यांत मजुरा दिल्हा असे. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

नवाब निजाम अलीखान बहादर यांजकडील तह, खर्ड्यांचे मुक्कामीं कैलासवासी रावसाहेबांनीं करून दिल्हा आहे. कदाचित् नवाबांचा व आपला तह जाहला कीं, कमती करून तह करावा. तरी आमचेकडील जे जाबसाल ठरले आहेत ते झाडून उगवून द्यावे. त्यांत कमती होऊं नये. कलम १.

आपल्याकडील नवाबांशीं तह ठरला आहे. त्याप्रमाणें नवाबांशीं बोलून तह चालेल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सरकारचे महालांत घासदाणा घेऊं नये ऐसा करार आहे. त्यापैकीं जाल्हनें वगैरे महालांत ऐवज घेणार नाहीं. परंतु या ऐवजीं नवाबांकडून साडे तीन लक्ष रुपये घासदाण्याशिवाय ऐवज देविला पाहिजे. कलम १.

सरकारचे महालांत घासदाणा घेऊं नये. याचेबद्दल सरदेशमुखी प्रांत वऱ्हाड आहेच. तह शिवाय नवाबांकडून घासदाण्याचा करार अधिक कसा होईल? येणेंप्रमाणें करार करावें. करार.

मार्गांत येतांना सरकारचे महालात कोठें कोठें ऐवज घेण्यांत येईल. त्यास जो करार जाहला आहे त्यांत मजुरा घेऊं नये. कारण फौजेचा खिसारा अतिशय झाला. सर्व प्रकारें लाच्यारी आहे. कलम १.

मसलतसंमंधें खर्चाचे ऐवजाची मखलाशी सदरीं जाहली आहे. त्यांत सदरहू कलमाची मखलाशी उगवली असे. येणेंप्रमाणें करार करावे. करार.

मौजे शिरापूर भिमातीरीं आहे. तेथें कुरण आहे. पागेचे उपयोगी असें. यांजकरितां दरोबस्त गांव देवावा. कलम १.

वरकड कलमें पेशजीं परस्परें करारांत आहेत, त्याप्रमाणें बहाल व बार करार. येणें-प्रमाणें करार करावें. करार.

मंडळें व चवऱ्यागड सरकारांतून रघोजी भोंसले, सेना साहेब सुभा, यांस दिल्हा. त्याविषयीं बाळाजी गोविंद बुंदेले यांस सनद व जमीदार वगैरे यांस पत्रें लागतील तीं देवावीं. देणें.

छ २४ रमज्यान, सन सबा तिसैन मया व अलफ. फाल्गुन मास. मुक्काम पुणें.

---

## यादी ३.

यादी राजश्री रघोजी भोंसले, सेना साहेब सुभा यांजकडील जाबसाल सुरुसन सीत तिसैन मया व अलफ.

पूर्वीं आमचें येणें सुरुसन तिसा समानीन पुण्यास जाहलें. त्यावेळेस व तीर्थरूप कैलासवासी आपासाहेब सुरुसन सीत समानीनांत आले त्या वेळेस, आम्हीं आपलेकडील मतलब लिहून त्याजवर करार जाहले आहेत, तेव्हां त्याजविषयीं पुन्हा लिहावें असें नाहीं. त्याप्रमाणें घडत असावें.

पूर्वीं तुमचें येणें झालें ते समयीं व कैलासवासी रघोजी भोंसले येथें आले होते ते समयीं, स्वच्छतेचीं बोलणीं व करारमदारच्या यादी ठरल्या आहेत, त्याप्रमाणें तुम्हांकडून वर्तणूक घडावी. इकडूनही दुसरा प्रकार होणार नाहीं. खातरजमा असावी. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

परगणे बाळापूर व वासीम येथील कापड दरसाल पांच हजार रुपयांचे सरकारांत द्यावें. असा करार आहे. त्यांत सुरुसन तिसा समानीनपावेतों माफ केलें असें. आजपर्यंत सात सालें जाहलीं. हे माफ करावी. पुढें दरसाल कापड देण्यांत येईल.

इस्तकबील तिसैन तागाईत सीत तिसैन एकूण सालें सात. दरसाल कापड रुपये ५००० पांचहजार प्रमाणें ३५००० रुपये पस्तीस हजारांचें यावें. त्यास रदबदलीमुळें सूट सालें चार. एकूण रुपये २०००० वीस हजार. बाकी तीन सालांचें पंधरा हजारांचें कापड सरकारांत द्यावें. पुढें दरसाल करारप्रमाणें देत जावें. दिक्कत पडूं नये. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

परगणे शिवणी, हुसंगाबाद बमय किल्ला व गुणोर चाटूसावडी वगैरे महाल कदीम-पासून, संस्थान देवगड तालुक्यांतील, तेथील अमल भूपाळकरांनीं दाबिला आहे. करार-वालाई मिळत नाहीं. याजविषयीं ताकीदपत्रें संस्थानिकांस देऊन व सनदा पूर्ववत् आमचे नांवें करून देवाव्या म्हणजे बंदोबस्त करण्यांत येईल, ऐसें सन तिसामध्यें लिहिलें होतें.

तेव्हां भूपाळकरांस पत्र ही दिल्हें कीं, पूर्वीपासून चालत आहे, त्याप्रमाणें चालवावें. महाल दाबिले असतील ते सोडून द्यावे त्याजप्रमाणें थैली द्यावी व याशिवाय दौलतराव शिंदे यांसी या अन्वयें पत्र द्यावें कीं, भूपाळकरांस ताकीद करून पांचा महालांत अंमल बसवून देवावा.

येविषयीं आलाहिदा यादीवर मखलाशी होऊन पत्रें देविलीं आहेत. त्याप्रमाणें पत्रें द्यावीं. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सरकारचे महालांत आम्हीं घासदाणा घेऊं नये, हा करार आहे. त्याप्रमाणें सरकारचे महालास आम्ही पेस्तरसालीं घासदाणा घेणार नाहीं. वऱ्हाडची सरदेशमुखी आम्हांकडे सव्वा दोन लक्ष चालत आहे, त्याप्रमाणें प्रतिवर्षीं चालावी. पुढें मागें दिक्कत पडूं नये.

तुम्ही कराराप्रमाणें सरकार महालीं घासदाणा घेऊं नये. सरदेशमुखी तुम्हांकडे चालत आहे. त्या अन्वयें चालविली जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

प्रांत गंगथडी येथील महाल सरकारांत आले आहेत. तेथील घासदाणा तुमचा, तो तुम्हीं घेऊं नये. याचे ऐवजी प्रांत वऱ्हाड येथील सरदेशमुखी व बाबतीचा ऐवज सव्वा दोन लक्ष तुम्हांकडे दरसालचें येणें, तें तुम्हांस माफ केलें. याजप्रमाणें करार सुरुसन इसन्ने सितैनांत जाहला आहे. व अलिकडे सन तिसा सितैनांत व्रम्हेश्वरचें सालीं अकरा महालचा घासदाणा घेऊं नये असा करार आहे. त्याचा फडशा पेस्तरसालीं करावा. ऐसा करार कैलासवासी सेनाधुरंधर यांनीं सन सीत समानीनांत केला आहे. त्यानंतर तूर्त नागपुरास जलदीनें जाणें, याजकरितां फडशा महकूफ करावा. पेस्तरसालीं तिसैनांत याचा फडशा क्षेपनिक्षेप करून देऊं. येणेंप्रमाणें सुरुसन तिसा समानीनांत लिहून दिल्हें आहे. त्यास आपण पहिलेपासून कृपाच करीत आले आहेत. तेव्हां याचा विषय किती? तथापि सरकारची मर्जी. ऐवजाची तोडजोड करून ठराव करावा. त्यास लोभ करून ठराव होईल. ते पांच सालांत ऐवज द्यावा. आणि दस्ता-ऐवज मागील फिरोन द्यावा. पुढें दिक्कत पडूं नये. असें पत्र असलें पाहिजे.

पेशजी घासदाण्याचे ऐवजाचे करार जाहले आहेत. त्याप्रमाणें दप्तरचे हिशेबाचे रूईनें ऐवज तुम्हांकडे सरकारचा येणें ठरेल, त्याचा फडशा हस्तेबंदीचा करार होईल त्याप्रमाणें करून द्यावा. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

परगणे कडेवलींत पंचमहाल येथील वतनाचा बंदोबस्त सरकारांतून करून दिल्हा आहे. त्याप्रमाणें चालत आहे. कड्याच्या ठाण्याची दिक्कत आहे, त्यास आपला लोभ आहे. तेव्हां त्याचाही बंदोबस्त होईल. सांप्रत नगर हवेलीचे अठरा गांव व पेडगांवचे अठरा गांव येथें परगण्याचे शिरस्तेप्रमाणें वतनदारी चालत नाहीं. सबब राजश्री येशवंतराव महादेव नगरकर यांस पत्र कीं, नगर हवेलीचे देहे सुमारें अठरा व पेडगांव येथील रूसुम आलेले

हिशेबी देतात. तो रूसुम परगण्याचे शिरस्तेप्रमाणें तनखे यास दरसद्दे रुपये २ दोन व शिवाय वतन बाबती जमा वसूल करून देत नाहीं. तर नगर हवेली व पेडगांव येथील गांवचें वतन तनख्यास दरसद्दे सदरहूप्रमाणें देवावें. आणि ज्या गांवीं आंब्याचीं झाडें व इनाम ज्यांत असेल त्याजकडे चालविणें. गुमास्ते यांचे हातें कामकाज घेत जाणें.

सुदामत चालत आहे त्याप्रमाणें चालेल. त्यांत दिक्कत पडलीयास ताकीद करून चालविलें जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

छ २७ रबिलोवल, सन सीत तिसैन. भाद्रपद. मुक्काम पुणें.

---

## उत्तर हिंदुस्थानांतील सरदारांचें वांटणीपत्र.

वांटणी खंडणी हिंदुस्थान सुरुसन समान सितैनांत करार करून दिल्ही बरहुकूम सनदा सरदारांस छ ५ जिल्काद. रुपये १००.

तपशील.

४६ सरकार. ५३।≈ वजा पवारास दिल्हें रुपये ७।≈ बाकी.
२१ होळकर. २३।- वजा पवारास दिल्हें २।- बाकी.
२१ शिंदे. २३।- वजा पवारास दिल्हें २।- बाकी.
१२ पवारांस सालमजकूरापासून करार करून दिल्हें.
    ८ खंडेराव बिन यशवंतराव पवार.
    ४ कृष्णाजी व जिवाजी पवार निमेनिम.
    १२
१००

---

## पेशवे व महादजी शिंदे.

### यादी १.

यादी निसबत राजश्री महादजी शिंदे, सुरुसन तिसा सितैन मया व अलफ.

परगणे धरगांव व बढवाई हे महाल पूर्वींपासून आम्हांकडे चालत होते. त्यासी श्रीमंत राजश्री दादासाहेब यांनीं घेतले होते. त्यांजकडून सुटल्यावरी पूर्ववत्प्रमाणें तुमचे तुम्हांकडे देऊं, ऐसें स्वामींचें अभय आहेच. हिंदुस्थानांत जातां येतां नर्मदेचा घाट स्वाधेन असावा, याकरितां कृपा करून पूर्ववत्प्रमाणें महाल आम्हांकडे द्यावे.

सदरहू दोन्ही महाल तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबीं घेतले होते. ते हल्लीं सरकारांत आले. सरकारांतून तुम्हांकडे फौजेचे सरंजामास करार करून दिल्हे असेत. सुदामतप्रमाणें अमल घेणें. येविषयीं जमीदारांस सनदा देणें.

देशचे महाल, खेडीं सर्व मातुश्री बायांकडे गेलें. खाजगत खर्चास सरंजाम नाहीं. खर्च चालला पाहिजे. त्यास देशीं खाजगतांकडे सरंजाम लाऊन देणार स्वामी धनी समर्थ आहेत.

तूर्त आहे त्यांतच संभाळून घ्यावें. पेस्तर मातबर मुलुखगिरी करून आल्यास देशीं तुमची सोय करून दिल्ही जाईल. येणेंप्रमाणें करार.

फडणिशी चिंतो विठ्ठल यांजकडे होती यामुळें सरदारी पेचांत आली. येविषयीं पूर्वी सेवेसीं विनंति केलीच होती. त्यास स्वामीचें अभय आहे. पूर्ववत्प्रमाणें आमची आह्मांकडे फडणिशी चालवावी.

रूबरू तुह्मांसीं बोललों आहों. त्याप्रमाणें करार.

मौजे माहाळुंगे तर्फ चाकण चौऱ्यासी हा गांव पुण्यापासून समीप आहे. हुजूर आल्यास वैरणकाडीस जागा नाहीं. गांवजमा सहाशें रुपयेपर्यंत होईल. त्यास कृपा करून कुरणसुद्धां गांव आह्मांकडे करार करून द्यावा. त्रिंबकजी इंगळे दिमतपागा यांणें पाणिपतचे साली कामकाज केलें. आमचे कामावरी बहुत पडले. त्यासमयीं यांसी गांव द्यावा, हें वचन आमचें आहे. त्यास मशारनिल्हेकडे मौजे मजकूर राहातात, याकरितां विनंती मान्य करून गांव आह्मांकडे द्यावा.

तूर्त गांव द्यावा, व कुरण द्यावयास ठीक पडत नाहीं. त्र्यंबकजी यांनीं तुह्मांस पाणिपताहून काढून आणिलें, सबब पड जमीन बिघे—करार करून नूतन दिल्हा असे. शिरस्ताप्रमाणें इनामपत्र.

अलाहिदा कलम लिहिलें असे. सबब दूर.

किल्ले पावागड आह्मांकडे आहे. त्याप्रमाणेंच धन्यांनीं कृपाळु होऊन आमचा आह्मांकडे ठेवावा. कलम १.

तुमचे रदबदलीस्तव तुमचा तुह्मांकडेच करार केला असे. उत्तम प्रकारें किल्ल्याचा व मुलखाचा बंदोबस्त करणें. येणेंप्रमाणें करार.

मुलें मनुष्यें ठेवावयासी देशीं जागा नाहीं. हिंदुस्थानांत स्वारीस जाणें. मुलें मनुष्यें देशीं असतात. बलकुबलीस राहावयाकरितां जागा चांगली असावी. त्यास देशीं कृपा करून राहावयायोग्य स्थळ सरंजामसुद्धां द्यावें.

तूर्त राहावयास पेडगांव तुह्मांकडे आहेच. त्यांतच गुदराणी करावी. पुढें श्रीकृपेनें सर्वही अनुकूळ होऊन येईल. येणेंप्रमाणें करार.

पांच लक्ष रुपये सरकारांत द्यावे, हा करार आहे. त्यास सरदारी वोढगस्त, रुपये आले नाहीं, हें सर्व स्वामींस विदितच आहे. तूर्त वोढीचा प्रकार जाणोन माफ करावे. हिंदुस्थानांत गेल्यावरी पांचशें काय, सरदारीचा खर्च चालून जें राहील तें सर्व धन्यांचेंच आहे.

सालगुदस्ता हिंदुस्थानांत तुमचें जाणें न जाल्यामुळें वायदाही चुकला. हल्लीं तुमचे वोढीमुळें तूर्त घ्यावयाचें महकूफ केलें असेत. हिंदुस्थानांत गेल्यावरी काळजी धरून, आधीं ऐवजाची तर्तूद करून, साहा महिन्याअलीकडे ऐवज पाठवून द्यावा. येणेंप्रमाणें करार.

परगणा पाटण येथील दोन हिस्से मामलत आह्मांकडे होती. त्यास पाणपतचे सालापासून एक हिस्सा सरकारांतून त्रिंबकराव शिवदेव यांजकडे दिल्हा होता. त्यांस मशारनिल्हेकडील हिस्सा पूर्ववत्प्रमाणें आह्मांकडे द्यावा.

तूर्त होत नाहीं.

मौजे शिरापूर तर्फ माजूर हा गांव व मौजे खोकर मोहु येथील पाटिलकी आह्मांकडें आहे. व गांवही पूर्वींपासोन चालत आहे. तेथें घोडीं, उंटें राहावयास जागा आहे. त्यास कुरणाकरितां मौजे मजकूर हा गांव सरकारांतून देवावा.

तूर्त नाहीं.

---

## यादी २.

यादी श्रीमंत राजश्री दादासाहेब यांजपाशीं फौज दोन हजार ठेवावी लागते. त्याची खर्चाची बेगमी सालिना दरस्वारी सेरा रुपये ३०० प्रमाणें साहा लाख होतात. त्याची नेमणूक करून देविली पाहिजे. निसबत माहादजी शिंदे यांनीं दोन हजार फौज राजश्री दादासाहेबांकडील बंदोबस्तास नेहेमीं ठेवावी. याप्रमाणें करार जाला. त्यास महालची नेमणूक झांशी तालुक्यापैकीं, इनाम खेरीज करून, महाल मजकूरसुद्धां कमाल बेरीज. रुपये.

३४७३४९।· परगणा भांडेर.
११६२६३।· तर्फ महू मोहनी व खलासीस फत्तेपूर.

४६३६१२॥·

चार लक्ष त्रेसष्ठ हजार सहाशें साडेबारा रुपये महालची बेरीज लाऊन दिल्ही असे. येणेंप्रमाणें.

छ २७ मोहरम सन ( १७७८–७९ ) तिसा सबैन, माघ मास.

# पेशवे व दौलतराव शिंदे.

## यादी १.

यादी दौलतराव शिंदे यांजकडील जावसाल सरकारांतून उगऊन द्यावयाचे सुरुसन समान तिसैन मया व अलफ.

ऐवज मोंगलाकडून देविला होता तो शिंद्यांस न पावला, सबब सरकारांतून ऐवज द्यावयाचा ठरला. रुपये.
५००००००.

पैकीं मोंगलाकडून ऐवज शिंद्यांस पावला मार्फत शेषाद्रीपंत. रुपये.
५०००००.

बाकी रुपये.
४५०००००.

तपशील.

२०००००० सध्यां सावकारी निशा द्यावी.

५००००० पौष शुद्ध १२.
५००००० पौष अखेर.
१०००००० माघ वद्य ८.
२००००००

१३००००० मामलेदार यांजकडून हस्तेबंदीची कराराप्रमाणें सावकारी निशा देवावी.

१२००००० प्रांत बुंदेलखंड, झांशी येथील दुसाला ऐवजाची वरात मामलेदार यांचे नांवें द्यावी कीं वराती बमोजीब शिंदे यांस ऐवज देऊन कबज घेणें. ऐवजाची निशा तुह्मांकडून न जाहाल्यास माहालाची जप्ती करून वसूल घेतील, दिक्कत न करणें. ह्मणोन सरकारचीं पत्रें द्यावीं.

४५०००००

पंचेचाळीस लक्ष रुपये सदर्हुप्रमाणें द्यावें, येणेंप्रमाणें करार करावे. करार.

दाहा लक्षांची जाहागीर स्वदेशीं लाऊन द्यावी. त्याजपैकीं जाहागीर बाकी देणें लाऊन राहिली आहे. ते स्वदेशीं माहाल लाऊन द्यावें. दाहा लक्ष पैकीं माहाल राहिले असतील ते स्वदेश पैकीं देविले जातील. येणेंप्रमाणें करार करावे. करार.

हिंदुस्थान व माळवा येथील हिशेबावर मखलाशा करून देऊन हिशेबाचे फडशे करून द्यावे.

हिशेबाचे मखलाशा करून दिल्या जातील. येणेंप्रमाणें करार करावे. करार.

मोंगलाकडील चिठ्ठी पन्नास लक्षांची शिंदे यांजकडे आहे. त्यांस ऐवजाची निशा सदरहू लिहिल्याप्रमाणें देऊन चिठ्ठी माघारी घ्यावी. कलम १.

येणेंप्रमाणें करार करावे. करार.

दोन करोड रुपयांचे करारापैकीं वसुलाचे ऐवजाचे हिशेबाचे अन्वयें बाकी निघेल

त्याजपैकीं खरड्याचे स्वारींत शिंदे यांस सरकारांतून सावकारांकडून कर्ज रुपये आठ लक्ष दिल्हे आहेत. ते खताबरहुकूम व्याजसुद्धां ऐवज वजा घेऊन, बाकी शिंद्यांचें देणें निघाल्यास द्यावें. आठ लक्षांचें खतासंबंधीं दस्तऐवजीं कागद व खत असेल तें सावकारांकडून माघारें द्यावें. कलम १.

येणेंप्रमाणें करार करावे. करार.

पैवस्ती छ १ रजब, सन समान तिसैन, पौषमास.

---

## यादी २.

यादी राजश्री दौलतराव शिंदे आलीज्याबाहादर यांजकडील जाबसालाचे ठराव सुरुसन तिसा तिसैन मया व अलफ.

बायांचे समेटाचा जिम्मा सरकारांतोन करून घेतला आहे. त्यास सौलतीनें अथवा जरबेनें बायांकडील बखेडा तोडून समेट करावा आणि बायांस श्रीगोंद्यांत ठेवावें. त्यांजकडे बक्षी वगैरे दरकदार, पागे, पथकें, लोक आहेत त्यांणीं खूळ केलें. त्यापक्षीं त्यांणीं बायांपाशीं राहूं नये. दरकदार, बक्षी वगैरे मंडळी यांजकडून हिशेब समजोन घेणें. त्यापक्षीं त्यांणीं आह्मांकडे येऊन हिशेब समजाऊन द्यावें. बाया श्रीगोंद्यांत राहतील. त्यांजपाशीं इकडून कोण्ही इतबारी वृद्ध खातरजमेचा नेमून बंदोबस्त करावा.

कलम १.

सदरहुप्रमाणें.

मागील हिशेबाचे फडशे होणें. त्याजवर मखलाशी करून फडशा करून द्यावा.

कलम १.

हिशेबाचे फडशे करून दिल्हे जातील. येणेंप्रमाणें.

दाहा लक्षांचे माहाल सरकारांतोन द्यावयाचें पेशजी करारांत आलें. त्यांजपैकीं माहाल बाकी लाऊन देणें राहिले आहेत, ते स्वदेशीं लाऊन द्यावे. कलम १.

इकडील आप्तविषयी व पदरचे लोक यांचीं कामेंकाजें सरकारांत पडतात, येविषयीं विनंतीपत्रें सरकारांत येतील. त्याप्रमाणें त्यांचा गौर रक्षून कामेंकाजें करून देत जावीं. कलम १.

बाजवीचे रीतीनें अगत्य जाणोन कामें केलीं जातील. येणेंप्रमाणें.

बायांचा समेट होय तोंपर्यंत च्यार पलटणें व दोन हजार फौज सरकारआज्ञेप्रमाणें देशीं राहील. कलम १.

च्यार चांगलीं पलटणें व दोन हजार फौज राहील. त्यांणीं सरकारआज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी. येणेंप्रमाणें.

विंचुरकर व नायगांवकर व राजे बहादर व पवार च्यार पथकें तैनात राहात आली, त्याप्रमाणें समागमें द्यावीं. कलम १.

बायांची वगैरे मसलत हवेलीकडील आटपल्यावर पेशजीप्रमाणें पथकें तैनातेस दिल्हीं जातील. येणेंप्रमाणें.

मुत्सदी व दरकदार व पागे, पथकें, लोक वगैरे सरकार चाकरीकरितां आह्मांसमागमें येतील. त्यांचीं घरें व मुलेंमाणसें देशीं आहेत. त्यांचें संरक्षण होऊन कोण्हीकडील उपसर्ग लागूं नये. येविषयीं सरकारांतून लोकांची खातरजमा करावी.

कलम १.

खातरजमा केली जाईल. येणेंप्रमाणें.

सरकार चाकरीकरितां कूच करून जाणेची आज्ञा. त्याजप्रमाणें कूच करून जातों. समेट बायांचा सरकारांतून व्हावयाचा तो अतिसत्वर करावा, दिवसगत लागूं नये.

कलम १.

तुह्मीं कूच करून जावें. बायांची मसलत समेटाची लौकरच शेवटास नेली जाईल. येणेंप्रमाणें.

छ १० सवाल, सन तिसा तिसैन, फाल्गुन मास.

---

## नानाफडणवीस व दौलतराव शिंदे.

### यादी १.

यादी राजश्री बाळाजीपंत नाना यांची मुक्तता करावी आणि राजश्री दौलतराव शिंदे आलीज्या बाहादूर यांणीं व नानांनीं येक विचारें होऊन श्रीमंतांच्या दौलतीचा बंदोबस्त करावा. त्याजबदल जाबसाल नानांनीं शिंदे यांसी करार केल्याप्रमाणें उगऊन द्यावें. जाबसालाचे ठरावाविषयीं फकीरजी गाढवे व सखारामराव घाटगे सर्जेराव. सुरुसन तिसा तिसैन मया अलफ.

१ किले तीन, किल्याचे खर्चाची बेजमीची जाहागीरसुद्धां दौलतराव शिंदे यांस द्यावयाचा करार ठरला. त्यास, श्रीमंतांच्या व शिंदे यांच्या विचारें, शिंदे यांच्या उपयोगी किले असतील ते सरंजाम जकिऱ्यासुद्धां द्यावे.

२ कित्ता किले दोन पेशजी श्रीमंतांनीं द्यावयाचा करार केला त्याबद्दल द्यावें.

१ कित्ता किला एक जाहागीरसुद्धां इनाम करून देऊन इनामपत्रें करून द्यावीं.

१ कित्ता किला एक जाहागीर सुद्धां देऊन सनदा करून द्याव्या.

२

१ कित्ता हल्लीं द्यावयाचा करार ठरला तो जाहागीर व सरंजाम सुद्धां द्यावा.

३

१ नानांकडील जाहागीर माहालखेर्डी दौलतराव शिंदे यांजकडे इनामी करार करून द्यावयाचें पेशजी श्रीमंतांच्या ठरावांत. त्यास हल्लीं नानांची मुक्तता करावी.

त्याअर्थीं त्यांजकडील माहाल, खेडीं, जाहागीर, किल्ले वगैरे त्यांचीं त्यांजकडे देऊन चालवावीं. याप्रमाणें ठरावांत आलें. त्याचे मोबदला शिंदे यांस जाहागीर वसुली जमेची चांगली शिंदे यांचे विचारें महाल लाऊन देऊन सरकारचीं इनामपत्रें करून द्यावीं.

१ पेशजी माहाडच्या करारांपैकी ऐवज व माहाल लाऊन देणें राहिले आहेत. त्यास ऐवज यादीच्या अन्वयें बाकी निघेल तो द्यावा, व माहाल लाऊन देऊन सनदा करून द्याव्या. नानांकडील कारकून मंडळी वगैरे त्यांचें अगत्यांतील आहेत. त्यांजकडे पेशजीपासून कामकाज चालत आलें, त्याजप्रमाणें चालवावें. नानांकडील पुस्तपना खातरजमेनें करून पूर्ववत् प्रमाणें बंदोबस्त करून देऊन निभावणी करून द्यावी. येविषयीं दौलतराव शिंदे यांजकडून बेल, तुळशी, फकीरजी गाढवे यांणीं लस्करांतून आणून नानांस दिल्ह्या आणि नानांनीं बेल, तुळशी, दौलतराव शिंदे यांस दिल्ह्या. त्या फकीरजी गाढवे यांचे स्वाधीन केल्या कीं, दौलतराव शिंदे यांचे दौलतीचें व जातीचें कल्याण करावें. उभयपक्षीं न्यून अधिक पडेल तें उभयतांनीं मनांत आणूं नयें. नानांकडील ऐवज चीजवस्त वगैरे सरकारांत गेली आहे, ती सरकारांतून माघारें द्यावी. उभयपक्षीं क्रिया शपथ जाली आहे त्याप्रमाणें कोणी कोणास अंतर न करितां उभयतांनीं एक विचारें चालावें. उभयतांतून कोणा एकास दुसरें कोणी वांकडें करूं लागल्यास त्याचें पारिपत्य करून बंदोबस्त परस्परें उभयपक्षीं राखीत जावा. शिंदे यांस दुसरे कोणी नानांचे प्रकर्णीं वांकडें समजाविल्यास, तें मनांत आणून नानांचें वांकडें करूं नये; व नानांसही शिंदे प्रकर्णीं कोणी वांकडें समजाविल्यास शिंदे यांसी वांकडें करूं नये. यास अंतर करील त्यांस श्रीकुलस्वामीची व उदीची व पाटिलबावांचे पायांची शपथ असे त्रिवार.

१ परशरामपंत भाऊ यांजकडील जाहागीर माहाल, खेडीं आहेत, तीं दौलतराव शिंदे यांजकडे सरकारांतून लाऊन द्यावयाची पेशजी श्रीमंतांचे करारांत आहे. त्याप्रमाणें सरकारांतून माहालच्या सनदा करून द्याव्या.

१ राजश्री दौलतराव शिंदे आलीज्याबाहदूर यांजला फौजेच्या खर्चाबद्दल एक क्रोड रुपये द्यावयाचा करार ठरला आहे ते द्यावे. नगदी ऐवज वगैरे व जिन्नस बाजारनिरखें व कारकुनीचा ऐवज वगैरे लाऊन देऊन, भरणा करून ऐवज पुरऊन द्यावा. रुपये १००००००१ उगऊन घ्यावे.

१ श्रीमंतांचे पदरचे सेवक लोक सरकारांत चाकरी करीत होते. ते नानांजवळही कामकाज करीत होते. त्यांजकडे पेशजीपासून कामेंकाजें चालत आलीं, त्याप्रमाणें त्यांचीं त्यांजकडे बाहाल ठेऊन चालवावीं.

१ श्रीमंतांचे दौलतेसंमंधीं राजकारणीं कारभार दौलतराव शिंदे यांचे इतल्लया खेरीज होऊं नये.

८

येणेंप्रमाणें आठ कलमें करार करावीं.

तेरीख छ १ माहे मोहरम उर्फ आषाढ शुद्ध द्वितीया.

---

## पेशवे व दौलतराव शिंदे.

### यादी १.

यादी दौलतराव शिंदे यांणीं कलमाचा करार करून द्यावा. सुरुसन तिसा तिसैन मया व अलफ.

कलमें.

सरकारांतून यादी व सरकारचे मुत्सद्दी बाळाजी जनार्दन सुद्धां व कारकून वगैरे मंडळीपासून यादी व कागद दस्ताऐवज लेहून घेतलें असतील ते माघारें द्यावें. तगादा कोणास करूं नये. कलम १.

सरकारचे व सरंजामी यांचे माहाल हिंदुस्थानांत व स्वदेशीं गांव सनदेखेरीज ठेवले आहेत, ते सोडून द्यावे. कलम १.

हिंदुस्थानांत जातांना सरकारच्या व सरंजामाच्या माहालांस खंडणी वगैरे उपद्रव लागूं नये. कदाचित माहालीं ऐवज घेतल्यास व उपद्रव जाहल्यास तो ऐवज सरकारांत माघारा द्यावा. कलम १.

हिंदुस्थानांत वगैरे सरकारचे व सरंजामी यांचे माहालीं तुम्हांकडील फौजा जाऊन सालास ऐवज घेतात. तो घेऊं नये व उपद्रव काडीमात्र लाऊं नये. कलम १.

एकूण कलमें च्यार सदरहूप्रमाणें करार.

छ २६ जमादिलाखर, मुक्काम वानवडी. कार्तिक वद्य १३ त्रयोदशी.

---

## पेशवे व मल्हारराव होळकर.

### तहनामा १.

तहनामा सरकार श्रीमंत पंतप्रधान विद्यमान. श्रीमंत राजश्री रघुनाथराव दादासाहेब व राजश्री मल्हारजी होळकर सुरसन आर्बा खमसैन मया अलफ.

सुभे अजमेरपैकीं अमल पेशजी चालत आला आहे. त्याखेरीज अमल होईल त्याची वांटणी व सुभे आगरे वगैरे सुभे हाय बरहुकूम सनद पातशाही फरमान जो मुलूख

सुटेल व खंडणीया दंडणिया पडलें पान आकार होईल, त्याचा तह दर सद्दे वांटणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान चौथाई रुपये २५, बाकी रुपये ७५ पाऊणशें पैकीं फौजेच्या वांटणीचा तह श्रीमंत राजश्री दादासाहेबांस सरदारी रुपये ५ पांच, बाकी रुपये ७० सत्तर पैकीं तिजाई मल्हारजी होळकर रुपये २३।‹ सव्वा तेवीस रुपये दुवल, येणें-प्रमाणें तह कुल बेरीज होईल. त्याची वांटणी सदरहूप्रमाणें. कलम १.

बोराडीचें ठाणें सरकारांत ठेवावें. मशारनिल्हेकडेही न द्यावें व पवारांकडेही न द्यावें. कलम १.

चिरंजीवानीं पन्नास लोक निशास सरकारचेच पाठवावे.

मोंगलांकडील किल्ले घेतले आहेत, त्यांपैकीं मातबर किल्ले आहेत ते पांच सात सरकारांत ठेऊन, बाकी देऊन मोगलांचा सला करावा. सैद लष्करखान व जान बचा-याचा इमान चित्तापासून आमच्या वकिलाच्या विद्यमानें करावा. कदाचित् फिरोन त्यानें लबाडी केली तरी अवघ्यांनीं मेळोन परिच्छिन्न बुडवावा. जसा राहील तसा अकृत्रिम संदेह फेडून करावें. कलम १.

मोंगलांकडील राजकारणें अगर हरएक जागा राजकारणें खावंदास सांगून, आज्ञेप्रमाणें सांगून करणें, तरीं करावीं. कलम १.

स्वारी हिंदुस्थानांत हमराहा श्रीमंत राजश्री दादासाहेब व सरदार बरावर गेले. त्यासी सुभे हायबद्दल वांटणी तहाबरहुकूम घेत जावी. × × × ×

स्वारीस हिंदुस्थानांत गेले तरी, सर्व स्वारी जमा करून वांटणी बरहुकूमप्रमाणें घ्यावें. आणि श्रीमंत राजश्री दादासाहेब कदाचित् घरीं राहिले त्यांचा वांटा सदरहू तहाप्रमाणें द्यावा. सरकारची फौज जे येईल तेव्हडीयावरच साहेबांचा वांटा द्यावा. सदरहू स्वारीचा तहखेरीज साहा सुभे दक्षणप्रांतीं स्वामींनीं ज्यांस जें दिल्हें तें, व कृपाळूपणें पुढें जें चाल तें चालवावें. कलम १.

सुरत अट्ठाविशीपैकीं एक लाख रुपयांचा महालपैकीं राजश्री जयाजी शिंदे निमे, बाकी निमे राजश्री मल्हारजी होळकर पन्नासा हजारांचा महाल द्यावा. कलम १.

किल्ले यांचा बंदोबस्त दरोबस्त सरकारांतून चित्तास येईल तसा करावा. कलम १.

किल्याच्या जाहागिरा आहेत त्यासी सरकारांतून कमाविस ज्यास सांगणें त्यांसी सांगून ऐवज किल्लेस देवावा. कलम १.

मोगलांचे किल्यांपैकीं आसाम्या मशारनिल्हे राजश्री मल्हारजी होळकर यांसी हवाले द्यावे:—

१ किल्ले चांदवड.

१ किल्ले इंद्राई.

दोन किल्यांची हवालदारी मात्र सांगावी. वरकड बंदोबस्त सरकारांतून करावा.
कलम १.

चांदवडचे किल्याचे हवालदारीची सनद देणें. दुसरा किल्ला मोगलांकडे द्यावयाचा आहे. सबब सनद न पाठविली. ऐसी पुरवणी चिरंजीवास लिहिणें.

खावंदांच्या आज्ञेप्रमाणें वर्तावें. कलम १.

खावंदसाहेबांनीं तह करून दिला आहे व करार केले आहेत, त्याप्रमाणें चालवावें. यास अंतर न करावें. अकृत्रिमपणें कृपा करावी. सर्वांविषयीं घरोबियाच्या नात्यानें चालवितात त्यापेक्षां अधिकोत्तर माया करून लोभ करीत जावा. मान महत्त्व हरयेकविषयीं राखून चालवीत जावें. कलम १.

---

## माधवराव बल्लाळ पेशवे व अहिल्याबाई होळकर.

### पत्र १.

गंगाजल निर्मळ अहिल्याबाई होळकर यांसी.

स्नेहांकित माधवराव बल्लाळ प्रधान, आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें लिहित जाणें. विशेष. तुम्हांकडे सरकारचा ऐवज येणें. रुपये.

३७५९०३॥। नेहेमीं दरसालीं प्रांत माळवा येथील बाबती सरदेशमुखीचा मक्ता व अंतस्थ व पोतदारी व वेतन सुभेदारी व स्वदेशचे महाल व गांव मिळोन इस्तकबील सन समान सितैन तागाईत सालमजकूर सन सबैन दरसाल रुपये १२५३०१।· प्रमाणें तिसाला. रुपये.

१५५०० मोकासबाब सरकार विज्यागड साल मजकूर सन सबैनचा मक्ता बरहुकूम गुदस्त.

७२२७०२४~ बाबत गंगाधर यशवंत.

४२५०० चिंतो विठ्ठल व चिंतो अनंत व आबाजी महादेव मिळोन ऐवज येणें ५०००० रुपये.
पैकीं वसूल त्यांकडे रुपये ७५०० बाकी.

---

११५६६०५॥।~

पैकीं वसूल भरणा जाला व निशा रुपये.

२५०००० गंगाधर यशवंत यांजबद्दल ऐवज येणें. त्याजपैकीं यादवराव रघुनाथ भागवत व दिनकर अनंत * * * यांचे विद्यमानें भरणा जाला. त्यांचे जाब सादर आहेत.

३००००० निशा करून घेतली आहे व हुंडी.

१००००० हवाला यादवराव रघुनाथ भागवत, फाल्गुन अखेरचे मुदतीनें.

१२५००० हवाला व्यंकटराव काशी खेर, परगणे आंबाडचे ऐवजीं दिनकर बाबुराव खेर व बाबुराव रघुनाथ देवस्थळी यांजपासून निमेनिमेप्रमाणें घ्यावेत. रुपये.

७५००० खेतसी करमसी इंदूरकर यांचे दुकानची हुंडी.

३०००००

तीन लाख रुपयांची निशा सदरहूप्रमाणें करून घेतली आहे. परंतु याचा भरणा सरकारांत जाहालीयावर जाब सादर होईल, त्याप्रमाणें ऐवज मजुरा पडेल.

५५००००

बाकी रुपये ६०६६०५॥।~ साहा लक्ष, साहा हजार, सहाशें पावणें साहा रुपये दोन आणे येणें. त्यास ऐवज मुदतीप्रमाणें न आल्यास, स्वदेशीं तुमचे सरंजामाचे महाल आहेत त्यांची जप्ती करून, वसूल सरकारांत घ्यावा. ऐसा पेशजीचा करार असतां अद्याप ऐवज आला नाहीं. याकरितां हें पत्र तुम्हांस लिहिलें आहे. व आलाहिदा तपशीलवार अजमास पाठविला असे. तरी सदरहू ऐवज जलदीनें हुजूर पाठवून देणें. जलदीनें न आल्यास, स्वदेशीं तुमचे सरंजामाचे महाल आहेत, ते जप्त करून पेशजीचे कराराप्रमाणें वसूल घेतला जाईल. याखेरीज संस्थान बुंदी येथील इस्तकबील सन तिसा खमसैन तागाईत सन तिसा सितैन अकरा साला ऐवज तुम्हांकडे व शिंद्यांकडे येणें आहे. त्यास कांहीं दिवस अमल नवता, व संस्थानिकांनीं कराराप्रमाणें वसूल दिल्हा नाहीं, यामुळें तुम्ही ऐवज सरकारांत न दिल्हा. त्यास संस्थानिक ह्मणतात कीं, तुम्हांकडे व शिंद्यांकडे ऐवज दिल्हा आहे. ऐशास आपाजी राम सरकारचे वकील संस्थानास पाठविले आहेत. त्यांचे व शिंद्यांचे रुजवातीनें संस्थान मजकूरचा ऐवज तुम्हांकडे होईल तो हुजूर पाठवून देणें.

## पेशवे व तुकोजी होळकर.

### यादी १.

यादी मतलब राजश्री तुकोजी होळकर सुरुसन समान सितैन मया व अलफ.

शिंदे आमचे सोबती बरोबरचे, त्यांच्या सरदारीचा बंदोबस्त करून फौज बरोबरीनें जथून जोड घालून द्यावी. कलम. १.

शिंद्यांस हुजूर बोलाविले आहेत. लौकर आले तर तुमची त्यांची गांठ घालून बंदोबस्त करून देऊं. जर ते न आले तर जसें तुमचे सोईस पडेल तसें करून देऊं. सरकारची सोय व तुमची सोय तसें करून देऊं. येणें प्रमाणें. कलम. १.

बराबर मातबर तोफखाना न्यावा लागेल, याचा खर्च समाईक काढावा. कलम. १.

सदरहूप्रमाणें पहिल्यापासून चालत असेल त्याप्रमाणें करावें. करार.

सरकार तालुक्यांत कामाकाजाकरितां फौज जाईल त्यासी घासदाणीयाची परवानगी असावी. कलम. १.

अमली मुलुखांत घासदाणा घेऊं नये. जोर तलबी जेथें असेल तेथें घासदाणा घेत जावा. परंतु कमाविसदारांचा बंदोबस्त मामलतीचा करून द्यावा. येणें प्रमाणें करार.

सदरहू कलमें लिहिलीं आहेत. हीं जथून एक रूपें चालून कामकाज करावें. जथ पडूं न दिलीयास खावंदांचे प्रतापें सेवा घडून येईल. बशर्त फौज आणि खावंदांनीं कृपाकरून पुस्तपन्हां राखावी. कलम. १.

जो कोणी सरकारउपयोगी त्याचा सर्व प्रकारें पुस्तपन्हां होईल. येणें प्रमाणें करार.

सरकारचे सरदार व पथकें सेवेसी दिल्हीं आहेत. चाकरी, स्वामीसेवा मेहनत करितील, त्यांची रदबदल करूं. तर खावंदांनीं मान्य करून कृपा करावी लागेल. कलम. १.

चाकरी करून आलीयावर योग्यता पाहून कार्याकारण रदबदली आइकिली जाईल. येणें प्रमाणें करार.

वरकड फौज सरकारची सरंजामी पथकें एकूण फौज २०००० वीस हजार जथून दिली पाहिजे.

१ हरी गोपाळ निसबत राजश्री महादाजी नीलकंठ.

१ शिवाजी विठ्ठल.

१ खंडेराव व कृष्णाजी जिवाजी पवार.

१ त्रिंबकराव शिवदेव.

१ नारो शंकर.

१ बहिरो अनंत.

० महिपतराव कवडे.

० संताजी वाबळे. हुजूर बोली एक हजार फौज बोली करून माळव्यांत सरकार तालुकापैकी द्यावा.

१ करोडियाचा बंदोबस्त खरूपानरूप करून द्यावा. रुजू मीरखान टोके.

---

१०

दहा सरदार व पथकें सदरहू वीस हजार फौजेनिशीं द्यावे. कलम. १.

सदरहू सात सरदार समागमें द्यावे. जो सरदार सरकारांत अड घालील त्यास देणार नाहींः येणें प्रमाणें करार.

सर्वांनीं एकरूप होऊन खावंदांच्या पायांपाशीं एकनिष्ठता धरून सेवा करावी. आणि फितूर, फांदडा न करावा. कलम. १.

फितूर, फांदडे करणार नाहींत. ताकीद केली जाईल. येणें प्रमाणें. कलम. १.

खावंदांनीं एकरूपपणें असोन सर्वांवर कृपा करावी. किंतू कोणाविषयीं धरूं नये. कलम. १.

तुम्हीं एकनिष्ठपणें चालत आहां. तिकडूनही एकनिष्ठेस अंतर नसावें. इकडून कृपा केली जाईल. येणें प्रमाणें करार.

राजे रजवाडे पातशाही लोक वगैरे यांसी बहुमान, हत्ती, घोडें, जवाहीर, वस्त्रें द्यावीं. तो खर्च समाईक काढावा. कलम. १.

सदरहूप्रमाणें करार.

सदरहू मखलाशीप्रमाणें नऊ कलमें. येणें प्रमाणें करार.

छ १ रजब, मार्गशीर्ष मास.

---

## पेशवे व गाइकवाड यांचे मधील वाटणीपत्र.*

वाटणी प्रांत सुरत व हंकर व गोलवाडा व काठेवाड निसबत श्रीमंत राजश्री पंत प्रधान सरुसन खमसैन मया व अलफ. रुपये.

| गांव सुमार. | जमा बेरीज रुपये. | हली नजर आंदाज. |
|---|---|---|
| परगणे गोंडल व मंगणी व आरडोई ८४ | ८००० | २९५०० |
| परगणे सर धार व राजकोट व जस धप १४१ | १००००० | २५००० |
| परगणे कडोलणे ३२ | ४०००० | ३००० |
| परगणे दह्या चार खडी १२ | १०००० | २७५० |
| परगणे खरीडी २४ | ५०००० | ५३०० |
| परगणे काकवाड २४ | ३०००० | ३००० |
| परगणे शिसाग १२ | १०००० | ७०० |
| परगणे द्रावके १२ | ३५००० | ६००० |

| | | |
|---|---|---|
| परगणे ढाक व बालासरंग ३२ | १०००० | १५०० |
| परगणे खडबा व मैमापा १२ | ५००० | ५०० |
| परगणे खंबालिये ५२ | ४०००० | ४५०० |
| परगणे परथरी व निकावे १२ | ४०००० | ४१२५ |
| परगणे खरीकरी सोर १२ | २५००० | ५०० |
| परगणे माडो २४ | १०००० | ४०० |
| परगणे घटका १२ | १०००० | ५०० |
| परगणे रोयण भेगाण १२ | ५००० | ५०० |
| परगणे हवेली इलास उर्फ नवानगर ५० | १५०००० | १२००० |
| परगणे वासवाडा ८४ | १२५००० | ३०००० |
| परगणे सुलतानपूर हवेली २४ | ६०००० | ३००० |
| परगणे जयतपूर ६४ | ६०००० | १००० |
| परगणे दरेवाले १५ | ४०००० | ४००० |
| परगणे राजणपुरावइसाणा ११२ | १००००० | ५००० |
| प्रांत उपट गेटा ५२ | ४०००० | २००० |
| प्रांत वाडुवे ८४ | १००००० | वैरण० |
| परगणे कोती याणे ११५ | १००००० | ७००० |
| परगणे मंगरूळ, मय बंदर २२८ | ३६०००० | २५००० |
| परगणे पूरबंदर २४ | १००००० | १२५०० |
| कसवे भडे १ | १०००० | ५०० |
| परगणे चोरवाडा २० | २५००० | १०००० |
| परगणे मेकराडे ८४ | ७०००० | २००० |
| प्रांत घोगे मय बंदर ११८ | १४०००० | २८००० |
| प्रांत सरवा २४ | १९००० | १००० |
| प्रांत भीम डाव ८४ | १०००० | १२०० |
| प्रांत भडली ८४ | ४५००० | ५००० |
| प्रांत बहेर २४ | २०००० | ३००० |
| परगणे जोधपूर, वैजाहली १२ | ३५००० | ३३२५ |
| परगणे जुनागड नसाले ८९ | ५०००० | १०००० |

| | | |
|---|---|---|
| ३०००० | तर्फ हवेली | ४१ |
| १५००० | तर्फ दातर्पे | २४ |
| ५००० | तर्फ निलाखे | २४ |
| ५०००० | | ८९ |

| | | | |
|---|---|---|---|
| परगणे उणादलेवडे मय बंदर महाल. | १२० | १००००० | १५००० |
| ३८ | २०८१ | २२५९००० | २८५३०० |

सदरहू महाल अडतीस, एकूण देहे सुमार दोन हजार एक्याऐशी, कामील जमा कोरी बावीस लक्ष, एकूण साठ हजार, बल जमा रुपये दोन लक्ष, पंचाऐशी हजार तीनशे, हे वाटणी सरकारांत घेतलीं. ते आपणांस मान्य असे. याखेरीज जमानत महाल समाइक बितपशील. रुपये.

१ × × × × × × ×

१ शहर जुनागड सायर व टंकसाळ व कसबे मजकूरची फौजदारी व खँडपुराई व कोतवाली.

१ दिवा बंदर.

३

सदरहू तीन महाल समाइक राहिले. दुतर्फा अमलदार ठेऊन अमल करावा. जो आकार होईल तो निमे वाटून घ्यावा. व शहर जुनागडचा मोहतर्फा तेथेंही जे पैदास्त होईल ते निमेनिम वाटून घ्यावी. जुनागडचे जमीदार समाईक, त्यासी परगणे मजकूरच्या तर्फा ज्या वाटणींत आल्या असतील, त्यातर्फाचे देसाई यांस बोलाऊन कामकाज करावें. अथवा सर्वा तर्फांचे देसाई एकच असले तरी दुतर्फा अमल त्यांजवर करावा. सरकारचे वाटणींतील महालांची आम्हांकडील अमलदारांनीं अथवा फौज जाईल त्यांनीं घासदाणा वगैरे उपसर्ग न द्यावा. सरकारच्या अमलदारांनीं अथवा फौज जाईल त्यांनीं आम्हांकडील महालांसीं घासदाण्याचा वगैरे उपसर्ग न द्यावा. गिरासे व तालुकदार व रयत व जमीनदार कोणाचे कोणी महालांतील न ठेवावे. सरकारच्या वाटणीच्या तालुक्यांतील आम्हांकडील रयत व जमीदार व मवासी आले तरी न ठेवावे. आम्हांकडील तालुक्यांतील सरकारच्या वाटणीच्या तालुक्यांतील रयत व जमीदार व मवासी आले तरी न ठेवावे. जिकडील तिकडे अमलदारांनीं आपल्या वाटणीच्या महालांत अमल करावा. कोणी कोणाचे महालांत मुजाहीम न व्हावे. जोर तलबी नवा मुलूख वाटणीखेरीज साधेल

तो निमेनिम वाटून द्यावा. वाटणी करार करून दिल्ही असे. याखेरीज महाल चुकोन राहिला असला तरी तहकीकात मुळें निमेनिम वाटून द्यावा. हे वाटणी करार.

## पेशवे व दमाजी गाइकवाड यांचे मधील करार.

यादी निसबत राजश्री दमाजी गायकवाड सेना खासखेल समशेर बहादर सुरुसन तिसा सितैन मया व अलफ.

साल मजकुरीं मशारनिल्हेपासून ऐवज घ्यावयाचा करार रुपये.

२३२५००१ नजर एकसाली समानांत फौज चाकरीस न आली व मागील अन्याय माफ केले सबब.

१५७५००० बाकी तागाईत सन तिसा अखेर इस्तकबील सन सबा तागाईत सन तिसा अखेर दरसाल ५२५००० पांच लक्ष पंचवीस हजारप्रमाणें तिसाला सदरहू ऐवजावर वराता जाल्या आहेत.

३९००००१

| यासी मुदत. | सन तिसा. |
|---|---|
| ६५०००० | कार्तिक अखेर. |
| ६५०००० | चैत्र अखेर. |
| ६५०००० | आषाढ अखेर, सन सबैन. |
| ४००००० | अश्विन अखेर. |
| ४००००० | मार्गशीर्ष अखेर. |
| ४००००० | चैत्र अखेर. |
| ४००००० | जेष्ठ अखेर. |
| ३५०००० | श्रावण शुद्ध १५. |
| ० | सन इहिदे सबैन |
| ० | × × × |

३९००००१

येणें प्रमाणें एकूणचाळीस लक्ष रुपये सदरहूप्रमाणें मुदतीनें सरकारांत द्यावे. येणें-प्रमाणें करार.

खंडेराव गायकवाड यांचें पेशजीचे कराराप्रमाणें चालवावें. वरकड जावसाल सरकारांत मनास आणणार नाहीं. येणेंप्रमाणें करार.

भुकणजी हरीदत्त यांजकडे श्रीरंगपट्टणचे हवाल्याबद्दल ऐवज येणें. त्यास मशारनिल्हेचा ऐवज तुम्हांकडे वाजवी असल्यास त्यांनीं देविले तर सरकारांत द्यावा. येणेंप्रमाणें करार.

शहर अमदाबाद निमेनिम अमल, त्यास गायकवाडांकडील कारकुनाचे दाखल्यानें तहप्रमाणें परस्परें द्यावें घ्यावें, याप्रमाणें सलास व आर्बांत करार झाला; त्याप्रमाणेंच करार असे. येणेंप्रमाणें करार.

तुम्हांकडील महाल पेशजी सरकारांत घेतले:—

१ परगणे विसनपूर.
१ परगणे मरोली.
१ परगणे गल्हे.
१ परगणे तेलाडी.
१ परगणे मोहे.
१ परगणे सत्रागांव.
१ परगणे वाघोड.
७

सदरहू सात महाल सरकारांत घेतले होते ते सन सलासांत तुम्हांस सरकारांतून दिल्हे तेव्हां तुम्ही दरबारखर्चाबद्दल दिल्हे ते हल्लीं सरकारांत घेतले.

१ परगणे सत्रागांव.
३ देहे.
१ मौजे दाभोळ, परगणे तेलाडी.
१ मौजे पासरे, परगणे मरोली.
१ उबराट, परगणे मरोली.
३
४

एक परगणा व तीन देहे सरकारांत ठेवून बाकीचे परगणे तुमचे तुम्हांस दिल्हे असत. येणेंप्रमाणें करार.

इस्तकबील सन आर्बा तागाईत सन सीत सितैन अखेर पावेतों दरसाल सव्वापांच लक्ष प्रमाणें सरकारांत भरणा पुरवून द्यावा. कदाचित् बाकी राहिली तर सरकारांत घ्यावी. येणेंप्रमाणें करार.

सन सबैनापासून दरसाल ऐवज सरकारांत घ्यावयाचा करार पेशजी तीर्थरूपाचे वेळेस होता. त्याप्रमाणें वेरीज तागाईत पेशजी प्रमाणें रुपये ७,७९,००० सात लक्ष एकूण ऐशीहजार सदरहू ऐवज अखेर सालांत सरकारांत घेत जावा. येणेंप्रमाणें करार.

दरसाल तीन हजार फौजेनिशीं चाकरी हुजूर करावी. मसलत पडेल तेव्हां चार हजारानिशीं चाकरी करावी. छावणीस एका खाशानें छावणीचें काम पडल्यास राहावें. येणेंप्रमाणें करार.

हिंदुस्थानचे स्वारींत तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेबांनीं ऐवज कर्ज तुम्हांस दिला तो तुम्हांकडे येणें. तो तुम्हांस माफ केला असे. येणेंप्रमाणें. व मागील वाक्यासाक्या रेजगाण वगैरे दप्तरीं ओढत असतील ते माफ केली असे. येणेंप्रमाणें करार.

दाभाड्यांकडील वतनें तुमचे तसलमातीस दिल्ही असत. दाभाड्यांचे वायकांचा बोभाटा सरकारांत येऊं देऊं नये. येणेंप्रमाणें करार.

सुरत बंदरचा निमे हिस्सा सरकार, व निमे गायकवाड, त्यास दहा हजार रुपये समाईकपैकीं वजा करून, बाकीचा हिस्सा सरकारातून गायकवाडांस पावत होता. त्यास सन सलास व सन अर्बात दहा हजारांचा हिस्सा निमे द्यावयाचा करार जाला. त्याप्रमाणेंच हल्लीं करार केला असे. येणेंप्रमाणें करार.

मागील ऐवज सन सलासांत तेलाडी वगैरे महाल दिल्हे त्या बाबत व दरसाल दोन लक्ष चोपन्न हजार सन अर्बापासून सोडिले त्याबाबत ऐवज येणें, तो तुम्हास माफ केला असे. येणेंप्रमाणें करार.

तुम्हांकडील खाजगत वतनें व इनामगांव व सरंजामी खेडीं पेशजी तीर्थरूप कैलासवासी यांचे वेळेस व तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांनीं करार करून दिले त्याप्रमाणें करार असे. येणेंप्रमाणें करार.

सन सलासांत सेना खासखेली तुम्हांस दिली. त्याप्रमाणें करार असे. येणेंप्रमाणें करार.

उगवणीचे कर्ज देणें. त्यापैकीं सालमजकुरीं तुम्हांवर ऐवज भारी पडला. सबब कर्वे वगैरे साहुकारांस द्यावे, रुपये २००००० दोन लक्ष रुपये द्यावे. येणेंप्रमाणें करार.

---

## पेशवे व सयाजीराव गाईकवाड यांचे मधील करार.

यादी राजश्री सयाजी गायकवाड सुरुसन तिसा सितैन छ १४ साबान.

साल दरसाल तीन हजार फौजेनिशीं सरकारांत चाकरी खाशानिशीं करावी. अथवा फत्तेसिंग गायकवाड यांनीं करावी. भारी मसलत पडल्यास चार हजार फौजेनिशीं छावणीस रहावें, ऐसे जाहल्यास राहून चाकरी करावी. कलम १.

सलासचें सालीं राजश्री दादासाहेबांपासून महाल चहू लक्षांचे माफ करून घेतले. पैकीं लाख रुपयाचे महाल दरबारखर्चाबद्दल सरकारांत देऊन, तीन लक्षांचे महाल तुम्हांकडे दिले. ते महाल तुम्हांवर कृपा करून पेशजी प्रमाणें हल्लीं माफ केले असत. कलम १.

बाबीचा तालुका तुम्हीं घेतला त्यापैकीं निमे मुलुख सरकारांत द्यावा. त्याबद्दल तुम्ही शिबंदीखर्च केला आहे. व सरकारचा ऐवज सदरहू मुलुखचा येणें. ऐवज परस्परें देऊं नये. व मागूं नये. पेस्तर सालापासून वाटणी मुलखाची निमेनिम द्यावी. कलम १.

अमदाबाद व सुरत वगैरे तह पेशजी जाला आहे. त्यांत अलीकडे तुम्हांकडून कोठें कोठें खलेल होती. ते न करितां सुदामत चालवें. कलम १.

सनवती कर्ज तुम्हांकडे येणें. त्यास हल्लीं सरकारचा ऐवज तुम्हांकडे भारी ठरला. सबब तीन वर्षांनंतर सनवती कर्जाचा हप्ता चालता करावा. कलम १.

सरकार उगवणीचे कर्ज, कर्वे वगैरे येणें आहे. त्यास साल मजकुरीं आज्ञा केल्याप्रमाणें देवावें. राहिला ऐवज तीन वर्षांनंतर प्रविष्ट करावा. कलम १.

भुकणजी हरिदत्त यांजकडे बारा लक्षांचा ऐवज सरकारचा येणें. त्या ऐवजाची चिट्ठी तुम्हांवर दिली होती. त्यास त्यांच्या रुजवातीनें तुम्हांकडे ऐवज ठरला, तर सरकारांत द्यावा. नसला तर, त्याचा त्याजपासून घेऊन. येविषयीं तुम्हीं भीड घालूं नये. त्याचें साहित्य करूं नये. कलम १.

सालाबादचा ऐवज पेशजी पावणे आठ लक्ष रुपये द्यावयाचा करार सलासचें साला-पासून सव्वा पांच लक्षांचा करार ठरावला. हल्लीं पेशजी पावणे आठ लक्षांचा करार होता. त्याप्रमाणें ठरविला असे. सबब पेस्तर सालापासून दरसाल पावणे आठ लक्ष सरकारांत देत जावे. त्याची हप्तेबंदी.

| | |
|---|---|
| ३८७५०० | अव्वल सालीं ज्येष्ठ. |
| ३८७५०० | कार्तिक अखेर निमे. |
| ७७५००० | |

सदरहूप्रमाणें सरकारांत देत जावे. कलम १.

सालमजकुरीं ऐवज येणें. रुपये.

| | |
|---|---|
| १५७५००० | पेशजी सव्वा पांच लक्षाप्रमाणें बाकी सन सबा तागाईत तिसा, तीन सालें येणें. |
| १५००००० | समानचें सालीं फौज चाकरीस न आली सबब करार केले. |
| ८२५००० | सलासचें सालीं महाल माफ केले. सबब त्याचा वसूल पांच वर्षे तुम्हीं घेतला. व सरकारचें कर्ज व पानपतचें कर्ज माफीखालीं आलें सबब नजर. |
| २१००००० | दमाजी गायकवाड यांचा काळ जाला. पुढें दौलत तुम्हांकडे पूर्ववत् करार केली सबब नजर. |
| ६०००००० | |

यासी हसेबंदी.

२३०००००० साल मजकुरीं द्यावे.

११५०००० आश्विन अखेर.

११५०००० पौष अखेर.

२३०००००

साहुकारी निशा द्यावी.

२८२५००० पेस्तर साल सन सबा सदरहूप्रमाणें हसेबंदी. निशा साहुकारी द्यावी. निशा न दिल्यास महाल गहाण आठ लक्षांचे सरकारांत ऐवज फिटे तों ठेवावे. ऐवज फिटल्यावर माघारे द्यावे.

८७५००० इहिदे सबैन सदरहू हसेबंदीप्रमाणें द्यावे.

६००००००

येणेंप्रमाणें सरकारांत द्यावे.

तळेगांव इंदुरी जकात सरपाटिलकी वगैरे वतनी वाब, दाभाडे यांची तुमचे तसलमातीस आहे. तर तुम्हीं दाभाडे यांच्या बायकांमुलांचे चालवावें. बोभाट सरकारांत आणूं नये. कलम १.

पूर्वी दमाजी गायकवाड कैलासवासी यांनीं सरकारलक्ष सोडून अन्यथा वर्तणूक केली. तें सर्व तुम्हांवर नजर देऊन माफ करून दौलत बहाल केली. तुम्हीं सरकारलक्षाप्रमाणें वर्तणूक करावी. सरकारांतून सर्व प्रकारें चालविलें जाईल. तुम्हांकडे अंतर पडल्यास क्षमा होणार नाहीं. याजकरितां सरकारलक्षाप्रमाणें वर्तणूक करावी. कलम १.

येणेंप्रमाणें अकरा कलमें करार केलीं असत. सदरहूप्रमाणें वर्तणूक करावी. न केल्यास दौलत तुम्हांकडे राहणार नाहीं.

---

## पेशवे व खंडेराव गाईकवाड यांचे मधील करार.

यादी राजश्री खंडेराऊ गायकवाड सुरूसन खमस सबैन मया व अलफ. मशारनिल्हे निखालसपणें येऊन भेटले. त्यास मशारनिल्हेचे करार.

प्रांत गुजराथपैकीं गायकवाड भागांतील सरंजाम.

१ प्रांत नडियाद.

१ प्रांत कडी.

१ प्रांत कपडवंद.

१ प्रांत बोहल व छाला व धारासणें.

१ मौजे बिडज, प्रांत ढवळकें.

एकूण चार महाल व एक गांव कैलासवासी दमाजी गायकवाड विद्यमान असतां, तुम्हांस सरंजाम नेमून दिला. महालची लावणी आबादी करोन सुदामतप्रमाणें चाकरी करावी. कलम १.

येणेंप्रमाणें करार करावें.

हिशेबवगैरे निमित्यानें राजश्री फत्तेसिंगराव यांसी तुम्हांसी संबंध नाहीं. येणेंप्रमाणें करार करावें.

प्रांत नडियाद व कपडवंद वगैरे महाल येथील जिन्नस राजश्री फत्तेसिंगरायांनीं तुमची खाजगत व बाबस्ते(?) व रयत व सावकार, वाणी, उदमी वगैरे चीजवस्त व कमाविसदाराचे अमलाचा वसूल व्यारा परतो न घ्यावा. कलम १.

येणेंप्रमाणें करार करावें.

राजश्री फत्तेसिंगराव यांजकडील तुमचे महालीं वगैरे हरएक बाबें उपसर्ग न लागावा. कलम १.

येणेंप्रमाणें करार करावें.

एकूण चार कलमें करार केलीं आहेत. त्यास इमानें इतबारें वर्तोन सरकार लक्षाखेरीज दुसरें लक्ष शपथपूर्वक न धरितां निष्ठेनें वर्तावें. याप्रमाणें सरकारांतून निभाविलें जाईल. येणेंप्रमाणें करार.

छ २९ सफर, खमस, चैत्र मास.

---

## फत्तेसिंगराव गाईकवाड यांनीं पेशवे यांजकडे पाठविलेली.

### यादी १.

यादी निसबत राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड, सुरुसन समान सबैन मया व अलफ.

गोविंदराव गायकवाड यांचा पक्ष सरकारांत एकरूप धरूं नये. आमदाबादेहून निघोन कदाचित् हुजूर आले, तर पेशजी कैलासवासी रावसाहेबांनीं दीड लक्ष रुपयांची नेमणूक करार करून दिली आहे, त्याप्रमाणें मशारनिल्हेस ऐवज करार करून द्यावा. तीन लक्ष रुपयांचा सरंजाम महाल सरकारचे विचारें नेमून द्यावे. येणें प्रमाणें पांचशें राऊतांनिशीं चाकरी, जेथें सांगूं तेथें करावी. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

खंडेराव गायकवाड यांची नेमणूक सरकारांतून तीन लक्ष रुपयांची करार करून दिली. त्यांणीं पांचशें राऊतांनिशीं चाकरी आम्ही सांगूं तेथें करावी. त्यास सदरहूप्रमाणें वर्तावें म्हणून पेशजी करार आहे. त्याजप्रमाणें चालवावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

महारुद्र रामचंद्र यांजकडे सरकारचा व तुम्हांकडून सरंजाम आहे. त्याजप्रमाणें चालवावा. येणें प्रमाणें करार करावें. करार.

खंडेराव गायकवाड यांजकडे कसबे महाल सांगितले होते. त्यापैकीं त्याचे नेमणूकेचे तीन लक्ष रुपये घेऊन, बाकीचा ऐवज हिशेबीं निघेल तो आमचा आम्हांस द्यावा. व मुलखगिरी इंदूर वगैरे येथील खंडण्यांचा ऐवज त्यांजकडे येणें. एकूण दोन कलमांचा फडशा होणें. त्यापैकीं पन्नास हजार रुपये मात्र आम्हांस दिले असत. बाकी ऐवज त्याजकडून ध्यावयाचा राहिला, तो देणें म्हणून पत्र.

पेशजीं तुमचा त्यांचा करार आहे त्याजप्रमाणें तुम्हीं व त्यांनीं वर्तावें. वाजबीचे रीतीनें फडशा करुन देणें म्हणून खंडेराव गायकवाड यांस पत्र देवावें. द्यावें.

आमचे पक्षीचे कोणी गैरवांका समजावितील तें ऐकों नये.

गैरवाजबी ऐकणार नाहीं. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

डभईचे कमाविसदारापासून ऐवज घेतला त्याची याद अहिलादा असे. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

दाभाडे यांचीं वतनें वगैरे पहिलेपासून आमचे जिमें होतीं. त्याप्रमाणें आमचे जिमें असावीं.

तुमचे तसलमातीस वतनें वगैरे होतीं तीं सरकारांतून त्यांचीं त्यांजकडे दिलीं. तुम्हीं येविषयीं कांहीं बोलूं नये. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

मौजे नारायणटेंभी व उमरखेडें, परगणे वण हे गांव पाटिलकीचे आहेत. त्यास दरोबस्त दोन्ही गांव आम्हांकडे देवावे.

खासखेलीचें पद राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड यांचें नांवें करार करून द्यावें.

सेनाखासखेलीचें पद फत्तेसिंगराव गायकवाड यांचें नांवें करार करून द्यावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

तुम्हीं पेशजी कराराप्रमाणें फौजेनिशीं चाकरी करावी, येणेंप्रमाणें करार करावें. करार.

महादाजी बल्लाळ यांची फडणिशी पेशजीप्रमाणें चालवावी. कामकाज घेत जावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

इंग्रजास पांच लक्षांचे महाल दिले त्याचा मोबदला सरकारांतून महाल द्यावे. त्यापैकीं परगणे सावली मात्र दिली. बाकीचे महाल लावून ध्यावे.

वरकड पेशजी तीर्थरूप कैलासवासी रावसाहेब यांचे वेळेस कलमें करार केलीं आहेत. त्याजप्रमाणें करार असत. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सरदारीवर कर्ज, सावकारी व कमाविसदारांचें सनवती व हलीचें बहूत जालें, व

फौजेच्या देण्याचा पेंच विशेष. मुलखांत फितुरामुळें जागा राहिली नाहीं. यास्तव सरकारांतून ताकीद सर्वांस असावी. मुलखाची आबादी होऊन सरदारीस सहुलत पडे तोंपर्यंत ऐवज मागों नये. पुढें ज्याची जशी तोड पडेल तशी काढूं.

बाळाजी नाईक व गोपाळ नाईक यांचें कर्जाचा निकाल करून द्यावा. बाकी सावकारांचे, सोईसोईनें निकाल करून द्यावा. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

अमृतराव आपाजी यांस पत्र कीं, राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड यांचा अमल सुदामतप्रमाणें शहर अमदाबाद येथें आहे. त्याप्रमाणें चालूं देणें. तुम्हीं शहरास कमाविसदार सुरळीत माणूस द्यावा. त्यांनीं तुमचा अमल सुदामतप्रमाणें अमृतराव आपाजी चालवितील. येविषयीं मशारनिल्हेस पत्र देवावें. द्यावें.

याउपरी आमचे भाऊबंद सरकारांत कोणी आलिया त्यांचा अगत्यवाद धरूं नये.

तुम्हीं भाऊबंदाचे पेशजीप्रमाणें चालवावें. सरकारांत आल्यास ऐकणार नाहीं. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

गोविंदराव गायकवाड यांस हुजूर आणावे. गणेश विश्वनाथ यांनीं घेऊन यावें.

मशारनिल्हेस हुजूर येणेंविषयीं हुजुरून पत्रें परभारें जातील. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

गोविंदराव गायकवाड यांजकडील कारकून फौज ठेवून पाठवितील. तरी त्यांस मना करावें. व देशीहून कोणी शिलेदार मशारनिल्हेकडे जातील, त्यासही जरब देऊन न जात तें करावें.

सदरहूविषयीं ताकीद केली जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

छ २३ रजब, समान.

---

## यादी २.

यादी निसबत राजश्री फत्तेसिंग गायकवाड, सुरुसन समान सबैन मया व अलफ.

गोविंदराव गायकवाड यांस खंडेराव गायकवाड यांजप्रमाणें सरंजाम द्यावयाचा करार अलाहिदा यादीवर करून दिला आहे. त्याजवर निकाल न पडे, तर लाख रुपये पावेतों जास्ती सरंजाम देऊन समजावीस करावी. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

गोविंदराव गायकवाड यांची समजावीस लिहिल्याअन्वयें न पडे, तरी मशारनिल्हे गडबड करूं लागल्यास, सरकारचे महालास त्यांचा उपद्रव लागूं देऊं नये. तुमचा तुम्हीं बंदोबस्त त्याचा करावा. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

गोविंदराव गायकवाड यांस अमदाबादेहून हुजूर बोलाविलें आहे. त्यास ते इकडे

येतील. त्यांस तुम्ही उपद्रव करूं नये. येण्यास दिकत मशारनिल्हेनीं केल्यास अमदाबा-देहून मार्गस्थ करून द्यावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

छ २३ रजब. समान सबैन, श्रावण मास.

---

## यादी ३.

यादी कलमें फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहादर, सुरुसन समानीन मया व अलफ.

गोविंदराव गायकवाड यांजकडील वेध दौलतीस एकंदर नसावा. कलम १.

मशारनिल्हेचा वेध तुम्हांकडे काडीमात्र नाहीं. चार लक्षांचा सरंजाम सरकारांतून देऊन त्यांची तोड काढिली जाईल. येणेंप्रमाणें करार करावें.

आम्ही राज्यांतील सेवक, यास्तव आमदाबाद तालुका शहरसुद्धां आम्हांस सरकारांतून द्यावा. कलम १.

श्रीमंत राजश्री रावसाहेब थोर होत तों पर्यंत, तुम्हांकडे तालुका शहर असावें. तुम्हीं श्रीमंतांस विनंति करून आपलेकडे करून घ्यावें. पुढें श्रीमंतांचे मर्जीनुरूप करावें. येणेंप्रमाणें करार करावें.

इंग्रेजांची मसलत शेवटास नेल्याशिवाय देशीं जाऊं नये. आम्हांकडील मुलखाचा बंदोबस्त करून द्यावा. इंग्रेजांचा पेंच आम्हांस न पडे तें करावें. कलम १.

मसलत शेवटासी गेल्याखेरीज आम्ही जाणार नाहीं. तुमचा बंदोबस्त जाहल्यावरी स्वारी जाईल. येणेंप्रमाणें करार करावें.

मोल्हेरचा किल्ला व नवापूर हें आम्हांस द्यावें. येविषयींचें बोलणें व मखलाशी पेशजी करून दिल्ही आहे. तें अमलांत न आलें. त्यास हल्लीं किल्यावर टाणें व महालची दखल द्यावी. कलम १.

नवापूरची यादी मखलाशीची पेशजी असेल, त्याप्रमाणें अमलांत येईल. मोल्हेरचा जाबसाल सरकारांत बोलण्यांत ठरेल त्याप्रमाणें केलें जाईल. येणेंप्रमाणें करार करावें.

दौलत सर्व प्रकारें पेचांत आली. कांहीं बाकी राहिली नाहीं. यास्तव दरसाल ऐवज आम्हांपासून सरकारांत घेतात. तो न घ्यावा. व मागील ऐवज माफ करावा. पुढें घेऊं नये. कलम १.

मागील माफ केला असे. दहा वर्षां पुढें सरकारचे कराराप्रमाणें ऐवज सालदरसाल देत जावा. येणेंप्रमाणें करार करावें.

दरसाल फौज चाकरीस द्यावी, त्याचा करार, त्यास पांच वर्षे दंग्यामुळें मुलखांतील

बंदोबस्त राहिला नाहीं. क्रोड रुपये यांचा पेंच माथां. यास्तव फौज चाकरीस द्यावी ते माफ करावी. मातबर मसलत पडलीयास फौजसुद्धां चाकरीस हजर असों. कलम १.

दरसाल फौज चाकरीस देणें, ते तुम्हांस माफ केली असे. मातबर मसलत सरकारांत पडेल तेव्हां तुम्हीं मातबर फौजसुद्धां मसलतीस सामील असावें. येणेंप्रमाणें करार करावें.

अंताजी नागेश यांजकडे आमचे हिशेबाचे वगैरे जाबसाल आहेत. त्यास त्यांचे भाऊ व कारकून तुम्हापांशीं आहेत. ते आमचे स्वाधीन करावे. कलम १.

तुमचा तुम्ही वाजबीचे रीतीनें जावसाल असतील ते करून घ्यावे. येविषयीचे जाबसाल अगर पक्ष कोणाचा सरकारांतून करणार नाहीं. येणेंप्रमाणें करार करावें.

आमचे महाल इंग्रेजांकडे गेलेले आहेत ते आमचे आम्हांस द्यावे. कलम १.

पेशजी करार सरकारांतून ठरला आहे. त्याप्रमाणें घडेल. येणेंप्रमाणें करार करावें.

तूर्त मसलतीस ऐवज द्यावा. कलम १.

होत नाहीं.

एकूण कलमें नव करार करून दिल्हीं आहेत. त्यास तुम्हीं इंग्रेजांतून निघून आम्हांस सामील व्हावें. तुम्हीं इंग्रेजांचे पारपत्यास फौजसुद्धां अनुकूल होऊन सरकारउपयोगीं पडल्यास, केल्या कराराप्रमाणें निभावून देऊं. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

छ २५ रबिलोवल, फाल्गुनमास. सुरुसन समानीन मया व अलफ. मुक्काम पांचदेवळें, नजिक बडोदें.

---

## गोविंदराव गाईकवाड यांनीं फत्तेसिंगराव गाईकवाड यांचे विरुद्ध पेशवे यांजकडे मागितलेली मदत.

यादी फत्तेसिंग गायकवाड यांजकडील बंदोबस्ताविषयीं साहित्य वगैरे कलमें सरकारांतून ठराव करून घ्यावयाचा.

( यादी सरदार द्यावा ) हजार दोन हजार फौजेनिशीं. कलम १.

पंधरा हजार फौज व शिबंदी वगैरे मसलतीस पाहिजे. त्यास सरदार सरकारांतून नेमून देतील. त्यांनीं आम्हीं एक विचारें ठेवावी. फौजेस खर्चास लागेल तो ऐवज आम्हीं देऊं. मशारनिल्हे गायकवाड यांजकडील मुलखाची जप्ती करून ऐवज येईल तो, अगोदर सदरहू फौजेस खर्च जाला असेल तो ऐवज, सरकारचे कारकुनाचे विद्यमानें घेऊं. नंतर महालाचा बंदोबस्त सरकारांतून करावा. कलम १.

फत्तेसिंग गायकवाड यांजवर मसलत होती· हें त्यांस समजल्यावर त्यांचें बोलणें सरकारांत लागलें. त्यास सरकारमर्जीनुरूप बोलण्याचा ठराव होऊन आल्यास, चार महाल

सरकार निसबतीस घेऊन आमच्या विद्यमानें तह करावा. बापुजी देसाई वगैरे जमीदार हुजूर आहेत. सबब त्यांचें वतनाचे महाल सरकारांत घ्यावे. महाल वितपशील:–

१ परगणे नडयाद.
१ परगणे पेटलाद.
१ परगणे मोर्ध.
१ परगणे मातर, किल्ले खेडेंसुद्धां.
―
४

चार महाल सरकारांत घेतल्याखेरीज तह होऊं नये. कलम १.

फत्तेसिंग गायकवाड यांजकडील महालचे जमीदार व कमाविसदार यांस ताकीदपत्रें जीं, महालपैकीं एक पैसा गायकवाड यांजकडे न देणें; हुजुरून फौज व सरदार पाठविले आहेत, त्यांसी रूजूं होऊन महालचा वसूल सरकारांत देत जाणें. म्हणोन. कलम १.

बापुजी कृष्ण व बापुजी देसाई यांस वचन, शफत पुरस्कर देऊन, हे आपले पदरचे ऐसा अभिमान धरून चालवावें. येविषयींची खातरजमा. कलम १.

सरकारांतून सरदार, स्वामी नेमून देतील त्यांची आमची एकवाक्यता असावी. मसलती बापुजी कृष्ण यांनीं करावी व देवावें त्यांनीं करावें. उभयतांनीं एकविचारें जें कर्तव्य तें करावें. येविषयींचा बंदोबस्त करून द्यावा. कलम १.

अंताजी नागेश यांचे पुत्र हुजूर आहेत, त्यांस समागमें द्यावयाची आज्ञा. सरकार कामाचे उपयोगी आहेत. कलम १.

रवळोजी शिंदे व रुद्राजी शिंदे व जयराम लक्ष्मण व नारो श्रीपत चार सरदारांसह स्वामींची आज्ञा आम्हांस हुजूर येण्याविषयीं आली. तेव्हां मशारनिल्हेची आमची एक मसलत होऊन झाडून फौज गायकवाडांकडील मसलतीस सरकार रुजूं व्हावी, येविषयीं आणशपथ होऊन आम्ही स्वामींकडे आलों. मागें फत्तेसिंग गायकवाड यांस यांतील प्रकार समजोन, रवळोजी शिंदे यांचा व त्यांचा हर्षामर्ष होऊन, रवळोजी शिंदे व रुद्राजी शिंदे व जयराम लक्ष्मण फौजसुद्धां, राजश्री माहादजी शिंदे यांजकडे जावयास गेले. दोन मास आम्हांकडील सरकारलक्षाचा मार्ग किल्ले पाया ( फाटलें आहे ) पाहिला. परंतु आम्हांकडील सालजाब दिवसगतीवर पडला जाणोन जावयास गेले. नारो श्रीपत बंधूसुद्धां फत्तेसिंग गायकवाड यांनीं बडोद्यांत कैद केले. त्यास मशारनिल्हेचीं पथकें गायकवाडांकडे चाकर होते. त्याप्रमाणें करार करून हुजूर येण्याविषयीं पत्रें द्यावीं. वगैरे फौज फत्तेसिंग गायकवाड यांजकडील हुजूर येईल, त्याचा बंदोबस्त करून द्यावयाची आज्ञा व मशारनिल्हेची तलब गायकवाड यांजकडे येणें. त्यास तहाचा ठराव हुजूर जाल्यास तहांत तलबेचा ऐवज

लावोन घ्यावा. वगैरे माल मालीयेत फत्तेसिंग यांजकडे गेली आहे ती द्यावी. येविषयींचा वंदोबस्त करून द्यावा. कलम १.

तोफा वगैरे.

७ तोफा.

२ थोर.

५ लहान.

—

७

५० जेजाला.

५०० बाण.

कलम १.

फत्तेसिंग गायकवाड यांजकडे स्वदेशीं गांव, खेडीं असतील तीं जप्त करावीं. कलम १.

फत्तेसिंग गायकवाड यांजकडे देशची फौज आहे. त्यास सरदारांस वगैरे पतक्यास ताकीदपत्रें जीं, सरकारचे फौजेंत सोनगडच्या मुक्कामीं येऊन रुजूं होणें; न जाल्यास तुमचीं घरें दारें, वतनें जप्त होऊन पारिपत्य केलें जाईल. म्हणोन पत्रें लागतील तीं. कलम १.

बापुजी कृष्ण व बापुजी देसाई यांचा बदोबस्त स्वामींनीं करून द्यावा. येणेंप्रमाणें. कलमें.

१ बापुजी कृष्ण यांस हजार स्वारांचा सरंजाम व स्वदेशीं इनाम गांव दोन दहा हजारांचे द्यावे.

१ बापुजी देसाई यांस पांचशें स्वारांचा सरंजाम व इनाम गांव गुजराथ प्रांतीं द्यावा.

—

२

सदरहू सरंजामास चार महाल सरकारांत घेणें. त्यापैकीं सरंजाम लावून द्यावा. कलम १.

किशोर पुरूषोत्तम वगैरे समस्त सावकार, प्रांत गुजराथ यांस ताकीद पत्रें जीं, फत्तेसिंग गायकवाड यांजकडील मुलखाची जप्ती सरकारांतून केली असे. तर संवत १८४३ चे फसलच्या ऐवजीं रसदेचे भरणे, महालच्या हम्या, व कर्जाऊ ऐवज गायकवाड यांजकडे न देणें. सरकारची ताकीद असे. म्हणोन. कलम १.

फत्तेसिंग गायकवाड यांजकडील महालचे जमीदार, देशमुख व देशपांडे वगैरे मवासी सरकारचे फौजेंत येऊन रुजूं होतील, त्यांस वचन प्रमाण स्वरूपानुरूप देऊन बंदोबस्त करून द्यावा लागेल, त्याप्रमाणें सरकारांतून निभावणी व्हावी. व गायकवाड यांचा तहाचा ठराव जालीयास त्याचा बंदोबस्त सुदामत असेल त्याप्रमाणें करून द्यावा. कलम १.

फत्तेसिंग गायकवाड यांचा तहाचा ठराव हुजूर जाल्यास फौज व शिबंदीचीं कबजें करून पैका द्यावा लागेल. त्यास तहांत फौजेचा पैका वगैरे सालजाब मशारनिल्हेकडून करून घेऊन तहाचा ठराव व्हावा. कलम १.

खंडेराव गायकवाड यांचे पुत्र, मल्हारराव गायकवाड हे परगणे कडी येथें राहातात. त्यांस हुजूर आणावें. येविषयींची आज्ञा जाल्यास मशारनिल्हेकडे कारकून पाठवूं. हुजूर आल्यावर त्यांजकडील सरंजाम आहे, त्याजप्रमाणें चालविला पाहिजे. अथवा फौजेंत रुजूं जाल्यास त्यांचा बंदोबस्त करून द्यावा. येविषयींची आज्ञा. कलम १.

सदरहू मसलतीस फौजा श्रावणमासीं, सुरत अठ्ठाविशींत जाव्या. म्हणजे बंदोबस्त यथास्थित. याजकरितां त्वरा असावी. येविषयींची आज्ञा. कलम १.

सावली महाल सरकारचा हलीं दहा पंधरा वर्षे फत्तेसिंग गायकवाड पोकळींत खातात. त्यांस त्यांजकडील मुलखाचे जप्तीबरोबर परगणे मजकूरचा बंदोबस्त होऊन येईल. परंतु गायकवाड यांचे तहाचा ठराव हुजूर होऊन आल्यास, परगणे मजकूर त्यांजकडे द्यावयाचे नाहीं. येविषयीं बंदोबस्त. कलम १.

फत्तेसिंग गायकवाडांकडील जप्ती केली असतां, तह लौकर न होई, तरी फौज राखून मुलखाचा बंदोबस्त करून, फौजेची शिबंदी वारून सालीना दहा पंधरा लक्ष रुपये सरकारांत देत जाऊं. शिवाय दरबारी खर्च. येणेंप्रमाणें. कलम १.

---

## गोविंदराव गाइकवाड यांजकडील

## यादी २.

यादी गोविंदराव गायकवाड, सेना खासखेल समशेर बहादर, सुरुसन सलास तिसैन मया व अलफ. फत्तेसिंगराव यांचा काळ जाल्यावर सेना खासखेली व समशेर बहादरीचें पद व सरंजाम किल्ले ठाणींसुद्धां मानाजीराव गायकवाड यांजकडे सरकारांतून करार करून देऊन नजरेचे ऐवजाचा वगैरे करार ठरला, त्याप्रमाणें मशारनिल्हेकडून अमलांत आलें नाहीं. याजकरितां सेनाखासखेली व समशेरबहादरीचें पद व सरंजाम किल्ले ठाणींसुद्धां त्यांजकडून दूर करून, सालमजकुरापासून पेशजीप्रमाणें मशारनिल्हेचे नांवें सरकारांतून करार करून दिल्हा. त्याविषयींची ऐवजाची वगैरे कलमें.

मशारनिल्हेचे नांवें सेनाखासखेली व समशेरबहादरीचें पद व सरंजाम करार करून दिल्हा. त्याबाबद ऐवजाचा करार नजर वगैरे मिळोन रुपये.

४३६२००० सालाबद्दल ऐवज फौजेचे चाकरीसुद्धां इस्तकबील सन इहिदे तिसैन तागाईत सन सलास तिसैन एकूण सालें तीन, दरसाल रुपये १४५४००० प्रमाणें रुपये.

५६३८००१ नजर मशारनिल्हेकडे सरंजाम व पद करार केलें सबब.

१००००००१ एक करोड रुपये सोळा आणे सरकारांत द्यावयाचा करार ठरला.

त्यास गोविंदराव बडोद्यास गेलीयावर, शिलकी ऐवज जो निघेल तो हुजूर सदरहू ऐवज पैकीं पाठवावा. बाकी ऐवज राहील, तो निकडीनें क्षेपनिक्षेप सरकारांत पावता करावा. येणेंप्रमाणें करार करावे. करार.

फौजेची चाकरी दरसाल तीन हजारांची सरकारांत करावी. मसलत पडेल तेव्हां चार हजारनिशीं करावी. काम पडल्यास एका खाशानें छावणीस रहावें. फौजेचे चाकरीस सरकारांत प्रयोजन लागेल ते समयीं आज्ञा होईल त्याप्रमाणें करावी. प्रयोजन नसल्यास सालाबादी करारांत ऐवज लिहिला आहे त्याप्रमाणें सरकारांत देत जावा. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सयाजीराव गायकवाड व जानाजीराव गायकवाड व मल्हारराव गायकवाड यांचे योग्यतेनुरूप चालवावें. सरकारांत बोभाट येऊं नये. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

महादाजी बल्लाळ यांजकडे तुम्हांकडील फडणिशी आहे, त्याप्रमाणें करार केली असे. वेतन पेशजीचे कराराप्रमाणें पाववीत जावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सरकारचीं कलमें व तुम्हांकडील कलमें पूर्वीं तीर्थरूप कैलासवासी रावसाहेब यांचे वेळेस करार जालीं आहेत त्याप्रमाणें चालावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

अमदाबादेंत दोहींकडील अमल आहे. त्यास पूर्वींचे करार आहेत त्याप्रमाणें चालावें. अलीकडे अधिक केलें असेल तें मोडावें. कराराप्रमाणें चालावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

दमाजी गायकवाड यांजपासून फत्तेसिंगराव गायकवाड यांचे अखेरपर्यंत, बायका व घरांतील माणसें असतील त्यांसीं मर्यादेनें राहून, योग्यतेप्रमाणें त्यांचें चालवावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

पुण्यांतील सावकाराचें कर्ज तुम्हांकडे आहे. त्याजवर सरकारच्या उगवण्या आहेत. त्या सदरहू नजरेचे वगैरे ऐवजाचा फडशा जाल्यावर सावकाराचा ऐवज पुढें सोईसोईनें द्यावा. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

वलणरंगार घाट प्रांत सुरत येथें रंगारी यांचे धुलाईबाबद आकार होतो. तो सरकारांत गायकवाडांनीं द्यावयाचें ठरलें. त्याची सोडचिठ्ठी मशारनिल्हेनीं द्यावी. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सालाबादी मालकाचे जाबसाल मशारनिल्हेहीं करावे. रुपये.

७७९००० सालाबादी.
६७५००० फौजेबाबद.

१४५४०००

चवदा लक्ष, चोपन्न हजार रुपये दरसाल सरकारांत द्यावयाचे, तें पेस्तरसाल सन अर्बा तिसैनापासून सालाचे सालांत देत जावे. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सुरत अठ्ठाविशीचे महाल व कसबे गायकवाडांकडे आहेत, ते सरकारांत सालमजकुरापासून घ्यावयाचा करार ठरला. ते वितपशील.—

६४००० परगणे व सराई स्वराज्य.

९५०० परगणे तडकेश्वर स्वराज्य.

४४००० परगणे कामरेज.

३०००० स्वराज्य.

१४००० मोगलाई.

४४०००

१३७५०० परगणे चवऱ्याऐंशी.

१०५००० स्वराज्य.

३२५०० मोगलाई.

१३७५००

८५००० परगणे बेलसर.

६०००० स्वराज्य.

२५००० मोगलाई.

८५०००

३०५०० परगणे कडोद.

२९५०० स्वराज्य.

१००० मोगलाई.

३०५००

४०५०० परगणे टेंभे.

३१००० स्वराज्य.

९५०० मोगलाई.

४०५००

७२५०० परगणे तेलाडी.

६६५०० स्वराज्य.

६००० मोगलाई.

७२५००

४२५०० परगणे मरोली.

४०००० स्वराज्य.
२५०० मोगलाई.

४२५००

५९००० परगणे गलहें.

५०००० स्वराज्य.
९००० मोगलाई.

५९०००

१७००० कसबे नवसरी.

१५००० स्वराज्य.
२००० मोगलाई.

१७०००

६५००० परगणे घणदिवी. ( गणदेवी. )

४६५०० स्वराज्य.
१८५०० मोगलाई.

६५०००

४१००० परगणे मोहें.

३६००० स्वराज्य.
५००० मोगलाई.

४१०००

६७००० परगणे चिखली.

५१५०० स्वराज्य.
१५५०० मोगलाई.

६७०००

२५००० परगणे वरमाव.

१६५०० स्वराज्य.
८५०० मोगलाई.

२५०००

४५००० जकाती.

४५००० पंचमहाल तापी उत्तर तीर.

० लंग.

४५०००

५०००० सुरत.

९५०००

पैकी वजा मशारनिल्हेकडे महाल ठेविले ते.

६५००० परगणे घणदिवी.

६७००० चिखली परगणे.

१७००० नवसरी कसबे.

१४९०००

तपशील:—

११३००० स्वराज्य.

३६००० मोगलाई.

बाकी महाल सरकारांत द्यावयाचे त्याची बेरीज. रुपये.

६३९००० स्वराज्य

११४००० मोगलाई

७५३०००

पैकी वजा मोगलाई अमलाची बेरीज ११४००० रुपये.

बाकी स्वराज्याचे महाल सरकारांत ठेवावयाचे त्याची बेरीज. ६३९००० रुपये.

सहा लक्ष, एकूणचाळीस हजार रुपयाचे बेरजेचे महाल सरकारांत द्यावयाचें ठरलें. त्याच्या सोडचिठ्ठ्या मशारनिल्हेनीं द्याव्या. सरकारांतून बंदोबस्त सदरहू महालांचा करावा. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

बाळाजी नाईक भिडे यांचें कर्ज तुम्हांकडे येणें. त्याजवर सरकारची उगवणी आहे. याजकरितां कर्ज फिटेतों पावेतों, दरसाल रुपये १००००० एक लक्ष रुपये देत जावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

मशारनिल्हेहीं सरकार लक्ष राखून चाकरी एकनिष्ठेनें करावी. करार मदार ठरले आहेत यांत तफावत होऊं नये. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

परगणे चिखली व घणदिवी व नवसरी तीन महाल मशारनिल्हेकडे ठेविले. त्याचे मुबदला मशारनिल्हेहीं राजपिंपळें व मांडवी हे दोन्ही परगणे लावून दिले. त्याच्या सोड-चिठ्ठ्या गोविंदराव यांणीं सरकारांत द्याव्या. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

---

## यादी. ३.

यादी राजश्री गोविंदराव गायकवाड सेना खासखेल समशेर बहादर यांजकडे सालाबादी वगैरे ऐवज येणें. सुरुसन समान तिसैन मया व अलफ. रुपये.

१२०००००१ सन अर्बा तिसैनांत करार केले ते रुपये.

१००००००१ नजर व सालाबादी रुपये.

४३६२००० सालाबादी ऐवज फौजेचे चाकरीसुद्धां इस्तकबील सन इहिदे तागाईत सन सलास तिसैन तीनसाला, दरसाल १४५४००० रुपये. प्रमाणें

रुपये.

५६३८००१ पद व सरंजाम करार केला मशारनिल्हे.

( मधील पानें नाहींत. )

७५००० तसलमात मशारनिल्हे यांजकडे गाड्याचे आकारपैकीं रुपये.

पैकी अदा रद्दकर्जांत रुपये.

२६२ खिजमतगार निसबत खास जिलीब यास नेबंद पैकी वरात छ ५ रबिलाखर सन समान तिसैन रुपये.

१४१ महादजी खरमक दिमत संभाजी धाइरीकर.

१२१ त्रिंबकजी साखरा दिमत महादजी संकपाळ.

२६२

५०० दिमत तोफखाना याजकडे इहिदे व इसन्नेचे आकारपैकीं वरात छ ५ साबान अर्बा तिसैन रुपये ५०००० पैकीं.

१०१११२

९००० गणेश संभाजी कारकून, शिलेदार याजकडे पावले ते जबानीं रावजी आपाजी रुपये भरणा कोणीकडे जाला त्याची रुजवात होणें. रदबदलीमुळें मजुरा करावे.

२३१०० पागा निहाय वगैरे गणेश संभाजी, कारकून शिलेदार यांजबरोबर ऐवज आणावयास पाठविले होते. त्यांस चंदी वैरणीबद्दल वगैरे आदा जाला तो कबजा बद्दल. रुपये.

१०९९८। पागा दिमत खंडेराव बल्लाळ.

११७७४॥ पागा दिमत भैराळजी पायगुडे.

३२७॥ गणेश संभाजी वगैरे यास रुपये.

१५० गणेश संभाजी यास रोजमुरा दुमाही ३.

३१॥ सयाजी जाधव व जिवाजी भंडारा खिजमतगार असामी २ यास रोजमुरे दुमाही ३, दर १०॥ प्रमाणें रुपये.

३७॥ खास बारदार दिमत सोमाजी नाईक असामी २ रोजमरा दुमाही ३, दर १२॥ प्रमाणें रुपये.

१६॥ इमाम सारवान दिमत उष्टरखाना रोजमरा दुमाही ३, दर ५॥.

९२ जासूद जथे हाय असामी ४ त्यास रोजमरा दीडमाही रुपये.

३२७॥

२३१००

७८३३२१२

बाकी ९९८२७८९ रुपये.

पैकीं वजा मानसिंगराव गायकवाड यांजपासून अलीकडे नजर सरकारांत मुबलक घेतली. याजमुळें दौलतीस ओढ बहुत पडली. पुढें सरकारचे ऐवजाची सरबरा झाली पाहिजे. यास्तव कांहीं रयात व्हावी, म्हणून तुम्हांकडील रावजी आपाजी यानीं विनंती केली. सबब सूट ६०००००० रुपये.

एकूण साठ लक्ष रुपये रदबदलीमुळें एकसाला सूट दिली असे. येणेंप्रमाणें करार.

बाकी ३९८२७८९ रुपये.

तपशील.

१९९१००१ पेस्तरसाल सन तिसा तिसैनांत ध्यावे. यासी नेमणूक रुपये.

१७००००१ रद कर्ज गुजारत रामचंद्र नाईक वानवळे यांस वरात छ ६ जिल्हेज, सन सबा तिसैन रुजू जमाखर्च मशारनिल्हेचे तसलमातीस लिहून पुढें छ १ सफर सन समान तिसैनांत तसलमात पैकीं जमा धरून सावकाराचें रद्द कर्जी देविले रुपये.

१५००००१ गुजारत हरीभक्ती.
२००००० गुजारत दयाराम जोहोरी यांस.

१७००००१

सदरहू प्रमाणें सावकारास पावते करावे.

१५०००० हरीभक्ती सावकार यांचे रद्द कर्जाची वरात होईल त्यास द्यावे.

७५००० महादाजी अनंत वेहेरे यांजकडे फौजेचे खर्चाबद्दल तसलमातीस द्यावयाविषयीं एक लक्ष रुपयाची वरात आहे. त्यापैकीं आदा होणें आहे ते आज्ञा होईल त्याप्रमाणें द्यावे. रुपये.

६६००० कित्ता वराता होतील त्यास द्यावे.

१९९१००१
१९९१७८८ सन मयातैनांत द्यावे.

३९८२७८९

एकूण एकूणचाळीस लक्ष ब्यायशीहजार सातशें एकूणनव्वद रुपये सदरहू मुदती-प्रमाणें क्षेपनिक्षेप सरकारांत भरणा करावा. येणेंप्रमाणें करार. कलमें.

फौजेची चाकरी दरसाल तीन हजार फौजेनिशीं सरकारांत करावी. मसलत पडेल तेव्हां चार हजारांनिशीं करावी. काम पडल्यास एका खाशानें छावणीस रहावें. फौजेची चाकरी प्रयोजन लागेल ते समयीं आज्ञा होईल त्याप्रमाणें करावी. प्रयोजन नसल्यास सालाबादी करारांत ऐवज लिहिला आहे त्याप्रमाणें सरकारांत देत जावा. येणेंप्रमाणें करार.

अमदाबादेस दोनीकडील अंमल आहे. त्यास पूर्वी तीर्थस्वरूप कैलासवासी माधवरावसाहेब यांचे वेळेस करार जाहले आहेत. त्याप्रमाणें चालावें. अलीकडे सरकार आज्ञेखेरीज नवीन केलें असेल तें मोडावें. कराराप्रमाणें चालावें. येणेंप्रमाणें करार.

तुमचे दौलतींत हत्ती नामी चांगले असतील त्यांपैकीं तीन हत्ती मर्जीपसंद, व घोडी पांच उत्तम मर्जीयोग्य सरकारांत द्यावी, म्हणोन सन अर्बा तिसैनांत करार जाहला असतां आलीं नाहीं. तरी हल्लीं क्षेपनिक्षेप तीन हत्ती व पांच घोडी चांगली सरकारांत द्यावी. येणेंप्रमाणें करार.

तुम्हांस खर्चास सरकारांतून सावकारांकडून एक लक्ष रुपये देविले आहेत. ते व्याजसुद्धां वराता होतील त्यास तूर्त द्यावे, म्हणोन सन अर्बा तिसेनांत करार जाहला. परंतु अद्याप ऐवज दिला नाहीं. तरी पेशजीचे कराराप्रमाणें एक लक्ष रुपये व्याजसुद्धां हल्लींचे ऐवजाचे कराराशिवाय सरकारांत पावते करावे. साहुकारांच्या वराता होतील त्यास द्यावे. येणेंप्रमाणें करार.

महादाजी वल्लाळ यांजकडे तुम्हांकडील डौलाची फडणिशी आहे. त्यास ते मृत्यु पावले; सबब त्यांचे पुत्र विष्णु महादेव यांचे नांवें फडणिशी करार केली असे. तरी वेतन व कारकुनी पेशजीचे कराराप्रमाणें पाववीत जाणें. येणेंप्रमाणें करार.

पुण्यांतील सावकारांचें कर्ज तुम्हांकडे आहे. त्याजवर सरकारच्या उगवण्या आहेत, त्या सोईसोईनें सावकारांस ऐवज द्यावा. येणेंप्रमाणें करार.

जवाहीर तुम्हांजवळ शिलकी आहे. त्यापैकीं एक लक्ष रुपयांचे दागिने सरकारांत ऐवजाचे कराराशिवाय वाजवी किमतीचे मर्जीयोग्य द्यावे. याप्रमाणें पेशजी करार जाहला असतां दिल्हें नाहीं. तरी हल्लीं सदरहू किमतीचे दागिने सरकारांत द्यावे. येणेंप्रमाणें करार.

सरकारचीं कलमें व तुम्हांकडील कलमें पेशजीं तीर्थस्वरूप कैलासवासी माधवरावसाहेब यांचे वेळेस करार जाहलीं आहेत. त्याप्रमाणें चालावें. येणेंप्रमाणें करार.

बाळाजी नाईक भिडे यांचे कर्ज तुम्हांकडे येणें त्याजवर सरकारची उगवणी आहे. याजकरितां कर्ज फिटे तों पावेतों दरसाल रुपये १००००० एक लक्ष देत जावे. पेशजी करार जाहला आहे त्याप्रमाणें देत जावे. येणेंप्रमाणें करार.

मल्हाराव गायकवाड व वायका यांशीं मर्यादेनें राहून त्यांचे योग्यतेनुरूप चालवावें. सरकारांत बोभाटा येऊं देऊं नये. येणेंप्रमाणें करार.

छ १० सावान, सुरुसन समान तिसैन. माघ मास.

---

## दमाजी गाइकवाडांपासून तो गोविंदराव गाइकवाडांपर्यंत जे जे पेशवे यांजबरोबर करार जाहले त्यांचा सारांश.

### दमाजी गाइकवाड यादी १.

यादी दमाजी गायकवाड यांचे कारकिर्दीपासून तागाईत गोविंदराव गायकवाड अखेर सन समान तिसैन पावेतों ठरावाच्या यादी वगैरे जाहल्या, त्यांतील कलमें. सुरुसन सबा अशर मयातैन व अलफ.

कारकीर्द दमाजी गायकवाड.

१ सन इसन्ने खमसैनांत ऐवज घ्यावयाचा करार बरहुकूम झाडा हिशेब १६००००० रुपये.

१ सन सलास खमसैन बरहुकूम झाडा ऐवज घ्यावयाचा करार १६००००० रुपये.

१ गायकवाड यांजकडील याद सन सलास खमसैनची आहे. त्यांतील मजकूर हिशेब रुजू दफ्तर मुक्काम कसबें पुणें. छ २५ साबान, बाकी २२२४३४ रुपये.

१ सन तिसा खमसैनांत गायकवाड यांनीं महालचे वसुलाची याद समजाविली. इस्तकबील सन आर्बा खमसैन तागाईत सन तिसा खमसैन पावेतों जमेची बेरीज रुपये २५८००००० सदरहू यादीस सरकार भरणा वगैरे खर्च पुरवून बाकी शिल्लक उतरून दाखविली ते याद.

१ सन तिसा खमसैनांत सरकारचे ऐवजाची याद ठरली. त्या यादीवर गायकवाड यांजकडील एकुणात आहे. ती येणेंप्रमाणें. सन तिसा पैकीं पंधरा लक्ष चौपन्न हजार याप्रमाणें द्यावे हें खरेंच; परंतु मागील खर्चामुळें तिसाचा ऐवज इतका होणार नाहीं. हे पंधरा दिवसांत मागील सविस्तर सलासापासून कच्चा हिशेब समजावून प्रत्ययास आणूं. हिशेबामुळें तोटा येईल तो तिसाचे ऐवजपैकीं सितैनचे ऐवजीं देऊं. छ ८ रजब, फाल्गुन शुद्ध १० बहुधान्य नामसंवत्सरे सही.

१ सन सितैनचें सालीं ऐवज घ्यावयाचा करार झाला त्यांतील मजकूर रुपये.

१ सालाबादी ऐवज ७५४००० रुपये.

१ साल मजकुरीं महालाबद्दल जास्ती ४००००० रुपये. पैकीं बिसनपूर व तेलाडी वगैरे चार लक्षांचे महाल वांटणीचे घ्यावे, म्हणून सन मजकुरीं याद खास दस्तुरची अलाहिदा ठरली. त्याजवर गायकवाड यांचे रदबदलीमुळें महालची वहिवाट त्यांजकडे ठेऊन ऐवज घ्यावयाचा करार केला असे.

१ कित्ता ऐवज रुपये.

२५००० राजश्री भाऊसाहेबांची नजर.

५००० बद्दल वज्रजोगीण.

१५०० बद्दल तिमया गोसावी.

३१५००

१ सन इहिदे सितैन. शके १६८२ विक्रमनाम संवत्सरे, श्रावण शुद्ध सप्तमीचें खत दमाजी गायकवाड यांनीं केशवभट कर्वे व रामजी नाईक दातार व गणेश महादेव विवलकर यांजपासून कर्ज घेऊन लिहून दिल्हें त्यांतील मजकूर रुपये.

७५४००० सरकारांत देणेंबद्दल.

८९६००० गुदस्ताचें कर्ज वारावयाबद्दल.

१६५००००

याजवर उगवणी सरकारची आहे तो मजकूर.

कर्जाचे ऐवजास महाल नेमून देविले आहेत. मशारनिल्हे ऐवज प्रविष्ठ करितील. कदाचित् सरकारांतून घालमेल झाली, तर ऐवज सरकारांतून उगवून देऊं. सरकारांतून घालमेल जाहली नाहीं असें असतां ऐवज राहिला, तर महाल जप्त करून ऐवज देऊं. येणेंप्रमाणें सावकारांशीं करार. छ ११ जमादिलावल, सन इहिदे सितैन.

इस्तकबील सन इसन्ने सितैन तागाईत सन समान सितैन सात सालांचे कागदपत्रांचा ठिकाण लागणें असे.

१ सन तिसा सितैनांत बाळाजी जनार्दन फडणीस यांचे हातची याद आहे त्यांतील कलमें.

१ नजर एकसालीं सन समानांत फौज चाकरीस न आली व मागील अन्याय माफ केले. सबब २३२५००१ रुपये.

१ बाकी तागाईत सन तिसा अखेर इस्तकबील सन सबा तागाईत सन तिसा अखेर दरसाल ५२५००० प्रमाणें तीन साला सदरहू ऐवजावर वराता झाल्या आहेत १५७५००० रुपये.

१ सन सबैनापासून दरसाल ऐवज सरकारांत द्यावयाचा करार पेशजीं कैलासवासी तीर्थरूपांचे वेळेस होता त्याप्रमाणें बेरीज. तपशील पेशजीप्रमाणें ७७२००० रुपये.

सात लक्ष एकूणऐशीहजार सदरहू ऐवज अखेर सालांत सरकारांत घेत जावा. येणेंप्रमाणें करार. करार माधवरावसाहेब यांचे हातचा.

१ दरसाल तीन हजार फौजेनिशीं चाकरी हुजूर करावी. मसलत पडेल तेव्हां चार हजारानिशीं चाकरी करावी. छावणीस एका खाशानें छावणीचें काम पडल्यास राहावें. येणेंप्रमाणें करार.

१ हिंदुस्थानचे स्वारींत तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेबांनीं ऐवज कर्ज तुम्हांस दिल्हा, तो तुम्हांकडे येणें. तो तुम्हांस माफ केला असे. येणेंप्रमाणें व मागील बाक्या

साक्या रंजगाण वगैरे दत्पर्रां वोढत असतील ते माफ केले असेत. येणेंप्रमाणें करार.

१ मागील ऐवज सन सलासांत तेलाडी वगैरे महाल दिल्हे. त्याबद्दल व दरसाल दोन लक्ष चोपन्न हजार सन आर्बापासून सोडिले. त्या बाब्रद ऐवज येणें. तो तुम्हांस माफ केला असे. येणेंप्रमाणें करार.

१ तुम्हांकडील खाजगत वतनें व इनामगांव व सरंजामीं खेडीं पेशजीं तीर्थरूप कैलासवासी यांचे वेळेस व तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांनीं करार करून दिल्हे. त्याप्रमाणें करार असे. येणेंप्रमाणें करार.

१ सन सलास सितैनांत, सेनाखासखेली तुम्हांस दिल्ही. त्याप्रमाणें करार असे. येणेंप्रमाणें करार.

१ उगवणीचें कर्ज देणें. त्यापैकीं सालमजकुरीं तुम्हांवर ऐवज भारी पडला. सबब कर्वे वगैरे सावकारांस द्यावे. २००००० रुपये. दोन लक्ष रुपये द्यावे. येणेंप्रमाणें करार.

कारकिर्द गोविंदराव गायकवाड.

१ सन तिसा सितैनांत दमाजी गायकवाड मृत्यू पावल्यावर गोविंदराव यांचें नांवें सरंजाम वगैरे कुल पेशजीप्रमाणें व सेनाखासखेलीचें पद हल्लीं सरकारांतून मशारनिल्हेस बहाल करून नजर एकसाली करार केली. त्या यादींतील कलमें.

१ नजर रुपये.

२०५०००० ऐन नजर.
५०००० दरबार खर्चाबद्दल
२१०००००

१ दमाजी गायकवाड यांनीं नवे महाल वावेचे घेतले. त्याचा तह पेशजीं निमे सरकारांत द्यावे व निमे तुम्ही द्यावे. त्यास सरकारचा कारकून बरोबर येईल. त्याचे विद्यमानें कचे जमेची चौकशी करून, निमेनिमेच्या दोन यादी करून पाठवाव्या. त्यांतून एक सरकारांत घेतली जाईल. त्याचे अमल पेस्तर साल सन सबैनापासून सरकारचा बसेल. येणेंप्रमाणें सदरहू निमे महालाचा ऐवज तुम्हांकडे मागील सन तिसा अखेर पावेतों येणें, तो तुम्हांस माफ केला असे.

१ सदरहू नजरेचे पूर्वीं तुम्हांकडील कारभाराचे कराराची याद दमाजी गायकवाड यांचें नांवें झाली आहे. याप्रमाणें करार असे. येणेंप्रमाणें करार.

सदरहू अस्सल याद बाळाजी जनार्दन फडणीस यांचे हातची मखलाशीसुद्धां व करार थोरले माधवरावसाहेब यांचा असे.

१ सन तिसा सितैनांत गोविंदराव गायकवाड यांजकडून कलमबंदीची याद आली, त्याजवर सरकारांतून मखलाशा व करार झाले, त्या यादींतील कलमें.

१ सरकारचा पैका भारी ठरला. त्यापक्षीं ज्या सालीं स्वामींच्या सोईस येईल त्या सालीं चाकरी माफ करावी. कलम.

पैका तो सरकारचे करारप्रमाणें मुदतीवरहुकूम द्यावा. चाकरीचा प्रकार तर सरकारची सोय पाहून तुम्हांवरही रयात केली जाईल. येणेंप्रमाणें करार.

१ आमचे प्रांतीं मातबर कामकाज आम्हांस लागल्यास चाकरीस हरकोणास पाठवूं. त्यांचे हातें सेवा घेऊन कृपा करीत जावी. कलम १.

तुमचे देशीं तुम्हांस मोठा पेंच कांहीं पडल्यास हुजूर चाकरीस तुम्हांस यावयास सोय न पडली, तर फत्तेसिंगास पाठवावे. ज्या पक्षीं फत्तेसिंगाचे तुमचे न बने, तर मातबर सरदार खातरजमेचा देऊन फौज चाकरीस रवाना करावी. तुम्ही कसर ठेवून राहूं नये. येणेंप्रमाणें करार.

२

१ सन इहिदे सबैनांत एकंदर ऐवज द्यावयाची याद ठरली त्यांतील मजकूर.

१ साल गुदस्त सन सबैनाचा ऐवज.

८७२००० सेनाखासखेलीचे नजर पैकीं.

७७९००० सालाबादी ऐवज अखेर सालीं द्यावा ते.

१६५१०००

१ साल मजकुरीं ऐवज द्यावा.

३४९४२८॥। एक सालीं नजरेपैकीं श्रावण शुद्ध पंचमी द्यावे, ते ३५०००० पैकीं वसूल ५७१। बाकी.

६५४००० सेनाखासखेलीचे नजरेपैकीं.

७७९००० सालाबादी ऐवज अखेर सालीं द्यावा तो.

१७८२४२८॥।. सदरहू ऐवज पेस्तरसालीं घेतला.

१ सन इसन्ने सबैनचे सालीं ऐवजाची याद झाली त्यांतील मजकूर. रुपये.

३७७८८४॥।. सेनाखासखेलीचे नजरेबद्दल, येणें त्यापैकीं.

१५५८००० सालाबादी ऐवज सालगुदस्त ७७९००० व सालमजकूर ७७९०००.

१५०००० उगवणीवाले सावकार यांजबद्दल.

१००००० बाबीबद्दल अजमासें. पुढें शफतपूर्वक जमा समजोन ठराव होईल त्याप्रमाणें द्यावे.

२१८५८८४॥।.

कारकीर्द सयाजीराव गायकवाड.

१ सन सलास सबैनांत ऐवजाची याद ठरली त्यांतील मजकूर.

| | |
|---|---|
| | रुपये. |
| ७७९००० | सालबादी सन इसन्ने सबैन बाबत. |
| ६७५००० | सालमजकुरीं फौज न ठेवावी असा करार केला, त्या ऐवजी नक्त. |
| ६८८४॥।. | बाकी मागील निशा होणें राहिले होते ते. |
| २५००० | पटणबद्दल बाबीपैकीं मोघम सालमजकुरीं अजमासें. |
| १४८५८८४॥।. | |

१ सन सलास सबैनांत मशारनिल्हेकडून कलमबंदीची याद आली. त्याजवर मखलाशा जाहल्या. त्या यादीपैकीं कलमें.

१ दमाजी गायकवाड यांनीं नवे महाल बाबीचे घेतले. त्याचा तह पेशजीं निमे सरकारांत यावे व निमे तुह्मीं घ्यावे. त्यास सरकारचा कारकून बरोबर येईल, त्यांचे विद्यमानें कच्चे जमेची चौकशी करून, निमे निमेच्या दोन यादी करून पाठवाव्या. त्यांतून एक सरकारांत घेतली जाईल. त्याचा अमल सन सबैनापासून असेल. सदरहू निमे महालचा ऐवज तुह्मांकडे मागील व सन तिसा अखेर पावेतों येणें. तो तुह्मांस माफ केलाच आहे. ह्मणून पेशजीचे यादीवर कलम लिहिलें आहे. परंतु त्याप्रमाणें अमलांत आलें नाहीं. गुदस्ता सन इसन्नेंत एक लक्ष रुपये मोघम घेतले. व सालमजकुरीं मोघम पंचवीस हजार करार केले आहेत. त्यास पेस्तर राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड आलीयानंतर बोलून चालून ठराव करणें तो केला जाईल. येणेंप्रमाणें करार करावें.

१ दरसाल तीनहजार फौजेनिशीं चाकरी हुजूर करावी. मसलत पडेल तेव्हां चारहजार फौजेनिशीं हुजूर चाकरी करावी. छावणीस एका खाशानें काम पडल्यास राहाणें. येणेंप्रमाणें करार करावें.

इसवी सन आर्बा सबैन तागाईत सन सबा सबैन चार सालांचे कागदपत्र दप्तर गळतीमुळें आढळलें नाहीं.

## कारकीर्द फत्तेसिंगराव गायकवाड.

१ सन समान सबैनचे सालीं गायकवाड मशारनिल्हे यांजकडून कलमबंदीची याद आली. त्यापैकीं कलमें:—

१ खासखेलीचें पद राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड यांचे नांवें करार करून द्यावें.
सेनाखासखेलीचें पद फत्तेसिंगराव गायकवाड यांचे नांवें करार करून द्यावें.
येणेंप्रमाणें करार करावें. करार.

१ इंगरेजांस पांच लक्षांचे महाल दिल्हे. त्याचा मोबदला सरकारांतून महाल द्यावे. त्यापैकीं परगणे साबली मात्र दिल्ही. बाकीचे महाल लावून द्यावे.

तुम्हीं पेशजी कराराप्रमाणें फौजेनिशीं चाकरी करावी. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

१ सन समान सबैनांत फत्तेसिंगराव गायकवाड यांचे नांवें सेनाखासखेलीचें पद करार करून दिल्हें, त्याची नजर ५०००१ रुपये. इस्तकबील सन तिसा सबैन तागाईत सन सलास समानीन पांच सालांचे कागदपत्र दफ्तरचे गळतीमुळें आढळलें नाहीं.

१ सन आर्बा समानीनांत याद ठरली. त्यांतील मजकूर सालाबादी व फौज चाकरीस यावी, ती मना केली. सबब मोघम ऐवज सरकारांत सालमजकुरीं द्यावयाचा ठरविला १५०००१ रुपये.

१ सन आर्बा समानीनांत गायकवाडांकडून याद आली. त्यांतील कलमें:—

१ सालाबाद ऐवज सरकारचा देणें. त्यास आजपर्यंत इंग्रजांचा दंगा या प्रांतांत, याजकरितां फौज बारमाही ठेवून, आपली अब्रू व सरकार स्थळें रक्षून, सरकारलक्षांत तिळमात्र अंतर केलें नाहीं. सर्वस्वीं यापूर्वीपासून दौलतीचें संरक्षण सरकारांतून करीत आला, त्याप्रमाणें पुढें सालमजकूरपासून निभाव होय; व मागील देण्याचा फडशा होऊन सरदार, सरकार सेवेसी उपयोगी तो अर्थ ध्यानांस आणून, आज्ञा करणें ती करणार स्वामी समर्थ आहेत. कलम १.

तुम्हीं एकनिष्ठेनें वर्तणूक करून सरकार लक्षांत अंतर करूं नये. सरकारांतूनही तुम्हांविषयीं दुसरा अर्थ नाहीं. ऐवजाची याद अलाहिदा असे. येणेंप्रमाणें करार करावें.

१ आजपर्यंत मुलखांत दंगा व घरकलहाकरितां सावकारी देण्याचे व फौजेचे देण्याचे पेंच भारी सरदारीवर वाढले. सांप्रत दंगा वारला. इतक्यावर मुलखीं बंदोबस्त होणें त्यास प्रस्तुत फौजेची चाकरी मना करावी. मातबर काम पडल्यास फौजेसुद्धां येऊन सरकार सेवेसीं हजर होऊं. कलम १.

सरकारांत दहा वर्षे मसलत पडून दौलत ओढीखालीं आली. हे प्रकार तुमचे ध्यानांत आहेत. त्यापक्षीं रदबदल करूं नये. येणेंप्रमाणें करार करावें.

१ सन समान समानीनांत ऐवजाची याद ठरली त्यांतील कलमें.

१ सालाबादी व फौजेबाबद ऐवज मशारनिल्हेकडे येणें तो बितपशील:—

१४५४००० सन खमस. समानीन.
७७९००० ६७५०००

१११६५०० सन सीत. समानीन. रुपये.
७७९००० ३३७५००

८७९००० सन सबा
७७९००० १०००००

३४४९५००

पैकीं वजा मशारनिल्हेकडील रामचंद्र भास्कर यांनीं दौलतीचे वोढीचे प्रकार व फौज छावणीस राहिली यास्तव कांहीं सरकारांतून रयात झाली पाहिजे. ह्मणून विनंति केली. सबब एक साला सूट ५७०५०० रुपये.

बाकी २८७९००० रुपये.

लंग

कारकीर्द मानसिंगराव गायकवाड.

१ सन इहिद्दे तिसैन फत्तेसिंगराव गायकवाड मृत्यु पावले. त्यांचे बंधु मशारनिल्हे यांजकडे पेशजीप्रमाणें सरंजाम व समशेरबहादर व सेनाखासखेलीचें पद करार करून सरकारचा ऐवज करार रुपये.

३६८७००० सालाबादीं ऐवज फौजेसुद्धां दरसाल रुपये १४५४००० प्रमाणें इस्तकबील सन समान समानीन तागाईत सन तिसैन अखेर तीन साला. ४३६२००० रुपये.

पैकीं वजा एकसाला फौजेची चाकरी झाली त्या बद्दल वजा ६७५००० रुपये.

बाकी रुपये.

३३१३००१ नजर फत्तेसिंगराव मृत्यु पावले सबब सरंजाम व पद मानसिंगराव गायकवाड यांजकडे करार केलें. सबब.

७००००० १

१ सन इहिद्दे तिसैन दुसरी याद सरकारांतून कलमबंदीची ठरली त्यांतील कलमें:—

१ सालाबादीं कलमें रुपये.

७७९००० सालाबादी.
६७५००० फौजेबद्दल.

१४५४०००

चौदा लक्ष चौपन्न हजार रुपये दरसाल सरकारांत द्यावयाचे ते देत जावे. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

१ फौजेची चाकरी दरसाल तीन हजारांची सरकारांत करावी. मसलत पडेल तेव्हां चार हजारांनिशीं करावी. काम पडल्यास एका खाशानें छावणीस रहावें. फौजेची चाकरी सरकारांत प्रयोजन लागेल ते समयीं आज्ञा होईल त्याप्रमाणें करावें. प्रयोजन नसल्यास सालाबादी करारांत ऐवज लिहिला आहे, त्याप्रमाणें सरकारांत घेत जावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

१ महादाजी बल्लाळ यांजकडे तुम्हांकडील फडणिशी आहे. त्याप्रमाणें करार केलें असे. वेतन पेशजीचे कराराप्रमाणें पाववीत जावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

१ आमदाबादेंत दोहींकडील अंमल आहे. त्यास पूर्वींचे करार आहेत त्याप्रमाणें चालावें. अलीकडे अधिक केलें असेल तें मोडावें. कराराप्रमाणें चालावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

१ दमाजी गायकवाड यांजपासून फत्तेसिंगराव गायकवाड यांचे अखेरपर्यंत बायका व घरांतील माणसें असतील, त्यांशीं मर्यादेनें राहून योग्यतेप्रमाणें त्यांचें चालवावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सदरहू दोन यादी हरी बल्लाळ फडके यांचे हातच्या मखलाशीसुद्धां, व करार करावें नाना फडणवीस यांचे हातचे, व करार माधवरावसाहेब यांचा.

कारकीर्द गोविंदराव गायकवाड.

१ सन आर्बा तिसैनांत मशारनिल्हे यांनीं सरकारांत याद शिकामोर्तबानिशीं लिहून दिल्ही. त्यांतील मजकूर, राजश्री पंतप्रधान यांचे सरकारांत द्यावयाचा करार गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर यांचा सेनाखासखेली व समशेर बहादरीचें पद व सरंजाम पेशजीं मानाजीराव गायकवाड यांजकडे करार करून दिल्हा होता. त्यास ते मृत्यु पावले. सबब सरकारांतून कृपा करून सालमजकुरापासून सेनाखासखेली व समशेर बहादरीचीं पदें व सरंजाम व कोट, किले, ठाणीं, मुलखसुद्धां दरोबस्त दौलत आम्हांकडे पेशजीप्रमाणें करार करून

दिल्हे. त्याविषयीं ऐवजाची वगैरे बोलणीं ठराव झाला तीं कलमें बरहुकूम पैकीं कलमांतील मजकूर कलमें.

१ ऐवजाचें कलम.

४३६२००० सालाबादी ऐवज फौजेचे चाकरीसुद्धां इस्तकबील इहिदे तिसैन तागाईत सन सलास तिसैन तीन सालास दरसाल रुपये १४५४००० प्रमाणें.

५६३८००१ नजरेबद्दल.

१००००००१

२०००००० मानाजी गायकवाड यांचे पेशजीचे ठरावापैकीं बाकी बद्दल.

१२००००००१

१ फौजेची चाकरी दरसाल तीन हजार फौजेनिशीं सरकारांत करावी. मसलत पडेल तेव्हां चार हजारांनिशीं करावी. काम पडल्यास एका खाशांनीं छावणीस राहावें. याप्रमाणें पेशजीपासून करार आहे. त्याप्रमाणें करूं. कलम १.

१ परगणे सावली हा महाल मोबदल्यास कैलासवासी फत्तेसिंगराव यांस दिल्हा होता. तो हल्लीं सरकारांत द्यावयाचा ठरला. तो बिनदिक्कत देऊं. कलम.

१ महादाजी बल्लाळ यांजकडे आम्हांकडील डौलाची फडणिशी आहे. त्याप्रमाणें सरकारांतून करार करून दिल्ही आहे. त्यास वेतन व कारकुनी पेशजीच्या कराराप्रमाणें पाववीत जाऊं. कलम.

१ आमदाबादेंत दोहींकडील अंमल आहेत. त्यास पेशजी कैलासवासी माधवरावसाहेब यांचे वेळेस करार जाहले आहेत. त्याप्रमाणें परस्परें चालावे. नवीन परस्परें होऊं नये. नवीन झालें असलीयास मोडावें.

१ सालाबादी कलमांचे जाबसाल कराराप्रमाणें करूं.

७७९००० सालाबादी नक्त.

६७५००० फौजेनीं चाकरी करावयाची. त्यास सरकारची आज्ञा होईल, ते समयीं फौज पाठवूं. ज्या सालीं फौजेची चाकरी होणार नाहीं, त्या सालचा पैका देऊं.

१४५४०००

यादीवर एकूणातीस सदरहूप्रमाणें निभावणी करून देऊं. येणेंप्रमाणें करार. गोविंदराव गायकवाड यांचे हातचा असे.

१ सन समान तिसैनांत याद जाहली. त्यांतील कलम कीं, आमदाबादेस दोहींकडील अंमल आहे. त्यास पूर्वीं तीर्थस्वरूप कैलासवासी माधवरावसाहेब यांचे वेळेस करार जाहले आहेत. त्याप्रमाणें चालवें. अलीकडे सरकार आज्ञेखेरीज नवीन केलें असेल तें मोडावें. व कराराप्रमाणें चालवें. येणेंप्रमाणें करार.

---

## सरखेल व छत्रपति शाहूमहाराज.

### तह.

तहनामा राजश्री सरखेल, सुरुसन आर्बा अशर मया व अलफ.

थोरातांशीं अवक्रिया करूं नये. भाकर दिल्ही आहे, ते त्यांनीं खावी. सनदी पत्रांखेरीज कोठें त्यांनीं उपसर्ग न करावा.

वरघाटचे किले मोंगलाईतून राजकारणामुळें अगर सक्तीनें आम्हीं घेतले, तरी तुमच्या स्वाधीन करावें. तळघाटचे किलेयास तुम्हीं राजकारण करून घेतले. तर ते आमच्या स्वाधीन करावे. त्रिवक आम्हांकडे, पट्टा तुम्हांकडे द्यावा.

नाणे मावळ, पौन मावळ, पौड खोरें येथें दरखंडीस दोन रुपये प्रमाणें आम्हांस द्यावे.

कारवरसे येथील देशमुखी लखमोजी दळवी याची चालवावी.

हरीहरपुरी गोसावी यांसी इनाम मौजे कादव तर्फ पौन मावळ इनाम आहे, तें चालवावें.

कोथलाचा ऐवज दोन खंडी सोनीया ( फाटलें आहे ). कच्चा ऐवज जो असेल तो तुम्हीं द्यावा.

राजश्री शाहूराजे छत्रपति यांच्या पायांशीं यापूर्वींही अंतर न जालें. यापुढेंही अंतर करणार नाहीं.

नाणे मावळ व जुन्नर पैकीं गांव चालवावे.

५ राजमाचीकडे नाणे मावळपैकीं:—

१ वोलवडें.
१ डंबरें.
१ आवर्शे.
१ वरंपें.
१ शिरवेदा.

५

३॥ इनामगांव जुन्नरपैकीं:—

२ सखोजी शिंदे.

१ सावलें तर्फ अंदर.

१ इंगळूण तर्फ मिन्हेर.

२

१ एसाजी काटदकर राहाणार मौजे निरगुड तर्फ मिन्हेर.

॥· विसाजी बाबाजी यांस मौजे नाणे, तर्फ नाणे मावळ.

३॥

८॥

कोंकणची मसलत दसऱ्यापासून मार्गशीर्षपर्यंत ( फाटलें आहे ) तुम्हीं राहून प्रतिवर्षीं करावी. हबशी, फिरंगी मारून गर्देस मेळवावे.

हल्लीं राजमाची, श्रीवर्धन, मनरंजनगड, मृगगड, कोथळा आम्हांकडे द्यावे. लोहगड व तुंगी, तिकोना, कोरगड, बनगड सामानसहित तुम्हांकडे द्यावे.

मुटे खोरें, मोसे खोरें येथें, सिंहगड, प्रचंडगड येथील लोकांचीं शेतें खाजगत असतील. ते खेरीजकरून वरकड दरखंडीस दोन रुपये प्रमाणें आम्हांस द्यावे.

सुधागडचा तनखा चालवावा. पेणेस तनखा होता, त्याची कटकट सुधागडकर यांनीं न करावी.

कोथलेकर लोकांचे कबिले व वस्तभाव गुरूढोर जे असतील ते द्यावे.

तुंग, तिकोना, लोहगड, कोरीगड, घनगड येथील गडकरी लोक आम्हांकडे आहेत, ते तुम्हांकडे द्यावे.

चाकर इसम लोक जे तुम्हांकडे आहेत ते तुम्हांकडे असतील. आम्हांकडे जे लोक आहेत ते आम्हांकडे. यापुढें तुम्हांकडील चाकर आम्हीं न ठेवावा. आम्हांकडील चाकर तुम्हीं न ठेवावा.

खाजगत गांव तुम्हांकडे आहेत ते चालवावे.

२ तालुके पणवेली.

१ शिरढोण.

१ सोमटणें.

२

२ चिपळूण तर्फेस गांव आहेत तेथें पट्टी न द्यावी.

१ मौजे गोवल.
१ मौजे सारलवजी.
―
२

४

रायगड आम्ही घेतला तर राजश्री शाहूराजे छत्रपतिसाहेब यांजकडे द्यावा. याप्रमाणें उभयपक्षीं वर्तावें. छ ४ सफर.

मोर्तबसुद.

---

## जंजिरे संस्थानचे बंदोबस्ताबद्दल माधवराव हरी व मानाजी आंग्रे यांजमध्यें झालेला करार.

यादी मानाजी आंगरे संस्थान जंजिरे कुलाबा, सुरुसन खमस तिसैन मया व अलफ. तीर्थरूप राघोजी आंगरे वजारतमाहा सरखेल, सन सलास तिसैनांत, चैत्रमासीं, कैलासवासी जाहले. सबब संस्थानच्या बंदोबस्तास सरकारांतून राजश्री माधवराव हरी आले. त्यांचे विद्यमानें संस्थानचे बदोबस्ताच्या ठरावाचीं कलमें. त्रितपशीलः—

संस्थानचा कारभार येणंप्रमाणें.

१ मानाजी आंगरे, राघोजी आंगरे यांचे पुत्र. यांचा धनीपणा.

१ जयसिंग आंगरे यांनीं दौलतीचा लहान मोठा सर्व बंदोबस्त मनास आणून, वडिलांचे नांव राखोन जागे, जंजिरे, लोक, लोक पाल राखावे.

―
२ कलम १.

१ मानाजी आंगरे यांचा धनीपणा, त्यांचें मान महत्व राखून, अख्त्यारीनें जयसिंग आंगरे यांनीं खासे थोर होत तोंपर्यंत कारभार करावा. थोर जाहल्यावर त्यांचे आज्ञेप्रमाणें कारभार करावा. येणेंप्रमाणें इमानेंइतबारें चालावें. करार करावा. करार.

परभू लोक संस्थानांतील कारभार करीत होते. त्यांनीं गैरराहा वर्तणूक केल्यामुळें पारिपत्य जाहलें. आणखी राहिले त्यांनींही बहिवाटींत खलेल करून परागंदा जाहले. आपले बराबर फडणीस वगैरे नेले. याजकरितां ते लोक संस्थानांत नसावे. कलम १.

परभू मंडळी तिकडील चाकर, सरकारांत आले आहेत. यांजकडे इकडे आल्याचा दोष ठेऊं नये. तेथें त्यांनीं अपराध करून, पळून आले असल्यास त्यांचे आंगीं दोष लावल्यास, मग त्यांचे चालवावयास सरकारांतून आज्ञा होणार नाहीं. इकडे आले आणि मुळी दोष नाहीं, त्यांजवर इकडे आल्याचा दोष ठेऊन चालवावयास दिक्कत करूं नये. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

पदाधिकारीचीं वस्त्रें व मरातब होणें, त्यास आमचे वडील कैलासवासी यांस पेशजी सामर्थ्यांनरूप सरकारांत नजर घेऊन पदाधिकाराचीं वस्त्रें व मरातब दिल्हा. हल्लीं आमचा सर्वप्रकारें लेंकुरपणा व प्रांताची हकिकत जाहली, ती अलाहिदा कलमीं लिहिली आहे. ती पाहून नजरेची बेरीज ठरावून, उगवीत घ्यावयाचा ठराव होऊन, पदाचीं वस्त्रें येथें आणवून दिल्हीं पाहिजेत. कलम १.

नजरेचा करार अलाहिदा यादीवर जाहला आहे. त्याप्रमाणें फडशा करावा. पदाधिकाराचीं वस्त्रें व मरातब पुण्यास आल्यावर दिल्हा जाईल. येणंप्रमाणें करार करावें. करार.

मार्गशीर्ष मासीं पुण्यास यावयाचा करार केला आहे. त्याप्रमाणें निघून येतों. तथा नाहीं. परंतु आमचे वडील कैलासवासी यांचें मानमहत्व स्वामींनीं चालविल्याप्रमाणें पुढें सामोरे वगैरे हरयेक विषयीं मान, प्रतिष्ठा वडिलांप्रमाणें चालवावी. तेथें पावल्यानंतर पदाधिकाराचीं वस्त्रें देऊन, पंधरा दिवसां अलीकडे निरोप द्यावा. कलम १.

पूर्वापार सांप्रदाय चालत असतील, त्याप्रमाणें सामोरे येण्याचें वगैरे घडेल. आणि निरोपही लौकरच दिल्हा जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

वेदमूर्ति राजश्री रंगभट शैव यांचे बंधु, धोंडभट शैव, तुम्हीं अटकेंत ठेविले आहेत, त्यांस पोथ्या पुस्तकें व वस्तभावसुद्धां सोडून द्यावें. येणंप्रमाणें करार करावें. करार.

मातुश्री नर्मदाबाई व आनंदीबाई यां उभयतांनीं देवदेव पूजा करून, पुराण श्रवण करीत जावें. कारभारांत एकंदर मन घालूं नये. कलम १.

उभयतां मातुश्रींचा वडीलपणा, मान, महत्व राखावें. कारभारसंबंधें चांगली गोष्ट सांगितल्यास, उपयोगी पडल्यास घ्यावी. त्यास अडचण करूं नये. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

भोंसले सातारकर यांस, दहाबारा वर्षे राहून जाहली, त्यानिमित्य कर्ज काढून लाखों रुपये खर्च करणें प्राप्त जाहला. यांजकरितां भोंसले यांणीं आपलें घरीं जावें. त्यांचा पुस्तपन्हा सरकारांतून करूं नये. कलम १.

भोंसले यांनीं आपल्या घरास जावें. त्यांचा पुस्तपन्हा सरकारांतून होणार नाहीं. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

पुण्यास येऊन श्रीमंतांची भेट घेऊन, बहुमान करून घ्यावा हें प्रमाण. परंतु तूर्त येण्याची सोय नाहीं. पुढें मार्गशीर्ष मासीं येणें घडेल. कलम १.

दिपवाळी जाहल्यावर मार्गशीर्ष मासाअलीकडे पुण्यास येण्याचा करार केला आहे. त्याप्रमाणें निघून यावें. येण्याविषयीं खातरजमेचा हामीदार घ्यावा. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सरकारचे फौजेच्यामुळें आमचा प्रांत झाडून लुटून गेला. व खाजगत गुरें वगैरे लुटलीं गेलीं. व आरमार धक्यावरील जाळलें. यांजमुळें लाखो रुपयांची खराबी जाहली. याचा विचार जाहला पाहिजे. कलम १.

मुलखांतील तसनस फौजेमुळें जाहली. त्याची गोष्ट बोलूं नये. सरकार जमेस ऐनजिन्नस व नख्त आले असेल, तो ऐवज नजरेचे ऐवजांत मजुरा दिल्हा जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सरकारचे मामलेदार आमचे संस्थानानजीक आहेत. ते मनस्वी घसघस करितात. आह्मी मनास आणावें, तरी सरकारचा शब्द लागेल. याजकरितां त्यांस, सुदामत चालत आल्याप्रमाणें राहावें, नवीन करूं नये, ह्मणून ताकीद असावी. कलम १.

सरकारचे मामलेदार घसघस करितात. त्यास काय घसघस करितात ते सरकारांत समजावीत जावी. समजोन ताकीद केली जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सरकारचा व तुमचा खटला पडल्यापासून आजतागाईत हरयेक बंदरचीं व सरकारचीं व सावकारीं वगैरे गलबतें व माहागिऱ्या वगैरे धरून तुह्मीं नेलीं असतील तीं, जराबजरासुद्धां सोडून द्यावीं. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

छ १५ जिल्काद, सन खमस तिसैन. ज्येष्ठ मास.

---

## मानाजी आंग्रे यांची पेशव्यास यादी.

यादी राजश्री मानाजी आंगरे वजारतमाहा सरखेल, सुरुसन सीत तिसैन मया व अलफ.

आह्मांकडील महाल, मुलख, किल्ले, कोट, वडिलांचे वेळेस होते. त्याप्रमाणें राखून सरकार सेवा पूर्ववत् प्रमाणें आमचे हातून घ्यावी. कलम १.

अलाहिदा याद करार जाहली आहे, त्याप्रमाणें चालेल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

आह्मांकडील मुलखाची जप्ती केली आहे. त्याची मोकळीक करावी. कलम १.

राघोजी आंगरे मृत्यु पावले. सबब त्यांजकडील मुलखाची जप्ती सरकारांत केली आहे. त्यास त्यांचे पुत्र मानाजी आंगरे यांजपासून सन सबा व सन तिसा सबैनांत नवा सरंजाम लाख रुपयांचा दिल्हा. त्यापैकीं आंगरे यांस लाऊन दिल्हा बेरजेप्रमाणें पंचवीस हजारांचा मुलख सरकार तालुक्यालगत, सोईस येईल तो, सालमजकुरापासून सरकारांत घेऊन, बाकी मुलख, किल्ले, कोटसुद्धां व वजारतमाहा सरखेलीचा किताब मशारनिल्हेचें नांवें पेशजीप्रमाणें करार करून देऊन, जप्ती मोकळी केली असे. तरी पंचवीस हजारांचा मुलख सदरहूप्रमाणें सरकारांत ठेऊन, बाकी मुलखाची जप्ती मामलेदारांस

ताकीद करून मोकळी करणें. सुदामत प्रमाणें वहिवाट मशारनिल्हे करतील. ह्मणून सरसुभा प्रांत कोंकण यांचे नांवें सनद व सदरहू अन्वयें मोकळिकेविषयीं मामलेदार तालुकेहाय वगैरे यांस लागतील तीं पत्रें देवावीं. देणें.

तिगस्ता आमच्या संस्थानावर फौज आली, ते समयीं अवचित्गड व रेवदंडा व उंदेरी या तिही तालुक्यांत लोकांनीं, आमचें रान सायाचें राखिलें होतें, तें तोडून नेलें आहे. त्यास ज्यांनीं तोडून नेलें त्यांस ताकीद करून लाकडें आमचीं अह्मांस देवावीं.

कलम १.

सरकार तालुक्यांतील लोकांनीं परभारें तुमचे तालुक्यांतील सायाचें रान तोडून आणिलें असेल, तीं लाकडें ठिकाणीं लावून सरकारांत समजवावीं. लोकांनीं इमारतीस लाविलीं असतील तीं माघारी देऊं नये. शिलकेस असतील तीं ताकीद करून माघारी देविलीं जातील. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

साल तिगस्ता कजियामुळें किल्ले कोटाच्या इमारती जाया जाहल्या. व माधवराव हरी यांनीं आरमार दग्ध केलें. त्यास इमारतीची व आरमारची दागदोजी जाहली पाहिजे. सबब सोटे सागवानी वसई पैकीं—

८०० दरसाल दोनशें सोटे पावत होते. ते तीन साला पावले नाहीं. सबब तीन सालाचे देवावे. पुढें दरसाल दोनशेंप्रमाणें चालत आल्याप्रमाणें देवावे. साल मजकूरसुद्धां.

१५०० जास्ती संस्थानाची हलाखी जाहली. आरमार जळालें सबब एक साला सोटे.

२३००

पैकीं दरसाल दोनशेंप्रमाणें साल मजकूरसुद्धां चार सालाचे आठशें सोटे देणें व पुढें पेशजीप्रमाणें दरसाल दोनशें सोटे सनद सादर होईल त्या अन्वयें देत जाणें. ह्मणून मामलेदार तालुके वसई यांचे नांवें सनद देवावी. देणें.

आमचीं गुरें पांच सहा हजार खाजगत होतीं. त्यापैकीं कांहीं माधवराव हरी यांनीं आणिलीं. व कांहीं लोकांस दिल्हीं. व लोकांनीं लुटून नेलीं. तीं त्यांस ताकीद करून जेथें जिवंत असतील तीं आमची आह्मांस देवावीं. कलम १.

गुरें सरकारांत जमा असतील तीं व सरकारांतून कोणांस बक्षीस दिल्ही असल्यास माघारी देऊं नयेत. परभारें कोणीं नेलीं असतील, त्यांचे ठिकाण लावून समजवावें. ताकीद करून जिवंत असतील तीं माघारी देविलीं जातील. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

श्रीशंकराचार्यस्वामी यांचे पट्टीबाबत पांच हजार रुपये घ्यावयाचा करार साल गुदस्ता

जाहला आहे. त्याप्रमाणें साल मजकुरीं ऐवज सरकारांत घ्यावा. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

जयसिंग आंगरे तुम्हांपासून निघून सरकारांत आले आहेत. त्यांचे खर्चाचे नेमणुकी-विषयीं सरकारांतून तुम्हांस आज्ञा केली जाईल. त्याप्रमाणें चालवावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सालगुदस्तां सन खमस तिसेनांत पदाधिकाराचीं वस्त्रें व मरातब पेशजीप्रमाणें आमचें नांवें द्यावयाचा करार करून, अडीच लाख रुपये नजरे बाबत सरकारांत घ्यावयाची करारी यादी वगैरे दस्तऐवज आम्हांपासून सरकारांत घेतले आहेत. ते आमचे आम्हांस माघारे द्यावे. कलम १.

अडीच लाख रुपये नजरेचे सालगुदस्तां ठरले होते. त्यास हल्लीं पंचवीस हजारांचा मुलख व तुम्हांकडील मुलखाचे जप्तीमुळें वसूल आला वगैरे मिळून लाख रुपये नजरे-बाबत सरकारांत घ्यावयाचा करार जाहला. सबब अडीच लाख रुपयांचे ठरावासंबंधें दस्तऐवज असतील ते माघारे दिल्हे जातील. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सरकारचे मामलेदारांकडे वगैरे सालगुदस्तां आम्हांकडील वस्तवानी वगैरे जिन्नस आला आहे तो मामलेदारांस ताकीद करून आम्हांकडे माघारा देवावा. कलम १.

वस्तवानी वगैरे जिन्नस सरकारांत जमा असेल, तो माघारा देऊं नये. परभारें लोकांनीं नेला असल्यास रुजू करून द्यावा. ताकीद करून माघारा देविला जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

माधवराव हरी यांनीं आमचा जिन्नस वगैरे अमानत ठेविला आहे. तो त्यांस ताकीद करून त्यांजवळ ठेविला आहे त्यांपासून देवावा. कलम १.

जिन्नस कोणांकडे काय अमानत ठेविला आहे. त्याचा झाडा सरकारांत समजवावा. अमानत ठेविला असल्यास माघारा देविला जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

तीर्थरुप कैलासवासी जाहले याजमुळें आमचे घरचे घरांत बखेडे फार जाहले. यास्तव आम्हांकडील मुलखाची जप्ती सरकारांतून करून वसूल दुसाला घेतला. व माधवराव हरी यांचे गुजारतीनें रोख भरणा सरकारांत जाहला आहे, तो ऐवज माघारा देवावा. कलम १.

तुमचें घरांत बखेडा जाहला, त्याचे बंदोबस्ताबद्दल सरकारांतून मसलत केली, त्यास लाखो रुपये खर्च जाहला. परंतु तुम्ही पूर्वीपासून सरकार लक्षाचे यास्तव तुमचें नांवें पेशजीप्रमाणें मुलख वगैरे करार करून दिल्हा. सबब एक लक्ष रुपये नजरेबाबत सरकारांत घ्यावयाचे करार केले असत. तरी तुम्हांकडील महालानिहायचे जप्तीपैकीं नख्त

व ऐनजिन्नस वसूल आला असेल व पेशजी माधवराव हरी, सरकारांतून बंदोबस्तास गेले होते, त्यांजकडे नख्त ऐवजाचा भरणा तुह्मीं केला, तो ऐवज सदरहू नजरेचे ऐवजांत वजा करून, रुजवातमुळें लाख रुपयांहून जाजती बेरीज जाहल्यास, जाजती ऐवज होईल तो माघारा दिल्हा जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

तालुके रेवदंडा व उंदेरी व अवचितगड व पेण व करनाळा वगैरे येथील मामलेदारांस पत्रें कीं, पूर्वचालीप्रमाणें चालावें. नवीन करूं नये ह्मणून. कलम १.

सुदामत वहिवाट सोडून नवीन तुह्मीं केलें असेल तें चालणार नाहीं. सरकारचे मामलेदार नवीन करूं लागल्यास समजवावें. मनास आणून ताकीद केली जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

आह्मांकडील कारकून वकिलीस पुण्यास असतात. त्यास पांच खंडी तांदूळ कोंकणांतून आणावयाचें त्यांस दस्तक असावें दरसाल. कलम १.

दोन खंडी तांदूळ कोंकणांतून हरएक जागाहून पुण्यास आणितील, त्यांस जकातीचे हशिलाचा तगादा न करणें ह्मणून एक दस्तक देवावें. देणें.

संस्थानांत बखेडेखोर आहेत, त्यांजकडे वाजवी चौकशीनें दोष लागल्यास आह्मीं पारिपत्य करूं. त्याचा पुस्तपन्हा सरकारांतून होऊं नये. कलम १.

तुमचे पदरचे यांजकडे वाजवी दोष असल्यास, दोष पाहून पारपत्य करावें. त्याचा पुस्तपन्हा सरकारांतून होणार नाहीं. तुह्मीं कोणाचा आकस करूं नये. सरकारांत कोणी आल्यास त्यांजकडे दोष असेल तो समजवावा. वाजवी मनास आणून सरकारांतून ताकीद करून फडशा करून देवविला जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

कोलटकर यांचें कर्ज तुह्मीं देणें. त्याची हप्तेबंदी पेशजी जाहली आहे, त्याप्रमाणें ऐवज द्यावा, असा करार सालगुदस्ता सरकारांतून जाहला आहे. त्यास घरकलहामुळें दौलत खराबीस आली. सोहलत असावी ह्मणून तुह्मीं विनंती केली. त्याजवरून सालमजकुरापासून तीन सालें हप्तेबंदीचा ऐवज मना केला असे. तीन सालापुढें पेशजीचे कराराप्रमाणें ऐवज क्षेपनिक्षेप द्यावा. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

पेशजी सरकारांतून तुह्मांकडील हरएक जात्रसाल प्रकर्णीं ठरावाचीं कलमें जीं करार जाहलीं आहेत त्याप्रमाणें वर्तत जावें. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सरकारचा व तुमचा खटला पडल्यापासून आज तागाईत हरएक बंदरचीं व सरकारचीं व सावकारीं वगैरे गलबतें व महागिन्या वगैरे तुह्मीं धरून नेल्या असतील, त्या जराबजरासुद्धां सोडून द्याव्या. तुह्मांकडील सरकारांत आल्या असल्यास चौकशी करून माघाऱ्या देवविल्या जातील. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

सदरहू प्रमाणें सतरा कलमें करार करावीं. करार.

छ १५ रबिलोवल, सन सीत तिसैन. भाद्रपद मास. सनदा लिहिणें.

## कुडाळकर सरदेसाई व पेशवे यांजमधील तह.

तहनामा सरकार राजश्री पंतप्रधान, सुरुसन इहिदे अर्बैन मया अलफ. फिरंगीयावरी मसलत न झाली, तरी सोंधें संस्थानयावरी मोहीम करावी. याजकरितां राजश्री व्यंकटराव नारायण यांची रवानगी फौजेनिशीं होत आहे. यासी राजश्री जयराम सांवत व रामचंद्र सांवत भोंसले सरदेसाई परगणे कुडाळ माहालाहाय यांनीं सामील व्हावें. यासी द्यावयाचा करार मार्फत नारो जिवाजी. बितपशील.

सोंध्यावरी जावें. तेथें खंडणी झाली तरी दरसदे चौथाई सरदेशमुखी रुपये ३५ राजश्री व्यंकटराव यांनीं घेऊन, बाकी रुपये ६५ फौज जमा होईल त्यास, गणतीप्रमाणें राऊत व दोन प्यादाचा एक राऊत याप्रमाणें सरदेसाई यांची फौज येईल त्यास, दामाशाई द्यावी, आणि खि॥ बदार (?) आणावा लागला तरी समाईक काढून बाकी बेरीज यथाविभागें घ्यावीं. कलम १.

मोहिमेस निघतां सरदेसाई यांसी पैका पावेल. तो खंडणी झाली तरी गवीत वजा करून बाकी बेरीज निघाली तरी द्यावी. खंडणी न झाली तरी पैका पावेल, तो सरकारची फौज मोहिमेस राहील त्याबद्दल, सरदेसाई यांची फौज राहिली तरी, सरदेसाई यांचे फौजेचें नांवें खर्च लिहावा. कलम १.

सुभा प्रांत आंकोलें—

१ परगणे आंकोलें.
१ परगणे शिवेश्वर.
१ परगणे कडवाड.
१ परगणे कपर.
१ परगणे अडवट.

५ कलम १.

यांपैकीं दर परगण्याशीं मुकासे गांव २ प्रमाणें राजश्री स्वामींनीं प्रसिद्धगडच्या वेढीयाचे मुकामीं राजपत्रें करून दिलीं. परंतु प्रांत मजकूर सोंधेकरांकडे होता. कबज होऊन मशारनिल्हेचे मुकासे चालिले नाहीं. प्रस्तुत जंजिरे, खोलगड व कूर्मगड व सदाशिवगड व मदलिंगगड व कोट अंकोला व शिवेश्वर या स्थळांच्या वेढ्यास आरमार व फौजेनिशीं येऊन कस्तमेहनत करावी. ज्या परगणीयांतील स्थळ व परगणा मशारनिल्हेची फौज

समागमें असोन साध्य होईल, त्यांतील गांव पेशजीचे हक्कदार व इनामदार व देव ब्राह्मण खेरीज करून मुकासे द्यावे. सदरहू गांवांमध्यें वतनदारांचें गांव असतील ते न द्यावे. त्याचे मुबदला दुसरे गांव मुकासे द्यावे. कलम १.

राजश्री स्वामी करवीरवासी यांचा कारभार दोही संस्थानीं आहे. तो देणें लागेल. त्याचा दामाशाई मशारनिल्हेकडे सरंजाम येईल त्यावरी येईल ते दामाशाई मशारनिल्हेनीं द्यावी. कलम १.

महाराज राजश्री स्वामींची मोहीम किल्ले प्रसिद्धगडास झाली. ते समयीं सांवत मशारनिल्हेचे वडील भेटीस आले. त्यांस तर्फ आंतरूज व जांबोली पंचमहाली गांव मुकासे यांची राजपत्रें करून दिलीं. त्यास सोंधेकरांकडे प्रांत होता. ते समयीं अंमल न झाला. तर्फ साष्टी व कोट फोंडें मर्दनगड याच्या वेढ्यास सांवताची फौज यावी, आणि हे गांव द्यावे, ऐसे सन तिसाचे सालचे तहनाम्यामध्यें करार होता. त्यास मशारनिल्हेची फौज दोही कार्यास आली नाहीं. याबद्दल सदरहू गांव दिले नाहीं. प्रस्तुत सोंधें संस्थानचे मोहिमेस फौजेनिशीं मशारनिल्हेनीं यावें. देश सुटल्यामध्यें सदरहूचे गांव मुकासे द्यावे. कलम १.

सदरहू प्रांतामध्यें सुभा प्रांत अंकोल्यामध्यें गनिमाईचा प्रसंग पडला तरी सांवत मशारनिल्हे यांनीं कुमक करावी. कलम १.

किल्ले, कोट, जंजिरे व स्थळांतील तोफ आदिकरून जकिरा व आरमार सरकारांत ठेवावें. १.

प्रांत बिदनूर दर्याकिनारा येथील मोहिमेस सांवत मशारनिल्हे यांची फौज येऊन देश सुटेल, त्याची बेरीज आकारून दरसद्दे रुपये पांचप्रमाणें परभारें गांव नेमून द्यावे. खेरीज हक्कदार व इनामदार, देव ब्राह्मण वजा करून, बाकी मुकासे मशारनिल्हेस द्यावे. कलम १.

या प्रांतीच्या स्थळास गनिमाई झाली तरी मशारनिल्हेनीं कुमक करावी. कलम १.

राजश्री नारो जिवाजी यांनीं एक स्थळाची रदबदल केली. त्यास नामी स्थळें आहेत, त्यांतून न द्यावें. दोही स्थानामध्यें एक जागा करून द्यावी. कलम १.

एकूण कलमें अकरा करार केलीं असत. जाणिजे, छ ५ साबान.

---

## विठ्ठल शिवराम यांनीं जिवाजी विश्राम यांचेकरितां पेशवे सरकारांकडे पाठविलेली यादी.

याद करारनामा मार्फत विठ्ठल विश्राम, सुरसन सीत सितैन मया अलफ.

श्रीदेव व ब्राह्मण धर्मादाय पुरातन चालत आहेत ते चालवावे. कलम १.

पुरातन पूर्वापार चाललें असेल त्याप्रमाणें चालवूं. करार करावें.

देसाई यांचे मूळ पांच सहा असाम्या आहेत. यांचें वतन व बागाईत हल्लीं इनामतीची व वांटा चालला आहे, तो निखालस त्यांचा त्यास देवावा. जिऊबाचे विद्यमानें देवावा. त्यामध्यें त्याची वांटणी करून देऊन, त्यानें असावें. त्यामध्यें कोणी लबाडी करील त्याचें पारिपत्य करावें. कलम १.

पूर्वीपासून मूळचें वतन खरेंखुरें असेल तें चालवूं. भाऊबंदाची वांटणी यथाविभागें करून देऊं. त्याप्रमाणें त्यांनीं अनभवून वतनाची चाकरी करावी. हशम पुरातन सनदी आहे. त्यामध्यें जे तूर्त आमच्या वांटेस मिळोन पदरीं पडेल, अगर सरदार, कारकून यांचे पुरातन चाललें आहे, त्याप्रमाणें चालवावें. कलम १.

सरकारच्या कामास उपयोगी पडेल त्याचें पुरातन चाललें असेल तें चालवूं.

कुडाळ प्रांताचे नाडकर्णी यांचे नाडकर्ण सांवताच्या अमलांत अमानत असोन, त्यास असामी चाकरीचे नातेनें ऐवज पावतां होई. त्यास हल्लीं त्यांची वृत्ति त्यांस बहाल करून द्यावी. कलम १.

वाजवी मनास आणून बहाल करून देऊं.

मुलूख सरकारांत जाहला ह्मणजे तालुकेचा बंदोबस्त कुली जिऊबाचे हातें घ्यावा. वाजवी धन्यानीं एक वेळा मुलखाची जमाबंदी पहावी. चौकशी करावी. खर्चवेंच, ठाणीं, किलेचा वगैरे वजा देवून, बाकी ऐवज राहील तो सरकारांत घ्यावा. नाहींतर सरकारांत आला ह्मणजे चढ घालावा. एकावर एकानें उभे रहावें हें कामाचे नाहीं. या गोष्टीचें दृढ असावें. कलम १.

एकदां सर्व तालुकीयाचा बंदोबस्त हुजरून जिवबाचे विद्यमानें करून देऊं. त्याप्रमाणें जिवबांनीं इमानें इतबारें वर्तावें. उगीच कोणी घालमेलीची गोष्ट बोलेल, ते सरकारांत ऐकणार नाहीं. येणेंप्रमाणें.

कदाचित् अधिक बोलणें झालें तर जिवबांशींच बोलन करावें. येणेंप्रमाणें.

वतनदार पुरातन पंचमहाल व कुडाळ प्रांतांतील आहेत. ते कुली आजचे प्रसंगीं सामील आहेत. त्यांचीं वतनें इनामें सालाबाद चाललीं आहेत त्याप्रमाणें चालवावीं. कलम १.

सरकारकामावर पडेल त्याचें वतन पुरातन चाललें असेल, त्याप्रमाणें सरकारांतून चालवूं. येणेंप्रमाणें.

रयतेचें प्रजापालन ज्याप्रमाणें सांवताच्या अमलांत जिवाजी विश्राम यांनीं चालविलें आहे, त्याप्रमाणें चालवावें. मुलखाचा बस्त वाजबी सांवत घेत होते. तो दाखला पाहून

वाजबी घ्यावा. नाहीं तर सरकारच्या तालुकेंत कमाविसदार मनस्वी रयतीवर जास्ती जलाल करिताती तें नसावें. ते जमीन देववाबेची आहे यास्तव. कलम १.

वाजबी असेल त्याप्रमाणें रयतेचे चालवूं. जाजती जलाल गैरवाजवी रयतेवर होणार नाहीं. येणेंप्रमाणें.

हल्लीं कामकाजामुळें सरदार, नाईकवाडी वगैरे कोणी सरकारकामास उपयोगी पडणार, त्यास बक्षीस अगर इनाम गांव, खेडें, जमीन द्यावी लागेल. ते जिऊबा ज्याप्रमाणें करार करितील त्याप्रमाणें निभावून देवावें. कलम १.

सरकार कामास येईल, त्यास बक्षीस व इनाम देणें, तें काळानुरूप योग्यता पाहून जिवाजी विश्राम यांचे विद्यमानें देऊं.

हल्लीं देसाई यांसीं मिळून राज्य बुडवून टोपीकरास द्यावें, याप्रमाणें कर्म ज्यांनीं केलें आहे, त्यास राज्यांत न ठेवावें. अगर कोणीं वगवशिलेनें रदबदली करितील तर ते खातरेंत न आणावी. कलम १.

अन्याय जसा असेल तसें पारिपत्य केलें जाईल.

जिवाजी विश्राम यांचे एक पुत्र हुजूर नेहमी संनिध कबिलेसुद्धां असावे. त्यांचे जाती-ची तैनात मातबर करून ठेवावे. कांहीं स्वारांचा करार हजार पावेतों करार करून सेवा घ्यावी. इतबाराकरितां करावें. कलम १.

एक पुत्रास हुजूर ठेऊन घेऊं. कित्येक सरबराई करणें ते पाहून समजून करूं. येणेंप्रमाणें.

सरकारचें राज्य झालें ह्मणोन फिरंगी यांसी कळतांच अनर्थ करणार. आह्मी ठासून राखों, तंव पावेतों राखों. नाहीं तर, गोपाळराव व विजयदुर्ग सरकारच्या तालुकेदारांनीं कुमक करावी. कलम १.

वातमी राखून वरचेवर जाहीर करावें. त्याप्रमाणें जलमार्गें व खुष्कीनें कुमक करणें, ती केली जाईल. येणेंप्रमाणें.

तूर्त रेडी इंग्रजानें घेतली आहे. त्यास पन्नास हजार रुपये द्यावे लागतात. ते साव-कारी गोमांतकची निशा द्यावी. तर हा प्रसंग जेव्हां होतो, तेव्हां गोमांतकची निशा होणार नाहीं. याकरितां पन्नास हजार रुपयांची बशर्त सावकाराची निशा तूर्त देवावी. लौकिक न होतां किल्ला हस्तगत करून बंदोबस्त करूं. पन्नास हजार रुपये तालुकेवर उगावा करून ऐवज पैकीं देऊं. कलम १.

बशर्त काम जाहल्यास पन्नास हजार रुपये तूर्त सरकारांतून द्यावे. आणि त्याच तालुक्यांत उगवून सरकारांत घ्यावे. कुदकावेसीनें पन्नास हजारांत कमी होतील ते करावें. येणेंप्रमाणें.

येणेंप्रमाणें बारा कलमें करार करावीं.

तारीख १७ जमादिलावल. कार्तिकमास. सुरुसन तिसैन.

सर्व तालुका सर जालीयावर सरकार मातबर कारभारी, इतबारी, तालुके मजकुरीं पाठवून, तेथें चार सहा महिने राहून, सर्व बारीक मोठें कामास जिऊबांचे विद्यमानें माहीत होऊन, सर्व कच्चें पक्कें हुजूर येऊन समजावितील त्याप्रमाणें मनास आणून, आज्ञा होईल त्याप्रमाणें जिऊबांनीं बंदोबस्त करावा. येणेंप्रमाणें सर्व बंदोबस्त जिऊबांचेच हातीं करविला जाईल. येणेंप्रमाणें करारार्चीं कलमें तपशीलवार लिहीलीं आहेत. त्याप्रमाणें जिऊबांनीं एकनिष्ठेनें इमानें इतबारें वर्तणूक करावी. सरकारांतून कराराप्रमाणें चालवावयासी अंतर होणार नाहीं. येणेंप्रमाणें.

---

## होन सांवत यांनीं फोंड सांवत यांचेकरितां पेशवे सरकारांकडे पाठविलेली यादी.

यादी संस्थान वाडी निसबत खेम सांवत भोंसले, सरदेसाई, प्रांत कुडाळ वगैरे महाल व गांव सुरुसन इहिदे अशर मयातैन व अलफ. मशारनिल्हे मृत्यु पावल्यावर करवीरकर व निपाणीकर व गोवेंकर वगैरे यांनीं कलह करून संस्थान नातवानीस आणिलें. हल्लीं कांहीं अमल त्यांजकडे आहे. बाकी मुख्य संस्थानचे जागेसुद्धां, घर लेंकवळे वगैरे यांनीं बेदा करून, संस्थान हस्तगत केलें आहे. त्यास त्याजकडून व करवीर वगैरे यांजकडून दरोबस्त संस्थानचा महाल, मुलख, किल्ले, कोट, अरमार, तोफा वगैरे दौलत सरकारांतून फौज देऊन, सोडवून, फोंड सांवत भोंसले यांची स्थापना करारामदाराचें बोलण्याप्रमाणें महाल मुलखाची वगैरे व्यवस्था करून घेऊन करावी. येविषयीं फोंड सांवत यांजकडील होन सांवत भोंसले पुणीयाचे मुक्कामीं येऊन ठराव केला. तीं कलमें बितपशील:—

सरकारांतून मातबर सरदार नेमून द्यावे. त्यांनीं फौजसुद्धां संस्थानीं जाऊन लेंकवळे वगैरे कुभांडी यांजकडील व करवीरकर वगैरे यांजकडील मुलख, किल्ले, कोट वगैरेसुद्धां सोडवून सरकारांत लिहून पाठवावें. त्याचा जमाखर्चाचा अजमास समजून व्यवस्थेविषयीं आज्ञा व्हावी. त्यास सरकारांतून फौज स्वार व पायदळ व तोफा वगैरे रवाना करून संस्थान हस्तगत होई तें करून, तुमचे बोलण्याचा अन्वय ध्यानास आणून बंदोबस्त करून दिला जाईल.

फौज वगैरे सरंजाम संस्थानचे बंदोबस्तास जाईल. त्याचे खर्चाची तोशीस आम्हांकडे लागूं नये. खर्च होणें तो सरकारांतून व्हावा. त्यास सरकारची फौज वगैरे लवाजमा

संस्थानचे बंदोबस्तास जाईल. त्याचे खर्चाची तोशीस तुम्हांस लागणार नाहीं. सरकारांतून खर्च केला जाईल.

संस्थानचे दौलतीचे बिलकुल कामकाजास सरकारचा मुनीम चांगला शहाणा माणूस दौलतीचा बोज राखून सरकारचे व आमचे लक्ष्यानें असा, इतबारी नेमून द्यावा. त्याचे हातून कुल दौलतीचें इराद्याचें कामकाज घेऊं. त्यास सरकार लक्ष्याचा तुमचे मनोदयानुरूप मुनीम नेमून दिल्हा जाईल.

महाल, मुलूख, किल्ले, कोट वगैरे कुल संस्थानची दौलत सरकारचे फौजेचे हस्तगत जाहली म्हणजे महाल, मुलूख व गांव, खेडीं व बंदरें व किल्ले, कोट मिळून एकंदर पैकीं निमे सरकार सरहद्दे लगत सोईचा सरकारांत घेऊन, बाकी निमे आम्हांकडे संस्थानचे व किल्ले, कोट, आरमारें वगैरे बिलकुल आमचे हवाली खर्चाबद्दल करून फोंड सांवत यांस अधिकारी करून द्यावे. त्यास वर लिहिल्याप्रमाणें निमे सरकारांत घेऊन, बाकी निमे तुम्हांकडे चालवून, संस्थानास अधिकारी फोंड सांवत यांस करून दिल्हे जातील. निमे मुलूख सरकारांत देतों, सबब निमे आम्हांकडे महाल, मुलूख वगैरे व संस्थानसंमंधें लवाजमा राहील. त्यास करवीरकर यांचा उपद्रव होऊं लागल्यास, त्याचा पुस्तपन्हा साल बसाल सरकारांतून होत जावा. त्यासी निमे मुलूख वगैरे व संस्थानसंमंधें लवाजमा जे तुम्हांकडे सरकारांतून कायम होईल. त्यास करवीरकर वगैरे यांचा उपद्रव होऊं लागल्यास सरकारांतून पुस्तपन्हा करून बंदोबस्त राखिला जाईल.

---

## मुधोजी नाईक निंबाळकर यांनीं पेशवे सरकारांकडे पाठविलेली कराराची यादी.

यादी राजश्री मुधोजी नाईक बिन बजाजी नाईक निंबाळकर, देशमुख, प्रांत फलटण, सुरुसन समान सितैन मया व अलफ. सन हजार ११७७.

सन हजार ११७५ तें सालीं चाकरी तीनशें स्वारांनिशीं केली, त्यामुळें दीढा लक्षाचे कर्जदार जाहलों. सरकारांतून पावलें न पावलें, साहेबांस विदित आहे. याचा परिहार करणार धनी समर्थ आहेत.

"चाकरी केली ती उमेदवारीनें केली. करार."

सगुणाबाईचा व आमचा कजिया लागला, तेव्हां वाड्यांत दोनशें प्यादे व पन्नास राऊत रखवालीस ठेविले. तेव्हां स्वारीस निश्चितपणें गेलों. याजमुळें कर्जदार जालों. त्यांची वर्तणूक आहे ती विदित आहे. आम्हीं मात्र कर्जदार जालों. आज्ञाभंग आपणांकडून जाला नाहीं.

"पूर्वीं भाऊपणामुळें जे जे कलह जाले ते जाहले. पेस्तर ताकीद केली जाईल. येणेंप्रमाणें करार."

मुधोजी नाईक बिन जानोजी नाईक असतां, पानदेखणें यांच्या देवळांत कारभारीसुद्धां बसोन दोन हजार माणूस मेळवून, सर्वांचे साक्षीनें बोलले जे—आजतागाईत तुमचें वतन जतन केलें. आतां तुम्ही आला. आपलें वतन आटपावें. असें बोलोन सर्वांचे साक्षीनें तरवार व भाला व देवाचा प्रसाद आमचे स्वाधीन केला. गुंता ठेवून गेले नाहीं.

"इनसाफास कोणी उभा राहील, ते समयीं रुजूं मोझ्या मनास आणून, आज्ञा करणें ती केली जाईल. येणेंप्रमाणें करार."

सगुणाबाईस आपण नेमणूक करून देतील, ते काळानुरूप देतील. त्याप्रमाणें आपण तिचा जीव आहे तोंपर्यंत चालवूं. त्यांनीं समाधानें असावें येविषयीं ताकीद असावी.

"पेशजी वराडचे स्वारींत, सगुणाबाईस बेगमीस दहा हजार रुपये द्यावे, येणेंप्रमाणें करार जाहला आहे. त्याप्रमाणें दहा हजार रुपये क्षेपनिक्षेप दरसाल पावीत जावे. यांत कमजास्ती करूं नये. करार."

पुर्ता अभिमान धरून चालवावें असें असिलें तर कृपा करून चालवावें. गतवर्षीं सर्व बोली सिद्ध करून वस्त्रांनिमित्य दरबारास नेले. आण अपमान जाला. तेव्हां सर्व सोडून जावें, परंतु स्वामींचे कृपेनें मात्र राहिलों. प्रस्तुत तसें न करावें.

"तुम्हीं लिहिली विनंति ध्यानास आणून हल्लीं तुम्हांवर कृपा केली असे. येणेंप्रमाणें करार."

साहेबीं चाकरी लहान मोठी सांगितली त्याप्रमाणें केली. कोण्हीविषयीं मान पाहिला नाहीं. पुढें मान सन्मान राखणार धनी समर्थ आहेत.

"सरकारचाकरी होऊन येई आणि तुमचाही बहुमान राहे, तेंच केलें जाईल. जरूरी कार्यास तुम्हींही अनमान करूं नये. येणेंप्रमाणें करार."

कसबीयांत ठाणें, टाणें बसावयासी कारकून व फौज देऊन ठाणें बसवून द्यावें.

"हुजूरचा कारकून व सरंजाम देऊन, ठाणें तुमचें स्वाधीन होय तें केलें जाईल. येणेंप्रमाणें करार."

मुधोजी बिन जानोजी नाईक यांजमागें चार लबाड व खानादान व कारकून मिळोन खूळ केलें आणि कजियास प्रारंभ केला. यांचें पारिपत्य करणार धनी समर्थ आहेत.

"तिकडील कित्येक लोकांपासून मागें अंतर पडलें, तें हल्लीं चित्तांत आणावेसें नाहीं. येणेंप्रमाणें करार."

गुदस्तां करारनामीयांत साहेबीं लेहून दिल्हें आहे जे,—नव महिनीया धर्मता इनसाफ करून धर्मन्यायें जिकडे वडीलपण लागेल, त्यास सर्व अधिकार वतनाचा व वडीलपणाचा व जागिरीचा देऊं. त्यास आपण सिद्ध असों. कागदी पत्रीं चौऱ्याशीच्या दाखल्यानें, श्री जेजुरी साक्ष करून जें निवडेल, त्यास आपण राजी असों.

"जो तुह्मांसी वादास उभा राहील, तेव्हां वाजवी इनसाफ मनास आणून आज्ञा करणें ते केली जाईल. प्रस्तुत तुह्मांवर कृपा करून सरंजाम व देशमुखीचें वतन तूर्त तुह्मांकडे दिल्हें असें. एकनिष्ठेनें सेवा करणें. करार."

साहेबीं तीनशें लोकांची बोली केली आहे. त्याप्रमाणें सरकारांतून चालवावें.

"आला (हि)दा फडशा जाहला. येणेंप्रमाणें करार."

परगणे फलटण आपणांकडे करार करून दिल्ह्यावर मुधोजी नाईक सरंजामाबद्दल चाकरी करित होते. त्याप्रमाणें देखील सरदेशमुखी कराराप्रमाणें चाकरी करूं.

"आला(हि)दा यादीवर फडशा जाहला असे. येणेंप्रमाणें करार."

पुरातन आमचे तीर्थरूपांनीं व तीर्थरूप जानोजी नाईक यांचे वेळेस भावाबंदास शेतें, भातें, इनाम, शेऱ्या दिल्ह्या, त्याप्रमाणें आपण चालों. अलीकडे कोणी नवीन करून घेतलें असेल, तें चालणार नाहीं. येविषयींचा बोभाट हुजूर आला, तर पुर्ता शोध करून, जे आज्ञा करणें ती करावी.

"बजाजी नाईक व जानोजी नाईक यांचे वेळेस शेतें, भातें व इनाम, शेऱ्या चालत असतील, त्या तुह्मीं चालवाव्याच. मुधोजी नाईक बिन जानोजी नाईक यांचे वेळेस जीं नवीन शेतें व इनाम जाहले असतील, ते पाहून कार्याकारण चालवावे. येणेंप्रमाणें करार."

सालमजकुरीं तीनशें लोकांची बोली आहे. जातीची बोली मोघम आहे. जातीस हजार रुपये पावले आहेत. संसार भारी आहे. याचा परिहार करणार धनी समर्थ आहेत.

फलटणचे वाड्यांत आह्मीं राहावें हें उचित. तथापि सगुणाबाईचा आग्रह असला तर, त्यांचा जीव आहे तोंवर, ती व आह्मीं समजोन राहावें. त्यांचा जीव आहे तंवर आह्मीं बोलणार नाही.

"तीन वाडे आहेत, त्यांत एके वाड्यांत सगुणाबाईनीं राहावें. एके वाड्यांत समस्त भाऊबंदानीं राहावें. रामाचा वाडा आहे त्यांत तुह्मीं राहावें. वडीलपण तुह्मांकडे आहे. समजून उमजून सर्वांनीं राहावें. येणेंप्रमाणें करार."

देशांतील वतनदारांचा इनसाफ हरएकविषयीं कजिया आला तर आह्मीं मनास आणावें. साहेबांजवळ कोणी आल्यास मनावर घेऊं नये. आह्मीं धर्मता करूं."

"तुह्मांही वाजबीचे रीतीनें इनसाफ करून विल्हे लावावें. कदाचित् गैरवाजबीमुळें हुजूर बोभाट आल्यास मनास आणून, आज्ञा होईल त्याप्रमाणें करावें. येणेंप्रमाणें करार."

मोंगलांचे दंग्याचें सालीं खंडणी फलटणची पावणेदोन लक्ष जाली. ते समयीं आपण दरम्यान होऊन हवाला घेतला. यांजपैकीं कमकसर निमे वसूल जाला. बाकी ऐवज हिशेबीं राहिला आहे तो देवावा. अडीच लक्षांची पट्टी परगणेयांत करून वसूल केला. आह्मांसी दरम्यान आले होते. त्यांनीं आमचा हवाला घेतला, आण पैका पावला नाहीं. त्यास आज्ञा करून पैका देविला पाहिजे.

"तुह्मांकडे मध्यस्तीस कोण आले होते त्यांस हुजूर आणून मनास आणून, वाजबी आज्ञा करणें ते केली जाईल. येणेंप्रमाणें करार."

---

## पेशवेसरकार व प्रतिनिधी यांचेमधील तह.

यादी तहनामा किल्ले विशाळगड व रत्नागिरी याचा दुतर्फा अमल आहे. तेथें विशाळगडतर्फेनें वर्तणूक करावया ठराव. सुरुसन इहिदे सबैन मया व अलफ. कलमें बितपशील:—

सरकारतर्फेनें पाहणी होऊन मुलकी जमाबंदी पंचसाला जाहली आहे. त्याप्रमाणें वसूल घ्यावा. जास्ती रयतेस काडीमात्र उपसर्ग लागों नये. कलम १.

ऐनजिनसी गल्ला घ्यावा. तो महालचे महालीं फड करू घ्यावा. किल्याचे लगते पांच सहा कोशीं गांव आहेत, त्यांचा गल्ला मात्र हिश्याप्रमाणें, गल्ला किल्यावर घ्यावा. कलम१.

महालांत वसुलास वरातदार मनस्वी येतात. येणेंकरून रयतेस उपद्रव होतो. याजकरितां दोन शिपाई नेहमी दर महालीं ठेवून सरकारचे रीतीप्रमाणें वसूल घ्यावा. कलम १.

न्यायमनसुबी, खंडगुन्हेगारी ठरणें ते सरकारतर्फेनें ठरेल. त्या अन्वयें हिस्सा होईल तो घ्यावा. कलम १.

सरकारतर्फेचे हिशेब मुलकी श्रावण भाद्रपदमासीं होतात. कार्तिकमासीं विशाळगडतर्फेनें खोतास बोलावून नेऊन सालचें सालांत हिशेब करावे. चार पांच साला हिशेब राहातात, ते तट्टन ठेवूं नये. वरचेवर करीत जावे. कलम १.

सन समानांत हुजरून बाबती सोडिल्या, त्याप्रमाणें विशाळगडतर्फेनें सोडून हलीं हिशेब करावे. कलम १.

मुलकी जमाबंदीबद्दल चौथाईत शेर सरकारशिरस्तेप्रमाणें घ्यावे. बाकी तीन तक्षिमा

ऐनजिन्नस द्यावा. अगर सरकारचे फरोक्त थोडेबहुत होते, त्याअन्वयें विशाळगडकरी यांनीं घ्यावा. कलम १.

वेठबेगार, फडफर्मास याचा बंदोबस्त तालुक्याचा सरसुभाहून सालमजकुरीं जाहला आहे. त्याप्रमाणें विशाळगडाकडे घेत जावें. जास्ती घेऊं नये. कलम १.

मुलकी खोत, पाटील हिशेबाकरितां महिना दोन महिने किल्यावर राहून श्रमी होतात. याजकरितां चार रोजांत हिशेब करून निरोप देत जावा. कलम १.

विशाळगड लगते दुतर्फा गांव आहेत, तेथील गल्ला रत्नागिरीस जातो. व रत्नागिरी लगते दुतर्फा गांव आहेत, तेथील गल्ला विशाळगडीं जातो. याजकरितां दरसदरे समजोन महाली ऐवज मुबदला दरकार लागल्यास करून घ्यावा, द्यावा. कलम १.

कलमें १०.

एकूण दहा कलमें, सदरहू लिहिल्याप्रमाणें अमलांत आणावे. कारभार संमधें विशाळगडास पत्र जाईल त्याप्रमाणें करावें. कदाचित् कांहीं लढा असिला, तरी कारकून पाठवून फडशा वरचेवर करून घ्यावा. विशाळगडतर्फेनें बोलीचालीबद्दल राजश्री भिकाजी त्रिंबक मध्यस्थ करून दिल्हे आहेत. यांचे मारुफतीनेंच एकहाती जाबसाल करीत जावे. सरकारांतून यांचे विद्यमानेचा कारभाराचा जाबसाल करून घेतला जाईल. जाणिजे. छ ४ रमजान. परवानगी हुजूर.

---

## पेशवेसरकार व प्रतिनिधी यांचे मधील इसवी सन १७७० सालचे तहाची पुरवणी.

तहनामा सरकार राजश्री पंतप्रधान, सुरुसन आर्बा समानीन मया व अलफ. राजश्री आबाजीराव पंडित प्रतिनिधी यांजकडील तालुके विशाळगड व तालुके रत्नागिरी निसबत सरकार येथील दुतर्फा अमल आहे. त्यास पंडित मशारनिल्हेकडील अमलदारांकडून कांहीं महालीं जास्ती वहिवाट होऊं लागली, ह्मणोन सालगुदस्ता तिकडील अमलाची जप्ती केली होती. ते मोकळी करून दुतर्फा सुरळीत चालावयाचीं कलमें ठरवून दिल्हीं. बितपशील:—

प्रांतमजकुरीं जमाबंदीचा ठराव मरुता अगर पहाणी होऊन होणें तें, सुदामत दुतर्फा जमाबंदी होत आल्याचा दाखला पाहून, पेशजींपासून चालत आल्याप्रमाणें चालावें. नवीन दुतर्फाही करूं नये. कलम १.

सन समान सबैनांत हुजरून रयतेस बाबती सोडल्या आहेत, त्याप्रमाणें हिश्याबद्दल विशाळगडतर्फेकडून सूट द्यावी. कलम १.

प्रांतांत कमावीस, खंड, गुन्हेगारी होईल, त्याची वहिवाट सुदामत चालत आल्याप्रमाणें चालावी. कलम १.

प्रांतात न्याय, मनसुबी होणें, त्यास फिर्याद वादी जिकडे जाईल तिकडे मनास आणित असतां दुसरेकडून वादीयास उपद्रव नसावा. सुदामत चालीप्रमाणें दुतर्फा चालावें. कलम १.

बंदर संगमेश्वर येथील जकातींत विशाळगडचा हिस्सा आहे. त्यास बाजारचे जकातींत शेंकडा रुपये १५ पंधरा हिस्सा सुदामत चालत असतां, एकशें पंधरा रुपयास पंधरा रुपये घ्या ऐसें जकातदार ह्मणतात. त्यास सुदामत शेंकडा पंधरा रुपये घेत आल्याप्रमाणें घेत जावे. कलम १.

कैलासवासी आपाजीराव प्रतिनिधी यांची स्त्री सकवारबाई यांचा खर्चवेंच, दानधर्म चालला पाहिजे. याजकरितां तुह्मीं आपल्याकडील तालुक्यापैकीं दोन हजार रुपयांचे गांव नेहमी त्यांचे खर्चास लाऊन यांचे निसबतीस द्यावे. यापैकीं पेशर्जी गांव लाऊन दिल्हा असेल त्यासुद्धां दोन हजारांची भर करून द्यावी. ती जिवंत आहे, तों घालमेल करूं नये. निर्वेध चालवावें. कलम १.

महालांत वसुलास बरातदार मनस्वी येतात. तेणेंकरून रयतेस उपद्रव होतो. याजकरितां दोन शिपाई नेहेमीं दर महालीं ठेवून सरकारचे चालीप्रमाणें वसूल घ्यावा. कलम १.

मुलकी खोत, पाटील हिशेबाकरितां महिना दोन महिने किल्ल्यावर राहून श्रमी होतात. याजकरिता चार रोजांत हिशेब करून निरोप देत जावा. कलम १.

साल होतांच श्रावण, भाद्रपदमासीं सरकारतर्फेचे मुलकी हिशेब होतात. त्या अन्वयें आश्विन, कार्तिकमासाअलीकडे विशाळगडतर्फेचे हिशेब व्हावे. कलम १.

वेठबेगार, फडफर्मास रयतेकडील किल्याचे बेगमीस घ्याक्याची पेशजीपासून चाल आहे. त्यापैकीं सरकारतर्फेनें कांहीं रयतेस सूट दिल्ही आहे. त्या अन्वयें विशाळगडाकडून द्यावी. कलम १.

तालुके मजकुरीं चलनी रुपया घ्यावयाची चाल आहे. याजकरितां चालीप्रमाणें रुपया घ्यावा. बट्टा कोणापासून घेऊं नये. कलम १.

मुलकी जमाबंदीपैकीं विशाळगडचे अंमलाचे गांवीं ऐनजिन्नस वहिवाट करणें तें, ज्यागांवीं सरकारचा अंमल निमे व विशाळगड निमे मिळून वीस खंडी जमाबंदीचा गांव असेल त्यापैकीं दहा खंडी सरकारच्या जाऊन, बाकी दहा खंडी विशाळगडच्या राहिल्या,

त्यांपैकीं हरीक दरोबस्त तसेर होतात, ते खेरीज करून, राहिल्या गह्यापैकीं चौथाई तसेर चौथाई प्रोख्त सरकार शिरस्तेप्रमाणें घेऊन, बाकी राहील त्यांपैकीं चवथाई गल्ला किल्ल्यावर कोठीस ध्यावा. बाकी राहिला गल्ला सरकारचे प्रोख्त होईल, त्याप्रमाणें प्रोख्त करून पैका ध्यावा. जास्ती दर घेऊं नये. कोठीचे नेमणुकेप्रमाणें ज्याच्यानें गल्ला कोठीस न नेववे तर जरुराती त्याचे प्रोख्त तसेराचे दर आहेत, त्यापेक्षां पांच रुपये जास्ती घेत जावे. याच अन्वयें चवथाई हिश्याचे गांवीं वहिवाट करावी. लगते गांव सात आठ कोशीं असतील, तेथील गल्ला सालाबादप्रमाणें किल्ल्यावर निमे अमलपैकीं चवथाई कोठीस ध्यावा. तसेर प्रोख्त शिरस्तेप्रमाणें व कोठीचा गल्ला सदरहू नेमणुकेप्रमाणें वजा करून, बाकी ऐनजिन्नस राहतो त्यांपैकीं रयतीनें आपल्या संतोषेंकरून साखरपेयाचे फडावर दिल्यास ध्यावा. सक्ती करून घेऊं नये. सदरहूप्रमाणें वहिवाट करावी. कलम १.

तर्फ देवळें येथील हबसी पट्टीचा मक्ता व मौजे सालपें व मौजे भोवडें तर्फ मजकूर या गांवचे जमाबंदीचा मक्ता पेशजीपासून सुदामत चालत आल्याप्रमाणें विशाळगडाकडे चालेल. कलम १.

शिवाजी बल्लाळ हे पहिल्यापासून तुमचे पदरचे कारकून, दरबारीं जाबसालास येत होते. त्यांजविषयीं हल्लीं तुमचे मनांत संशय आला आहे. याजकरितां तुह्मीं आपले कडील शहाणा माहितगार इतबारी कारकून दुसरा जाबसालास दरबारीं ठेवावा. त्यांचे हातें तुमचें निसबतीचें कामकाज घेतलें जाईल. शिवाजी बल्लाळ यांजकडे तुह्मांकडून गांव व वेतन पहिल्यापासून चालत आल्याप्रमाणें चालवावें. आकस, आदावत करूं नये. कलम १.

बंदर संगमेश्वर येथें खाडींतून मीठ येतें. त्यास इजारदार जकातीकडील मौजें वानरी व कसबे कोडिवरें येथें किरकोळ मीठ उतरून विकतात. तेथें आपलेकडील हिस्सा जकातीचा येणें, तो जकातदार द्यावयास दिक्कत करितात. तो देवावा ह्मणोन तुमचे कारकुनाचें बोलणें. त्यास येविषयीं राजश्री महिपतराव कृष्ण यांस आलाहिदा पत्र सादर केलें आहे. त्याप्रमाणें ते मनास आणून, मागील दाखला पाहून, सुदामत चाल असल्यास जकातदार यांस ताकीद करून चालवितील. सुदामत नसल्यास चालणार नाहीं. कलम १.

सन इहिदे समानीनांत प्रांताची जमाबंदी पांच साला जाहली आहे, त्याप्रमाणें पांच सालें भरे तों चालावें. जास्ती रयतेस कोणेविषयीं उपसर्ग काडीमात्र होऊं नये. कलम १.

मीठ सरकारतर्फेनें सरकारच्या मिठागरापैकीं रयतेस प्रोख्त घालून दराप्रमाणें पैका

वसूल येतो त्यास विशाळगडतर्फेनें मीठ न घालतां, पैक्याविषयीं रयतेस तगादा होतो. तो होऊं नये. कलम १.

येणेंप्रमाणें सतरा कलमें ठराऊन देऊन तहनामा करार करून दिल्हा असे. तर सद्रहूप्रमाणें दुतर्फाही सुरळीत चालावें. छ २९ रजब.

## फ्रेंचसरकार व इंग्रजसरकार यांचे मधील करारनामा.

करारनामा फराशीस व इंग्रेज यांचा तह जाहला. सन १७८३ माहे जुलै उर्फ रबिलोवल अज श्रावण वद्य १ पावेतों. चार वर्षें, सात महिने, अकरा दिवस जाहले. पातशाहा फराशीस होता. त्याचें नांव लुईस. हल्लींचा पातशाहा जाहला यांसुद्धां सोळा जाहले. पातशाहा इंग्रेज यांचे नांव जॉर्ज पातशाहा जाहला, यांसुद्धां तिसरा यांनीं करार बंदर वेरसाई फराशीस यांचें आहे. तेथें इंग्रेज यांनीं आपल्याकडील वकील बरोबरीचा पाठविला. त्याचें नांव मिस्तर अलेनफिन्त एरबोर यांस पाठविला. आणि सांगितलें कीं, तूं जो तह करशील तो आपल्यास करार आहे. ह्मणून बोलून रवाना केला. तो बंदर मजकुरीं गेल्यावर पातशाहा फराशीस यांनीं आपल्याकडील वकील मुसे पाले गावीये कौंत ग्रवर्जन याजला इंग्रजांचे वकिलाकडे अखत्यारीनें पाठविले. आणि तहाचा करार जाहला त्याचीं कलमें.

१ उभयतां वकील यांची बोलणीं जाहलीं कीं, तुमची आमची दोस्ती होत आहे. याजकरितां मागें लढाया झाल्यामुळें चित्तांत परस्परें कित्येक किलाफ असतील ते सोडून बोलणीं बोलावीं; व जहाजें जातात व येतात त्यांनीं परस्परें लढाया करूं नयेत; व खुष्कीसही लढाया तूर्त होऊं नयेत. याप्रमाणें तूर्त कागद उभयतांचे आपल्या जहाजास व खुष्कीस पाठवावे. पुढें बोलणें होऊन ठराव होईल, त्याप्रमाणें फिरोन पत्रें पाठवावीं. याप्रमाणें पहिलें. कलम.

२ कलम दुसरें:— जंजिरें, तर्णे वगैरे लहान लहान आहेत ते पेशजीचे लढाईत तुह्मीं इंग्रजांस दिल्हे त्याप्रमाणें हल्लींही करार. कलम.

३ कलम तिसरें:— जंजिरें मजकुरीं पातशाहा फराशीस यांचीं तरांडीं जात होतीं. ते हल्ली मना केलीं. त्यास जंजिरें मजकुरीं जाऊं देणार नाहीं. इतर बंदरीं जातील. कलम.

४ कलम चवथें:— येथें इंग्रेज यांनीं करार केला कीं, तुह्मीं जंजिरें मजकुरीं जहाजें जाऊं देणार नाहीं, ह्मणून करार केला. त्यास तुमची आमची दोस्ती जाहली. तेव्हां तुमचीं जहाजें मासे मारावयाविषयीं जात असतात त्याप्रमाणें जावें. आह्मी मना करणार नाहीं. कलम.

५ इंग्रज पातशाहा यांनीं पातशाहा फराशीस यांस जंजिरें सिंपियेर व जंजिरें मलकलावस दिल्हें. कलम.

६ बंदर गाले फसेकरा येथें तुह्मी फराशीस यांनीं मासे मारावयासी पेशजीप्रमाणें जात जावें. कलम.

७ पातशाहा इंग्रज यांनीं फराशीसाचा जंजिरा सतलुसी पेशजी लढाईत घेतला होता. तो फराशीस यांस माघारा दिल्हा. व आपलेकडील जंजिरें तबगा फराशीस यांस दिल्हा. कलम.

८ पातशाहा फराशीस यांनीं पेशजी लढाईत जंजिरे इंग्रेजांचे सात घेतले होते. ते माघारे दिल्हे त्यांचीं नांवें:—

१ लग्रेर नाद.
१ लग्रेल नाद्या.
१ सावेचा.
१ कडील मिनीख.
१ शेकीर स्तोफ.
१ नेवीस.
१ मासिस्थ.
७

एकूण जंजिरे सात इंग्रेज यांस दिल्हे. व पेशजी जंजिरेहाय यांजकडे गांव चालत आल्याप्रमाणें दिल्हे व फराशीस यांजकडे गांव पहिल्यापासून चालत आले आहेत ते आह्मी फराशीसानें घ्यावें, व सदरहू जागा फराशीस यांचे व निसबतीचे उदीम व इमारती असतील त्यांची उगवणी अठरा महिन्यांत करून घेऊन, जागा सोडून द्याव्या व उदमाचा फडशा करून घ्यावा. कलम.

९ पातशाहा इंग्रेज यांनीं पातशाहा फराशीस यांसी सजिगलची खाडी व मुलूख दिल्हा. व खाडीचे किनाऱ्याचे किल्ले दिल्हे. येणेंप्रमाणें:—

१ जंजिरे गोरें.
५ किल्ले.
  १ सेट्टुई.
  १ पोदोरे.
  १ गलाम.
  १ आर्गे.
  १ पोर ते दिलां.
  ५
६

१० पातशाहा फराशीस यांनीं लढाईत किलकंज्य व खाडी गंबी घेतली होती, ते माघारी इंग्रजांस दिल्ही. कलम.

११ आपला आपला मुलूख सरहद्देत असेल त्याची चौकशी करून दुसरा करारनामा केला जाईल. व गोदाचे सवदागर पेशजी वीस पंचवीस वर्षे चालत आल्याप्रमाणें हल्लीं ही चालावें. कलम.

१२ शिंदीयांचा मुलूख आफरिक आहे. तेथें उभयतां पातशाहाची सावकारी चालत आहे त्याप्रमाणें चालावी. कलम.

१३ पातशाहा इंग्रेज यांनीं पातशाहा फराशीस यांसी पेशजी लढाई जाहली, ते वेळेस मुलूख व किले घेतले होते, ते माघारे फराशीस यांसी दिल्हे. व जहाजें परस्परें जातील येतील त्याशीं लढाई होऊं नये. कलम.

१४ फुलचरी व कारिकल हीं दोनी बंदरें कोटसुद्धां फराशीसांस माघारी इंग्रेज यांनीं दिलीं.

२ फुलचरीचे सरंजामास परगणे.

१ बंकनूर.

१ बाहूर.

२

४ कारिकल येथील सरंजामास गांव.

६

१५ बंदर मही येथें फराशीस पहिल्यापासून आहेत त्याप्रमाणें राहावें. व बंदर सुरत येथें कोठी फराशीस याची पहिल्यापासून आहे त्याप्रमाणें करावी. व सावकारी चालत आल्याप्रमाणें चालवावी. कलम.

१६ विलायत खुष्कींतील राजे सरदार आहेत, ते आम्हां उभयतां जवळ हरकोणासी कज्या करावयाकरितां उमेदवार होऊन कुमक मागावयासी आल्यास, आम्हीं उभयतांनीं त्यांजला सांगावें कीं, तुम्ही चार महिने दम धरणें. पुढें जें सांगणें तें सांगू. जर करितां ऐकिल्यास उत्तम, न ऐकत तरी ज्याचे खातरेस होईल तसें करोत. आपण उभयतांनीं कोणाचेही कुमकेस जाऊं नये. कलम.

१७ डोकरक विलायत येथें गोद तरांडीं राहावयाची आहे. ते पहिले लढाईत इंग्रेज यांनीं गोद घेतली. आणि गोदीचें तोंड दगडानें बंदिस्त केलें. त्यामुळें तरांडीं परवानगी-शिवाय जावयाची मना जाहली. हल्लीं तुमची आमची दोस्ती जाहली. याजकरितां पेशजीपासून तुम्हां फराशीसांचीं तरांडीं जात आहेत, त्याप्रमाणें जावीं. दगडाची इमारत जाहली आहे ती काढून टाकावी. कलम.

१८ पातशाहा फराशीस याचे सावकार व पातशाहा इंग्रेज याचे सावकार हरएक उदीमास तुमचें आमचें बंदरीं जातील. त्यांनीं बंदरचे शिरस्तेप्रमाणें उदीम व्यापार करावा. कोणी कोणास अडथळा करूं नये. कलम.

१९ तुमची आमची दोस्ती जाहली. पेशजी लढाई जाहली त्या वेळेस परस्परें मुलख व जागे वगैरे घेतलीं आहेत. ते हल्लीं एकमेकाची दिल्हीं. परंतु एखादें ठिकाण वगैरे उभयतांकडे राहिलें असिल्यास चौकशी करून, ज्याजकडे लागूं होतील त्यांनीं द्यावें. कलम.

२० तुमचा व आमचा करार जाहला. परस्परें किल्ले व मुलख घेतले ते ज्याचे त्यास द्यावे, ऐसा करार झाला. त्यास लांब मुलख विलायतीकडे आहेत. ते तीन महिन्यांचे मुदतीनें द्यावे. व बंगाल्याअलीकडे फुलचरी वगैरे मुलख आहे, तो सहा महिन्यांचे मुदतीनें द्यावा घ्यावा. कलम.

२१ उभयतां पातशाहाचे लढाईमुळें असाम्या धरल्या आहेत, त्या सोडाव्या. त्यांजला खर्च लागला असेल तो उभयतांचे सरकारांतून पोहोंचला असल्यास द्यावा घ्यावा. कलम.

२२ पातशाहा फराशीस व पातशाहा इंग्रेज या उभयतांचा करार दोस्ती जाहली. याजकरितां आपापले विलायतेनजीक तरांडीं परस्परें धरिल्यास, तह जाहल्यावर बारा दिवसांत सांपडतील तें घ्यावीं. उपरांत सांपडल्यास कोणी कोणाची धरूं नयेत. सोडून द्यावीं. हिंदुस्थानांत लांब तरांडीं धरिल्यास पांचा महिन्यांत धरिल्यास घ्यावीं. उपरांत सांपडल्यास सोडावीं. विलायतीपासून जंजिरा किनारीं हिंदुस्थानचे हद्दीपर्यंत तरांडें एका महिन्यांत सांपडल्यास धरावें. पुढें सांपडल्यास सोडावें. कलम.

२३ तुमचा आमचा करार जाहल्यापासून एका महिन्यांत परस्परें तुमचा मुलख आह्मी द्यावा. व आमचा मुलख तुह्मी द्यावा. येणेंप्रमाणें करार. कलम.

सदरहूप्रमाणें तेवीस कलमें करार करून उभयतां वकील यांणीं आपल्या निशाण्याकरून आपापल्या पातशाहांच्या मोहरा केल्या.

---

## पेशवे सरकार व सवाई संताजी भोंसले यांच्या मधील तह.

तहनामा, राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांसी, सवाई संताजी भोंसले. सुरुसन तिसा अशरीन मया अलफ. राजश्री चिमणाजीपंत फौजेसहवर्तमान रेवाउत्तरतीरीं स्वारीस जात आहेत. त्यांस आपण फौजेनशीं सामील होऊन, ऐशास आमचे महाल, मुकासे आहेत, त्यांस तुमचे फौजेनें उपसर्ग न लावावा. आह्मीं तुमचे मुकासीयांत उपसर्ग न लावावा. पुढें परमुलखीं गेलीयावर, येणें तहप्रमाणें वर्तावें. कलमें बितपशील:—

माळवा मुकासा तुमचा आहे. त्यांत आह्मीं उपसर्ग न द्यावा. कलम १.

राजपत्राचे आमचे जे मुकासे आहेत, त्यांस तुह्मीं उपसर्ग न द्यावा. कलम १.

परमुलखीं गेलीयावर फौजेमुळें जो टका आकारेल, त्यांपैकीं दिवाण वांटा दरसद्दे रुपये २० वीस काढून, बाकी रुपये ८० रहातील ते फौजेवर गणतीवर वांटून द्यावे. कलम १.

सदरहूप्रमाणें उभयतांनीं वर्तोन एक विचारें मनसबा करावा. छ १४ रबिलोवल.

## रघोजी भोंसले यांचा मुरशत कुलीखान व बाकर अल्लीखान यांच्या मधील तह.

तहनामा सरकार राजश्री रघोजी भोंसले, सेनासाहेबसुभा. सुरुसन समान आर्बैन मया अलफ. अजम मुरशत कुलीखान बहादर रुस्तुमजंग व बाकर अलीखां यांसी करार केला. विद्यमान राजश्री फत्तेसिंगबावा भोंसले व राजश्री यशवंतराव महादेव खासनवीस. येणेंप्रमाणें कलमें बितपशील:—

सुभे बंगाला येथील चौथाई व सरदेशमुखी, तुमचा तालुका जेथवर आहे तेथवरी आमचा अंमल बैसवून सुरळीत द्यावा. कलम एक १.

आह्मांस बंगाले प्रांते दोन महालची जमीदारी करून द्यावी. कलम एक १.

आपले तर्फेनें सरंजाम तुह्मीं पंचवीस लक्षांचा वसुली द्यावा. तन्मुळें पातशाही चढाई तुह्मांवर जाहली, तरी आह्मीं कुमक तुमची करावी. तुह्मीं आमची कुमक करावी. पातशाही फौजेसीं झुंजविना बदलामी तुम्हांवर येईल, तर येविषयीं दिक्कत न घेणें. आमचे आह्मीं समजोन घेऊं. कलम १.

एकूण कलमें तीन करार केलीं असेत. याप्रमाणें अजम मीर हबिबुल्लाखान यांपाशीं तहनामा लेहून दिल्हा आहे. त्यामध्यें दोन चार कलमें कमपेश असतील त्याप्रमाणें चालवावीं. तुह्मीं आह्मीं एकत्र जाहलीयावर एकें विचारें चालावें. जमीदार व सरदार, अमीर अगर सावकार, मुदई हरकोणीं धरला गेला तर, अगर लढाईत सांपडला तर, उभयतांचें मतें कैदेंत ठेवणें अगर निरोप देणें अगर जें करणें तें एकें विचारें करूं. बंगाल्याचे सरदेश गेलीयावर कूच मुक्काम अथवा लढाई करावयाची तें एकें विचारें करूं. तुमचे इतल्याशिवाय त्या प्रांतींचा बंदोबस्त करणार नाहीं. छ १७ माहे जमादिलोवल. हा करारनामा लिहिला. सही. मोर्तब सुद.

## फत्तेसिंग भोंसले यांचा मुशरत कुलीखान व बाकर अल्लीखान यां मधील करार.

करारनामा नवाब अली खिताब मुरशत कुलीखान रुस्तुमजंग व मिरजा बाकरखान अजतरफ फत्तेसिंग भोंसले, सुरुसन समान आर्बैन मया अलफ. सुभे बंगाला येथील तहाचा करार दाद राजश्री रघोजी भोंसले, सेनासाहेबसुभा यांसी मीर हबिब यांनीं करून आपला

तहनामा यांस दिल्हा आहे व यांजपासून त्यांनीं घेतला आहे. हल्लींही राजश्री रघोजी भोंसले यांनीं मिरजा बाकरखान यांस लेहून दिल्हा आहे. याप्रमाणें अमलांत येईल. कदाचित् रघोजी बावांकडून तफावत् आली तरी आम्हीं त्यांस सांगोन करारप्रमाणें निभावणी करून देऊं. यास अंतर होणार नाहीं.

छ १४ जमादिलोवल निर्देश समक्ष. लेखनावधि सुद.

## जानोजी भोंसले यांचा निजाम बंदेगानअल्लीशीं तह.

तहनामा सुभे वऱ्हाड सन ११६७ फसलीपासोन जे कांहीं शाहामत व अवालीपन्हा बसालत व माअली दस्तगाह राव जानोजी भोंसले यांसी, छ ७ माहे रमजान सन ११७० फसलीस अलजपुरांत करार झाला १५ कलमें.

१ बंदगानअली यांचे सरकारचे जागिरीचे महाल व जातीची जागीर आह्मांकडील व सुभेदारीचे मशरूत समसामुदौला बहादूर व पाये बाकी साधणूक पैकीं कच्चा गांवखर्च व सरदेशमुखी वजा करून बाकी सेरसद बितपशील. जेलः—

१ सरकार कुलबाब सेरसद ५५.
१ चाहारम व नजर घांसदाणा पट्टीयांत वगैरे कुलबाब सेरसद ४५.
२

१ परगणे रायेगांव व कारंज, वाढवणें दरोबस्त व परगणे अंदोरी व परगणे वरूड अंका व परगणे लोहटे हिस्सा महालांत मशरूत सुभेदारीचा तिकडील कांठी पर्वा ये वर्धा आहेत. आजरूयेमची साधणूक गांवखर्च व सरदेशमुखी मामुलप्रमाणें वजा करून बाकी सेरसद बितपशील जेलः—

१ सरकार कुलबाब सेरसद ५५.
१ चाहारम व नजर घांसदाणा पट्टी पट्टीयांत वगैरे कुलबाब सेरसद रुपये ४५.
२

परगणे कारंज वाढवण्यांत जो कांहीं बाबत हिस्सा निमे सरकारचा तादाद होईल, तो इकडील, कांठी वर्धा नदी नगद पैका घेतला जाईल.

१ महालांत सरकार कलम व सरकार खेडलें व सरकार दवनार वगैरे ते वर्धा नदीच्या इकडील कांठीं शिवाय हेकी, देवगड व चांदे सेकदार व झेंडा सरकारचा पाठवूं. कच्या शिरस्त्याप्रमाणें जे कांहीं साधणूक मुकरर होईल, त्याजपैकीं गांवखर्च व सरदेशमुखी मामुलप्रमाणें वजा करून बाकी निमे निमः—

१ सरकार कुलबाब सेरसद ५०.
१ च्याहारम व नजर व घांसदाणा पट्टी पट्टीयांत वगैरे कुलबाब सेरसद रुपये ५०.
२

जो कांहीं बाबत हिस्सा निमे सरकारचा तादाद होईल त्याचा माविजा इकडील कांठीं दर्याये वर्धा घेतला जाहला.

१ महालाती मध्यें इजारदार आहेत. त्यांची साधणूक कची गांव हा गांव ध्यानास आणून गांवखर्च व सरदेशमुखी मामुलप्रमाणें वजा करून, बाकीची निशा इजारदारांकडोन करून घ्यावी. जो कोणी करार बाकई न देईल, तरी पाटील कुलकर्णी यांचे मुकाबिल्या व मवाज्यानें हिशेब पाहून, उभयपक्षीचे इतफाकानें मार्ग करून घेऊन, गांव त्यांचे हांतून सोडवावे.

१ महाल हवेली अलजपूर जागीर सरकारमध्यें घासदाण्याच्याहारम व नजर व घासदाणा व पट्टी पट्टीयांत वगैरे पंचास हजार रुपये बिन मख्ता सालीना करार झाला, तो सालबसाल दिल्हा जाईल.

१ दिगर जागीरदाराचे महालपैकीं कची साधणूक पैकीं गांवखर्च व सरदेशमुखी मामुलप्रमाणें वजा करून बाकी निमे निम.

१ जागीरदारान कुलबाल सेरसद रुपये ५०.

१ च्याहारम व नजर व घांसदाणा पट्टी पट्टीयांत वगैरे कुलबाल सेरसद रुपये ५०.

२

१ देवगड व चांदांत आह्मांस तालुक नाहीं.

१ तुह्मांकडील पागा व पतकें यांनीं महालांत एक दाम न घ्यावा. कदाचित् घेतला तरी आपले हिश्शांतून मुजरा द्यावा. अगर सरकाराकडोन कोणी घेईल तरी मुजरा देविला जाईल.

१ गांव जे मुफसद असतील त्यांस उभयतां बाईत फाळा तंबी करून रुपये घ्यावे.

१ ठाणीं व गल्या व मकाणें सरकारचीं सरकारांत व ठाणीं व गल्या व मकाणें तुह्मांकडे राहातील. कोणेही प्रकारें तर्फेनें मुजाहिमत दरम्यान न यावी.

१ साबाजी भोंसले यांचे जागीरीचे परवान्याकरितां हाजुरांत सही केली जाईल.

१ कोणी एक मातबर गृहस्थ तुह्मांकडोन या तहनाम्याच्या बंदोबस्ताकरितां हाजुरांत असला पाहिजे.

तुमचे भावाबंदापैकीं कोणी हाजुरांत आला, तरी त्याजला जागा दिल्ही जाईल. तुमचे दोस्त ते आमचे दोस्त. अगर आह्मांकडोन कोणी नाखूष होऊन तुह्मांकडे येईल त्याजला तुह्मी जागा द्यावी.

१ तर्फेन मुलखास कौल देऊन आबाद करावे. अगर कोणी आपले गर्जेकरितां, खिलाफ जाहीर करील, तरी तर्फेन मंजूर न करावे.

१ आपसामध्यें जें कांहीं वचनप्रमाण दरम्यान आला आहे, त्याप्रमाणें अमल करावा तफावत न करावा. यास दरम्यान खुदा.

## रघोजी व मुधोजी भोंसले यांचा निजामाशीं तह.

तहनामा करारदाद बमोहर रघोजी भोंसले, सेनासाहेबसुभा व बमोहर मुधाजी भोंसले, सेनाधुरंधर व दसखत हिंदवी सेनाधुरंधर.

१ तहानामा करारदाद रघोजी भोंसले, सेनासाहेबसुभा मजकूर मुधोजी भोंसले सेनाधुरंधर.

१ सरकारचे जागीरीचे महाल ठाण्यासुद्धां सोडले.

८ दारवें वगैरे महालांत राव जानोजी भोंसले हीन हायात असतां, साबाजी भोंसले यांचे तसरूफांत होते ते सोडले.

| | | |
|---|---|---|
| १ | परगणे दारवें | महाल. |
| १ | परगणे तळेगांव दसाशीर | महाल. |
| १ | परगणे माहागांव | महाल. |
| १ | परगणे खडी धाकनी | महाल. |
| १ | परगणे अमरावती राणी | महाल. |
| १ | परगणे लाडखेड | महाल. |
| १ | परगणे अंजनी | महाल. |
| १ | परगणे गिरोली | महाल. |
| ८ | | |

१२ महालांत रायाजी भोंसले व फिरंगोजी भोंसले ठाणेंजात सुद्धां भाम वगैरे.

| | | |
|---|---|---|
| १ | परगणे नायगांव | महाल. |
| १ | परगणे बारी | महाल. |
| १ | परगणे कुऱ्हाड | महाल. |
| १ | परगणे केलापूर | महाल. |
| १ | परगणे वारी | महाल. |
| १ | परगणे हिरापूर | महाल. |
| १ | परगणे हवेली कलम | महाल. |
| १ | परगणे येवंतावाद | महाल. |
| १ | परगणे चिंचोली | महाल. |
| १ | परगणे सोयेखेडें | महाल. |
| १ | परगणे डोंगर खोरा | महाल. |
| १२ | | |

महाल बारा भामसुद्धां मयठाणेंजात.

| | | |
|---|---|---|
| १ | परगणे आमनेर मैकिल्ला | महाल. |
| २ | परगणे बराड व कसबे जरूड | महाल २. |
| १ | परगणे कायेर | महाल. |
| १ | परगणे बोरी | महाल. |
| २५ | | |

१ जसी घाट, महाल सुभे वराडचे राजाराम बाबुराव यांचे अमलापासून तागाईत हाल जो पैका अधीक घेतला आहे व ठाणीं व महाल गैरसनदी आपले कबजांत आणिले, याचे जमाबंदीबाबद पैका मार्फत जफरूदोल्ला बहादूर, द्यावयाचा करार केला. बितपशील जेल पोहचावीत जाऊं. रुपये १३०००००

| | |
|---|---|
| १०००००० | घासदाणा तसरूफ. |
| २००००० | दरबार खर्च. |
| १००००० | जफरूदौला बहादूर. |
| १३००००० | |

१ महमद इस्मायलखान यांचे अमलांत जे कांहीं महाल व ठाणीं सरकारचीं आमचे कबज्यांत आलीं आहेत, व गव्या इस्मालखान यांचे अमलापूर्वीं आमचे कबजांत आहेत, ते बहाल राहावीं.

१ यंदाचे वर्षीं सन ११८४ फसलींत तहनामा लिहून दिधल्याप्रमाणें सुभे वऱ्हाडचे महालातीमध्यें नक्षत्र मृगसाल पावेतों, तहशीलेकरितां कोणी न जावें. ऐवज सन मजकूरचा सरकारांत दाखल होईल व सन ११८५ फसलींत सुरू साल, मृगसाल, खालसा व जागीरातीमध्यें पेशजीचे तहनाम्याप्रमाणें घेतलें जाईल.

१ सवाल जबाबाचा सिलसिला रघुनाथराव यांजकडोन महकुफ करून, माधवराव नारायण, पंतप्रधान यांजकडे आह्मी मजबूत केला असे. बशर्त हें कीं, सेनासाहेबसुभातीचा खिलत तिकडोन इकडे यावा.

कलमें पांच सुरुसन सीत सबैन मया व अलफ. छ १ माहे जमादिलावल, मुक्काम पंच गव्हान मुताबिक सन ११८९ हिजरी.

74

79

PLEASE DO NOT REMOVE
CARDS OR SLIPS FROM THIS POCKET

UNIVERSITY OF TORONTO LIBRARY